
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
अं. क्र. १४४२

सन १९६३

# आणि थॉमस जेफर्सन



REFBK-0013105

नवलेखन : मुंबई ४.

• संपादन : सॉल के. पॅडोव्हर, अनुवाद : नारायण पुराणिक

# लोकशाही

आणि

# थॉमस जेफर्सन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.

संपादन : सॉल के. पॅडोव्हर
अनुवाद : नारायण पुराणिक

किंमत : रु. ३

न व - ले ख न

*Thomas Jefferson On Democracy.*
Edited by Saul K. Padover.
Copyright 1939 by D. Appleton–Century Company, Inc.

मुद्रक :
श. कृ. सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
रुक्मिणी निवास, मोरबाग रोड,
दादर, मुंबई १४.

प्रकाशक :
वसंतकुमार सराफ,
नवलेखन,
५ ई, मॉडेल हाउस,
प्रॉक्टर रोड,
मुंबई ४.

REFBK-0013105
२८ दि. निबंध
१८-३-६३
८३७०५

## थॉमस जेफर्सन :

थॉमस जेफर्सन (जन्म : १३ एप्रिल १७४३; मृत्यु : ४ जुलै १८२६) हे अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष. अमेरिकन सरकारच्या ध्येयधोरणावर आणि पर्यायानें अमेरिकेच्या सविस्तर राजकारणावर थॉमस जेफर्सन यांचा जेवढा प्रभाव पडला आहे तेवढा अन्य कोणाहि पुढाऱ्याचा पडला नाहीं. आपल्या उभ्या हयातींत त्यांनीं लोकशाही आणि स्वातंत्र्य यासाठीं अत्यंत कळकळीनें प्रभावी कार्य केलें. 'जेथें जेथें मानवी मनावर कोणत्याहि स्वरूपांत जुल्म होण्याची शक्यता असेल तेथें तेथें प्रखर लढा देण्यास मी शपथपूर्वक बांधलेला आहे,' असें त्यांनीं लिहिलें होतें.

अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा त्यांनीं लिहिला. त्या वेळीं तर त्यांचें वय अवघें तेहत्तीस वर्षांचें होतें. 'हक्कांची सनद' ही अमेरिकेच्या घटनेंत समाविष्ट करण्यांत आलेली आहे. त्या सनदेचा त्यांनींच प्रथम पुरस्कार केला. त्याचप्रमाणें चालू काळांतहि अमेरिकेचें राजकारण सांभाळणारे जे दोन राजकीय पक्ष आहेत, त्यांतला एक पक्ष — डेमॉक्रॅटिक पक्ष — स्थापन करणाऱ्यांपैकीं जेफर्सन हे एक होते.

अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन, यादवी युद्धांतले राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन आणि थॉमस जेफर्सन ही अमेरिकेच्या इतिहासांतली प्रख्यात आणि प्रभावी त्रिमूर्ति आहे. कांहींच्या मतें जेफर्सन यांचें व्यक्तिमत्व तर वॉशिंग्टन आणि लिंकन यांच्यावरहि मात करणारें होतें. ते कायदेपंडित होते, राजकारणी होते, स्थापत्यशास्त्रज्ञ होते. कला आणि शास्त्रीय संशोधन यांची त्यांना आवड होती, आणि त्या क्षेत्रांत ते मग्न असत.

"समाजशासनाचे अंतिम अधिकार हे प्रत्यक्ष लोकांकडेच असले पाहिजेत. आपला अधिकार लोक शहाणपणानें वापरत नाहींत, असें दिसलें तर तो अधिकार लोकांकडून काढून घेणें हा खरा मार्ग नव्हे. उलट ते तो अधिकार शहाणपणानें वापरतील अशा दृष्टीनें त्यांना शिक्षण देणें हा खरा मार्ग आहे," असें जेफर्सन म्हणत असत.

'जेफर्सनचीं तत्त्वें' म्हणून जीं कांहीं तत्त्वें ओळखलीं जातात त्यांत या तत्त्वाचा समावेश होतो. हें तत्त्व आजहि अमेरिकेच्या सार्वजनिक धोरणाचें अधिष्ठान बनलें आहे.

१७७९ मध्यें, म्हणजे वयाच्या छत्तिसाव्या वर्षी जेफर्सन व्हर्जिनिया राज्याचे गव्हर्नर झाले. त्या काळांत त्यांनीं बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या. वारसा-हक्कांसंबंधाचे सरंजामशाही कायदे त्यांनीं संपुष्टांत आणले. मोफत शाळा आणि मोफत वाचनालयें सुरू केलीं. राज्ययंत्रणा आणि चर्च यांचें विभक्तीकरण दृढ केलें.

बेंजामिन फ्रँकलिनच्या पाठोपाठ ते फ्रान्समध्यें राजदूत म्हणून १७८५ सालीं गेले. पांच वर्षें युरोपमध्यें जिकीरीचें काम केलें. तेथून परत येतांच राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं त्यांची आपले परराष्ट्रमंत्री म्हणून नेमणूक केली. १८०० सालीं ते अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले.

* * *

## चार शब्द :

थॉमस जेफर्सन धीम्या वृत्तीचा व धोरणी मुत्सद्दी होता. आपल्या शब्दांचा राजकीय परिणाम जास्तींत जास्त व्हावा अशा धोरणानें तोलूनमापून तो बोले. त्याच्यावर वृत्तपत्रांतून अतिशय टीका होत असे. व्यक्तिशः आपल्यावर आणि आपल्या विचारांवर होणारी टीका त्याच्या मनाला लागे. व म्हणून आपल्या विरोधकांना आपल्यावर हल्ला करायची संधि तो देत नसे. १७९६ सालीं जेम्स मन्रोला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो, "आयुष्याच्या सुरुवातीपासून वृत्तपत्रांसाठीं कांहींहि लिहायचं नाहीं, असं मीं ठरवून टाकलं होतं."

हा त्याचा निश्चय एवढ्यावरच थांबला नाहीं. ह्या मुत्सद्दी तत्त्ववेत्त्यानें आपल्या राजकीय व सामाजिक विचारांची पद्धतशीर वाढहि मुद्दाम केली नाहीं. अमरिकेंत प्रस्थापित झालेल्या लोकशाहीशीं त्याचें नांव निगडित होऊन तें अमर झालें आहे. पण त्यानें लोकशाहीवर एकहि निबंध लिहिलेला नाहीं. १८१६ सालीं व्हॅन डेर केम्पला त्यानें लिहिलें, "मीं 'व्हर्जिनियावर कांहीं मुद्दे' ह्याखेरीज आणखी कांहीं लिखाण प्रसिद्ध केलंय् का, असं आपण विचारलंत; सरकारी कागदपत्रांखेरीज कांहींहि नाहीं."

असें असूनहि जेफर्सनचे लोकशाहीवरील विचार आम्हांला कसे कळले, हा प्रश्न साहजिकच उभा राहतो. त्याच्या तैलबुद्धीची ओळख आम्हांला त्याच्या पत्रांतून होते. आपले विचार जाहीर रीतीनें स्पष्ट करण्यांत जेफर्सन कमालीची खबरदारी घेत असला, तरी आपल्या पत्रांतून तो आपले विचार मोकळेपणानें लिही. त्याच्या दुर्दम्य आशाआकांक्षा, त्याचें बहुरंगी व्यक्तिमत्व, त्याची चौफेर धांवणारी कल्पनाशक्ति ह्या साऱ्यांना तो आपल्या पत्रलेखनांत मोकळें सोडी. विशाल दृष्टीच्या आणि उदार हृद-

याच्या जेफर्सननें मोकळ्या मनानें लिहिलेलीं हीं पत्रें म्हणजे अमेरिकन लोकशाहीचा अमोल ठेवा होय.

त्याच्या पत्रांतून आणि इतर लेखनांतून निवडून घेतलेले व अर्थ-बोधाच्या दृष्टीनें सुसूत्र पद्धतीनें मांडलेले ह्या पुस्तकांतील उतारे केव्हांहि उद्धृत करण्यासारखे आहेत. हें पुस्तक जेफर्सनच्या सर्व लेखनाची जंत्री नाहीं, त्याच्या निवडक विचारांची सुसूत्र केलेली मांडणी आहे, हें ह्या पुस्तकाच्या संपादकाला स्पष्ट करावेंसें वाटतें. ह्या पुस्तकांतील प्रत्येक शब्द जेफर्सनचा स्वतःचा आहे. जे वाचक हें पुस्तक वाचतील किंवा चाळतील त्यांना जेफर्सनच्या शब्दांतील वैशिष्ट्यांचा आनंद उपभोगायला मिळेल. अधूनमधून तो स्विफ्टसारखा संतापून लिहितो, तर पुष्कळ ठिकाणीं त्याचें गद्य बेकनसारखें नादमधुर आहे. त्याच्या काळांतील इतर कुठल्याहि व्यक्ती-पेक्षां जेफर्सनच्या विचारांत, त्या उदारमतवादी काळांतील विचार आणि आकांक्षा अधिक उमटल्या आहेत. मानवी चांगुलपणावरील त्या काळांतील विचारवतांचा विश्वास, मानवी प्रगतीवरील त्यांची श्रद्धा, विज्ञान व तर्कशुद्ध विचारांवरील त्यांचा विश्वास, हीं इतर कुणापेक्षांहि जेफ-र्सनच्या विचारांतून अधिक स्पष्ट झालीं आहेत.

अशा पुस्तकाची आज फार निकडीची गरज आहे. व तें योग्य वेळीं प्रसिद्ध होत आहे, असें संपादकाच मत आहे. गतकाळापेक्षां आज आम्हांला मार्गदर्शनाची, भविष्यकाळाबद्दल आशा बाळगण्याची अधिक तीव्र आव-श्यकता आहे. स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याच्या लेखकाशीं ह्या पुस्तकाद्वारें होत असलेला, पूर्व परिचय जेफर्सनच्या मायदेशाच्या नागरिकांना हवासा वाटेल, असा संपादकाचा विश्वास आहे.

* * *

# पुस्तक–परिचय

वास्तविक पाहतां, हें पुस्तक दीड शतकापूर्वींच प्रसिद्ध व्हावयास हवें होतें. अमेरिकन लोकशाहीचा सेंट पॉल म्हणून जरी जेफर्सनचा उल्लेख केला जातो आणि जरी विचारप्रदर्शन करतांना त्याच्या लेखणींतून योग्य शब्दांची अखंड मालिका कागदावर उमटत असे; शब्दभांडाराची ईश्वरी देणगी जरी त्याला मिळाली होती व तो जरी खंदा लेखक होता, तरी लोकशाहीवरील आपल्या विचारांची सुसूत्र रचना त्यानें कधींच केली नाहीं; किंवा त्या विषयावर एखादा प्रबंध किंवा पुस्तकहि लिहिलें नाहीं.

त्यानें ठिकठिकाणीं केलेल्या स्फुट लेखनांत, विशेषतः त्यानें लिहिलेल्या सुंदर पत्रांत जेफर्सनचे विचार विखुरलेले आहेत. अशा पत्रांतून आणि लेखांतून ह्या पुस्तकांतलि मजकूर घेतला आहे. संपादकानें ह्यांत स्वतःचे शब्द घातलेले नाहींत किंवा जेफर्सनच्या विचारांत कांहीं फेरफार केले नाहींत. कांहीं विचार परस्परविरोधी वाटले किंवा आर्थिक विषयां-सारख्या विषयांवरील जेफर्सनचे विचार संपादकाला न पटले, तरी ते जसेच्या तसेच ठेवण्यांत आलेले आहेत. हें पुस्तक सर्वस्वी जेफर्सनचेंच आहे.

अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याच्या ह्या लेखकानें आपले विचार मुख्यतः आपण लिहिलेल्या पत्रांतून व्यक्त केले आहेत व त्याद्वारें त्या पिढीच्या विचारसरणीवर आपल्या विचारांचा दाट ठसा उमटविला आहे. अमेरिकेंत व युरोपांत राहणाऱ्या हजारों लोकांना त्यानें पत्रें लिहिलीं. आपल्या आयुष्यांत त्यानें सुमारें पंचवीस हजार पत्रें लिहिलीं. तो स्वतः शेती करी, व शिवाय राजकारणांत भाग घेई. ह्याचा विचार केला तर ही पत्रसंख्या खरोखरीच आश्चर्य वाटण्याइतकी प्रचंड आहे. आजच्या राजका-

रण्याला व्याख्यानें, मुलाखती, रेडियोवरील भाषणें जितकीं महत्त्वाचीं वाटतात, तितकेंच पत्रलेखन जेफर्सनला महत्त्वाचें वाटे. आपल्या पत्रांच्या द्वारें तो जनतेशीं बोले, अनुयायांना उत्साहित करी. तो चांगला वक्ता नव्हता. त्यानें व्यासपीठ सोडलें आणि आपले विचार प्रदर्शित करण्यासाठीं पत्रलेखनाचा मार्ग पत्करला. राजकीय वातावरणाच्या दृष्टीनें आपण भाषण करणें अधिक प्रभावी ठरेल असें त्याला वाटलें, तरी भाषण करण्याऐवजीं तो पत्र लिही. आपलें पत्र जाहीर रीत्या वाचलें जाईल ह्याची त्याला खात्री असे. आपल्या पत्रांचा विशिष्ट राजकीय परिणाम व्हावा, लोकशाही तत्त्वांचें जनतेला त्याद्वारें शिक्षण मिळावें किंवा त्याच्याच भाषेंत सांगावयाचें तर 'उपयोगी सत्याचें बी पेरलें जावें' म्हणून जेफर्सन पत्रें लिही.

कुठलींहि मानवी मूल्यें जतन करावयाचीं असलीं, तर त्यासाठीं लढा द्यावाच लागतो. भूतकाळांतहि ज्यांचे विचार स्वतंत्र होते व स्वतंत्र होण्याचा ज्यांनीं निश्चय केला होता, अशांनींच स्वातंत्र्य जिंकलें. अशा थोड्या महाभागांत जेफर्सन प्रमुख होता. तो शास्त्रज्ञ, लेखक, विद्वान् व उत्तम शासक तर होताच; पण त्याच्या काळांतील यशस्वी राजकारणीहि होता. तो स्वभावानें लाजाळू असला, तरी खंदा लढवय्या होता. आपलीं स्वप्नें प्रत्यक्षांत पुरीं करून दाखविणाऱ्या एखाद्या महर्षिसारखा तो वाटतो.

लोकशाहीचा अर्थ तरी काय आहे? जेफर्सनच्या मतें स्वातंत्र्याची कल्पना, ही लोकशाहीचा आत्मा आहे. त्याचीं मतें त्याच्याच काळांतील वैचारिक भूमिकेंतून बनलीं होतीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तो अठराव्या शतकांतील तत्त्वज्ञानाचा अभ्यासक होता. त्या शतकांतील राजकीय घटनांतून त्याची मानसिक घडण घडली होती. युरोपांतील विचारप्रवाहांचा तो जरी अभ्यास करीत असला, तरी त्याच्या जीवनाचीं मुळें अमेरिकन भूमींत खोलवर रुजलेलीं होतीं. त्यामुळें युरोपांतील राजकीय स्वातंत्र्याबाबतचे प्रगत विचार आणि त्या प्रदेशांतील समाजाची प्रत्यक्ष असलेली अनुकंपनीय गुलामी, ह्यांच्यांतील तफावत लक्षांत येतांच त्याच्या मनाला धक्का बसला. जेफर्सनचे वडील शेतकरी होते. त्यांना स्वतःला जें कांहीं शिक्षण मिळालें होतें, तें त्यांनीं स्वतःच्या वाचनानें मिळ-

विलेलें होतें. अशा स्वतंत्र वृत्तीच्या वापाच्या सान्निध्यांत राहिल्यानें, युरोपांतील जनता ज्या रहस्यवादाच्या प्रभावानें धन्याच्या अंकित राहून जीवन जगत असे, तो जेफर्सनच्या मनाला कधीं पटला नाहीं. तर्कशुद्ध विचारांचा पुरस्कर्ता असल्यानें आणि स्वातंत्र्यांत फोफावणाऱ्या निसर्गावर त्याचें प्रेम असल्यानें, अज्ञानांधकारप्रियता आणि जुलूम ह्या मानवाच्या दोन्ही शत्रूंना अमेरिकन भूमीवर पाय रोवूं द्यायचे नाहींत, असा त्यानें निश्चय केला होता. अमेरिकेचा तिसरा अध्यक्ष म्हणून जेव्हां त्याची निवड झाली, तेव्हां आपला मित्र डॉ. रश् ह्याला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो, "मानवी मनांवर अत्याचार करणाऱ्या प्रत्येक जुलुमाच्या विरुद्ध जन्मभर लढण्याची मीं ईश्वरासमक्ष शपथ घेतली आहे."

इंग्लिश राजवटीतर्फे युरोपांतील परिस्थितीचा परिणाम अमेरिकेवर होत असे. त्याचा जेफर्सनच्या मनावर असा परिणाम झाला कीं, आपल्या स्वातंत्र्यविषयक विचारांबाबत तो किंचित्‌हि तडजोड करावयाच्या विरुद्ध होता. युरोपांतील दहा टक्के लोकांना स्वतंत्र व ऐषआरामी जीवन जगतां यावें, म्हणून नव्वद टक्के जनता गुलामींत राबत होती. १८२६ सालीं, आपल्या मृत्यूपूर्वी थोडे दिवस आधीं, त्यानें लिहिलें होतें, "बहुसंख्य माणसें जन्मतःच आपल्या पाठीवर खोगीर घेऊन जन्माला येत नाहींत किंवा कांहीं सुदैवी अल्पसंख्य माणसांना त्या बहुसंख्यांवर स्वार होण्यासाठीं कायदेशीर अधिकार देऊन ईश्वर बूट-पाटलोण चढवून जन्माला घालीत नाहीं." तत्कालीन युरोपवर, जेव्हां जेफर्सननें आपली दृष्टि टाकली, तेव्हां त्याला काय दिसलें? वेडपट असलेल्या राजाला समोर करून इंग्लंडमधील मूठभर उमराव साऱ्या देशावर राज्य करीत होते. प्रशियांत एका कार्यक्षम एकतंत्री राजाच्या जागीं दुसरा नालायक राजा येत होता. रशिया म्हणजे, तर जवळ जवळ गुलामांनीं भरलेला तुरुंगच होता व त्यांतले उमराव पौर्वात्य हुकूमशहासारखे चाबकाचे फटकारे मारून तेथील जनतेला राबवीत होते. ऑस्ट्रियांत अजूनहि उमरावांचें आणि पाद्रयांचें वर्चस्व होतें व जनता आपल्या मानेवरील त्यांचें जूं फेंकून देण्यासाठीं धडपडत होती. फ्रान्समध्यें राजसत्ता दुबळी होती व गरिबीनें जनता पिळून जाऊन क्रांतीच्या व बेबंदशाहीच्या मार्गानें पाऊल टाकीत होती. युरोपमध्यें जेफर्सनची नजर जेथें

जेथें गेली तेथें तेथें त्याला जुलूम व निराशा ह्यांचेंच वर्चस्व दिसलें.

त्या परिस्थितीचा परिणाम जेफर्सनच्या मनावर व अमेरिकेंतील राजकीय विचारांवर फार झाला,असें म्हटलें तर तें विधान कांहीं अतिरेकी ठरणार नाहीं. युरोपांतील सामाजिक स्थिति अमानुष होती. राजकीय स्थिति अन्यायी होती. ह्या असह्य परिस्थितींतून सुटण्यासाठीं,युरोपांतील लोक हजारों मैलांचा महासागर ओलांडून अमेरिकेंत येत. एकदां जेफर्सन म्हणाला, "जग कसं बनवावं ह्याबद्दल विचार करीत असतां, ईश्वराच्या मनांत कांहीं विशिष्ट आकार ठरण्याआधीं त्यानें ओबडधोबड, अंदाजें जें कांहीं बनवलं तें म्हणजे युरोप." अमेरिका युरोपपेक्षां चांगली आहे, हें सांगण्याचा त्याचा उद्देश ह्या उद्गारांत अभिप्रेत आहे.

अमेरिकेचा वकील म्हणून फ्रान्समध्यें राहात असतांना, सामाजिक वर्गभेदाबाबतचा त्याचा तिरस्कार अधिक दृढ झाला. फ्रान्समधील गरिबी व जनतेच्या होणाऱ्या हालअपेष्टा पाहून त्याला संताप आला. त्यानें लिहिलें, "फ्रान्सची लोकसंख्या दोन कोटि आहे, असें कळतें. त्यांतले एक कोटि नव्वद लक्ष लोक त्या गरिबींत, मानवी जीवनांतल्या अत्यंत हीन अवस्थेंत जगत आहेत. त्यांचें जीवन इतकें दुःखदायक आहे, कीं अमेरिकेंत दारिद्र्यांत जगत असलेल्या कुठल्याहि माणसाशीं ह्यांच्या जीवनाची तुलना केली, तर अमेरिकेंतील जीवन चांगलें म्हणतां येईल." ह्या हीन जीवनास 'वाईट शासनपद्धति' जबाबदार आहे, हें त्याला माहीत होतें.

युरोपांतील सरकारें, म्हणजे 'कबुतरांवर घारींचीं राज्यें' असल्याचें वर्णन करून त्यानें युरोपच्या मार्गानें न जाण्याचा अमेरिकेस इषारा दिला. ज्यांनीं युरोप पहिला, त्यांनाच अमेरिका हें केवढें सुंदर नंदनवन होतें, ह्याची कल्पना आली. जेफर्सननें १७८५ सालीं मन्रोला लिहिलें, "युरोपचा एकदां प्रवास केला तर, तेथील अनुभवांमुळें तुम्ही तुमच्या देशावर, त्याच्या भूमीवर, त्याच्या हवेवर, त्यांतील समानतेवर, स्वातंत्र्यावर, कायद्यांवर, जनतेवर व शिष्टाचारांवर मनापासून प्रेम करूं लागाल." तो पुढें म्हणतो, "देवा! जगांत इतर कोणाजवळहि नसलेला केवढा मौल्यवान् ठेवा आपल्याजवळ आहे, ह्याची किती थोडी जाणीव माझ्या देशबांधवांना आहे."

ह्या एक नवा देश होता. वंशपरंपरागत चालत असलेल्या, असमान समाजरचनेनें त्यांतील नागरिकांचीं मनें बोथट झालेलीं नव्हतीं. अधःपातापासून दूर राहिलेली व कुठल्याहि बंधनानें न जखडलेली जनता, सुपीक व कुठल्याहि जमीनदारांच्या तावडींत न सांपडलेली जमीन, ह्यांच्या आधारावर युरोपचा दुःखद अनुभव टाळून नवी समाजरचना करतां येणार होती. त्यांतून जेफर्सनचा जन्म त्या काळीं सरहद्द समजल्या जाणाऱ्या भागांत झालेला. त्याचे शेजारी-पाजारी, तो ज्यांना आदर देत असे असे लोक, स्वतंत्र वृत्तीचे होते व त्यांनीं जमीनदार किंवा धर्मगुरु ह्यांची मदत न घेतां आपल्या जमिनीची आंखणी केलेली होती.

जेफर्सनच्या काळांत—आणि आजहि मूळ सामाजिक प्रश्न हा शासनव्यवस्थेबाबतचा होता. समाजांतले सारे दोष हे शेवटीं शासनव्यवस्था कशा स्वरूपाची आहे व कशी काम करते ह्यांतून निर्माण होतात. एखादें नालायक सरकार आपल्या जनतेला किती क्रौर्यानें वागवील व तिच्यावर किती हीन व अपमानित जीवन जगण्याची सक्ति करील, ह्याला कांहीं मर्यादा नव्हत्या. कारण, जेफर्सनच्या काळांत नागरिकांना कसलेच राजकीय हक्क नव्हते व त्यामुळें समाज असाहाय्य स्थितींत होता. ज्या देशांत समाजाला शासनयंत्रावर नियंत्रण ठेवतां येत नाहीं, त्या देशांतील समाजाची स्थिति लांडग्यांच्या राज्यांत राहणाऱ्या शेळ्यांच्यासारखी असते, असें प्रमेयच जेफर्सननें बसवून टाकलें होतें. ह्या मुद्यावर वाद करण्याचीसुद्धां त्याला आवश्यकता वाटत नसे. जेफर्सन म्हणे कीं, वैभवशाली एकतंत्री शासनव्यवस्थेपेक्षां, वाईटांतली वाईट प्रजासत्ताक शासनव्यवस्थाहि अधिक चांगली. कारण चुका करण्याची सवलत निसर्गानें माणसांना दिली असून, जर त्यांच्या कारभारांत हस्तक्षेप न झाला तर माणसें सारासार विचार करून आपल्या चुका सुधारतात. ज्या शासनव्यवस्थेंत नागरिकांना सर्वांत अधिक स्वातंत्र्य असेल, ती शासनव्यवस्था सर्वोत्तम होय, हें तत्त्व स्वयंसिद्ध असल्याचें तो मानी; मग त्यामुळें खुद्द शासनयंत्र जरी निष्प्रभावी झालें तरी चालेल. ह्याच न्यायानें फार प्रभावी शासनयंत्र तो वाईट समजे; कारण लवकरच असें सरकार आपल्या जन्मदात्या नागरिकांची सेवा करण्याऐवजीं त्यांच्यावर स्वामित्व गाजवूं लागतें.

शासनव्यवस्थेचें स्वरूप कसें असावें, ह्याबद्दल जेफर्सनच्या मनांत स्पष्ट कल्पना होत्या. तो इतिहासाचा व्यवहारी अभ्यासक होता— व्होल्टेर-प्रमाणें इतिहासाचा अभ्यास तो त्यांतून शिकावयास मिळणाऱ्या ज्ञानासाठीं करी, करमणुकीसाठीं नव्हे— व शासनव्यवस्थे-कडे पाहातांना तो शांतपणें पाही व मोजूनमापून आपलीं मतें बनवीं. हीच दृष्टि त्याच्या समकालीन असलेल्या अनेक अमेरिकनांची, विशेषतः ज्यांनीं राज्यघटना बनविली त्यांची असे. जेफर्सनला शासनयंत्र हें आपत्तींची जननी असल्याचें वाटे, पण ती एक अटळ आपत्ति असल्याचें समजून तो सरकारचें अस्तित्व मानी. समाजावर कांहीं प्रमाणांत तरी नियंत्रण असणें आवश्यक असतें, तर व्यक्तीला मात्र कांहीं प्रमाणांत स्वातंत्र्य हवें असतें व एकमेकांचे हे हितसंबंध परस्पराविरोधी असल्यानें सुव्यवस्था व व्यक्तिस्वातंत्र्य ह्यांच्यांतला संघर्ष अटळ असतो, हें त्यानें ओळखलें होतें. ऐतिहासिक दृष्टीनें विचार केला, तर शासनसंस्था नेहेमींच व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करते. कांहीं वेळेला हें आक्रमण दडप-शाहीचे कायदे करून केलें जातें, तर कांहीं वेळेला हिंसेचा अवलंब करून होतें, हें जेफर्सनला चांगलें ठाऊक होतें. ज्यांच्यावर राज्य करावयाचें त्यांच्या हितासाठीं हातीं असलेल्या सत्तेचा वापर फारच थोड्या राज्य-कर्त्यांनीं केला, हें विधान स्वयंसिद्ध होतें. त्याच्या एका वाक्यांत त्यानें असें स्पष्ट केलें कीं, एकतंत्री राज्यकारभार किंवा बेबंदशाही ह्यांच्यांत निवडच करावयाची झाली, तर मी बेबंदशाही पसंत करीन. तो म्हणाला, “ मनुष्याच्या दुःखास कोणती अवस्था अधिक कारणी-भूत होते? अजिबात कायदे नसलेल्या आपल्या अमेरिकन-इंडियन समाजाची आहे तशी, का सुधारलेल्या युरोपांतील समाजांत कायद्यांचा जसा अतिरेक आहे तशी?— असा जर मला कोणी प्रश्न विचारला तर दोन्ही समाजांचें आयुष्य मीं पाहिलेलें असल्यानें, मी म्हणेन कीं, युरोपांतील कायद्यांच्या अतिरेकाची परिस्थिति अधिक कारणीभूत होते. ” तो पुढें म्हणतो, “ लांडग्यांच्या रक्षणाखालीं जगण्यापेक्षां आपल्या कळपांतच शेळ्या अधिक सुखी असतात. ”

सरकारांची प्रवृत्ति बव्हंशीं जुलूम करण्याकडे झुकत असल्यानें, जेफर्स-

नच्या पिढींतील लोकांपुढें सरकारी नोकरांचें राक्षसांत रूपांतर होण्याचें कसें टाळावें, हा प्रश्न होता. निराळ्या शब्दांत म्हणावयाचें तर, स्वातंत्र्यावर आक्रमण करणाऱ्या शासनयंत्राला अडवून कसें ठेवावें हा प्रश्न होता.

१७८९ सालीं जेफर्सन लिहितो, "सरकारच्या आहारीं देऊं नयेत असे कांहीं हक्क असतात व त्या हक्कांवर सरकारें सतत आक्रमण करीत असतात. असे हक्क म्हणजे विचारस्वातंत्र्य, भाषण किंवा लेखन मार्गे आपले विचार जाहीर करण्याचा हक्क, व्यापारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क."

जेफर्सनच्या मतें जीवित आणि स्वातंत्र्य ह्यापेक्षां शासनयंत्राचें स्थान दुय्यम दर्जाचें असून जीविताच्या व स्वातंत्र्याच्या शाश्वतीशिवाय सुखाचा मार्ग आक्रमणें शक्य नाहीं. माणसांचे विचार व त्यांच्या क्रिया ह्यांवर निर्बंध घालणारें प्रभावी सरकार, 'जीवनाचा आनंद नष्ट करील' व 'आपण जन्माला आलोंच नसतों, तर बरें झालें असतें' असें माणसांना वाटायला लागेल.

ह्यावर उपाय म्हणजे स्वयंशासन. सार्वजनिक कार्यें चालविणारे अधिकारी निवडण्याचा व त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा माणसांचा हक्क सुरक्षित राहील अशी त्यांना हमी दिली पाहिजे व तीहि केवळ प्रसंग आला म्हणून किंवा त्यांच्यावर उपकार म्हणून नव्हे, तर त्यांच्याकडे हें कार्य निसर्गानेंच सोंपविलें आहे म्हणून. जेफर्सन म्हणे, (आणि अठराव्या शतकांत हें एक महत्त्वाचें तत्त्व समजलें जात होतें व बरेच थोर लोक तें महान् तत्त्व मानीत), कांहीं हक्क माणसांना जन्मतःच मिळतात व हे हक्क कधींहि हिरावून घेतां येत नाहींत. अशा निसर्गदत्त हक्कांत जीविताची सुरक्षितता, स्वातंत्र्य, सुखी होण्याचा प्रयत्न करणें, हे हक्क आहेत. स्वयंशासनाचा माणसाचा हक्कहि निसर्गदत्त हक्क आहे.

प्रेसिडेंट वॉशिंग्टनला जेफर्सननें १७९० सालीं लिहिलें होतें, "प्रत्येक मनुष्याला अणि ह्या पृथ्वीतलावर असलेल्या मनुष्यांच्या प्रत्येक संघटनेला स्वयंशासनाचा हक्क आहे. जन्मतःच निसर्ग त्यांना हा हक्क देतो. व्यक्ति आपल्या इच्छेप्रमाणें ह्या हक्कांची अमलबजावणी करते. संघटना बहुसंख्यांचें म्हणणें मान्य करून करते; कारण समाजांतल्या बहुसंख्यांची इच्छा हा समाजाचा नैसर्गिक कायदा होय."

लोकशाहीच्या टीकाकारांचें असें म्हणणें होतें कीं, माणसें स्वयंशासनास लायक नसतात. ह्या आरोपाचें खंडन जेफर्सन दोन छोट्या वाक्यांत करी. तो म्हणे, "मनुष्य स्वयंशासनास लायक नाहीं असें सांगण्यांत येतें. मग दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याबाबत त्याच्यावर कसा विश्वास टाकतां येईल?" लोकशाहीवर पूर्ण विश्वास नसतांना केलेले अर्धवट प्रयोग किंवा एखाद्या व्यक्तीच्या किंवा गटाच्या मार्गदर्शनाखालीं असलेली अर्धवट लोकशाही जेफर्सनला मान्य नव्हती. त्यानें जोसेफ कॅबेलला लिहिलें, "नाहीं, माझ्या मित्रा, चांगली शासन-व्यवस्था हवी असली, तर ती एका व्यक्तीच्या हातीं देणें योग्य नव्हे, अनेकांत ती जबाबदारी विभागली पाहिजे." ड्युपाँ-दि-नेमॉर्स ह्या आपल्या फ्रेंच मित्राला त्यानें लिहिलें, "आपण दोघेहि जनतेला आपलीं मुलें म्हणतों. . . पण तुम्हांला वाटतें कीं, तीं मुलें एखाद्या आयाच्या देखरेखी-खालींच असलीं पाहिजेत, तर मी त्यांना सज्ञान समजतों व स्वतःचा कारभार तीं स्वतः चालवूं शकतात असा विश्वास ठेवतों." जेफर्सनचे हे शब्द लोकशाहीचें तत्त्व विशद करणारे सर्वोत्कृष्ट उद्गार असल्याचें मत प्रोफेसर चार्लस् ई. मेरियम् ह्यांनीं दिलें.

मनुष्यजातीच्या चारित्र्यावर आणि 'सारासार विचारबुद्धीवर' जेफर्सनचा विश्वास होता. माणसें जेव्हां आपला कारभार स्वतः पाहातात तेव्हां आपल्या हातून झालेल्या चुका सुधारण्याची त्यांना संधि मिळते, पण दुसऱ्याच्या सत्तेखालीं जगत असतांना अन्याय सहन करण्यावांचून त्यांना गत्यंतर नसतें, अथवा हिंसा करावी लागते. तो म्हणतो, "लोकांवर व त्यांच्या पुढाऱ्यांवर माझा एवढा विश्वास आहे कीं कुठल्याहि कारणानें ते अमर्याद चुका होऊं देणार नाहींत ह्याची मला खात्री वाटते." कांहीं काळपर्यंत जनतेची दिशाभूल होण्याची शक्यता आहे किंवा फसवणूकहि होईल; परंतु सत्यदर्शनाचे मार्ग जेथें उघडे ठेवण्यांत आलेले असतील, तेथील जनता असत्य व अहितकारक असेल तें दूर सारण्याला शिकेल. जेफर्सन म्हणतो, "जेथें जनतेला सर्व माहिती असते, तेथें जनता आपल्या शासनाचा कारभार चालवूं शकते; जेथें शासनकर्त्यांच्या चुका जनतेचें लक्ष वेधून घेण्याइतक्या मोठ्या असतात, तेथें त्या चुका जनता सुधारील ह्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं."

म्हणून सर्व समाजाला शिक्षण मिळावें ही लोकशाही समाजाची एक मूलभूत गरज आहे. अज्ञानावर जुल्म पोसतो, हें जेफर्सनला माहीत होतें. जेथें अज्ञानाचा अंधःकार असतो, तेथें माणसें स्वतंत्र राहूं शकत नाहींत. ज्ञानाचा प्रखर प्रकाशझोतच अंधश्रद्धेचें उच्चाटन करून स्वयंशासनासाठीं माणसाचें मन स्वतंत्र करूं शकतो. जनतेला शिक्षण मिळाल्याशिवाय लोकशाही समाजाच्या अस्तित्वाचा विचारहि करवत नाहीं. जेफर्सन म्हणतो, "एखाद्या राष्ट्रानें अज्ञानीहि राहावयाचें व स्वतंत्रहि राहावयाचें ठरविलें तर...जें पूर्वी कधीं घडलें नाहीं व भविष्यकाळीं जें कधींहि घडणार नाहीं, तें साध्य करण्याचें ठरविण्यासारखें आहे." आम जनतेला शिक्षण मिळावें अशी मागणी करण्यांत जेफर्सनचा केवळ लोकशाही सर्वकाळ टिकवून धरावी ह्याच उद्देश नव्हता, तर माणसांच्या शिक्षणानें विशाल झालेल्या दृष्टीमुळें त्यांच्या सुखांत जी भर पडते, तीहि त्याला हवी होती. तो म्हणतो, "आम जनतेला शिक्षण मिळावें ह्या हेतूनें जें कार्य आज होत आहे त्यांतून मनुष्यजातीच्या सुखांत भर पडेल, असा मला विश्वास वाटतो."

त्याच कारणासाठीं पूर्ण वृत्तपत्रस्वातंत्र्याचा जेफर्सननें पुरस्कार केला. लोकशाहीच्या यशासाठीं जशी साक्षर जनता आवश्यक असते, तसेंच त्या जनतेला वाचनाचें स्वातंत्र्य असणेंहि आवश्यक असतें. बातम्यांवर किंवा विचारप्रदर्शनावर कसलेंहि दडपण आणणें म्हणजे एकतंत्री शासनव्यवस्थेच्या जागीं जनतेच्या मनावर दडपण टाकणाऱ्या जुलमी सत्तेची स्थापना करून लोकशाही नाकारणें होय. शिवाय, अल्पसंख्य असलेल्यांचें म्हणणें ऐकून घेणें हें लोकशाहीचें सार असल्यानें, अशा नियंत्रणानें त्यांचा तो हक्क नष्ट होऊन बहुसंख्य असलेल्यांच्या हातीं जुल्म करण्याचें एक साधन दिल्यासारखें होईल. जेफर्सन म्हणाला, "वृत्तपत्रस्वातंत्र्यावरच आमचें स्वातंत्र्य आधारलेलें आहे व जर त्याच्यावरच नियंत्रण येणार असेल तर स्वातंत्र्यहि नष्ट होईल." खुद्द जेफर्सनवरच वृत्तपत्रांनीं—त्यांतले बहुतेक भाडोत्री होते—आपल्या अनिर्बंध स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन टीका केली, तरी कुठल्याहि परिस्थितींत वृत्तपत्रस्वातंत्र्य सुरक्षित ठेवलें पाहिजे, असेंच त्याला वाटे. तो अध्यक्ष झाला तेव्हां, अशा

बेजबाबदार वृत्तपत्रांबद्दल म्हणाला, "खोटें आणि बदनामीकारक लिखाण लिहिण्याच्या त्यांच्या स्वातंत्र्याचें मी रक्षण करीन."

हेंच तत्त्व पुस्तकांनाहि लागू पडतें. जेफर्सनचें असें म्हणणें होतें कीं, एखाद्या पुस्तकांत दिलेली माहिती असत्य असेल, तर तसें सिद्ध केलें पाहिजे व त्यांतले विचार चुकीचे असले तर तसें दाखवून दिलें पाहिजे, 'पण, कृपा करून आम्हांला मोकळेपणानें दोन्ही बाजू समजावून घेऊं द्या.' अप्रिय विचार ऐकून घेऊन त्यांच्यावर टीका झाली पाहिजे. सार्वजनिक कार्य करणाऱ्या व्यक्ति व सार्वजनिक कार्याचें धोरण ह्यांवर उघड अनिर्बंध टीका झाली नाहीं,तर लोकशाहीचा लवकरच अधःपात होईल. जेफर्सन म्हणतो, "सार्वजनिक कार्याच्या टीकाकारांना शिक्षा द्यावी, अशी मागणी करणें म्हणजे एका जुन्या कथेंतील लांडग्यांच्या मागणीसारखें आहे. त्या लांडग्यांत आणि शेळ्यांत शांतता रक्षणाचा करार झाला आणि त्या कराराचें पालन व्हावें म्हणून शेळ्यांचे रक्षणकर्ते कुत्रे त्यांनीं काढून टाकावेत, अशी लांडग्यांनीं मागणी केली."

ज्या लोकशाहींत विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य आहे,त्या लोकशाहींत श्रद्धास्वातंत्र्यहि अभिप्रेत असतें. एकतंत्री कारभाराच्या राजकीय दडपशाहीपेक्षां धर्मगुरूंचा जुलूम, जेफर्सनच्या मतें अधिक गर्हणीय आहे. भूतकाळीं धार्मिक अंधश्रद्धेमुळें रक्तपात झालेले आहेत, हें त्याला माहीत होतें. 'नोट्स् ऑन व्हर्जिनिया' ह्या आपल्या पुस्तकांत जेफर्सन लिहितो, "ख्रिश्चन धर्माच्या सुरुवातीपासून लाखों स्त्री, पुरुष व मुलें जाळलीं गेलीं, त्यांचे हाल करण्यांत आले. पण एकसूत्री समाजाचा उद्देश साधण्याच्या मार्गानें आपण एक इंचभरसुद्धां प्रगति केली नाहीं." धार्मिक एकता प्रस्थापित होणें शक्य नसल्यानें आणि योग्यहि नसल्यानें, तसें करण्याचे प्रयत्न सोडूनच दिले पाहिजेत. ज्याला जसें वाटेल तसें धर्मपालन त्यानें करावें, वाटलें तर मुळींच करूं नये. जेफर्सन म्हणे, "मनुष्याचा निर्माता ईश्वर व मनुष्य ह्यांचाच संबंध धार्मिक श्रद्धेशीं येत असल्यानें इतर कुणाला, विशेषतः समाजाला, त्यांत हस्तक्षेप करण्याचें कारण नाहीं." जेफर्सन स्वतः चर्चमध्यें जात नसे, त्याला धार्मिक पंथहि आवडत नसत; परंतु जिझसनें सांगितलेल्या नैतिक तत्त्वांवर त्याची अचल श्रद्धा होती.

धार्मिक श्रद्धेबाबत नागरिकांना शिक्षा करणें जेवढें असह्य असतें, तितकेंच नागरिकांनीं कोणत्या धर्माचें पालन करावें हें शासनसंस्थेनें ठरविणेंहि असह्य आहे. अमेरिकन राज्यक्रांतींतून जीं कांहीं शाश्वत मूल्यें प्रस्थापित झालीं त्यांत धार्मिक सहिष्णुता हें एक होतें. आणि हें नवें युग सुरू करणाऱ्या, व्हर्जिनियाच्या विधानसभेनें १७८६ सालीं संमत केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या आपल्या कायद्याचा जेफर्सनला जन्मभर अभिमान वाटला. हा कायदा जेफर्सननें लिहिला होता. ह्या कायद्याची सुरुवातच पुढील उच्च तत्त्वानें केलेली आहे: "सर्वशक्तिमान् ईश्वरानें मनुष्याचें मन स्वतंत्र निर्माण केलें असल्याची जाणीव असल्यामुळें..." आणि ह्या कायद्याचा शेवटचा भाग लिहितांना, धार्मिक श्रद्धेवर बंधन घालणारें कुठलेंहि कृत्य 'निसर्गदत्त हक्कांचा भंग करणारें आहे' असें मानलें जाईल, असा इशारा दिलेला आहे. जेफर्सनच्या मानवविषयक तत्त्वज्ञानांत धार्मिकसहिष्णुता ही केवळ धर्माच्या दृष्टीनें आवश्यक समजली गेली नाहीं, तर लोकशाही समाज टिकवून धरण्यासाठीं ती आवश्यक मानली आहे. धार्मिक असहिष्णुता किती क्रूर असते ह्याची त्याला जाणीव होती व प्रमुख सत्ताधारी धर्मपक्षांशीं जेव्हां शासनयंत्र हातमिळवणी करतें, तेव्हां केवढी प्रचंड दडपशाही होऊं शकते, त्याची त्याला कल्पना होती. अशा युतीचें जेफर्सननें, 'धार्मिकपंथ आणि शासनसंस्था ह्यांची घृणास्पद युति' अशा शब्दांत वर्णन केलें. अशा युतीनें भूतकाळांत मानवी समाजावर भयंकर आपत्ति आणली असल्यामुळें, अमेरिकेंत ती होऊं देतां कामा नये. तो म्हणतो, "प्रत्येक देशांत, प्रत्येक काळांत धर्मोपदेशक हा स्वातंत्र्याचा शत्रूच राहिला आहे. त्यानें नेहमींच एकतंत्री जुलमी राज्यकर्त्यांशीं संगनमत करून त्यांच्या जुलमांवर पांघरूण घातलेलें आहे व त्या बदल्यांत त्यांच्याकडून आपल्या जुलमी कृत्यांचें रक्षण करून घेतलें आहे." अमेरिकेंतील नागरिकाचें शरीर आणि मनहि स्वतंत्र असलीं पाहिजेत व त्यानें कोणत्या धर्माचें पालन करावें, हें त्याला सांगण्याचा अधिकार व्यक्तीला अथवा कायद्याला असूं नये. जेफर्सननें पुढील स्पष्ट शब्दांत हें तत्त्व सांगितलें आहे:

"देवांची एकूण संख्या वीस आहे, असें माझा शेजारी म्हणाला किंवा

देव अजिबात नाहीं, असें त्यानें मत दिलें तर त्यामुळें मला कसलीहि दुखापत होत नाहीं. त्यामुळें कांहीं माझ्या खिशांतले पैसे चोरीस जात नाहींत किंवा माझा पाय मोडत नाहीं."

अमेरिकन लोकशाहीवरील नितांत श्रद्धेमुळें जेफर्सनला आंतरराष्ट्रीय राजकारणांत एकाकी पडावें लागलें. त्याचा कटु अनुभव लक्षांत घेतां दुसरा कुठलाहि मार्ग स्वीकारणें त्याला शक्य नव्हतें. त्याच्या राजकीय जीवनांतील बराच मोठा भाग युरोपांत नेहमीं होणाऱ्या उठावांपैकीं एका उठावाच्या काळांत गेला. वॉशिंग्टन अध्यक्ष असतांना जेफर्सन परराष्ट्र-खात्याचा मंत्री होता. ह्या काळांत फ्रेंच जनता आपल्या राजाचा शिरच्छेद करण्यांत गुंतली होती व परराष्ट्राशीं युद्ध होण्याचा मार्ग मोकळा करीत होती. जेफर्सन जेव्हां अमेरिकेचा उपाध्यक्ष होता, तेव्हां बोनापार्ट एकामागून एक विजय संपादून युरोपावरील आपल्या हुकूमशाहीचा मार्ग मोकळा करीत होता. जेफर्सन जेव्हां अमेरिकेचा अध्यक्ष झाला, तेव्हां त्याच्या भोंवतालच्या जगांतील भूमि नेपोलियन पायांखालीं तुडवीत होता, तर सागरावर ब्रिटिश धुमाकूळ घालीत होते. जवळजवळ वीस वर्षें तो अधिकारांच्या जागांवर होता, त्या सर्व काळांत जगांत कधीं शांतता नव्हती. हा आंतरराष्ट्रीय रक्तपात पाहून जेफर्सन जवळ जवळ हताश होई. एकदां त्यानें अतिशय कडवटपणें आपला मित्र मॅडिसन ह्यांस लिहिलें, "सर्व पशुराज्यांत फक्त मानवाचेंच कुटुंब सातत्यानें व पद्धतशीरपणें आत्मनाश करीत आहे. इतर कुठलाहि पशु तसें करीत असल्याचें मला दिसत नाहीं." आणि गेल्या एकशेंतीस वर्षांपूर्वी त्यानें उच्चारलेले शब्द आज अधिक अर्थपूर्ण रीतीनें जागतिक परिस्थितीस लागू होतात. तो म्हणाला : "सुसंस्कृत राष्ट्रांना आजपर्यंत एकमेकांशीं निगडित राखणारीं नीतितत्त्वें व आचार–विचार...आज नाहींशीं होऊन त्यांची जागा बलानें घेतली आहे. तो रानटी लोकांचा कायदा आला आहे व एकोणिसाव्या शतकाचा उदय घातपाती कृत्यांनीं होत आहे."

युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांनीं अमेरिकेचे हक्क व अमेरिकन जहाजें ह्यांच्यावर आक्रमण केलें. अशा परिस्थितींत अमेरिकेनें काय करावें? युद्ध पुकारावें? जेफर्सनच्या मतें,हा मार्ग ज्या कारणामुळें स्वीकारावयाचा त्या कारणाइतकाच वाईट होता. त्यानें लिहिलें, "मला शांतता आवडते आणि

आपला अपमान करणाऱ्यांना युद्धाखेरीज निराळ्या मार्गानें शिक्षा देऊन जगाला एक नवा धडा घालून द्यावा असें मला वाटतें. युद्धामुळें ज्याला शिक्षा मिळतें त्याच्याइतकेंच नुकसान, जो शिक्षा करतो त्यालाहि सहन करावें लागतें." हा 'निराळा मार्ग' म्हणजे युद्धांत अडकलेल्या राष्ट्रांशीं असलेले सर्व संबंध तोडून टाकणें, कुठल्याहि आक्रमकाशीं व्यापारी संबंध न ठेवणें आणि अमेरिकेच्या स्वतंत्र समाजव्यवस्थेंत त्यांच्या भांडणाचा कसल्याहि प्रकारें उपसर्ग होऊं न देणें.अंदाधुंदीच्या परिस्थितींत सांपडलेल्या जगांत अमेरिकेचें असलेलें स्थान जेफर्सननें ज्या शब्दांत वर्णिलें आहे, ते शब्द आजच्या परिस्थितींतहि तितक्याच स्पष्टपणें लागू पडतात. तो म्हणाला :

"फक्त आपल्या देशाचाच विचार केला, तर आपल्यापुढील अडचणी खूपच मोठ्या आहेत. पण युरोपांतील देशांशीं तुलना करून पाहिलें तर आपला देश हा नंदनवनासारखा आनंदमय आहे, असें म्हटलें पाहिजे... नियतीनें आपल्याला अशा काळांत जन्माला घातलें आहे कीं, असा अशांत काळ साऱ्या इतिहासांत दुसरा सांपडावयाचा नाहीं... खरोखर... आपण पुष्पशय्येवर आहों असें म्हटलें पाहिजे. आणि सारें जग फुटून तुटून गेलें तरी, त्या विध्वंसांत जी शासनपद्धति आपल्याला तरंगत ठेवणार आहे, ती इतिहासांत अमर ठरेल. आमच्यांतहि लहान-मोठीं भांडणें, हेवेदावे आहेत आणि कांहीं वेळां आमच्यांतहि मारामाऱ्या होतात.. परंतु आपल्या नशिबानें त्या राक्षसाला पोहोतां येत नाहीं, कीं सागरी प्राण्याला जमिनीवर सरपटतां येत नाहीं. आपण जर त्यांना टाळलें, तर त्यांचे हात आपल्यापर्यंत पोंचणार नाहींत."

युरोपांतील 'सिंह व वाघ' ह्यांपासून अमेरिकेनें दूर रहावें एवढेंच त्याचें धोरण नव्हतें, तर त्यांनाहि अमेरिकेच्या वाटेला जाऊं देऊं नये, हेंहि होतें. महासागराच्या मध्यावर एखादी रेषा ओढून पृथ्वीचे दोन्ही अर्ध-गोल कायम विभागून निरनिराळे ठेवतां यावेत, अशी व्यवस्था करण्याची त्याला इच्छा होती. अमेरिका खंडाचा भविष्यकाळ स्वातंत्र्यांत व शांततेंत जावा, अशी त्याला आशा वाटत होती — व म्हणून युरोपांतील युद्धांचा परिणाम पश्चिम गोलार्धावर होऊं नये याची तो खबरदारी घेई. अमेरिका ह्याप्रमाणें अशांत जगापासून निराळें ठेवण्याबद्दल

त्याला वाटत असलेली काळजी त्यानें आपला शिष्य प्रेसिडेंट मन्रो ह्याला लिहिलेल्या पत्रांतून स्पष्ट झाली आहे. तो अमेरिका केवळ अलग ठेवूं इच्छित होता असें नव्हे, तर तिला बाहेरच्या कुठल्याहि वातावरणाचा उपसर्ग पोंचूं नये म्हणून, ‘ हवाबंद ’ करूं इच्छित होता. हें धोरण पुढें ‘ मन्रो तत्त्वां ’त ( मन्रो डॉक्ट्रीन ) समाविष्ट होऊन जगापुढें आलें. ह्या तत्त्वाचें स्पष्टीकरण जेफर्सननें मन्रोला लिहिलेल्या एका पत्रांत केलें आहे :

“ युरोपांतील भांडणांत प्रत्यक्ष भाग न घेणें, असें अमेरिकेचें मूलभूत धोरण असावें, असें मी सतत मानीत आलों. त्यांचे राजकीय हितसंबंध आमच्यापेक्षां निराळे आहेत. त्यांचे आपसांतील हेवेदावे त्यांच्यांतील सत्तेचा समतोलपणा, त्यांचे गुंतागुंतीचे गट, शासनव्यवस्थेचीं त्यांचीं तत्त्वें व तिचे प्रकारहि सर्व आम्हांला अपरिचित आहेत. सतत युद्ध करीत राहणारीं तीं राष्ट्रें आहेत. त्यांच्या सर्व शक्ती ते त्यांच्या लोकांचे श्रम, मालमत्ता व जीवित ह्यांचा विध्वंस करण्यांत खर्चीं करतात. उलट, त्यांच्या बरोबर विरुद्ध धोरणानें वागण्याची आमच्यासारखी संधि इतरांना कधीं मिळाली नव्हती. आमचें धोरण शांतता राखण्याचें, सर्व मनुष्यमात्राशीं मैत्रीचे संबंध ठेवण्याचें, आमच्या बुद्धीचा व सर्व साधनांचा उपयोग विनाशासाठीं करण्याऐवजीं आमची स्थिति सुधारण्यासाठीं करण्याचें आहे. युरोपशीं सहकार्य करण्याचे फारच थोडे प्रसंग आमच्यापुढें येतील व थोड्या धोरणानें व दूरदर्शीपणानें ते संभाळून घेतां घेतील. आमच्या अर्धगोलांत राहाणाऱ्या आमच्या बांधवांपैकीं आज कोणीहि आमच्याशीं युद्ध करण्याच्या अवस्थेंत किंवा मनःस्थितींत नाहीं व पुढें युगभर तरी असणार नाहींत. युरोपच्या ज्या राष्ट्रांनीं आपले पाय दाक्षिण किंवा उत्तर–अमेरिकेंत रोंवले होते, त्यांच्या पायांखालील जमीन आतां सरकूं लागली असून, लौकरच त्यांच्या शेजारपणांतून आपण मुक्त होऊं. ”

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बाबतींत स्वीकारलेलें अलिप्ततेचें धोरण, आर्थिक बाबतींतहि स्वीकारण्यांत आलें. जेफर्सन शेतकऱ्याचा मुलगा होता. स्वतः शेतकरी होता. शहरी जीवन व व्यापारी ह्याबद्दल त्याच्या मनांत संशय असे. शहरी संस्कृति व शहरी अर्थव्यवस्था ह्यांच्याबद्दल त्याच्या मनांत असलेला संशय त्याला आपल्या मनांतून कधींच दूर करतां आला

नाहीं. जेफर्सनचा असा विश्वास होता कीं, खेड्यांतील जनतेला स्वतःची जमीन असल्यानें त्यांना अधिक स्वातंत्र्य वाटतें व कुणावर अवलंबून राहावें लागत नाहीं व ह्यामुळें शहरी जनतेपेक्षां ग्रामीण जनता अधिक बरी.

ग्रामीण भागाचें शहरीकरण झालें तर,त्यामुळें लोकशाही मूल्यें नष्ट होऊं लागतील, अशी भीति वाटत असल्यानें जेफर्सनला अमेरिकन समाज हा शेतीप्रधान समाजच राहावयास पाहिजे होता. अमेरिकेनें आपल्याला पाहिजे तेवढें धान्य पिकवावें; परंतु कारखान्यांतून उत्पादन करूं नये असें त्याला वाटत असे. "आपल्याला जें उत्पादन करून हवें असेल त्याचे कारखाने युरोपांतच राहूं द्या" असें त्यानें लिहिलें होतें. युरोपांत त्यांचा कामगारवर्ग राहूं द्या, त्यांच्या घाणेरड्या वस्त्याहि राहूं द्या. अमेरिकेंत मात्र शेतीप्रधान लोकशाही आणि भरपूर मोकळ्या जमिनी असूं द्या. कारखान्यांतून तयार झालेल्या मालाच्या बदली शेतांत पिकलेला माल देण्याइतकाच युरोपचा अमेरिकेशीं संबंध असावा.

जेफर्सनच्या काळापेक्षां आज परिस्थिति कितीतरी बदलली आहे. आधुनिक शास्त्रांनीं आतां वातावरणसुद्धां काबीज केलें आहे. अमेरिकन अर्थव्यवस्थेंत त्यापेक्षांहि मोठा बदल घडून आला आहे. १८०० सालीं अमेरिकेची लोकसंख्या ५० लाख होती व देश शेतीप्रधान होता. आतां अमेरिका औद्योगिक क्षेत्रांत अग्रगण्य राष्ट्र झालें असून, लोकसंख्या १७ कोटींवर गेली आहे. औद्योगिक क्षेत्रें जशीं निर्माण झालीं, तसे गुंतागुंतीचे अनेक प्रश्न निर्माण झाले, सामाजिक संघर्ष वाढले. पण त्याबरोबरच त्यामुळें अमेरिकन लोकशाहीची व्याख्याहि बदलावी लागली. जेफर्सनच्या काळचा शेतकरीसमाज जसा लोकशाही जीवन जगत होता, तसेंच जीवन आजची शहरी जनता जगत असलेली पाहून त्याला आश्चर्य वाटलें असतें; कदाचित् आनंदहि झाला असता.

मानवी समाजांत कांहींहि कायम किंवा निश्चल राहात नाहीं, हें जेफर्सनला माहीत होतें. आणीबाणीच्या वेळीं, त्याच्या बांधवांच्या जीविताचा प्रश्न जेव्हां येई, तेव्हां जेफर्सन तात्त्विक बाजूंकडे दुर्लक्ष करी. प्रागतिक लोकशाहीचे पुरस्कर्ते जेफर्सननें १८१६ सालीं लिहिलेल्या पुढील शब्दांचें स्वागत केल्यावांचून राहाणार नाहींत :

"काहीं लोक राज्यघटनांकडे धार्मिक श्रद्धेनें पाहातात व मंदिराच्या कमानी-सारख्या त्या पवित्र मानून त्यांना स्पर्श करणें निषिद्ध समजतात. पूर्वजांचें ज्ञान सर्वसाधारण माणसांपेक्षां वरच्या दर्जाचें होतें असें मानून, त्यांनीं जें कांहीं केलें असेल त्यांत सुधारणा करण्याचा कुणालाच अधिकार नाहीं, असें समजतात...राज्यघटनांत आणि कायद्यांत सतत आणि निराधार बदल करीत रहावें, असें मला वाटत नाहीं. कांहीं सौम्य प्रकारचे दोष खपवून घ्यावेत, असें मला वाटतें...पण मानवी मनाच्या प्रगतीबरोबरच कायदे व संस्था हीं प्रगत झालीं पाहिजेत, हें मला माहीत आहे...जसे नवे शोध लागतात, नवीं सत्यें उजेडांत येतात, परिस्थिति बदलेल त्याप्रमाणें वागणूक व शिष्टाचार जसे बदलत जातात, तशा संस्थाहि बदलून अद्य-यावत् राहिल्या पाहिजेत. आपल्या रानटी पूर्वजांनीं घालून दिलेल्या नियमांनुसारच समाजांनीं वागलें पाहिजे, असा आग्रह धरणें म्हणजे लहान-पणीं एखाद्या मुलाला होणारा सदरा तो मोठा झाल्यावरहि त्यानें घातला पाहिजे असा आग्रह धरण्यासारखेंच आहे...प्रत्येक पिढीला...आपल्या सुखी जीवनास योग्य वाटेल अशा प्रकारचें सरकार निवडण्याचा हक्क आहे."

आधुनिक काळांत सरकारच्या हातीं अधिक प्रमाणांत सत्ता केंद्रित करण्याकडे जास्त कल आहे. जेफर्सनच्या काळांत जसा राजकीय स्वातंत्र्य व खुले बाजार ह्यांसाठीं लढा द्यावा लागला, तसाच लढा आजच्या काळां-तहि कमी–अधिक प्रमाणांत नियंत्रित असलेल्या अर्थव्यवस्थेच्या चौकटींत व्यक्ति–स्वातंत्र्याच्या प्रश्नावर द्यावा लागेल. आपल्याला लोकशाहीच्याच मार्गानें पाऊल उचलावें लागेल; कारण आपली परंपरा तशीच आहे, आणि आशा करूं या, आपले विचारहि तसेच आहेत.

स्वातंत्र्याशिवाय जीवन जगणें व्यर्थ होय, असें जेफर्सनला वाटे. लोक-शाहीचें ध्येय श्रद्धेशिवाय गांठतां येत नाहीं आणि लोकशाहीच्या मार्गानें जाण्यास अंगीं धैर्य लागतें, ह्याची अमेरिकन जनतेला जाणीव आहे. जेफर्सन लोकशाही मार्गाचा द्रष्टा होता. त्यानेंच स्वतंत्र नागरिकांचे, आपण निवड-लेल्या सरकारशीं संबंध कसे असावेत तें स्पष्ट केलें. आमच्या ह्या मार्गांत तोच आमचा वाटाड्या राहील, आमचा मार्गदर्शकदीप ठरेल. कारण आज आमच्यापुढें असलेल्या समस्यांचा त्यानें मुकाबला केला होता व 'ज्ञानाचा

प्रकाश व स्वातंत्र्य सतत पुढें पाऊल टाकीत आहेत ' अशी श्रद्धा मोठ्या धैर्यानें ठेवली होती.

अमेरिकन लोकशाहीचें स्वरूप समजावून घेण्यासाठीं व नव्या दृष्टिकोनांतून तिचें वैशिष्ट्य लक्षांत येण्यासाठीं, जेफर्सनच्या राजकीय व सामाजिक विचारांवरील हें पुस्तक उपयोगी पडेल, असें ह्या पुस्तकाच्या संपादकास वाटतें. जेफर्सनच्या लिखाणाची ही जंत्री नव्हे, त्याच्या तत्त्वांची तर्कशुद्ध मांडणी करून त्याचे विचार स्पष्ट करणारें हें पुस्तक आहे. ह्यांत घेतलेले उतारे जेफर्सनच्या प्रसिद्ध झालेल्या लिखाणांतून आणि 'न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी मॅन्युस्क्रिप्ट रूम'* मधें असलेल्या हस्तलिखितांतून घेतलेल आहेत. त्याच्या विचारांत संपादकानें आपले विचार मिसळलेले नाहींत. संपादकानें विषयवारी मजकूर मांडला व कांहीं वेळां कांहीं अप्रासंगिक वाटणारा मजकूर गाळला. (हा भाग . . .अशा टिंबांनीं सूचित केला आहे.) मूळ शब्द व वाक्यरचना तशाच ठेवल्या आहेत. मुख्यतः पुनरुक्ति टाळण्यासाठीं संपादकानें मजकूर निवडतांना आपलें तारतम्य वापरलें आहे. ज्यांना थोडक्यांत जेफर्सनच्या विचारांचें सार पाहिजे असेल त्यांनीं १ लें परिशिष्ट वाचावें. त्यांत विषयानुक्रमानें जेफर्सनचीं बोधवचनें दिलीं आहेत.

हस्तलिखित तयार करण्याच्या कामीं मिसेस् एलिनॉर बर्मन आणि मिस् एस्थर डेव्हिडसन् ह्यांनीं दिलेल्या साहाय्याबद्दल व वारंवार उत्तेजन दिल्याबद्दल मिस्टर फ्रॅन्सिस विकवेअर ह्यांचा संपादक आभारी आहे.

— सॉल के. पॅडोव्हर.

---

* कॅांग्रेसच्या लायब्ररींत जेफर्सनचीं बहुतेक हस्तलिखितें आहेत, परंतु त्या सर्वांतील सार काढून प्रसिद्ध करण्यांत आलेलें आहे.

: १ :

# मनुष्याचे निसर्गदत्त हक्क

## हीं सत्यें स्वयंसिद्ध आहेत :

( स्वातंत्र्याचा जाहीरनामा, १७७६ )

आम्ही हीं सत्यें स्वयंसिद्ध मानतों :

—जन्मतः सर्व माणसें समान असतात;

—ईश्वर त्यांना जन्मतःच* हक्क देतो व ते हक्क केव्हांहि हिरावून घेतां येत नाहींत;

—अशा हक्कांत जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करण्याचे हक्क येतात;

—असे हक्क मिळवून देण्यासाठीं माणसें सरकार स्थापन करतात व अशा सरकारांना ज्या माणसांवर त्यांचें नियंत्रण चालतें त्यांच्या संमतीनें अधिकार दिले जातात.

---

* कॉंग्रेसनें 'जन्मतःच' हा शब्द काढून त्या शब्दाऐवजीं 'कांहीं' असा शब्द घातला आहे.

म्हणून आमचें गाऱ्हाणें दूर करण्यासाठीं जेव्हां आम्हांला शस्त्र उचलावें लागलें, तेव्हां आमच्या कृत्याच्या समर्थनार्थ जगाच्या न्यायासनासमोर आम्ही केलेलें आवेदन योग्य समजलें गेलें, ह्याच हेतूनें स्वातंत्र्याचा जाहीरनामा काढण्यांत आला. हा जाहीरनामा काढण्यापूर्वी कधींहि व्यक्त न झालेलीं कांहीं नवीं तत्त्वें व्यक्त करावींत, किंवा पूर्वी कधीं कोणी न बोललेले

जेव्हां असें कोठलेंहि सरकार ह्या उद्दिष्टांचा नाश करूं लागतें, तेव्हां अशा सरकारांत बदल करून आपलें जीवित व सुख सुरक्षित राहील अशा दृष्टीनें योग्य तत्वावर आधारलेलें व योग्य अधिकार असलेलें नवें सरकार स्थापन करण्याचा अधिकार जनतेला आहे.

## मनुष्य जन्मतःच स्वतंत्र असतो

( १. १९१३ N. Y. pub. Lib. Ms. N. १९३. )

आमचीं मुलें जन्मतःच स्वतंत्र आहेत, असें आम्ही मानतों; आम्ही असेंहि मानतों कीं, त्यांचें हें स्वातंत्र्य त्यांना जन्म देणाऱ्यांकडून मिळत नाहीं, तर निसर्गानेंच त्यांना दिलेली ती देणगी आहे. त्यांच्या बाल्यावस्थेंत आपण त्यांची काळजी घेतों, त्यामुळें व तशी काळजी घेण्याची आवश्यकता असल्यामुळें, तीं आपल्या सहानुभूतिपूर्ण अधिकाराखालीं असतात. मुलाचें रक्षण करण्यासाठीं आणि हितासाठींच आम्ही ह्या अधिकाराचा वापर करूं शकतों........मनुष्य हा त्याच्या बापाची मालमत्ता नसल्यामुळें तो सज्ञान झाल्यावर त्याला कायदेशीर अस्तित्व आहे—( He is Sui Juris ) त्याला आपले स्वतःचे अवयव आपल्या इच्छेनुसार वापरण्याचा आणि आपल्या श्रमाचें फळ चाखण्याचा हक्क आहे.

---

विचार बोलून दाखवावेत हा उद्देश नाहीं, तर अखिल मानव-जातीसमोर सर्वसाधारण बुद्धीला पटेल अशा पद्धतीनें साध्या, स्पष्ट व निश्चित भाषेंत आपलें म्हणणें मांडून त्यांची संमति आपल्याला मिळावी व स्वातंत्र्याची जी भूमिका आपल्याला घेणें भाग पडलें त्या भूमिकेचें समर्थन करावें हे उद्देश आहेत. त्या जाहीरनाम्यांतील तत्त्वें किंवा भावना नव्या, मौलिक नाहींत किंवा दुसऱ्या एखाद्या विशिष्ट लेखनाची ती नक्कलहि नाहीं. अमेरिकन जनतेच्या मनांतील भावना शब्दांत स्पष्ट कराव्यात व ह्या प्रसंगाला साजेलशी भाषा आणि आवेश त्यांत स्पष्ट व्हावा असा उद्देश त्यामागें आहे. ( हेन्री ली ह्यांस, १८२५. )

## जुलमी सरकार उलथून पाडण्याचा हक्क

### स्वातंत्र्याचा जाहीरनामा ( १७७६ )

क्षुल्लक किंवा क्षणिक कारणांसाठीं प्रस्थापित सरकारें बदलूं नयेत हें सारासार विचार केला तर स्पष्ट होतें. त्यामुळें जोंपर्यंत अनाचार सहन करण्यासारखे असतात, तोंपर्यंत माणसें असे अनाचार सहन करतात. पण ज्या प्रकारच्या राज्ययंत्राची त्यांना संवय झालेली असते त्या प्रकारांत बदल करीत नाहींत हें अनुभवानें स्पष्ट झालेलें आहे. पण जेव्हां एकाच उद्देशानें एकामागें एक अन्याय होऊं लागतात व शासनाधिकाराचा वारंवार गैर उपयोग होऊं लागतो व माणसांना जुलमी, अनियंत्रित राज्यसत्तेखालीं दडपून टाकण्याचा त्यामागें हेतु असतो, तेव्हां असें सरकार उलथून पाडण्याचा आणि भविष्यकाळीं सुरक्षिततेची हमी राहील अशीं बंधनें घालण्याचा त्यांना हक्क आहे; हें त्यांचें कर्तव्य आहे.

## व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क

### ( मन्रोस, १७८२. )

आपण कांहीं प्रमाणांत इतरांच्या उपयोगीं पडावें असा जरी आपल्या अस्तित्वामागें हेतु असला तरी बव्हंशीं आपण आपल्या हितासाठीं जगावें. आपल्या शेजाऱ्यांसाठीं किंवा सर्व समाजासाठीं राबण्यापेक्षां स्वतःवर माणसाचा कमी अधिकार आहे असें म्हणणें मानवी स्वभावाच्या विरुद्ध व चमत्कारिक ठरेल. ही गुलामी ठरेल. आपल्या राज्यघटनेनें दिलेले व्यक्तिगत हक्क हे नव्हेत. ते हक्क स्वयंभू आहेत व त्यांचें रक्षण करण्याचें कर्तव्य आपल्या सरकारवर सोंपविण्यांत आलेलें आहे. राज्ययंत्राला समाजांतील प्रत्येक घटकाची सेवा घेण्याचा कायम अधिकार आहे असें मत दृढ होऊं देणें म्हणजे आपण स्वातंत्र्याचे मिळविलेले हक्क गमावून बसणें हें होय. कांहींच्या मतें आम्हांला जन्म देणाऱ्या ईश्वराला हा विरोधच ठरेल. कारण त्यानें सुखी होण्यासाठीं आम्हांला जन्माला घातलें; गुलामींत खितपत पडण्यासाठीं नव्हे. आणि अशा दृष्टीनें विचार करणाऱ्यांना असें जीवन जगण्यापेक्षां जन्माला आलों नसतों तर बरें झालें असतें असें वाटतें.

## विचार व आचार–स्वातंत्र्याचा हक्क

### ( हंफ्रेस ह्यांस १७८९ )

कांहीं हक्क सरकारच्या ताब्यांत देणें अयोग्य असतें. पण सरकार नेहमींच अशा हक्कांवर अतिक्रमण करीत असतें. विचार करण्याचा हक्क, विचार बोलून दाखविण्याचा अथवा प्रकाशित करण्याचा हक्क, अनिर्बंध व्यापार करण्याचा हक्क व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क असे हे हक्क आहेत. सरकारी व्यवस्या चालविण्यासाठीं कांहीं विश्वासार्ह साधनें असतात. अशीं साधनें बदलण्याचें स्वातंत्र्य विधानसभांना आपण कधींहि देऊं नये. नव्या राज्यघटनेंत कायदे करणाऱ्या ( Legislative ) व अंमलबजावणी खात्यांत ही व्यवस्था करण्यांत आली आहे. तरी न्यायदानखात्यांत ती तशी नाहीं. जनतेनेंच न्यायदान करावें, म्हणजे ज्युरी पद्धत असावी, अशी व्यवस्था करावयास हवी होती. कांहीं साधनें हीं राष्ट्रांतील जनतेच्या हक्कांच्या दृष्टीनें इतकीं धोक्याचीं आहेत कीं, त्या साधनांमुळें शासकांच्या दयाबुद्धीवर समाजाला आपलें अस्तित्व टिकवावें लागतें. म्हणून अशीं साधनें कांहीं विशिष्ट परिस्थितींतच सिद्ध ठेवावींत, असा स्पष्ट निर्बंध शासकांवर घालणें आवश्यक आहे. मग शासक कायदे बनविणारा असो कीं अंमलांत आणणारा असो. अशा साधनांपैकीं खडें लष्कर हें एक साधन आहे.

## स्वयंशासनाचा हक्क

Opinion...whether the seat of government shall be transferred to the Potomac, July 15, 1790.

पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक मनुष्याला व मनुष्यांच्या प्रत्येक गटाला स्वयंशासनाचा हक्क आहे. निसर्गानें त्यांना निर्माण केलें म्हणूनच त्यांना हा हक्क मिळाला आहे. व्यक्ति ह्या हक्काची अंमलबजावणी स्वतः करते. गट हा त्यांतील बहुसंख्याच्या मतातर्फे; कारण बहुमतानें बनविलेला कायदा हा प्रत्येक मानवी समाजाचा नैसर्गिक कायदा होय.

## अनिर्बंध संपर्काचा हक्क

### ( मन्रो ह्यांस, १७९७ )

एका नागरिकानें दुसऱ्या नागरिकाला त्यांच्या संयुक्त हिताच्या बाबीवर, मग त्या खाजगी असोत किंवा सार्वजनिक असोत व अशा बाबी कोणत्याहि कायद्यामुळें तयार होत असोत, अनिर्बंध पत्रें लिहिण्याचा हक्क हा नैसर्गिक हक्क होय. हा हक्क कोठल्याहि नगरशासन-यंत्रानें बनविलेल्या कायद्यांची देणगी नव्हे. मग तो इंग्लंडचा कायदा असो, व्हर्जिनियाचा असो किंवा कॉंग्रेसनें केलेला असो. उलट, इतर सर्व नैसर्गिक हक्कांच्या बरोबरीनें अशा हक्कांच्या संरक्षणासाठींच समाज बनविला गेला व कायदे बनविले गेले.

## एका पिढीला बंधनांत ठेवण्याचा दुसऱ्या पिढीला हक्क नाहीं

### ( जे. डब्ल्यू. एपेस ह्यांस, १८१३ )

ही पृथ्वी जिवंत असणारांची आहे, मृतांची नव्हे. निसर्गनियमांनुसार मनुष्याच्या मृत्यूबरोबर त्याची इच्छाशक्ति व त्याचे अधिकारहि नष्ट होतात. कांहीं समाजांत ते उद्योगप्रियतेस चालना देण्यासाठीं कृत्रिमतेनें चालू ठेवण्यांत येतात. तर कांहीं समाज ते मानीत नाहींत. उदाहरणार्थ, ज्या आमच्या शेजाऱ्यांना आम्ही रानटी म्हणतों ते असे अधिकार मानीत नाहींत. माणसाची प्रत्येक पिढी ही गट किंवा संघटना म्हणून समजण्यांत यावी. प्रत्येक पिढीला स्वतःच्या आयुष्यांत पृथ्वीच्या भोगवट्याचा अधिकार आहे. जेव्हां त्या पिढीचें अस्तित्व संपतें तेव्हां हा भोगवट्याचा अधिकार नव्या पिढीकडे अनिर्बंधपणें व कसल्याहि बंधनाविरहित जातो आणि ह्या क्रमानें एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात राहतो.

आपण प्रत्येक पिढी म्हणजे एक राष्ट्र समजू या. या पिढीला बहुमताच्या संमतीनें, स्वतःवर निर्बंध घालून घेण्याचा अधिकार आहे. पण एका राष्ट्रांतील जनतेला दुसऱ्या राष्ट्रांतील जनतेवर निर्बंध घालण्याचा जसा अधिकार नाहीं तसाच एका पिढीला दुसऱ्या पिढीवर निर्बंध घालण्याचा अधिकार नाहीं. किंवा आपण

असें म्हणूं या कीं, एका पिढीचा अधिकार जमीन कसणाऱ्या कुळांसारखा असतो. अशा कुळाला हयातींत जमिनीच्या भोगवट्याचा अधिकार असतो व आपलीं कर्जें फेडण्यासाठीं त्याला जमीनहि गहाण टाकतां येते. पण त्याच्या मृत्यू-बरोबर ज्याच्या हातीं जमीन जाते त्याला ती बोजारहित मिळते. एका पिढीचें आयुष्य आयुर्मानाच्या नियमांनुसार ठरतें. निरनिराळ्या हवामानाप्रमाणें आयुर्मानांत थोडे फरक असतात. पण अभ्यास करून त्यांची सरासरी काढतां येते. मी बफॉनच्या पत्रकाचें उदाहरण देईन. त्यांतील नोंदविलेल्या तेवीस हजार नऊशें चौऱ्याण्णव (२३९९४) मृत्यूंपैकीं, ते मृत्यू ज्या वयांत घडले त्यांचा विचार करतां, मला असें आढळतें कीं एका विशिष्ट क्षणीं जिवन्त असलेल्या सर्व माणसांच्या वयाचा विचार करतां त्यांपैकीं निम्मीं वयाचीं चोवीस वर्षें व आठ महिने पुरीं होतांच मरतील. पण ( ज्यांना स्वयंशासनाचा हक्क नाहीं असे अल्पवयी सोडल्यास ) एका विशिष्ट क्षणीं जिवन्त असलेल्या सज्ञानांपैकीं ( एकवीस वर्षांचें वय असलेल्या सज्ञानांसाठीं ) बहुसंख्य लोक समाजासाठीं राबतात. त्यांतलीं अर्धीं माणसें अठरा वर्षें आणि आठ महि-न्यांच्या काळांत मरण पावतील. म्हणजे करार करणारांपैकीं बहुसंख्य करार करणारे कराराच्या दिवसापासून एकोणीस वर्षांत मरण पावतात. व त्यांच्या मृत्यूबरोबर त्यांचे करारहि नष्ट होतात.

## ( गव्हर्नर प्लूमरला १८१६

राष्ट्राच्या उपयोगासाठीं प्रस्थापित केलेल्या संस्थांना, त्या संस्था चालविण्यासाठीं विश्वस्त म्हणून नेमलेल्यांनाच त्यांच्याबाबत अधिकार दिले गेले आहेत, अशा समजुतीनें, स्पर्शहि करतां येणार नाहीं किंवा त्या ज्या उद्देशानें अस्तित्वांत आणल्या गेल्या त्या उद्दिष्टांच्या दृष्टीनें त्यांस बदलहि करतां येणार नाहीं; ही कल्पना एकतंत्री कारभार करणाऱ्या राजाला त्या संस्थांचा दुरुपयोग करतां येऊं नये ह्या दृष्टीनें योग्य वाटत असली तरी राष्ट्रहिताच्या दृष्टीनें चमत्कारिक होय. तरीहि आपला वकीलवर्ग व धर्मोप-देशक हें तत्व मानतात आणि मृत पिढीला पृथ्वीवर आपल्यापेक्षां अधिक स्वातंत्र्य होतें असें मानून, त्या पिढीला, त्यावेळचे कायदे आमच्यावर लाद-ण्याचा अधिकार असल्याचें प्रतिपादतात. त्या कायद्यांत बदल करण्याचा

आम्हांला अधिकार नाहीं असें मानतात, आणि आम्हांला कायदे करण्याचा वेत पुढील पिढीवर लादण्याचा अधिकार आहे असें प्रतिपादतात. त्या कायद्यांत बदल करण्याचा अधिकार नाहीं असें सांगतात. थोडक्यांत, त्यांच्या म्हणण्याप्रमाणें ह्या पृथ्वीवर मृतांची सत्ता आहे; जिवंत असणारांची नाही.

## नैतिक मूल्यें माणसांत उपजतच असतात

## (टी. लॉ. ह्यांस, १८१४)

कांहीं माणसें जन्मांध असतात, कांहीं माणसें मुकीं असतात. कांहींना दांत नसतात. तरीहि ज्या अवयवांचीं जीं कार्यें आहेत, त्या कार्यगुणांशिवाय मनुष्य जन्माला येतो हें म्हणणें चूक आहे व मनुष्य ह्या शब्दाच्या व्याख्येंत त्याला दिसणें, ऐकायला येणें व हात असणें हीं अभिप्रेत आहेत. ज्याप्रमाणें कांहीं माणसें आंधळीं अगर बहिरीं जन्माला आलीं म्हणजे अंधत्व किंवा बहिरेपणा हा मानवी प्राण्याचा गुणधर्म आहे असें आपण मानीत नाहीं; त्याप्रमाणें कांहीं माणसांत नैतिक मूल्यांचा अभाव असला किंवा तीं अपुरीं असलीं म्हणजे तो मनुष्यस्वभाव आहे असें मानतां येणार नाहीं. जेव्हां माणसांत नैतिक मूल्यांचा अभाव असतो तेव्हां तो दोष दूर करण्यासाठीं आपण शिक्षण देतों, त्याच्या सारासार बुद्धीला व व्यवहारबुद्धीला आवाहन देतों. अशा दुर्दैवी व्यक्तीला आपण वाईट सोडून चांगलें करण्यासाठीं कांहीं उद्दिष्टें देतों. त्याला प्रेमाची ओळख करून देतों, किंवा द्वेष व तिरस्कार सोडायला सांगतों किंवा ज्या समाजांत ती व्यक्ति रहाते त्या व्यक्तीच्या सुखाला आणि अस्तित्वालाहि समाजांतील इतर व्यक्तींच्या सहवासाची आवश्यकता असेल त्या व्यक्तीला समाजाशीं फटकून वागण्यापासून परावृत्त करतों. त्याला व्यवहारी दृष्टीनें पटवून देतों कीं, प्रामाणिकपणेंच वागणें अंतिम हिताचें आहे–ठरतें. कायद्यानें ठरविलेलें शासन किंवा पारितोषिक त्याच्या दृष्टीला दाखवितों. व आयुष्यांत केलेल्या वाईटाची शिक्षा भोगावी लागते किंवा चांगल्याचें चांगलें फळ मिळतें हें स्पष्ट करतों. शिक्षणाद्वारें हे उपाय योजले जातात. व ह्या उपायांद्वारें नैतिक धडे देणाऱ्यांचें, धर्मोपदेशकांचें व कायदे बनविणारांचें कार्य घडत असतें.

नैतिक मूल्यांचें अस्तित्व कांहीं लोक नाकारतात. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, जर निसर्गानें असें मूल्य आपल्याला दिलें असतें तर निसर्गानेंच चांगलीं कृत्यें व वाईट कृत्यें निरनिराळीं ओळखण्यासाठीं त्या कृत्यांनाच कांहीं खाणाखुणा निर्माण केल्या असत्या पण प्रत्यक्षांत आपणांला असें दिसतें कीं एखादें कृत्य एका देशांत चांगलें समजलें जातें तर दुसऱ्या देशांत त्याच कृत्याला वाईट म्हटलें जातें. ह्या म्हणण्याला आधार असे कीं, निसर्गानें असें मोजमाप करण्यासाठीं आणि चांगलें काय तें ठरविण्यासाठीं कृत्यांची उपयुक्तता माणसाला शिकविली आहे. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या परिस्थितींत, निरनिराळ्या संवयींच्या व निरनिराळ्या राजवटींत राहणाऱ्या व्यक्तींत एकाच कृत्याची उपयुक्तता निरनिराळी असूं शकेल. म्हणून एक कृत्य एका देशांत उपयुक्त व म्हणून चांगलें ठरेल तर दुसऱ्या देशांतील निराळ्या परिस्थितींत तेंच कृत्य उपद्रवी व म्हणून वाईट ठरेल. म्हणून सर्वसाधारण माणसांत नैतिक मूल्यांची उपजत भावना असते, असा माझा प्रामाणिक विश्वास आहे. मला वाटतें, ही भावना माणसाच्या चारित्र्याच्या कोंदणांतील सर्वांत तेजस्वी रत्न आहे. ह्या भावनेचा अभाव हा हिडीस वाटणाऱ्या कुठल्याहि शारीरिक व्यंगापेक्षां अधिक हिडीस आहे.

## कायद्यांच्या नैसर्गिक मर्यादा

### ( एफ्. डब्ल्यू. गिल्मर ह्यांस १८१६ )

आमचे नैसर्गिक हक्क व कर्तव्यें जाहीर करून तीं अंमलांत आणणें हें आपलें खरें कार्य आहे. आमचे हक्क किंवा कर्तव्यें हिरावून घेणें हें नव्हे. ह्या आपल्या सत्तेच्या योग्य मर्यादांची ओळख अजून आमचे कायदे बनविणारांना झालेली नाहीं. दुसऱ्यांच्या हक्कांवर अतिक्रमण करण्याचा कुठल्याहि माणसाला नैसर्गिक अधिकार नाहीं व फक्त अशा अतिक्रमणापासून त्याला परावृत्त करावें. समाजाच्या गरजा पुरविण्यासाठीं काम करण्याचें कर्तव्य निसर्गतः प्रत्येक माणसावर आहे व फक्त तेंच पार पाडण्याची सक्ति कायद्यानें त्यांच्यावर करावी. दोन व्यक्तींतील वादांत संबंधित व्यक्तीला स्वतःबद्दल न्याय देण्याचा नैसर्गिक अधिकार नाहीं.

तिसऱ्या निःपक्षपाती व्यक्तीचा निर्णय मानणें हें त्या व्यक्तीचें नैसर्गिक कर्तव्य होय. हें कायद्यानें जाहीर करून अंमलांत आणलें कीं, कायद्याचें कर्तव्य पुरें होतें. आपण समाजांत आलों कीं, आपला कुठलाहि नैसर्गिक हक्क आपण सोडून देतों ह्या कल्पनेला कांहींहि आधार नाहीं.

## मनुष्याच्या समाजांतील हक्कांचा सारांश

### (डुपाँ डी नेमार्स ह्यांस, १८१६)

माझा असा विश्वास आहे कीं,......शील, सहानुभूति, औदार्य हीं मानवाची घडण घडविणाऱ्या मूल्यांतीलच आहेत. बलाशीं संबंधित नसलेला हक्क अस्तित्वांत आहे. आमच्या गरजा, त्या गरजा पुऱ्या करण्यासाठीं, आम्ही वापरीत असलेलीं साधनें वापरून, दुसऱ्यांच्या हक्कांवर अतिक्रमण न करतां, आम्ही जें मिळविलें असेल तें आमच्या हक्काचें राहावें, ह्यांतून मालमत्ता ठेवण्याचा हक्क निर्माण झालेला आहे. दुसऱ्याला आडकाठी करण्याचा हक्क कोणालाहि नाहीं. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठीं आपले नैसर्गिक गुण सहजपणें वापरणें हा मानवाचा स्वभावच आहे. न्याय हा समाजाचा मूलभूत नियम आहे. व्यक्तीस दडपून टाकणारे हे बहुसंख्य गुन्हेगार असून, ते आपल्या शक्तीचा दुरुपयोग करतात. 'बळी तो कान पिळी' ह्या मार्गाचा अवलंब करून समाजाचा पायाच उखडून टाकतात. आपल्या आवाक्यांतील बाबींत स्वतःचें कार्य करणें व इतर बाबींत स्वतः निवडलेल्या व स्वतःला ज्यांचें प्रतिनिधित्व रद्द करतां येईल, अशा प्रतिनिधीतर्फे कार्य करणें हाच लोकसत्ताकाचा गाभा आहे.ज्या प्रमाणांत हें तत्त्व शासनसंस्था स्थापण्यांत पाळलें गेलें असेल, त्या प्रमाणांत ती शासनसंस्था लोकशाहीची ठरते. प्रातिनिधिक शासनसंस्था ही इतर कुठल्याहि प्रकारच्या शासनसंस्थेपेक्षां देशांतील अधिक विस्तृत भूमीवर सत्ता चालवूं शकते.

## आशा

### (वेटमन ह्यांस, जून २४,१८२६)

माणसांच्या हक्कांची जाणीव सर्वांना झाली आहे किंवा होत आहे. सर्वांचें डोळे उघडले आहेत किंवा उघडत आहेत. शास्त्राच्या ज्ञानाचा प्रकाश

सर्वत्र पसरत आहे व त्या प्रकाशांत हें सत्य स्पष्टपणें सर्वांच्या नजरेस पडत आहे कीं, बहुसंख्य माणसें कांहीं जन्मतःच आपल्या पाठीवर खोगीर घेऊन जन्माला येत नाहींत किंवा कांहीं सुदैवी अल्पसंख्य माणसांना त्या बहुसंख्यांवर स्वार होण्याचा कायदेशीर हक्क देऊन बूट–पाटलोण चढवून ईश्वर जन्माला घालीत नाहीं.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलगत.
अनुक्रम ............ दि. ............
क्रमांक ............ नों. दि. ............

: २ :

# लोकशाहीचीं तत्त्वें

## पवित्र तत्त्वज्ञान

### ( हार्टले ह्यांस, १७८७. )

एखाद्या राजाशिवाय स्वतःचा कारभार माणसें स्वतः चालवूं शकतात, ह्यांवर विश्वार ठेवण्यांत आपल्या प्रयोगाची परिणति होईल ह्याबद्दल मळा शंका नाहीं; पण जर उलट झालें तर, एक तर ईश्वर नाहीं किंवा असला तर तो दुष्ट बुद्धीचा आहे, असें माझें मत बनेल.

## लोकशाहीचे आणि क्रांतीचे फायदे

### ( मॅडिसन ह्यांस, १७८७ )

समाजाची संघटना तीन पद्धतींनीं होते. ह्या पद्धति स्पष्टपणें एकमेकांपासून ओळखूं येतात.

( १ ) शासनसंस्थेशिवाय, आपल्या अमेरिकेंतील इंडियन्स आहेत, त्याप्रमाणें,

( २ ) समाजांतील प्रत्येक व्यक्तीला आपलें मत प्रदर्शित करतां येईल, अशा संस्थेच्या आधिपत्याखालीं—अल्प प्रमाणांत ही पद्धत इंग्लंडमध्यें व बऱ्याच मोठ्या प्रमाणांत आपल्या देशांत आहे.

( ३ ) सक्तीनें राज्यकारभार चालविणाऱ्या शासनसंस्थेखालील. राजाच्या अधिपत्याखालीं असलेले देश व इतर देशांतील प्रजासत्ताकें ह्या पद्धतीचीं

आहेत. ह्या शेवटच्या पद्धतीखालील समाजाचीं दुःखें पाहिल्याशिवाय कळायचीं नाहींत. हीं राज्यें म्हणजे मेंढरांवर लांडगे सत्ता गाजवितात तशीं आहेत.

शासनव्यवस्थेंतील पहिला प्रकार सर्वोत्तम आहे कीं काय ह्याबद्दल मला शंका आहे. मला वाटतें, जास्त लोकसंख्या असलेल्या भागांना ही पद्धत अयोग्य आहे. दुसरी पद्धत बऱ्याच प्रमाणांत चांगली आहे. ह्या पद्धतींत असलेल्या बहुसंख्य समाजाला बऱ्याच प्रमाणांत स्वातंत्र्य व सुख मिळतात. ह्या पद्धतींत कांहीं दोषहि आहेत. प्रक्षोभाचा ह्या पद्धतीवर आघात होतो, हा त्या पद्धतींतील सर्वांत मोठा दोष आहे. पण राजसत्तेच्या जुलुमांशीं तुलना केली तर, हा दोष कांहींच नाहीं. उलट ह्या दोषांतूनहि पुष्कळदां चांगलें बाहेर येतें. ह्यामुळें शासनसंस्थेंतील शैथिल्य नाहींसें होऊन, सामाजिक कार्याकडे तिचें लक्ष वेधलें जातें. आपल्या जड विश्वांत वादळें जशीं आवश्यक आहेत, तसेंच प्रक्षोभ व बंडें राजकीय क्षेत्रांत आवश्यक आहेत, असें माझें मत आहे. बंडें अयशस्वीं झालीं तरी शासनसंस्थेनें समाजाच्या कोणत्या हक्कांवर अतिक्रमण केल्यामुळें तीं झालीं हें स्पष्ट होतें. अशा बंडांच्या कारणांकडे शुद्ध दृष्टीनें पाहिल्यास, प्रजासत्ताकांतील शासकांनीं बंडखोरांना कडक शासन करण्याऐवजीं त्यांना सौम्य शिक्षा करून, बंडाचें पूर्णतः निर्मूलन करूं नये अशीच इच्छा होईल. शासनसंस्थेची प्रकृति धडधाकट राहण्यासाठीं बंडाचें औषध आवश्यक आहे.

**( डब्ल्यू. एस. स्मिथ ह्यांस, १७८७. )**

वीस वर्षांच्या आपल्या अस्तित्वांत असें बंड न झालें तर, ती ईश्वरी अवकृपाच म्हणायची. सर्व जनतेला सदासर्वकाळ कारभाराची पूर्व माहिती मिळणें शक्य नाहीं. समाजाच्या ज्या भागाचें चुकलें असेल तो भाग, त्यांना वस्तुस्थितीच्या चुकीची ज्या प्रमाणांत माहिती मिळाली असेल, त्या प्रमाणांत असमाधानी राहील. असें असमाधान उराशीं बाळगून समाजाचा तो भाग जर स्वस्थ राहिला तर ती शिथिलता म्हणजे, सामाजिक स्वातंत्र्याच्या येऊं घातलेल्या मृत्यूची खूणच समजावी. अकरा वर्षें आपलीं तेरा राज्यें स्वतंत्र आहेत. ह्या काळांत फक्त एकच बंड झालें. प्रत्येक राज्यास

दीड शतकांत एक बंड असें हें प्रमाण पडतें. दीड शतकांत एकहि बंड झालें नाहीं, असा दुसरा कोणता देश आहे ? आणि देशाच्या शासकांना, आपल्या देशांतील जनतेंत प्रतिकाराची भावना जागृत आहे, असा वेळोवेळीं इशारा न मिळाला तर कोणत्या देशांतील सामाजिक स्वातंत्र्य टिकून राहील ? त्यांना शस्त्रें उचलूं द्या. त्यांच्याविरुद्ध उपाय म्हणजे त्यांना वस्तुस्थितीचें योग्य ज्ञान देणें, त्यांना क्षमा करणें व त्यांचें समाधान करणें. शतका–दोन शतकांत कांहीं लोक मृत्यूमुखी पडले, तर त्याचें एवढे काय महत्त्व ? स्वातंत्र्याच्या वृक्षाला वेळोवेळीं देशभक्तांचें व जुलुम्यांचें रक्त शिंपडलें गेलेंच पाहिजे. त्या वृक्षाचें हेंच एक नैसर्गिक खत आहे.

## फ्रेंच राज्यक्रांति आणि अंदाधुंदी

### ( शॉर्ट ह्यांस, १७९३ )

आवश्यक असलेल्या संघर्षांत पुष्कळ दोषी माणसें त्यांच्यावर कसल्याहि प्रकारचे खटले भरले न जातां मारलीं गेलीं. त्यांच्याबरोबर कांहीं निर्दोषी माणसेंहि बळी पडलीं. ह्या घटनांचा मी इतरांप्रमाणेंच निषेध करतों व कांहीं घटनांचा तर मी मरेपर्यंत निषेध करीत राहीन. पण ते लढाईत बळी पडले असते तर मी त्यांच्या मृत्यूचा जसा निषेध केला असता, तसाच आतां करतों. जनतेच्या सामर्थ्याचा उपयोग करणें आवश्यकच होतें आणि जनतेच्या सामर्थ्याचें हें यंत्र तोफांच्याइतकें आणि बॉंबगोळ्यांइतकें आंधळें नसलें, तरी कांहीं प्रमाणांत आंधळें असतेंच. त्यांच्या थोड्या हितचिंतकांनाहि त्यांच्या शत्रूसारखें मरावें लागलें. पण जसा काळ जाईल व सत्य उघडीला येईल, तशा त्यांच्या आठवणी आदरानें जागृत होतील व ज्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं त्यांनीं प्राणार्पण करण्यास कधींहि मागेपुढें पाहिलें नसतें तें स्वातंत्र्य त्यांच्यानंतरच्या पिढ्या उपभोगतील. ह्या संघर्षांतून जगाच्या पाठीवरील सर्व मानवजातीच्या स्वातंत्र्याचें भवितव्य ठरविलें जात होतें. एवढें मोठें पारितोषिक, एवढ्या थोड्या निरपराध्यांचें रक्त सांडून कधींतरी मिळालें होतें का ? ह्या संघर्षांत बळी पडलेल्या कांहीं हुतात्म्यांच्या मृत्यूनें मला वाटणाऱ्या आपलेपणालाहि

धक्का बसला. पण हा संघर्ष अयशस्वी होण्याऐवजीं अर्धी पृथ्वी उध्वस्त झालेली मी पत्करली असतीं; जरी फक्त एकच आदाम आणि एकच ईव्ह शिल्लक राहिले असते आणि त्यांना स्वातंत्र्य मिळालें असतें तरी आजच्या स्थितीपेक्षां, मी तें पसंत केलें असतें.

## अखेरीस लोकशाही क्रांतीचाच विजय होणार

### (ॲडाम ह्यांस १८२३)

जी पिढी क्रांतीला सुरुवात करते ती क्वचित्‌च ती क्रांति पुरी करूं शकते. बालपणापासून राजा आणि धर्मगुरु ह्यांच्या आज्ञा मानायची त्यांच्या शरीराला व मनाला संवय लागलेली असल्यानें, त्यांना स्वहिताचा विचार करण्याची, त्यांचें रक्षण करण्याची पात्रता राहिलेली नसते. त्यांच्या अज्ञानामुळें व दुराग्रहामुळें ते पुष्कळदां बोनापार्ट किंवा इतूर्वेदे ह्यांच्यासारख्यांच्या हातचें हत्यार बनतात. युरोपांतील व स्पॅनिश अमेरिकेंतील आजची स्थिति ही अशी आहे. पण ही स्थिति आणीबाणीची आहे असें नाहीं. छपाईच्या कलेमुळें, मानवाच्या जीवनपथावर पडलेल्या प्रकाशामुळें साऱ्या जगांतील परिस्थितींत मोठाले बदल घडत आहेत. हा प्रकाश आज फक्त युरोपांतील मध्यमवर्गाच्या जीवनपथावर पडला आहे. राजे आणि खालची अज्ञानी जनता हीं दोन्हीं सारखीच अज्ञानी आहेत व ह्या प्रकाशाचे किरण अजून त्यांच्या जीवनपथापर्यंत पोंचले नाहीत. पण हा प्रकाश पसरत आहे व जर मुद्रणकलेची जोपासना केली तर सूर्य जसा एकदां गमन केलेल्या मार्गावरून परत फिरणें शक्य नाहीं, तसा हा प्रकाशहि कधीं अंधुक होणार नाहीं. स्वयंशासनाचा हक्क मिळविण्याचा पहिला प्रयत्न एखादे वेळीं फसेल, दुसरा फसेल; तिसरा फसेल— आणखीहि फसतील, पण नवी, अधिक ज्ञानी पिढी जसजशी पुढें येईल, तसतशी ही भावना त्यांच्यांत सहजतेनें रुजत जाईल. चवथा, पांचवा किंवा आणखी नंतरचा प्रयत्न तरी यशस्वी होईलच व असे एकामागें एक प्रयत्नहि होत राहातील.

## लोकप्रिय सरकारची कल्पना ग्रीकांना कां नव्हती ?

### (आय्. एच्. टिफॅनी ह्यांस, १८१६.)

सध्यांच्या समाजरचनेपेक्षां त्या लोकांची (ॲरिस्टॉटलच्या काळच्या

ग्रीकांची ) समाजरचना इतकी निराळी होतीं कीं, मला असें वाटतें कीं त्यांच्या लिखाणावरून त्या समाजरचनेची फारच थोडी कल्पना येऊं शकेल. व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या योग्य कल्पना त्यांना होत्या, परंतु त्या कल्पनांची जोपासना करण्यासाठीं योग्य त्या शासनयंत्राची रचना कशी असावी याची त्यांना कल्पना नव्हती. एक तर लोकशाही ( शुद्ध प्रजासत्ताक ) असावी किंवा जनतेपासून अलिप्त असलेली सरंजामशाही आणि जुलुमी राज्यपद्धति यांना शरण जावें. या दोन्हींखेरीज इतर कोणत्याहि रचनेची त्यांना कल्पना नव्हती. जेव्हां राज्यव्यवहार नागरिक स्वतः करूं शकत नाहींत तेव्हां केवळ नागरिकांनाच राज्यव्यवहार करणारे आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो ह्याची, आणि त्यामार्गें शुद्ध प्रजासत्ताकापेक्षां कमी दर्जाचें प्रजासत्ताक राज्य किंवा लोकप्रिय सरकार देशाच्या वाटेल तेवढ्या भागावर सत्ता गाजवूं शकेल ह्याची त्यांना कल्पना नव्हती.

लोकशाही पद्धतीचें आणि प्रातिनिधिक सरकार अस्तित्वांत आणण्याचा प्रयोग हा आपणच करावा म्हणूनच जणूं राखून ठेवला आहे. ही कल्पना ( वास्तविक इंग्लिश राज्यघटनेंत पूर्वीं असलेल्या पण आतां नष्ट झालेल्या छोट्या नमुन्यावरून घेतलेली. ) आपण कायदे बनविणाऱ्या व कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व खात्यांतून कमीअधिक प्रमाणांत अंमलांत आणलेली आहे... प्रातिनिधिक लोकशाहीचें हें तत्त्व अंमलांत आणल्यापासून, त्यापूर्वीं शासनयंत्राच्या रचनेबाबत लिहिलें गेलेलें बहुतेक सर्व लिखाण निरुपयोगी ठरलें आहे; आणि पुष्कळ अंशीं अरिस्टॉटलनें किंवा त्याच्यासारख्या दुसऱ्या एखाद्या पुराणपुरुषानें लिहिलेलें राजकीय लिखाण निरुपयोगी ठरल्याचें दुःख वाटत नाहीं... माझी अशी तीव्र इच्छा आहे कीं, प्रजासत्ताक पद्धतीचें लोकप्रिय नियंत्रण व्यवहार्य असेल तेथें जास्तींत जास्त प्रमाणांत अंमलांत यावें. आपलें सरकार शुद्ध व शाश्वत आहे ह्यावर मग मी विश्वास ठेवीन.

## जनताच चारित्र्यहीन असल्यामुळें रोममध्यें लोकशाही नव्हती

**( ॲडाम्स ह्यांस, १८१९. )**

आणि समजा, सीझर जेवढा पराक्रमी व व्यवहारदक्ष होता तेवढाच

सद्गुणी जरी असता, तरी त्यानें बळकावलेल्या सत्तेच्या ऐन ऐश्वर्यांतहि आपल्या नागरिकांना चांगलें शासनयंत्र ( सरकार ) देण्यासाठीं काय केलें असतें ? मी नागरिकांना 'पुन्हा चांगलें सरकार देण्यासाठीं' असें शब्द वापरले नाहींत. कारण सॅबिन्सच्या अत्याचारापासून ( the rape of the sabines ) तों सीझरनें केलेल्या विध्वंसापर्यंत ह्या लोकांना चांगलें सरकार कधीं मिळालेंच नव्हतें. आपल्याप्रमाणें ती जनता जर खरोखर ज्ञानी, शांतताप्रेमी व खऱ्या अर्थानें स्वतंत्र असती तर वरील प्रश्नाला पुढील उत्तर मिळणें साहजिक होतें.

"जीं परकीं राष्ट्रें अंकित करून घेतलीं आहेत त्यांना स्वतंत्र करा;रोमच्या विस्कळित सरकारापासून इटली स्वतंत्र करा. स्वयंशासनाचा अधिकार असलेलें राष्ट्र म्हणून तिच्याशीं सल्लामसलत करा, आणि तिच्या इच्छेप्रमाणें वागा." पण सारे राष्ट्रच नैतिक अधःपात, दुर्वर्तणूक आणि लांचखोरी ह्यांत खोल रुतलेलें असल्यानें ( आणि त्या अधोगतीस सर्वांत जास्त सीझरनेंच हातभार लावल्यानें ) सिसेरी, कॅटो, ब्रुटस् ह्यांना जरी त्यांच्या राष्ट्रासाठीं चांगलें सरकार स्थापन करण्यास सांगितलें असतें तरी ते काय करणार होते ? त्यांच्या नालायक सीनेटपलीकडे त्यांना चांगल्या शासनसंस्थेची कल्पनाच नव्हती. त्यांच्या टायब्यूनसमधील गटागटांच्या विरोधापलीकडे जनतेलाहि स्वातंत्र्याची कल्पना नव्हती. पुढें टायटस् ट्रेजन आणि अँटो-नायनस त्या जनतेंत निर्माण झाले. ह्या लोकांना जनतेला सुखी करण्याची इच्छा होती व शासनसंस्थेची योग्य रचना करून तिला कायम स्वरूप देण्याचें सामर्थ्यहि होतें. पण असें करण्यासाठीं त्यांना योग्य मार्ग दिसत नव्हता असें वाटतें. जनतेच्या आधि-पत्याखालीं असल्याशिवाय कोठलीहि शासनसंस्था चांगली होऊं शकत नाहीं आणि त्यांची जनता इतकी अधःपतित व चारित्र्यहीन होती कीं, योग्य नियंत्रण राखणें त्या जनतेच्या शक्तीबाहेरचें होतें.

## लोकशाही म्हणजे स्थैर्य : जुलूम म्हणजे बंड
## ( मॅडिसन ह्यांस, १७८७ )

शासनयंत्र जेव्हां अतिक्रियाशील राहातें तेव्हां मी तशा शासनयंत्राला

पाठिंबा देऊं शकत नाहीं, हें मी कबूल करतों. असें शासनयंत्र नेहमींच जनतेची कदर न करतां असें सरकार शासकांना पूर्ण मोकळीक देतें. मॅसाशुसेट्स्‌मध्यें झालेल्या बंडामुळें जितकी भीति वाटली तितकी वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. हिशेब करा. अकरा वर्षांत, तेरा राज्यांत केवळ एक बंड झालें; म्हणजे दीड शतकाच्या काळांत एका राज्यांत एक बंड पडतें. बंड झाल्याशिवाय एवढा काळ कुठल्याहि देशांत जाऊं नये. शासनसंस्थेच्या हातीं कितीहि सत्ता दिली तरी बंडें व्हावयाचीं थांबणार नाहींत. इंग्लंडमध्यें तर राजसत्ता आपल्याकडील शासनसंस्थेपेक्षां अधिक प्रभावी आहे, तरीहि एखादें तरी बंड झाल्याशिवाय पांच–सहा वर्षांचा काळ क्वचित्‌च जात असेल. फ्रान्समधील शासनयंत्र इंग्लंडपेक्षां अधिक प्रभावी पण इतर देशांच्या मानानें कमी जुलमी आहे, असें मॉण्टेस्क्यु मानतो आणि फ्रान्स-मध्यें बंडें दडपण्यासाठीं दोन ते तीन लाख सैनिक नेहमीं तयार असूनहि, माझ्या तीन वर्षांच्या वास्तव्यांत तेथें तीन बंडें झालीं व त्यांपैकीं प्रत्येक बंडांत आपल्या मॅसाशुसेट्स्‌च्या बंडापेक्षां अधिक लोक सामील झाले होते आणि अधिक रक्तपात झाला होता. तुर्कस्थानांत तर असा जुलमी सत्ताधारी आहे कीं, त्यानें नुसती मान हालविली तरी वाटेल त्याला मृत्युमुखीं पडावें लागतें, पण तेथेंहि रोज बंडाळी होतेच. शिवाय, त्यांचे बंडखोर ज्या भीषण प्रकारांचा अवलंब करतात ते प्रकार लक्षांत घ्या व त्यांची आपल्या शिस्तबद्ध, विचारी व आपोआप शांत होणाऱ्या बंडाशीं तुलना करा. आणि मग सांगा कीं, शासनयंत्राला अधिक जोराची चालना देऊन शांतता प्रस्थापित करतां येते का जनतेला जास्त माहिती देऊन तें शक्य होतें. हा शेवटचा पर्याय सर्वांत खात्रीचा आणि शासनसंस्थेला योग्य रीतीनें चालना देणारा आहे. आमजनतेला शिक्षण आणि माहिती द्या. शांतता व कायदा ह्यांचें रक्षण करणें आपल्या हिताचें आहे, अशी जनतेची खात्री पटवा, आणि ती त्यांचें पालन करील. आणि हें जनतेला पटविण्यासाठीं फार उच्च शिक्षणाची जरूर आहे असें नाहीं. आपलें स्वातंत्र्य टिकविण्याचा हा एकमेव मार्ग आहे. बहु-संख्य जनतेच्या इच्छेचें पालन व्हावें हें माझें तत्त्व आहे. संकल्पित राज्य-घटनेंतील सर्व भाग जनतेला मान्य असेल तर मी आनंदानें त्यांच्याशीं सह-

मत होईन आणि जेव्हां जेव्हां राज्यघटनेंतील एखादी तरतूद चुकीची आहे असें जनतेला पटेल तेव्हां जनता ती सुधारून घेईल अशी मी आशा ठेवीन

( डि. म्युनिअर ह्यांस, १७८६. )

आपल्या मध्यवर्ति व विशिष्ट घटकराज्यांना अधिक चालना मिळावी ( अधिकार मिळावेत ) अशी मागणी करण्यांत येते. असेंहि प्रतिपादण्यांत येतें कीं, व्यक्ति किंवा शासनसंस्था ह्यांच्यावर, त्यांच्या हातून चुका होऊं नयेत म्हणून नियंत्रण ठेवणें कठीण असतें. हें खरेंहि आहे आणि गैर-सोईचेंहि आहे. उलट सर्वसत्ताधारी शासनसंस्थेला सैन्याच्या जोरावर मिळ-णारी चालना ( मिळणारे अधिकार ) म्हणजे नागरिकांच्या छातीवर कायम रोखलेल्या सैनिकांच्या संगिनीच होत व त्यांनीं रोखलेली शांतता ही स्मशान-शांततेवत् होय व अशी शांतता अयोग्य, गैरसोईची मानली जावी. आम्ही अशा दोन्हींची तुलना करतों आणि आम्हांला ( शांततेचा ) पहिला प्रकारच मान्य होतो. इतर देशांतील राजांनीं केलेल्या अन्यायाशीं, आमच्यापैकीं ज्या नागरिकांनीं अत्याचार केले पण कसलीहि शिक्षा न होतां ते निसटले अशा नागरिकांची तुलना करा आणि तुम्हांला इतर देशांतील राजांनीं केलेले जुलूम संख्येनें अधिक, मनावर अधिक दडपण टाकणारे आणि मानवी प्रतिष्ठेचा अधिक अपमान करणारे आहेत असें दिसून येईल.

( प्रथम उद्घाटन, मार्च ४-१८०१ )

कांहीं प्रामाणिक लोकांना प्रजासत्ताक सरकार सामर्थ्यवान् असू शकत नाहीं आणि हें सरकारहि पुरेसें सामर्थ्यवान् नाहीं असें वाटतें, ह्याची मला जाणीव आहे. पण ह्या यशस्वी प्रयोगाची पूर्ण वेगानें प्रगति होत असतांना, आम्हांला आजपर्यंत ज्या सरकारनें स्वतंत्र ठेवलें व बलवान् केलें, जें सरकार जगांतील सर्वांचें आशास्थान होऊन बसलें आहे त्याचा त्याग शासनसंस्थेला कधीं काळीं आत्मरक्षणार्थ बलाचा वापर करावा लागेल ह्या केवळ तात्त्विक व काल्पनिक भीतीमुळें कोणता देशभक्त करील? कोणीहि तसें करणार नाहीं असा माझा विश्वास आहे. उलट, जगाच्या पाठीवरचें हें

सर्वांत सामर्थ्यवान् सरकार आहे असा माझा विश्वास आहे. सरकारनें हांक दिली तर देशांतील प्रत्येक नागरिक त्या हांकेला ओ देईल व सरकारसाठीं शस्त्र उचलील व सार्वजनिक शांततेवर झालेलें आक्रमण हें व्यक्तिशः स्वतः-वर झालेलें आक्रमण आहे असें समजून त्याचा प्रतिकार करील असें हें एकच सरकार आहे. मनुष्य स्वयंशासनास योग्य नाहीं असें पुष्कळदां सांगण्यांत येतें. तसें असेल तर मनुष्य दुसऱ्यावर शासन करूं शकेल असा त्याच्यावर विश्वास कसा टाकतां येईल ? का राजांच्या रूपानें आकाशाच्या पऱ्या माणसांवर राज्य करण्यासाठीं येतात असें आम्हीं मानायचें ? मनुष्याचा इतिहासच ह्या प्रश्नाचें उत्तर देऊं दे.

## राजसत्तेशीं तुलना करतां प्रजासत्ताक हा स्वर्गच होय

## ( हॉकिन्स ह्यांस, १७८७ )

राजा राज्य करीत असला म्हणजे ज्या लोकांना आधार वाटतो त्या लोकांबद्दल मला आश्चर्य वाटतें. अशा लोकांना राजासाठीं देवाची प्रार्थना करणाऱ्या बेडकांची गोष्ट सांगा. त्यानेंहि जर त्यांची समजूत पटली नाहीं तर त्यांना युरोपांत पाठवा. राजे लोकांच्या हातीं सत्ता असलेल्या देशांतील सांपळे त्यांना पाहूं द्या. मग प्रत्येक मनुष्य पूर्णपणें सुधारून परत येईल, असें आश्वासन मी देतों. आपल्या हातून घडूं शकणारीं दुष्कृत्यें व प्रजा-सत्ताक राज्यपद्धतीमुळें आजपासून जन्मभर घडणारे दुष्परिणाम जरी तरा-जूच्या एका पारड्यांत टाकले व दुसऱ्या पारड्यांत ह्या देशाला राजाच्या नियंत्रणाखालीं एका आठवड्यांत जें सहन करावें लागतें, अथवा इंग्लंडला एका महिन्यांत जें सहन करावें लागतें, तें दुसऱ्या पारड्यांत टाकलें तर दुसरें पारडेंच पहिल्यापेक्षां जड होईल. इंग्लंडमधील रेड बुकांत काय छापलें आहे किंवा फ्रान्समध्यें शाही आल्मनॅकमध्यें ( Almonac ) काय छापलें जातें तें वाचा व राजा राज्य करीत असला तर जनतेला काय फायदा मिळतो तें पाहा. कुठल्याहि राजघराण्यांत वीस पिढ्यांत सर्वसाधारण व्यवहारबुद्धि असलेला एखादाच राजा निर्माण झाला असेल. जास्तींत जास्त म्हणजे राजे आपले सर्व व्यवहार मंत्रीमंडळावर

सोंपवितात. आणि त्यांचीं मंत्रिमंडळें म्हणजे अयोग्य रीतीनें निवड केलेली समितीच नाहीं का? राजानें कधीं हस्तक्षेप केलाच तर तो उपद्रव देण्यासाटींच.

(मन्रो ह्यांस, १७८५)

तुम्ही येथें यावें असें मला मनापासून वाटतें. तुमच्या अपेक्षेइतका तुमचा प्रवास सुखाचा होणार नाहीं; पण येथें येण्याचा उपयोग मात्र भरपूर होईल. येथील परिस्थिति पाहून तुमच्या देशावर, त्या देशाच्या भूमीवर, हवेवर, त्यांतील समानतेवर, स्वातंत्र्यावर, कायद्यावर, जनतेवर व शिष्टाचारांवर तुम्ही मनापासून प्रेम करूं लागाल. देवा! जगाच्या पाठीवरील इतर कुठल्याहि देशाजवळ नसलेला केवढा अमोल ठेवा आपल्याजवळ आहे ह्याची फारच थोडी कल्पना माझ्या देशबांधवांना आहे. मला स्वतःलाच तशी कल्पना नव्हती हें मी मान्य करतों. अमेरिकेंत स्थायिक होण्यासाठीं येणाऱ्या युरोपियनांची संख्या कित्येक पटींनीं वाढेल,पण अमेरिकेंत राहणारा कोणीहि अमेरिकन पुन्हा युरोपांत राहण्यासाठीं जाणार नाहीं आणि गेला तरी स्थायिक होणार नाहीं असें म्हणण्याचें मी धाडस करतों.

## युरोपांतील राजे : मूर्ख आणि वेडे

(जे. लँग्डन ह्यांस, १८१०)

राजघराण्यांतील व्यक्तींचीं लग्नें राजघराण्यांतील व्यक्तींशींच करण्याची प्रथा युरोपांत आतां कितीतरी शतकें रूढ आहे. आतां कुठलाहि प्राणिवंश घ्या. त्यांना आळसांत ठेवा, कसलेंहि काम पडूं देऊं नका, मग त्यांना बांधून ठेवा, पिंजऱ्यांत ठेवा कीं राजमहालांत ठेवा. उत्तम पक्वान्नें त्यांना खायला घाला. त्यांची लैंगिक वासना पुरेपूर भागवा, शारीरिक सुखांत त्यांना बुडवून टाका, त्यांच्या विकारांना उत्तेजन द्या, त्यांच्यापुढें नेहमीं नमतें घ्या. विचारास चालना देणारें त्यांच्याप्रत कांहींहि जाऊं देऊं नका, म्हणजे कांहीं पिढ्यांतच त्यांचीं मनें नष्ट होतात व त्यांचे शारीरिक अस्तित्व तेवढें शिल्लक राहातें......राजांची जोपासना अशीच करण्यांत येते व कित्येक शतकें असेंच चाललें आहे.

मी युरोपांत असतांना पुष्कळदां, त्या वेळीं तेथें राज्य करणाऱ्या राजे–राण्यांच्या चारित्र्याची मनाशीं आठवण काढून, माझी मी करमणूक करून

येत असें......१६ वा लुई मूर्ख होता हें मला स्वानुभवावरून माहीत आहे...... स्पेनचा राजा ( चौथा चार्ल्स् ) मूर्ख होता आणि नेपल्सचाहि ( चौथा फर्डिनांड ) तसाच. त्यांनीं आपलीं सारीं आयुष्यें शिकार करण्यांत घालविलीं. आपण आदल्या दिवशीं कसली शिकार केली हें दुसऱ्याला सांगण्यासाठीं ते एक हजार मैल दूर अंतरावर आठवड्यांतून दोनदां दूत पाठवीत. सार्डिनियाचा राजा ( तिसरा व्हिक्टर अमाडियस ) मूर्ख होता. हे सारे बुर्बान राजे होते. पोर्तुगालची राणी ( वेडी मारिया ) ब्रॅगांझा घराण्यांतील होती, व वेडसर होती. डेन्मार्कचा राजाहि ( ७ वा खिश्चन ) अर्धवटच होता. त्यांच्यातर्फे त्यांचे मुलगे राज्यकारभार पाहात. प्रशियाचा राजा ( २ रा फ्रेडरिक वुइल्यम् ), थोर फ्रेडरिकचा वंशज, शरीरानें व मनानें निव्वळ डुक्कर होता. स्वीडनचा तिसरा गुस्ताव्हस आणि ऑस्ट्रियाचा दुसरा जोसेफ हे वेडसरच होते. आणि इंग्लंडचा तिसरा जॉर्ज तर वेडाच होता. म्हणजे राहिली ती फक्त म्हातारी कॅथरीन...... पण नुकताच तिचाहि बुद्धिभ्रंश झाला......ह्या साऱ्या पशूंचीं मनें नष्ट झालीं होतीं व त्यांचें सामर्थ्य नष्ट झालें होतें. अशीच स्थिति कांहीं काळानंतर प्रत्येक आनुवंशिक राजाची होईल......ही अशी आहे राजांची कथा. ह्या सर्व राजांच्या तडाख्यांतून देव आम्हांला मुक्त करो.

( हॅम्फ्रेज ह्यांस, १७८७)

राजांच्या व राजे होऊं पाहणाऱ्या न्यायाधिशांच्या कृपेची अशी आहे ही कथा. ह्या घटनांपासून आमच्या प्रारंभावस्थेंत असलेल्या प्रजासत्ताकानें बोध घेतला पाहिजे. आपसांतील मतभेद मिटविण्यासाठीं परक्या सत्तेला कधींहि आमंत्रण देऊं नका. आनुवंशिक न्यायाधिशांपासून सावध रहा. आपल्या नागरिकांना प्रचंड संपत्ति सांठवून राजांच्या बहिणी, पुतण्या ह्यांच्याशीं लग्नें करण्याइतकें श्रीमंत होऊं देऊं नका. थोडक्यांत, ईश्वरावर प्रार्थनांचा वर्षाव करा व त्यांच्यापासून राजे म्हणून ओळखले जाणारे मानवी सिंह, वाघ आणि राक्षस ह्यांची उत्पत्ति बंद होईल अशी मागणी करा. 'अशा प्राण्यांपासून देवा, आमची सुटका कर' अशी प्रार्थना जो करणार नाहीं तो नष्ट होवो.

* * *

: ३ :

# अमेरिकन लोकशाही

## मानवांचा मार्गदर्शक दीप

### ( हंटर ह्यांस, १७९० )

मानवांच्या हक्कांवर कधींहि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आक्रमण न करणारी प्रजासत्ताक ही एकच राज्यपद्धति असल्याची माझी खात्री पटली असल्यामुळें, आपण सुखानें जें प्रस्थापित केलें आहे त्याला पाठिंबा देण्यासाठीं मी मोठ्या प्रेमानें माझे श्रम खर्च करीन व देवाची प्रार्थना करीन. आपले व भविष्यकालीन पिढ्यांचे हक्क प्रस्थापित करतांना आपल्याप्रमाणेंच जुलमी राजसत्ता झुगारून देण्यासाठीं धडपडणाऱ्या राष्ट्रांना आपण मार्गदर्शन करीत आहोंत हा विचार खरोखरीच फार उत्साहदायक आहे.

### ( रटलेज ह्यांस, १७८८ )

झालेल्या चुकांची दुरुस्ती करण्याचा चांगुलपणा आणि सद्‌गुण बराच काळ आपल्या देशबांधवांत राहील असा मला विश्वास वाटतो. रक्तपात न करतां सारासार बुद्धि वापरून शासनयंत्रांत सुधारणा घडवून आणल्याचें एक नमुनेदार उदाहरण आपण जगापुढें घालून दिलें असा दावा आम्ही खात्रीनें करूं शकतों. पण उदाहरणानें जग सुधारणार नाहीं इतकें तें जुलुमाखालीं दडपलें गेलें आहे. अटलांटिक महासागराच्या बाजूला जनतेचें रक्त अनुवंशिक मालमत्ता ठरलें आहे आणि त्या रक्तावर पोसले जाणारे जीव त्याचा त्याग सहज रीत्या करणार नाहींत.

( गव्हर्नर हॉल ह्यांस, १८०२, )

( N. Y. pub. Lib. Ms II–217–18. )

आमचें उद्दिष्टहि प्रातिनिधिक सरकार यशस्वी व्हावें हेंच आहे. प्रयत्न केवळ आमच्यासाठीं नाहींत, तर सर्व मानवजातीसाठीं आहेत. मनुष्यावर स्वयंशासनाबाबत विश्वास टाकतां येईल कीं नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं आमचा हा प्रयोग आहे. जुलुमाखालीं दडपल्या गेलेल्या अखिल मानवजातीचे डोळे आपल्या प्रयोगावर खिळून राहिले आहेत. त्यांच्या सुटकेची ही एकच आशा आहे. ह्यासाठीं आपण आपले संकुचित विचार आणि स्थानिक फायद्याचे विचार सोडले पाहिजेत. मध्यवर्ति केंद्र सत्तेचे पुरस्कर्ते पुढारी असें म्हणतात कीं, स्वयंशासनाच्या बाबतींत माणसावर विश्वास टाकूं नये.

( बी. गॅलोवे ह्यांस, १८१२. )

मनुष्याचे हक्क प्रस्थापित करण्याचा जो जाहीरनामा आपण काढला आहे, त्यापासून आज ना उद्यां सर्व जगाचा फायदा झाल्याशिवाय राहाणार नाहीं असा माझा दृढ विश्वास आहे. फ्रेंच राज्यक्रांतींत झालेल्या भयंकर रक्तपातानें जरी प्रत्येक देशांतील देशभक्तांचा उत्साह कांहींसा कमी झाला असला तरी तो नाहींसा झालेला नाहीं; कदापि होणार नाहीं. प्रत्येकाच्या हृदयांत आपल्या हक्कांची जाणीव जागृत झाली असून, त्या जाणिवेचें स्फुल्लिंग, तें विझविण्यासाठीं, त्यांच्यावर होत असलेल्या दडपशाहीमुळेंच ज्वलंत राहील व त्याचा भडका उडेल. फ्रान्सच्या सच्च्या देशभक्तांनीं केलेल्या चुका व डान्टन्स व रोबेस्पीअर्स ह्यांचे गुन्हे, आपण ज्या विचारीपणानें, धीमेपणानें आपल्या ध्येयाप्रत पावलें टाकीत आहोंत त्या आशादायी प्रयोगाकडे पाहून विसरले जातील. जें एकदां साधलें तें पुन्हा साधेल ही समजूत यशाच्या आशेमुळें दृढ होईल.

( आर्. रश ह्यांस, १८२० )

सतत, सर्व समाजाच्या इच्छेवर चालणारें सरकार व्यवहार्य आहे असा आमच्या अस्तित्वाचा अर्थ सांगण्यांत येत आहे. जर आम्ही मोडलों व आमचे तुकडे तुकडे झाले तर जगांतील भल्यांच्या आशाआकांक्षांवरून बोळा फिरेल. आज गुलामींत खिचपत पडलेल्या जगांतील वाईट वृत्ती बळावतील. तेव्हां अखिल मानवजातीचे घटक सदस्य म्हणून व त्यांच्याशीं

तुलना करतां जबाबदारीच्या उच्च स्थानावर आपण असल्यानें आपसांतील संकुचित विकारांवर तावा ठेवून, सामर्थ्याच्या जोरावर सत्ता चालविण्यास शासनसंस्थेचा सारासार विचारांच्या आधारानें चाललेलें सरकार अधिक श्रेष्ठ असल्याचा जो विश्वास आपण निर्माण केला आहे, त्याला धक्का पोंचूं न देणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे.

## अमेरिकन लोकशाहीचा उज्वल भविष्यकाळ

### ( पहिलें उद्‌घाटन मार्च ४-१८०१ )

तेव्हां धैर्यानें आणि आत्मविश्वासानें आपण आपलीं गणराज्यविषयक आणि प्रजासत्ताकविषयक तत्त्वें आमलांत आणूं या. निसर्गानें व एका विशाल महासागरानें आपल्यावर दया करून आपल्याला, पृथ्वीच्या एक चतुर्थांश भागावर चाललेल्या विध्वंसापासून निराळें ठेवलें आहे. इतरांच्या वांट्याला आलेलें अपमानित जीवन सहन न करण्याची आपली उच्च मनोभूमिका आहे, आपल्या आवडीचा देश आपल्याला मिळाला आहे, आपल्या शंभराव्या, हजाराव्या पिढीलाहि पुरेल एवढा आपला देश विशाल आहे, आपल्या बुद्धीचा व कर्तृत्वाचा उपयोग करण्याचा प्रत्येकाचा समान हक्क आपण मानतों, आपले उद्योगधंदे आपल्या मालकीचे ठेवण्याचा आपल्याला हक्क आहे, आपल्या देशबांधवाकडून विश्वासाची, सन्मानाची वागणूक मिळण्याचा हक्क आपल्याला आहे, आपल्या दयाशील धर्मांचीं तत्त्वें अनेक प्रकारें प्रतिपादलीं व आचरलीं जातात; पण त्या सर्व प्रकारांत प्रामाणिकपणा, सद्‌गुण, सहनशीलता, कृतज्ञता आणि माणसाबद्दलचें प्रेम हीं आहेत. सर्वांत सर्वसामर्थ्यवान् ईश्वराचें अस्तित्व मानलें जातें, त्या ईश्वरावर आपण प्रेम करतों, त्या ईश्वरानें आपल्याला जें वैपुल्य दिलें आहे त्यावरून असें सिद्ध होतें कीं, आजच्या आमच्या जीवनांत तो आम्हांला सुखी ठेवीत आहे आणि ह्या पुढील जीवनांत अधिक सुखी ठेवील. एवढी सारी कृपा आपल्यावर झालेली असतांना आपला समाज सुखी व समृद्ध होण्यासाठीं आपल्याला आणखी कशाची गरज आहे ?

### ( डी. मार्बोइस ह्यांस, १८१७ )

मला असा विश्वास वाटतो कीं, अनेक युगें आपण यशस्वी रीतीनें

कारभार चालवूं आणि मॉण्टेस्क्यूच्या तत्त्वाविरुद्ध असें स्पष्ट करूं कीं, अंकित करण्याऐवजीं समजूत आणि करारनामे ह्यांच्यावर आधारलेलें प्रजासत्ताक जितक्या अधिक विशाल प्रदेशावर प्रस्थापित झालेलें असेल तितकें तें अधिक मजबूत होतें. मी जेव्हां असें म्हणतों कीं, आम्ही कित्येक युगें कारभार चालवूं, तेव्हां वाढत्या प्रदेशाबरोबर वाढणारीं साधनें आणि 'मनुष्याला प्रामाणिक जीवन जगण्याचीं साधनें दिलीं तर मनुष्याचा मूळ स्वभाव प्रामाणिक जीवन जगण्याचाच असतो', ही श्रद्धा माझ्या दृष्टीसमोर असते. आपण आज करीत असलेल्या श्रमांचें फळ आपल्याला मिळेल अशा विश्वासानें माझ्या मनाला समाधान वाटतें. त्यांतच, जाणत्यांच्या भविष्याप्रमाणें माझ्या ह्या आशा खोट्या ठरलेल्या मला माझ्या ह्यातींत पाहाव्या लागणार नाहींत. माझें नेहमींचें असें तत्त्व आहे कीं, जर आपण स्वप्नेंच पाहायचीं असलीं तर निराशेच्या दुःखाचीं पाहाण्याऐवजीं आशेचीं सुखदायक स्वप्नें पहावींत. कारण निराशेच्या स्वप्नांइतकींच आशेचीं स्वप्नें स्वस्त पण निराशेच्या स्वप्नांपेक्षां जास्त सुखद असतात.

## अमेरिकन प्रयोगाचें मूल्य अनुभवानें ठरेल

### (डी. आयव्हरनॉइस ह्यांस, १७९५)

लहान राज्येंच प्रजासत्ताकें स्थापण्यास योग्य असतात. ह्या व इतर अशाच कांहीं तत्त्वांचें मॉण्टेस्क्यू आणि इतर राजकीय लेखकांनीं जें प्रतिपादन केलें आहे तें अनुभवानें खोटें ठरेल असें मला वाटतें. खरें पाहिलें असतां असें दिसेल कीं, न्याय्य प्रजासत्ताक स्थापण्यासाठीं (आपले न्याय्य हक्क प्रस्थापित करण्यासाठींच आपण शासनसंस्था निर्माण करतों) तें इतकें विस्तृत करावें लागतें कीं, त्याच्या बव्हंश भागाला स्थानिक दुरभिमानाचा धक्का पोंचतां कामा नये. कुठल्याहि विशिष्ट प्रश्नावर निर्णय घेतांना ज्यांचे त्याबाबतींत विशिष्ट हितसंबंध नाहींत, अशांची अधिक संख्या त्यांच्या मंडळांत असली पाहिजे, म्हणजे तीं माणसें न्याय्य तत्त्वांना प्रमाणित महत्त्व देऊं शकतील. समाज जितके लहान असतील, तितके त्यांचे मतभेद उग्र व अनिष्ट परिणाम करणारे असतात.

ज्या काळांत आपण जगत आहोंत, तो काळ इतिहासांत बहुतेक

वैशिष्टपूर्ण ठरेल. कारण ह्या काळांत शासनव्यवस्थेवर जेवढ्या प्रमाणावर प्रयोग झाले तेवढ्या प्रमाणावर पूर्वी कधींहि झालेले नव्हते. पण ह्या प्रयोगांचे परिणाम काय होतात ते पाहाण्यास आपण जिवंत राहाणार नाहीं. आनुवंशिक न्यायाधीशांच्या पद्धतीसारख्या मोठ्या चमत्कारिक पद्धती आपल्या आयुष्यांतच नष्ट होतील. कारण अनुभवानें ह्या पद्धती त्याज्य ठरविल्या आहेत; पण ह्या नष्ट होणाऱ्या पद्धतींच्या जागीं नवें काय प्रस्थापित करणार? ह्या प्रश्नाचें उत्तर आपलीं मुलें किंवा नातवंडें देतील. पण आपण समाधानानें अशी खात्री बाळगूं या, कीं ज्या कारणांसाठीं माणसें शासनसंस्था स्थापन करतात व त्यांच्या पूर्वजांनीं ज्या कारणासाठीं ती स्थापन केली व त्यांच्या बापजाद्यांनीं ती पुढें चालविली, तीं कारणें नष्ट करणारा कुठलाहि मूर्खपणाचा, अयोग्य, जुलमी प्रयोग तीं करणार नाहींत...

मनुष्याचें हिरावून घेतलेलें स्वातंत्र्य परत मिळवण्याचा माणसें प्रयत्न करीत असतांना त्या प्रयत्नांत हिंसा, चुका व गुन्हेहि घडावेत हें खरोखरीच दुर्दैव होय; परंतु ह्या मार्गाचा अवलंब केल्याचें दुःख मानीत असतांनाच आपलें उद्दिष्ट आपल्या हातीं पडावें अशी आपण प्रार्थना करूं या.

## केंद्रीकरणामुळें जुलूम वाढेल

### ( गिडिऑन ग्रँगर ह्यांस, १८०० )

आपला देश फार मोठा असल्यानें एका केंद्र–सत्तेला सर्व राज्यकारभार चालवितां येणार नाहीं. सरकारी नोकर इतके दूर राहातील कीं शासनकार्य व्यवस्थित करणें व ज्या भागांत ते असतील त्या भागांतील कारभारावर लक्ष ठेवणें त्यांना शक्य होणार नाहीं व अशी नजर न ठेवल्यामुळें, सरकारी नोकर लांचलुचपत, लूटमार आणि उधळपट्टी अशा प्रवृत्तींना बळी पडतील. माझी अशी खात्री आहे कीं सर्व अमेरिकेला एकच कायदा लागू करण्याचें तत्त्व जर अमलांत आलें तर... अमेरिकन सरकार जगांतील सर्वांत अधःपतित सरकार ठरेल.

राज्याचे सर्व अधिकार एका ' जनरल गव्हर्मेंट 'च्या हातीं द्यायचें ठरविलें तर वशिलेबाजी, सट्टेबाजी, लूट व अधिकारलालसा ह्या दुर्गुणांना

पाठिंबा मिळेल. आपल्या राज्यघटनेंतील खरें तत्त्व असें आहे कीं, अंतर्गत कारभाराच्या बाबतींत प्रत्येक घटक राज्य स्वतंत्र आहे आणि जेथें परराष्ट्रांशीं संबंध येईल तेथें सर्व राज्यें एक आहेत. हें तत्त्व सर्वांत शहाणपणाचें व सर्वोत्कृष्ट आहे. ' जनरल गव्हर्मेंट 'चें कार्य आपण केवळ परराष्ट्रीय संबंधापुरतेंच ठेवूं या, व व्यापाराखेरीज आपला कारभार आपण परराष्ट्रांपासून निराळा करूं या. व्यापाराची व्यवस्था व्यापारी संभाळतील व त्यांना जितकें अधिक स्वातंत्र्य मिळेल तितकें ते आपलें काम अधिक चांगलें करतील. म्हणजे आपल्या ' जनरल गव्हर्मेंट 'ची संघटना आपण अगदीं साधी व कमींत कमी खर्चाची बनवूं शकूं. कांहीं सोपीं कामें थोडे सरकारी नोकर करूं शकतील, अशी ती बनवूं.

* * *

:४:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 13904

## तत्त्वें

### डेमोक्रॅटचा कार्यक्रम

**( एल्ब्रिज गेरी ह्यांस, १७९९ )**

माझें असें मत आहे कीं, आपले जे अधिकार घटक राज्यांनीं युनियन सरकारच्या स्वाधीन केलेले नाहींत ते अधिकार घटक राज्यांनींच राखून ठेवावेत व अधिकारांची वांटणी करण्याचा घटनात्मक अधिकार युनियनच्या विधानसभेकडे असावा. घटकराज्यांचे सर्व अधिकार त्यांनीं जनरल गव्हर्मेंटच्या हवालीं करण्याच्या व जनरल गव्हर्मेंटनें ते अधिकार अंमलबजावणी विभागाला देण्याच्या मी विरुद्ध आहें.

माझें असें मत आहे कीं, सरकार हें साधें व मितव्ययी असावें व महसुलाच्या रकमेंतून वांचवतां येईल तेवढी रक्कम वांचवून सरकारनें ती राष्ट्रीय कर्ज फेडण्यासाठीं वापरावी; केवळ चाहात्यांना अधिकाराच्या जागा देऊन, सरकारी नोकरांची संख्या वाढविण्यासाठीं व त्यांचे पगार देण्यासाठीं वाटेल त्या मार्गानें, 'हें सार्वजनिक हितासाठीं आहे' अशी सबब सांगून, राष्ट्रीय कर्जांत भर टाकूं नये.

माझें असें मत आहे कीं, आंतर्गत सुरक्षिततेसाठीं, आपल्यावर प्रत्यक्ष हल्ला होईपर्यंत, आपण आपल्या मिलिशियावर अवलंबून राहावें; आपल्या किनाऱ्यावर व बंदरावर उद्‌भवलेल्या प्रसंगांचा अनुभव लक्षांत घेऊन, त्यांचें रक्षण करण्यांस आवश्यक तेवढेंच नौदल आपण ठेवावें; जनतेला धास्ती वाटेल व तिच्या मनावर दडपण पडेल असें खडें सैन्य किंवा ज्याच्या खर्चानें व आपल्या राष्ट्राला सतत समुद्री युद्धांत गुंतवून त्यांच्या खर्चानें, आपणांस चिडवून–बुडवून टाकील असें नौदलहि नसावें.

माझें असें मत आहे कीं, आपण सर्व राष्ट्रांशीं खुला व्यापार करावा; राजकीय संबंध कुठल्याहि राष्ट्राशीं ठेवूं नयेत; आणि वकिलाती फारच थोड्या ठेवाव्यात किंवा अजिबात ठेवूं नयेत. युरोपांतील भांडणांत तहनाभे करून आपण स्वतःचे हात गुंतवूं नयेत; त्यांच्यांतील सत्तेचा समतोलपणा राखण्यासाठीं तेथील कत्तलींत सामील होऊं नये, किंवा स्वातंत्र्याच्या तत्त्वाविरुद्ध युद्ध करणाऱ्या राजांच्या गटांत सामील होऊं नये.

माझें असें मत आहे कीं, सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य असावें. कायद्याच्या मार्गानें एका पंथावर दुसऱ्या पंथाचें वर्चस्व स्थापण्याच्या सर्व प्रयत्नांच्या मी विरुद्ध आहें. माझें असें मत आहे कीं, देशांत वृत्तपत्रस्वातंत्र्य असावें, आमच्या नागरिकांनीं त्यांच्या प्रतिनिधीविरुद्ध केलेल्या तक्रारी किंवा त्यांच्यावर केलेली टीका, योग्य असो कीं अयोग्य असो, सारासार विचाराऐवजीं सत्तेचा वापर करून, आमच्या राज्यघटनेंतील तरतुदींचा भंग करून, दडपून टाकली जाऊं नये.

आणि माझें असें मत आहे कीं, शास्त्रांची सर्वांगीण प्रगति होण्यास उत्तेजन दिलें जावें; तत्त्वज्ञानाच्या पवित्र नांवाविरुद्ध आरडाओरड करण्याच्या

मी विरुद्ध आहें. माझें असें मत आहे कीं, कसल्यातरी भयंकर गोष्टी सांगून माणसांच्या मनाला भेडसवून, त्यांचा स्वतःच्या नजरेवरील विश्वास उडूं देऊं नये व दुसऱ्यांच्या दृष्टीवर त्यांचा आंधळा विश्वास बसूं नये; प्रगतीचा मार्ग पुढें जाण्याऐवजीं मागें पाऊल पडूं देऊं नये, शासनसंस्था, धर्म, नीतिमत्ता आणि इतर सर्व शास्त्रें, हीं मनुष्यजात अज्ञानी असलेल्या काळीं पूर्ण विकसित होतीं आणि आपल्या पूर्वजांनीं जें कांहीं केलें होतें त्यापेक्षां अधिक चांगलें कांहींच होणें शक्य नाहीं, अशा समजुतीच्या मी विरुद्ध आहें.

मी आणखी असेंहि म्हणेन कीं, फ्रेंच राज्यक्रांतीचा मी चाहता होतों आणि माझी अजूनहि अशी इच्छा आहे कीं, त्या क्रांतीचा शेवट स्वतंत्र व संघटित प्रजासत्ताकाच्या स्थापनेंत व्हावा. पण आपल्या व्यापारावर त्यांनीं केलेल्या आघातांची मला जाणीव नाहीं असें नाहीं.

माझ्या हृदयांत पहिलें स्थान माझ्या देशाला आहे. त्या देशांत माझें कुटुंब, माझी संपत्ति, माझें अस्तित्व आहे. एका राष्ट्रापेक्षां दुसऱ्या राष्ट्रांत माझा एका पैचा किंवा एका सुताचाहि अधिक हितसंबंध नाहीं, मनांत तसा हेतूहि नाहीं. तीं राष्ट्रें आपल्या देशाशीं किती प्रमाणांत मैत्रीचे संबंध राखतात, ह्यावरच मी त्यांचा क्रम लावतों.

## ( पहिलें उद्घाटन, मार्च ४, १८०१ )

नागरिक बंधूंनों, तुम्हांला प्रिय असलेल्या सर्व गोष्टींशीं संबंध येणारीं कर्तव्यें करण्याचें कार्य हातीं घेण्याच्या ह्या प्रसंगीं मी आपल्या सरकारचीं आवश्यक तत्त्वें कोणतीं समजतों व परिणामीं कोणत्या तत्त्वांवर आपल्या राज्यकारभाराची घडण होणार आहे, ह्याची कल्पना तुम्हांला यावी हें योग्यच ठरेल. मी अत्यंत थोडक्यांत तीं तत्त्वें तुम्हाला सांगतों, त्यांत त्यांचें सर्वसाधारण स्वरूप येईल, पण त्यांच्या मर्यादांची कल्पना येणार नाहीं. सर्व माणसांना समान व बरोबर न्याय मिळेल, मग ते कोणत्याहि घटक राज्याचे, कोठल्याहि धार्मिक किंवा राजकीय पंथाचे असोत. सर्व राष्ट्रांशीं प्रामाणिक स्नेहाचे संबंध, शांतता व व्यापार—पण अडकून पडण्यासारखे करारनामे कोणाशींच नाहींत; घटक–राज्य सरकारांच्या हक्कांना पूर्ण पाठिंबा;

(कारण) हीं राज्यें आपल्या अंतर्गत राज्यकारभाराचे कार्यक्षम गट व प्रजासत्ताकविरोधी वृत्तिविरुद्ध तटबंदी आहेत.

राज्यघटनात्मक बाबींत जनरल गव्हर्मेंटचें पूर्ण रक्षण; कारण अंतर्गत शांतता राखण्यासाठीं व परराष्ट्रीय संबंधांत देशाचें रक्षण व्हावें म्हणून हा आधारस्तंभ मजबूत हवा. आपले प्रतिनिधी निवडण्याच्या जनतेच्या हक्काचें जागरूकपणें रक्षण. ज्या ठिकाणीं क्रांतीच्या परिस्थितीमुळें, अजून शांतताकालीन मार्ग अमलांत आलेले नसतील तेथें सौम्य आणि सुरक्षित मार्ग अवलंबून सुधारणा.

बहुसंख्यांनीं घेतलेल्या निर्णयांना पूर्ण सम्मति-; प्रजासत्ताकाचें हें बहुमोल तत्त्व असून, त्या तत्त्वापासून परावृत्त होणें म्हणजे शक्तीचा वापर करणें होय आणि असा शक्तीचा वापर करणें म्हणजे प्रजासत्ताकाचा नाश करणारें व जुलमांना जन्म देणारें तत्त्व स्वीकारणें.

शिस्तबद्ध मिलिशिया; शांततेच्या काळांत सतत व युद्धकाळीं खडें सैन्य. युद्धांत उतरेपर्यंतची ही आपली विश्वासार्ह शक्ति आहे.

मुलकी अधिकाऱ्यांचा लष्करी अधिकाऱ्यांवर अधिकार;सार्वजनिक खर्चांत काटकसर, कामकरी जनतेवर कमी भार; राष्ट्रीय कर्जाची प्रामाणिकपणानें परतफेड, जनतेचा विश्वास राखण्याचें पवित्र कर्तव्य.

शेतीला उत्तेजन व शेतीला उपयोगी म्हणून व्यापारास उत्तेजन.

जनतेला सर्व माहिती देणें व गैरकृत्यांची सार्वजनिक चौकशी.

धार्मिक स्वातंत्र्य.

वृत्तपत्रस्वातंत्र्य.

हेबियस कॉपर्सचें व्यक्तिगत स्वातंत्र्यरक्षण.

आणि निःपक्षपातीपणानें निवडलेल्या ज्युरींच्यातर्फे खटले.

हीं तत्त्वें आमचे मार्गदर्शक तारे आहेत. ह्या मार्गदर्शक ताऱ्यांनीं आम्हांला क्रांतीच्या व सुधारणांच्या काळांत मार्ग दाखविला आहे. आपल्या पूर्वजांचा शहाणपणा आणि आपल्या वीरांचें रक्त, हीं तत्त्वें अंमलांत आणण्यासाठीं खर्ची पडलीं आहेत. हीं तत्वेंच आपलें राजकीय तत्त्वज्ञान असावें; नागरिकी जीवनाचे नियम बनावेत; ज्यांच्यावर आपण कार-भाराचा विश्वास टाकतों त्यांच्या कृत्यांचा हा कस ठरावा; आणि जर कदा-

चित् चुकीनें किंवा भीतीनें ह्या तत्त्वापासून आमचीं पावलें दूर गेलींच तर तावडतोब ती चूक सुधारून आमचीं पावलें पुन्हा ह्या शांतता, स्वातंत्र्य व सुरक्षितता यांच्या एकमेव मार्गावर यावींत.

## सर्व सत्तेचा वारसा जनतेकडेच

**( जे. कार्टराइट ह्यांस, १८२४ )**

टोरी वादाचा थोर तत्त्ववेत्ता ह्यूम म्हणतो, "...इतिहास आणि अनुभव ह्यांनीं 'न्याय्य सत्ता ही जनतेंतून निर्माण होते' हें तत्त्व चुकीचें ठरविलें आहे." आणि ह्या नालायक शास्त्रज्ञाला, आपल्या सहकाऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्या विश्वासघातक्याला जर समाजांतल्या बहुसंख्य जनतेंत न्यायसत्तेचें मूळ दिसत नसेल, तर तें मग दिसतें तरी कुठें ? अल्पसंख्यांत ? कीं त्या अल्पसंख्यांतील एखाद्या व्यक्तींत ?

आमच्या क्रांतीचीं सुरुवात अधिक अनुकूल भूमिकेवर झाली. आमच्या क्रांतीनें, आम्हांला वाटेल तें लिहिण्याचें स्वातंत्र्य दिलें. जुनेपुराणे कागद काढून, त्यांतले शाही हुकूम शोधण्याचें किंवा जवळपास रानटी अवस्थेंत असलेल्या पूर्वजांनीं केलेले कायदे किंवा बांधलेल्या संघटना धुंडून काढण्याचें आम्हांला कारणच पडलें नाहीं. आम्हीं निसर्गदत्त कायद्यांचा आधार घेतला...आम्हांला स्वयंशासनाची संधि पूर्वीं कधीं मिळाली नव्हती. जेव्हां आम्हीं आमची शासनव्यवस्था हातांत घेतली, तेव्हां त्या व्यवस्थेच्या शास्त्राची आम्हांला माहिती नव्हती... पण आम्ही त्या शास्त्राचीं सर्व नसलीं, तरी कांहीं तत्त्वें प्रस्थापित केलीं. आमच्या घटक राज्यांच्या राज्यघटना, सत्तेचा वारसा जनतेकडे असल्याचें व जेथें शक्य असेल तेथें जनतेनें सत्तेचा वापर स्वतः करावा हें मान्य करतात. ...जनतेचे, व्यक्तिस्वातंत्र्याचे, धार्मिक स्वातंत्र्याचे, भालमत्तेवर मालकी असल्याचे आणि वृत्तपत्रस्वातंत्र्याचे हक्क मान्य करतात.

## अल्पसंख्यांकांना बहुसंख्यांकांच्या बरोबरीनें हक्क आहेत

**( प्रथम उद्‌घाटन, ४ मार्च, १८०१ )**

सर्वांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सर्व बाबतींत बहुसंख्य असले-

असलेल्यांचें मत जरी ग्राह्य असलें, तरी तें मत बरोबर ठरावयाचें असल्यास योग्य असलें पाहिजे; जे अल्पसंख्य आहेत, त्यांना बरोबरीनें समान हक्क आहेत व समान कायद्यांनीं त्यांच्या हक्कांचें रक्षण केलें पाहिजे, व त्यांच्या हक्कांवरजर अतिक्रमण झालें, तर तो जुल्म ठरेल. तेव्हां, नागरिक बंधूंनों, आपलीं हृदयें आणि मनें एक होऊं द्या. आपल्या सामाजिकजीवनांत एकजिनसपिणा येऊं द्या, एकमेकांबद्दलचें प्रेम निर्माण होऊं द्या. कारण हे गुण असल्याशिवाय स्वातंत्र्य आणि प्रत्यक्ष जीवनहि कंटाळवाणें होईल. आणि लक्षांत ठेवा, आपल्या राष्ट्राच्या भूमीवरून आपण मानवजातीच्या दुःखास व रक्तपातास कारणीभूत झालेल्या धार्मिक असहिष्णुतेचें उच्चाटन केलें आहे; पण त्याची जागा जर आम्ही त्या धार्मिक असहिष्णुतेइतक्याच जुलमी, दुष्ट दडपशाहीला करून दिली तर आम्हीं कांहींच मिळविलें नाहीं असा याचा अर्थ होईल.

## बहुसंख्य जनतेनें केलेले कायदे पवित्र होत

### ( बॅरन व्हॉन हमबोल्ट ह्यांस, १८१७ )

बहुसंख्य जनतेच्या मतानें कारभार चालावा; हें समान हक्क असलेल्या व्यक्तींच्या समाजांचें मूलभूत तत्त्व आहे; हा प्रजासत्ताकवादाचा मूलभूत सिद्धांत आहे. जरी एकच मत अधिक पडून समाजानें एखादा निर्णय घेतला, तरी तो एकमतानें घेतलेल्या निर्णयाइतकाच पवित्र आहे, असें मानणें हा वास्तविक अतिशय महत्त्वाचा पहिला धडा आहे; पण त्याचें पूर्ण आकलन मात्र शेवटपर्यंत होत नाहीं. हा नियम एकदां मोडला, कीं बळाचा वापर करण्याखेरीज दुसरा कुठलाहि मार्ग राहात नाहीं व बळाचा वापर केला म्हणजे लष्करी दडपशाही येते. फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास असाच आहे.

## खरीं तत्त्वें

### ( एस्. केर्पेवाल ह्यांस, १८१६ )

खरीं तत्त्वें ठरवा आणि कांटेकोरपणें तीं पाळा. भित्र्यांना वाटणाऱ्या भीतीमुळें किंवा उन्नतीकडे जाणाऱ्या समाजाविरुद्ध कुरकुर करणाऱ्या

श्रीमंतांसाठीं हीं तत्त्वें पाळण्याच्या बाबतींत कसलीहि तडजोड करूं नका. अनुभवाचा दाखलाच जर हवा असेल, तर गेलीं चाळीस वर्षें राज्यकारभार चालवीत असलेल्या, आपल्या पंधरा ते वीस घटक राज्य-सरकारांचा अनुभव लक्षांत घ्या व एखाद्या जुलमी राजानें एका वर्षांत जेवढे अत्याचार केले असते, त्यांच्या मानानें ह्या सरकारांनीं गेल्या चाळीस वर्षांत अर्धे तरी अत्याचार केले का तें मला दाखवा; किंवा तेवढींच वर्षें एखादा राजा राज्य करीत असलेल्या देशांत घडलेल्या दंगे, बंडें, गुन्हे व त्याबद्दल झालेल्या शिक्षा, ह्यांच्याशीं तुलना करतां, ह्या राज्यांत ते प्रकार निम्म्यानें तरी झालेत का तें दाखवा. व्यक्तिगत हक्क, मालमत्ता असण्याचा व त्यांची व्यवस्था पाहाण्याचा हक्क हे सर्व नागरिकांना समान असावेत, हाच प्रजासत्ताक राज्याचा मूलभूत पाया होय. ह्या कसोटीवर आमच्या राज्यघटनेंतील प्रत्येक तरतूद घांसून पाहा; आणि जनतेच्या हितावरच ती आधारलेली आहे कीं नाहीं तें तपासून घ्या. पूर्ण पण शिस्तबद्ध चर्चा होऊं शकेल एवढ्या सोइस्कर संख्येइतकेच आमच्या विधानसभांचे आकार ठेवा. त्यांची निवड करतांना, जो देशासाठीं लढतो किंवा कर भरतो, त्या प्रत्येक नागरिकाला मत देण्याचा योग्य व समान हक्क द्या. ठराविक अल्पमुदतीनंतर त्यांना पुन्हा निवडून येण्याची किंवा समाजानें त्यांना नाकारण्याची तरतूद करा. अंमलबजावणी करणारे अधिकारीहि ह्याच पद्धतीनें व एवढ्याच मुदतीसाठीं निवडा व आपल्या जबाबदाऱ्यांपासून ज्याच्यामागें लपतां येईल, असा कुठल्याहि मंडळाचा पडदा त्यांना देऊं नका.

**( डिकिन्सन ह्यांस, १८०१ )** ( N. Y. pub. Lib, Ms. II-47. )

केवळ राजकीय मतभेद आहेत, म्हणून कोणालाहि अधिकारपदावरून दूर करावें, हें माझ्या व रिपब्लिकनांच्या तत्त्वाविरुद्ध आहे, अधिकारपदावर असतांना, लांचलुचपत घेणें आणि निवडणुकींत आपल्या अधिकाराचा उपयोग करून निवडणूक-स्वातंत्र्यावर मर्यादा घालणें, हे गुन्हे मात्र बडतर्फी करण्यास योग्य आहेत.

**( डॉ. वॉल्टर जोन्स ह्यांस, १८०१. )**

सारासार बुद्धीला पटणाऱ्या व अनुभवानें स्वीकारार्ह ठरणाऱ्या ज्या सुधारणा करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य मला असतें तर मी घडवून आणल्या असत्या,

त्या प्रत्यक्षांत आणण्याचें कामीं माझ्या असलेल्या मर्यादांची मला जाणीव आहे. पण जेव्हां विशाल यंत्रणेस चालना देणें किंवा तिच्यावर परिणाम घडवून आणणें किती जड आहे, आदर्श सत्याकडे सर्व समाजाचीं मनें आकृष्ट करणें किती कठीण आहे ह्याची जाणीव होते, तेव्हां 'राष्ट्र पचवूं शकेल, त्यापेक्षां त्याचें जास्त भलें करावयाचा प्रयत्न करूं नये' ह्या सोलोनच्या शहाणपणाच्या उद्‌गारांची आठवण येते.

**( नाथानियल नाइल्स ह्यांस, १८०१ )**

आपल्या इतिहासाचें शेवटचें प्रकरण म्हणजे, मनुष्यजातीला मिळालेलें नवें ज्ञान होय. हा काळ भयंकर होता, पण त्या काळांतहि चांगल्या नागरिकांनीं सामुदायिक संघटनेवरील आपला विश्वास कधींहि ढळूं देऊं नये, हें तत्त्व सिद्ध झालें. आमच्या प्रयत्नांचें तारु फुटणार ह्याची खात्री पटून किती चांगलीं माणसें सोडून गेलीं. प्रजासत्ताक फक्त लहान प्रदेशांत यशस्वी होतें, ह्या मॉण्टेस्क्यूचा सिद्धांत खोटा असल्याचा पुरावा आम्ही ह्या मार्गानें सादर केला आहे. सत्य बरोबर उलटें आहे. आमचा प्रदेश जेवढा आहे, त्याच्या एकतृतीयांश जरी असता तरी आम्ही अपयशी झालों असतों. पण जरी कांहीं भागांत निराशा व घबराट एखाद्या रोगाच्या सांथीप्रमाणें पसरली, तरी बाकीच्या भागांवर त्यांचा परिणाम झाला नाहीं व आपले तात्पुरते निराश झालेले बांधव, त्या निराशेंतून बाहेर येईपर्यंत इतर नागरिकांनीं कार्य चालू ठेवलें.

## अमेरिकन जनतेचें भवितव्य त्या जनतेच्याच हातीं आहे

**( डुपाँ-डी-नेमोइर्स ह्यांस, १८१६ )**

आम्हां अमेरिकनांची राज्यघटना आणि आमची सदसद्विवेकबुद्धि ही लोकशाहीवादी आहेत. समाज ही जन्मतःच माणसाला लागणारी निसर्गदत्त गरज आहे, असें आम्ही समजतों. ही गरज, आपल्यासारखीच गरज असलेल्या इतर माणसांच्या अनुमतीनें भागविण्यासाठीं त्याला बुद्धीची आणि इतर गुणांची देणगी मिळालेली आहे. ह्या साधनांचा व गुणांचा उपयोग करून मनुष्यानें समाज निर्माण केला आहे; व ह्या आपल्या निर्मितीवर नियंत्रण ठेव-

ण्याचा त्याला हक्क आहे; त्यानें समाजनिर्मितींत त्यांना सहमत करून घेतले असेल, त्यांच्या सम्मतीनेंच गाजवायचा असून त्याला त्यांना वगळतां येणार नाहीं किंवा त्याला वगळण्याचा त्यांना अधिकार नाहीं.

आम्हांला असें वाटतें कीं, ज्या व्यक्तींचा समाज बनतो त्या व्यक्तीं-च्याच हातीं त्यांना मिळावयाचें अधिकार सोंपविणें आणि जे अधिकार त्यांच्यावर सोपवितां येत नाहींत, ते त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींच्या, —हे प्रतिनिधी जर विश्वासघातकी निघाले तर, त्यांचें प्रतिनिधित्व ताबडतोब काढून घेतां यावें. —हातीं दिले तर ते अधिक सुरक्षित असते असें अनुववानें सिद्ध झालें आहे; म्हणून, आम्हांला वाटतें कीं, जनता ( म्हणजे ज्या व्यक्तींचा समाज बनतो त्या व्यक्ती ) दैनंदिन जीवनांत घडणाऱ्या सत्य घटनांचा न्याय करण्यास समर्थ असते व म्हणून सत्य घटनांचा न्याय करण्याचें कार्य त्यांच्या हातीं ज्युरर्सच्या नांवाखालीं राखून ठेवते; आणि जीं कार्यें करण्यासाठीं सर्वसाधारण बुद्धीपेक्षां अधिक वरच्या दर्जाची बुद्धिमत्ता लागते, तीं कार्यें करण्यास जनता अयोग्य असल्यानें, पण मनुष्यस्वभाव ओळखण्यास समर्थ असल्यानें, अशीं कार्यें करण्यासाठीं माणसांची निवड करते. कांहींची निवड प्रत्यक्ष जनता करते, तर कांहीं जन-तेनें निवडलेले प्रतिनिधी निवडतात.

समाजांतल्या व्यक्ती आपलीं मुलेंच आहेत, असें समजून आपण दोघेहि त्यांच्यावर पोटच्या मुलांसारखे प्रेम करतों. फरक एवढाच कीं, तुम्ही त्यांना तान्हीं मुलें समजून दाईच्या देखरेखीशिवाय तीं सुरक्षित राहाणार नाहींत ह्या भावनेनें वागवतां, तर मी त्यांना सज्ञान समजून त्यांचा स्वतःचा कारभार चालविण्याचें स्वातंत्र्य त्यांना देतों.

## अमेरिकन नागरिकांचे मूलभूत अधिकार

### ( कोरे ह्यांस, १८२३ )

आपल्या अनेक घटक राज्यांच्या घटनांतील तरतुदींच्या तपशीलांत थोडेफार फरक असल्याचें मीं म्हटलेंच आहे. पण काहीं तत्त्वें अशीं आहेत कीं, त्या तत्त्वांवर सर्वांचें एकमत असून, तीं तत्त्वें नागरिकांचें जीवित, स्वातंत्र्य,

मालमत्ता आणि सुरक्षितता ह्यांच्या रक्षणासाठीं आवश्यक समजून आपण बहुमोल मानतों.

(१) धार्मिक स्वातंत्र्य : दुसऱ्याच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आक्रमण करावयाचें नाहीं, एवढाच निर्बंध आहे.

(२) व्यक्तिस्वातंत्र्य : प्रस्थापित कायद्यांत असलेल्या तरतुदीबाहेर जाऊन कुठल्याहि व्यक्तीस तुरुंगांत टाकतां येत नाहीं किंवा तिच्यावर शारीरिक बंधनें घालतां येत नाहींत. हेबियस कॉर्पस ह्या प्रसिद्ध कायद्याखालीं हें स्वातंत्र्य अबाधित ठेवलें जातें.

(३) ज्यूरींच्या साहाय्यानें खटले चालविणें; व्यक्ति, मालमत्ता, आणि लौकिक ह्यांच्या रक्षणासाठीं प्रत्येकाला ह्या पद्धतीनें रक्षण मिळतें.

(४) कायदे करण्याचा व कर बसविण्याचा अधिकार फक्त जनतेच्या प्रतिनिधींच्याच हातीं आहे.

(५) वृत्तपत्रस्वातंत्र्य : व्यक्तिगत निंदा—हानि केल्यास त्याची पडणारी जबाबदारी एवढाच निर्बंध ह्या स्वातंत्र्यावर आहे. सरकारी नोकरांच्या वागणुकीची तपासणी करणारें वृत्तपत्र हें एक सामर्थ्यवान् साधन आहे. सरकारी नोकरांची वागणूक वृत्तपत्रें जनतेच्या न्यायासनासमोर आणतात व त्यांच्यांत शांततेच्या मार्गानें सुधारणा घडवून आणतात; नाहींतर हें कार्य करावयास क्रांतीच करावी लागली असती. मनुष्याला ज्ञान देऊन त्याला विचारी, नीतिमान् आणि समाजप्रिय बनविण्याचें कार्यहि वृत्तपत्रें करतात.

## लोकशाही समाजाची नीतिमत्ता

**( मॅडिसन ह्यांस, १७८९ )**

राष्ट्राच्या वागणुकींत कृतज्ञतेला स्थान नाहीं, असें म्हणून सबबी सांगणें म्हणजे कत्तल, विषप्रयोग, खोटे दस्तऐवज करणें, अशांसारखे गुन्हे कायदेशीर मानण्याचें जें तत्त्व कित्येक शतकें गाडून टाकण्यांत आलें आहे, त्याला पुन्हा जिवंत करणें होय. प्राचीन व आधुनिक संस्कृतींच्या दरम्यानच्या संक्रमणकाळांत हे सर्व गुन्हे कायदेशीर मानले गेले होते;पण अठराव्या शतकांत ही प्रथा मोडून हे गुन्हे भयंकर मानण्यांत आले. मनुष्य एकटा वागत असो,कीं बरोबरीनें सामुदायिक रीतीनें वागत असो, त्याच्या वागणुकीचें नैतिक

मूल्यमापन मीं एकाच तत्त्वानें करतों. इतर शंभर लोकांत असलों कीं, मी बदमाशासारखें वागेन, पण एकटा असलों कीं माझी वागणूक प्रामाणिकपणाची असेल, असें जो कोणी म्हणेल त्याच्या प्रामाणिक वागण्यावर विश्वास ठेवतां येणार नाहीं. मी एका कविवचनावर विश्वास ठेवून म्हणेन कीं, जर एका व्यक्तींतील नीतिमत्ता त्याच्या एकट्याच्या वागणुकींत प्रतीत होते, तर शंभर लोकांची नीतिमत्ता त्यांच्या सामुदायिक वागणुकींत कां स्पष्ट होऊं नये ?

## चर्चास्वातंत्र्य

### ( बेंजामिन कॅरिंग ह्यांस, १८०१ )

माणसामाणसांत समजुतीचे फरक असल्यामुळें व तर्कशुद्ध विचार करण्याच्या अभावामुळें विचार आणि भाषणस्वातंत्र्य असलेल्या देशांत मतभेद हे असणारच. पण आपण आपल्या भाग्यवान् देशांत करतों, त्याप्रमाणें मतभेदांचें गढूळ वातावरण उघड चर्चेच्या मार्गानें जर शुद्ध होऊं दिलें, तर मतभेदांचे ढगहि आकाशांतून जाणाऱ्या ढगांसारखे निघून जातात व सृष्टि अधिक तेजस्वी आणि शांत दिसूं लागते. सुव्यवस्थित जीवन जगणें व कायद्याच्या आज्ञा प्रेमानें पार पाडणें हें अमेरिकन नागरिकांचं वैशिष्ट्य. हीच देशांतर्गत शांततेची हमी होय. आपल्या सुरक्षिततेचा मार्ग म्हणून मतदानाच्या हक्काचें आपण रक्षण केलें, तर ज्ञानाच्या आधारावर लिहिलेली व जनतेच्या सदिच्छेवर आधारलेली आपली राज्यघटना कमकुवत करण्यासाठीं बळावणाऱ्या वृत्ती आपोआपच नाहींशा होतील. जनतेची सदिच्छा हाच कुठल्याहि शासनसंस्थेचा पाया असतो.

## सर्वांना मतदानाचा हक्क

### ( जे. मूर ह्यांस, १८०० )

[ सर्वांना मतदानाचा हक्क द्यावा ] असेंच माझें पहिल्यापासूनचें मत आहे. पण मालमत्ता असली कीं, मन स्वतंत्रपणें विचार करूं शकतें, असें मानणारे कांहीं फार प्रामाणिक लोक आहेत व त्यांना वाटतें कीं, मतदानाचा

हक्क मालमत्ता असण्याशीं संबंधित असावा. कुणाजवळ कितीहि संपत्ति असली तरी, मतें विकणें किंवा विकत घेणें अशक्य व्हावें एवढी प्रचंड मतदारांची संख्या असावी, असें माझें मत आहे. मी पुढें जाऊन असेंहि म्हणतों कीं, आधिक संपत्ति मिळाली कीं, माणसें अधिक प्रामाणिक होतात असें मला दिसलें नाहीं.

( एम्. पेन् ह्यास, १७९५ )

पंधरांपैकीं चौदा माणसें बदमाश असतात ह्या रॉचफुकॉल्ड आणि मॉण्टेस्क्यू ह्यांच्या म्हणण्यावर माझा विश्वास नाहीं......पण बदमाश, उच्च स्थानावरच अडळतात, असा माझा नेहेमींचा अनुभव आहे... कारण समाजांतील लाखों लोकांच्यापेक्षां उच्चस्थानीं चढणारे अधिकाराच्या व लाभाच्या जागा पटकावण्याचा नेहेमींच प्रयत्न करतात. हे बदमाश प्रथम जनतेंत आपल्याबद्दल चांगलें मत तयार करतात. व मग त्या मताच्या जोरावर कायदे करून व संघटना करून त्यांना त्यांच्या जागावरून हुसकून लावण्याचा खुद्द जनतेचा हक्क हिरावून घेतात.

## न्यायबुद्धि

### ( एफ्. डब्ल्यू. गिल्मेर ह्यांस, १८१६. )

समाजांत मिसळण्यासाठीं माणसाचा जन्म झाला, पण न्यायबुद्धि असल्याशिवाय सामाजिक संबंध राखणें शक्य नाहीं; म्हणजे मनुष्याला न्यायबुद्धि उपजतच असली पाहिजे. शासनसंस्थेबद्दल भविष्य वर्तविणाऱ्यांनीं नेहेमींच एक चूक केलेली आहे. वास्तविक अमेरिकन इंडियन समाजाची माहिती असतांना त्यांनीं ही चूक आधींच सुधारायला हवी होती. शासनसंस्थेच्या जन्माचा इतिहास सांगतांना ते असें प्रतिपादन करीत कीं, शासनसंस्थेचा उगम हा पितृवंशी किंवा राजवंशी स्वरूपांत झाला. आपला अमेरिकन-इंडियन समाज आज एककुटुंबी समाजाच्या अवस्थेंतून पुढें गेला आहे; पण अजून कुठल्याहि कायद्याच्या किंवा न्यायाधीशाच्या अधिकाराखालीं आलेला नाहीं. त्यांच्यांत प्रत्येक माणसाला स्वतःच्या मनाप्रमाणें वागण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे. पण असें वागतांना त्यानें जर दुसऱ्याच्या हक्कांवर अतिक्रमण केलें व हें अतिक्रमण फार सौम्य असलें, तर समाज आपली नावड व्यक्त करून त्याला शिक्षा

देतो, म्हणजे आपल्या भाषेंत म्हणावयाचें तर समाजाचें मत त्याच्याविरुद्ध जातें, आणि त्यानें केलेलें अतिक्रमण जर गंभीर स्वरुपाचें असेल, तर धोकेबाज शत्रू म्हणून त्याचा निःपात करण्यांत येतो. त्या समाजाचे पुढारी त्या समाजाचें नेतृत्व फक्त आपल्या चारित्र्याच्या जोरावरच करतात व त्यांना ज्यांचें चारित्र्य, बुद्धिमत्ता किंवा शौर्य सर्वोत्तम वाटतात त्याचे ते अनुयायी होतात, किंवा इच्छा नसली तर होतहि नाहींत.

## सरकारी नियंत्रण जितकें कमी, तितकें अधिक हितावह

(Notes on Virginia Query II (1787 revised)

(अमेरिकन इंडियन्स) अनेक छोट्या छोट्या समाजांत विभागलेले आहेत...त्यांनीं आजपर्यंत कुठलाच कायदा, किंवा सत्ता मानली नाहीं व शासनसंस्थेची त्यांच्यावर सांवलीहि पडली नाहीं. त्यांच्या समाजाचे सामाजिक शिष्टाचार व बरें काय व वाईट काय ह्याबद्दलच्या त्यांच्या नैतिक कल्पना, एवढेंच त्यांच्यावरील निर्बंध आहेत. जशी चव किंवा भावना ह्या प्रत्येक मनुष्याचा एक भागच आहेत, तसेंच ह्या कल्पना त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक भागच होऊन बसल्या आहेत ह्या भावनांच्या विरुद्ध जो गुन्हा करील, त्याला समाज बहिष्कृत करून शिक्षा देतो...शासनाचा हा प्रकार जरी अर्धवट वाटत असला तरी त्या समाजांत गुन्हे फारच कमी घडतात. इतके कमी कीं, ज्याप्रमाणें अमेरिकन–इंडियन्समध्यें कायद्याचा पूर्ण अभाव आहे, त्याप्रमाणें कायद्याचें नियंत्रण कमी केलें तर मनुष्य वाईट प्रवृत्तीकडे जातो वा युरोपियन राष्ट्रांत असल्याप्रमाणें कायद्याचा अतिरेक केल्यामुळें असा परिणाम होतो, असा प्रश्न विचारला गेला तर ज्यानें दोन्ही प्रकारची जीवनें पाहिलीं आहेत, तो म्हणेल कीं, कायद्याच्या अतिरेकामुळेंच असा परिणाम होतो; लांडग्यांची देखरेख नसलीं कीं मेंढरें आपसांत सुखानें राहातात. ह्यावर मोठे समाज सरकारी नियंत्रणाशिवाय टिकूं शकत नाहींत असें सांगण्यांत येईल. म्हणून रानटी लोक मोठे समाज न बनवतां, छोटे छोटे बनवतात.

* * *

: ४ :

# प्रजासत्ताकवाद

## प्रजासत्ताक म्हणजे काय ?

### ( जे. टेलर ह्यांस, १८१६ )

प्रत्येक भाषेंत प्रजासत्ताक ह्या शब्दाचा अर्थ अत्यंत अस्पष्ट लावण्यांत येतो, हें मान्य केलें पाहिजे. हॉलंड, स्वित्झर्लंड, जिनोआ, व्हेनिस, पोलंड हीं त्यांनीं स्वतःच घोषित केलेलीं प्रजासत्ताकें पाहा. ह्या शब्दाला मीं जर स्पष्ट अर्थ द्यायचें ठरविलेंच तर मी म्हणेन कीं, प्रजासत्ताक म्हणजे बहुसंख्य नागरिकांनीं, प्रत्यक्ष रीतीनें व व्यक्तिशः प्रस्थापित केलेले व बहुसंख्य नागरिकांनीं घालून दिलेले नियम पाहून वागणारें सरकार; आणि ज्या प्रमाणांत नागरिकांनीं सरकार स्थापण्यांत वर सांगितल्याप्रमाणें प्रत्यक्ष भाग घेतला असेल, त्या कमीअधिक प्रमाणांत सरकारें प्रजासत्ताक म्हणतां येतील. असें सरकार स्थापणें हें लहान प्रदेशांत व छोट्या समाजांतच शक्य होईल, हें स्पष्ट आहे. न्यूइंग्लंडमधील एखाद्या मध्यम आकाराच्या शहरापेक्षां असें प्रजासत्ताक मोठें असणार नाहीं.

जशी शुद्ध हवा ही शुद्ध स्वरूपांत टिकूं शकत नाहीं, तसें प्रजासत्ताकाचें हें शुद्ध स्वरूपहि टिकूं शकत नाहीं. त्या खालोखालच्या स्वरूपांत प्रजासत्ताक चालविणें म्हणजे शासनव्यवस्था विभागून, ती जनतेनें निवडलेल्या प्रतिनिधींच्यातर्फे चालविणें. हे प्रतिनिधी अल्पमुदतीसाठीं निवडलेले असावेत. म्हणजे त्यांच्या हातीं सत्ता देणें सुरक्षित ठरेल व जनतेचें मत ते आपल्या कारभारांत व्यक्त करूं शकतील. हा प्रकार शुद्ध प्रजासत्ताकाच्या जवळचा ठरेल व मोठ्या

आकाराच्या किंवा मोठ्या लोकसंख्येच्या देशांत प्रस्थापित करतां येईल. आपल्या कांहीं घटक राज्यांच्या राज्यघटनांत आपल्याला ह्यांचीं उदाहरणें मिळतात. अशा राज्यघटनांत, धर्मगुरूंच्या ढवळाढवळीचें विष जर न भिनलें तर इतर कुठल्याहि मिश्रव्यवस्थेपेक्षां सरस ठरतील व जरी त्यांच्यांत असें विष मिसळलें तरी, समप्रमाणांत इतर कोठल्याहि पद्धतींत विष मिसळलें असतां जी परिस्थिति येईल, त्या पद्धतींशीं तुलना करतां ही पद्धत सर्वश्रेष्ठ ठरेल.

प्रजासत्ताकवाद आणखी निराळ्या प्रकारच्या शासनव्यवस्थांतहि पाहावयास मिळतो. अशा प्रकारांत अंमलबजावणी खातें, कायदे बनविणारे आणि न्यायदान करणारे आणि कायदे बनविणारांच्या अनेक शाखांत काम करणारे ह्यांची निवड जवळपास प्रत्यक्ष रीतीनें जनता करते. ही निवड अनेक वर्षांसाठीं किंवा निवडलेल्यांच्या हयातभर अशा दीर्घ मुदतीसाठीं असते, किंवा ती आनुवंशिक होते किंवा जेथें अनेक अधिकार मिसळले असतात तेथें कांहीं जनतेच्या निवडीवर अवलंबून असतात, तर कांहींचा जनतेशीं संबंध नसतो. शासनसंस्था ही जनतेच्या नियंत्रणापासून जितकी दूर असेल, तितकीं तिच्यांत प्रजासत्ताक तत्त्वें कमी असतात. त्यामुळें, जेथें अधिकारग्रहण हें आनुवंशिक असतें अशा फ्रान्स, व्हेनिस इत्यादि देशांत, किंवा जेथें अधिकारग्रहण हें स्वयंनिर्मित असतें, अशा हॉलंडसारख्या देशांत तेथें प्रजासत्ताकाचें अस्तित्व मुळींच नव्हतें आणि ज्या देशांत निवडलेल्यांच्या हयातभर त्यांना अधिकार मिळतो तेथें, निवडणुकांनंतर जितकें आयुष्य असेल, तितक्या प्रमाणांतच असतें.

आपल्या राज्यांत प्रजासत्ताकाचें शुद्ध स्वपरू म्हणजे, हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज् सीनेट हें पहिल्या वर्षी शुद्ध स्वरूपांत व नंतर प्रतिवर्षी कमीकमी प्रमाणांत प्रजासत्ताक स्वरूपाचें असतें. न्यायदान-खातें हें आनुवंशिक अधिकारग्रहण करणारांचें असल्यानें, प्रजासत्ताकविरोधी आहे. लष्करी अधिकारीहि केवळ स्वतःलाच जबाबदार असतात.

## अमेरिकन सरकारें प्रजासत्ताक आहेत का ?

( जे. टेलर ह्यांस, १८१६)

शासनसंस्थेच्या निरनिराळ्या शाखांवर जनतेचें ज्या प्रमाणांत नियंत्रण

असेल, त्या प्रमाणांत ती शासनसंस्था प्रजासत्ताक जर मानली,—आणि ह्याखेरीज दुसरें कसलेंहि प्रमाण मला माहीत नाहीं हें मी कबूल करतों,—तर आपलीं सरकारें अपेक्षित प्रमाणांपेक्षां कमी स्वरूपांत प्रजासत्ताकें आहेत हें कबूल केलें पाहिजे; किंवा निराळ्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, जनतेच्या प्रतिनिधींवर, जनतेच्या हक्कांच्या व हिताच्या दृष्टीनें विचार करतां, असावें त्यापेक्षां कमी प्रमाणांत नियमित नियंत्रण आहे. माझ्या मतें ह्या अवस्थेचें कारण, ज्यांनीं राज्यघटना तयार केल्या, त्यांच्यांत प्रजासत्ताकाबद्दल कमी सहानुभूति होती हें नव्हे; खरें कारण असें आहे कीं, युरोपियन अधिकाऱ्यांनीं व्यक्तीपुढें खरीं तत्त्वें बाजूला सारून नमतें घेतलें व ज्यांना युरोपांतील आपल्या शहरांच्या जनतेचा जो अनुभव आला होता तोच अनुभव स्वतंत्र, सुखी व म्हणून कायद्याच्या कक्षेंत वागणाऱ्या अमेरिकन नागरिकांनाहि त्यांनीं अन्यायानें लागू केला व येथील सरकारांविरुद्ध भविष्य वर्तविलें.

ह्या चुका सुधारण्याची सुवर्णसंधि निघून गेली आहे, अशी मला भीति वाटते. ज्यांच्या हातांत सत्ता जाते ते आपली सत्ता संकुचित करण्यास क्वचित्च तयार होतात व असंघटित जनमताला अशा सुधारणा घडवून आणण्याचें आवाहन,त्या आवाहनाला होणाऱ्या संघटित प्रतिकाराचा विचार करतां फारसें यशस्वी होण्याचा संभव नसतो. ‘सारें व्यवस्थित चाललें आहे, कशाला बदल करायचा?’ असें आपणांस नेहमीं सांगण्यांत येतें. ‘जो चांगला उभा राहातो, त्याला स्तब्ध उभा राहूं द्या’ अशी एक इटालियन म्हण आहे. हें खरें आहे; आणि मला तर असा विश्वास आहे कीं, आम्ही आज जसे कायद्याच्या आज्ञा मानणारे, मेहेनती, शांतताप्रिय व संयमी आहोंत, तसेच जनतेचे हे गुण असलेला जरी एखादा अनियंत्रित अधिकार असलेला राजा इथें असला तरी आम्ही तसेच राहूं. पण अशी परिस्थिति असतांनाच, ती पुढें बिघडणार नाहीं ह्याची काळजी घ्यावी लागते. असें होईल अशी आशा मनाशीं ठेवूं या व वाईट कधींच होणार नाहीं, अशी आपल्या मनाला ग्वाही देऊं या.

तेव्हां रिपब्लिक ह्या शब्दाचें स्वरूप ‘कांहींहि किंवा कांहींहि नाहीं’ असें असल्याचें न सांगतां, त्याचें सत्य व सार्थ स्वरूप असें सांगू

या कीं, सरकारांत ज्या प्रमाणांत जनतेला प्रत्यक्ष निवडणूक व नियंत्रण ठेवायला वाव असतो, त्या कमी किंवा अधिक प्रमाणांत तीं रिपाब्लिकन असतात; आणि माझ्याप्रमाणें आपणहि असा विश्वास ठेवूं या कीं, जनतेच्या हक्कांचें रक्षण बहुसंख्य जनताच करूं शकते, व जनतेची फसवणूक होण्यांत जेवढा धोका असतो, त्यापेक्षां अधिक धोका त्यांच्या प्रतिनिधींच्या अहंकारांत असतो. ज्या सरकारांत हे गुण अधिक प्रमाणांत असतील, त्या सरकारचा मी मित्र आहें.

* * *

: ५ :

## राजकीय पक्ष

## ॲरिस्टोक्रॅट्स् व डेमॉक्रॅटस्

### ( एच्. ली ह्यांस, १८२४ )

माणसांच्या मनांच्या घडणीमुळें, त्यांचे दोन पक्ष पडतात : ( १ ) जे जनतेला भितात व ज्यांचा जनतेवर अविश्वास आहे व म्हणून जे सर्व सत्ता जनतेकडून हिरावून घेऊन, उच्चजन्मीयांच्या हातीं देऊं इच्छितात ते; व ( २ ) जे आपल्याला जनतेंतीलच समजतात, ज्यांचा जनतेवर विश्वास आहे, जनतेला आपली समजून तिला प्रामाणिक व सुरक्षित समजतात, पण सार्वजनिक हितरक्षणाच्या बाबतींत शहाणी मानीत नाहींत. प्रत्येक देशांत हे दोन पक्ष असतात व ज्या देशांत नागरिकांना विचार, वाचा व लेखनस्वातंत्र्य आहे, त्या प्रत्येक देशांत ते आपले विचार जाहीर करतात. मग त्यांना तुम्ही लिबरल्स व सर्व्हाइल्स, जॅकोबिन्स व अल्ट्राज, व्हिग्ज व टोरीज, रिपब्लिकन्स आणि

फेडरॅलिस्ट्स् अशा कोणत्याहि नांवांनीं ओळखा, ते पक्ष एकसारखेच आहेत व एकाच ध्येयाकडे जाणारे आहेत. ह्या सर्वांचें सार 'ॲरिस्टोक्रॅट्स्' व 'डेमोक्रॅट्स्' ह्या नांवांत आलें आहे.

## लोकशाहीसाठीं राजकीय पक्ष आवश्यक आहेत

**( जे. टेलर ह्यांस, १७९८. )**

स्वतंत्र असलेल्या व ज्यांत चर्चा होते अशा समाजांत, मनुष्यस्वभाव विचारांत घेतला तर, एकमेकांस विरोध करणारे पक्ष असणारच व त्यांच्यांत कडाक्याचे मतभेद होणारच; व त्यांतल्या एखाद्या पक्षाचें, कमी-अधिक काळ दुसऱ्या पक्षावर वर्चस्व राहाणारच. कदाचित् एका पक्षांत काय चालतें तें सांगण्यासाठीं दुसरा विरोधी पक्ष हवाच. पण अल्पकाळा-साठीं एका पक्षाचें बहुमत झालें व त्यासाठीं दुसऱ्या पक्षानें युनियन सोड-ण्याचा विचार केला तर, कुठलेंहि मध्यवर्ती सरकार टिकणार नाहीं.

मॅसाशुसेट्स् व कनेक्टिकटमधील सध्याच्या सरकारांना हांकलून लावण्यासाठीं, आम्हीं युनियन ( संघराज्य ) मोडलें तर ही अनिष्ट प्रथा कुठ-पर्यंत पोंचणार? समजा, न्यू-इंग्लंडचीं राज्यें आपण अलग केलीं, तर काय आपण बदलणार आहों? आपण त्यांच्या दक्षिणेसच नाहीं का राहाणार? आणि माणसांची भावनाविवशता राहाणारच ना? मग लगेच उरलेल्या भागांतील पेनसिल्वानिया आणि व्हर्जिनिया ह्यांच्या-तील एखादा पक्ष बंड करून उठेल, आणि जनतेचें लक्ष अशा पक्षभेदानें व्यापलें जाईल. आणि 'आमचें ऐकलें नाहीं तर आम्ही उत्तरेंतील पक्षाशीं संगनमत करूं' अशी धमकी एक राजकीय पक्ष दुसऱ्या राजकीय पक्षाला सतत देऊं लागला, तर तें एक हत्यारच होऊन बसेल.

तेव्हां, ज्यांत भांडणें नाहींत अशी मनुष्य–संघटना माझ्या माहिती-प्रमाणें आजपर्यंत अस्तित्वांत आलेली नसल्यानें, मग तीं मोठीं संघराज्यें असोत कीं एखाद्या छोट्या गांवाची पंचायत असो; व आपल्याला भांडायला कोणीतरी हवेंच ह्याबद्दल खात्री पटल्यानें, मी असें म्हणेन कीं, आमचे आपसांतील मतभेद इतरांपर्यंत पोंचविण्यापेक्षां न्यूइंग्लंडच्या आमच्या सहकाऱ्यांशींच आम्ही भांडत बसलेलें बरें.

## अमेरिकेंतील दोन राजकीय पक्ष

### ( जॉन वाइज ह्यांस, १७९८. )

अमेरिकेंत दोन राजकीय पंथ निर्माण झाले आहेत; एका पंथाचा असा विश्वास आहे कीं, आमच्या शासनसंघटनेपैकीं अंमलबजावणीच्या विभागासच सर्वांत अधिक पाठिंबा देणें आवश्यक आहे; दुसऱ्या पंथास असें वाटतें कीं,इंग्लिश शासनयंत्राप्रमाणें, आपल्याहि अंमलबजावणी-खात्याला, आपल्या राज्यघटनेंतील लोकसत्ताकाविषयींचीं कलमें लक्षांत घेतां, वाजवीपेक्षां जास्तच सत्ता दिलेली आहे......ह्या दोनपैकीं पहिल्या पंथाला फेडरॅलिस्ट म्हणतात, कांहीं वेळां ह्या पंथास ॲरिस्टोक्रॅट्स् किंवा मोनोक्रॅट्स् आणि कांहीं वेळां ह्या पंथाप्रमाणेंच इंग्लंडमध्यें असलेल्या पंथाच्या नांवावरून टोरी म्हणण्यांत येतें. दुसऱ्या पंथास रिपब्लिकन, व्हिग, जॅकोबिन्स, अराजक माजविणारे, अव्यवस्था निर्माण करणारे इत्यादि नांवें देण्यांत येतात. बहुतेकांस ह्या नांवांचे अर्थ कळतात......दोन्ही पंथांत शुद्ध चारित्र्याचीं प्रामाणिक माणसें आहेत आणि माझ्याबद्दल विचाराल तर, मी म्हणेन कीं, सभ्य आणि चांगल्या माणसांबद्दल मला जो आदर वाटतो, तो त्यांच्या राजकीय पक्षसंबंधामुळें कधींच कमी होत नाहीं.

### ( ॲबिगेल आदाम्स ह्यांस, १८०४ )

माझ्या मतापेक्षां निराळीं मतें असण्याचा इतरांचा अधिकार मी मान्य करतों व तसे मतभेद असल्यास तो त्यांचा गुन्हा आहे, असें मी मानीत नाहीं. मानवी मनाचा कमकुवतपणा व विचारवैचित्र्य माझ्या पूर्ण परिचयाचीं असल्यानें प्रत्येकाचे विचार सारखे नसल्यास मला त्याचें आश्चर्य वाटत नाहीं. आपल्या दोन्ही पक्षांचें, निदान त्यांच्यांतील सभ्य लोकांचें ध्येय जनतेचें हित करणें हेंच आहे. पण हें हित कोणत्या मार्गानें साधावें ह्याबद्दल त्यांच्यांत मतभेद आहेत. एका पक्षाला जनतेच्या अज्ञानामुळें भीति वाटते, तर दुसऱ्या पक्षाला जनतेपासून अलिप्त असणाऱ्या राज्यकर्त्यांच्या स्वार्थाची भीति वाटते.ह्यापैकीं कोणाचें बरोबर आहे तें काळ व अनुभव सिद्ध करतील.आपल्याला असें वाटतें कीं, ह्या प्रयोगांत एका पक्षाला पुरेसा काळ वाव मिळाला असूनहि बहुसंख्य जनतेचें हित त्याला साधतां आलें नाहीं व दुसऱ्या पक्षाला पुरेसा

वाव मिळालेला नाहीं. आपल्या विरोधकांचें मत नेमकें ह्याविरुद्ध आहे. देशांतील बहुसंख्य जनतेला ह्यांतलें जें मत मान्य असेल तें स्वीकारलें पाहिजे. ह्याबाबत माझीं मतें कांहींहि असलीं तरी त्या मतांच्या आहारीं जाऊन,मी योग्य व न्याय्य मार्ग कधीं सोडणार नाहीं;सत्य आणि सदसद्विवेक-बुद्धीला पटणारें जें असेल तें मी सोडणार नाहीं. माझ्या राजकीय मतांमुळें नैतिक मूल्यांवरील माझा विश्वास कधींहि ढळला नाहीं व आपण होऊन जे मला सोडून गेले असतील, त्यांच्याखेरीज एकाहि मित्रावरील माझें प्रेम कमी झालें नाहीं.

## दोन पक्षांतील मूलभूत फरक

### (जज जॉन्सन ह्यांस, १८२३)

वस्तुस्थिति अशी आहे कीं, आमच्या सरकारची स्थापना जेव्हां झाली, तेव्हां पुष्कळांनीं आपलीं राजकीय मतें युरोपांतील लिखाण व युरोपांतील देशांचा, विशेषतः इंग्लंडचा अनुभव ह्यांवर आधारलीं होतीं. हा अनुभव अहितकारक ठरला तरी निव्वळ तत्त्वप्रतिपादनापेक्षां अनुभव बरा,असें त्यांना वाटत होतें. युरोपांतील तत्त्वें अशीं होतीं कीं, अनेक संघटनांत सामील असणाऱ्या माणसांवर नियंत्रण ठेवणें फक्त शारीरिक व नैतिक बलाचा उपयोग करूनच शक्य असतें व हें बळ, ज्यांच्यावर जनतेच्या मताचा कांहींहि परिणाम होऊं शकत नाहीं अशा अधिकाऱ्यांकडून वापरलें जावें.ह्यामुळेंच त्यांनीं राजेरजवाडे, वंशपरंपरागत सरदारवर्ग आणि धर्मोपदेशक ह्यांच्या संघटना निर्माण केल्या. जनतेचें प्रचंड बळ कष्ट, अज्ञान आणि दारिद्य ह्या मार्गें आवाक्यांत ठेवणें हा वर्ग आवश्यक समजतो व ह्यासाठीं ज्याप्रमाणें मधमाशांच्या श्रमांचें मधुर फळ आपण त्यांच्यापासून हिरावून घेतों, त्याप्रमाणें जनतेच्या कष्टाचें फळ हा वर्ग जनतेपासून हिरावून घेतों व सतत कष्ट करीत कसेंबसें जीवन जगणें जनतेला भाग पाडतो. अशा रीतीनें जनतेकडून मिळविलेल्या उत्पन्नाच्या आधारावर हा वर्ग मोठ्या ऐषआरामांत आळशीपणानें आपलें सुस्थितींतील जीवन, जनतेला त्यांच्या ऐश्वर्याचें कौतुक वाटावें अशा थाटामाटानें जगतो. त्यांच्या ऐश्वर्यानें जनतेचे डोळे दिपले कीं, हा

वर्ग आपल्यापेक्षां वरच्या दर्जाचा आहे ही भावना जनतेच्या मनांत तयार होते व त्यामुळें जनता त्यांच्या अधिक अंकित होते.

आपल्यांतील कांहीं लोकच इतका दूरवर विचार करीत असले तरी ह्या विचारांच्या दिशेनें कमी–अधिक प्रमाणांत कांहींनीं वाटचाल केली होती. ज्या अधिवेशनांत आपण सरकार स्थापलें, त्या अधिवेशनांत सरकारी कारभार चालविणारांना त्यांच्या मतदारांच्या इच्छेवर अवलंबून राहाण्याची आवश्यकता न पडतां,त्यांनीं घटक राज्यांच्या आज्ञेवरच अवलंबून रहावें असे प्रयत्न करून सत्तेचे धागेदोरे त्या दृष्टीनें खेंचून बळकट करायचा त्यांनीं प्रयत्न केला. मध्यवर्ती जनरल सरकार व घटक राज्यसरकार ह्यांच्या सत्ता समतोल राखण्याचा जो प्रयत्न बहुसंख्य सभासद करीत होते, ते प्रयत्न अयशस्वी करण्याचाहि त्यांचा प्रयत्न होता. म्हणजे जनतेनें नाकारलेली सत्ता बळकावण्याचा व जे अधिकार जनतेनें दिलेले आहेत,त्यांचा उपयोग आपल्या इच्छेप्रमाणें करण्याचा फेडरल पक्षाचा सतत हेतु होता.

आमचा ( रिपब्लिकन पक्षाचा ) हेतु अधिवेशनांतील बहुसंख्य सभासदांची व जनतेची इच्छा मानली जावी हा होता. त्यांच्याप्रमाणें आम्हांलाहि असें वाटतें कीं,मनुष्य हा विचारशक्ति असलेला प्राणी आहे, निसर्गानें त्याला हक्क व न्यायबुद्धि दिलेली आहेत. चुकीच्या मार्गानें तो जात असला तर त्याच्यावर नियंत्रण ठेवावें व त्याच्या योग्य वागणुकींत त्याला संरक्षण द्यावें, हें कार्य त्यानें निवडलेल्या प्रतिनिधींना सौम्य स्वरूपाचे अधिकार देऊन करावें, आाणि असे अधिकार ज्यांना द्यावयाचे ते माणसांच्या इच्छेनुसारच अधिकारपदावर राहावेत. संघटित मानवसमाजाला सुखी ठेवण्यासाठीं राजेरजवाडे,सरदार आाणि धर्मोपदेशक ह्या संघटना सर्वोत्तम किंवा सर्वज्ञानी आहेत असें आम्हांला वाटत नाहीं; शहाणपण किंवा सदाचार हे आनुवंशिक गुण आहेत, असें आम्हांला वाटत नाहीं. मनुष्यांच्या ज्या श्रम-उद्योगाला अशा वर्गानें संरक्षण द्यावयाचें, त्यांचेंच उत्पन्न हा वर्ग खात असतो व हा वर्ग समाजांत जी असमानता निर्माण करतो तीमुळें प्रत्यक्ष मानवी स्वातंत्र्यच धोक्यांत येतें.

आमचा असा विश्वास आहे कीं, ज्या माणसांना स्वस्थपणें आणि

सुरक्षितपणें आपल्या कष्टांचें फळ चाखायला मिळतें,न्याय आणि सुरक्षितता टिकविण्याबद्दल ज्यांना आपुलकी वाटते, ज्यांना स्वतःच्या हिताहिताचा विचार करण्याची संवय असते व आपल्या बुद्धीला जें पटेल तेंच मार्गदर्शक तत्त्व मानायची ज्यांना संवय असते, अशा माणसांवर नियंत्रण ठेवणें हें, ज्यांचीं मतें चुकीच्या विचारांवर पोसलीं आहेत, आणि युरोपांत असल्या-प्रमाणें, अज्ञान आणि जुल्म ह्यांनीं दबलेलीं व विकृत झालेलीं आहेत अशा माणसांपेक्षां, अधिक सोपें आणि सुरक्षित असतें. जनतेवर प्रेम करणें हें त्या वेळीं आमचें तत्त्व होतें, तर जनतेबद्दल भीति व गैरविश्वास वाटणें हें दुसऱ्या पक्षाचें तत्त्व होतें. आमचे सभासद हे शेतकरी व कामकरी अस-ल्यानें राज्यांत शांतता व सुरक्षितता असावी ह्याचें महत्त्व दुसऱ्या पक्षांत बहुसंख्य असलेल्या शहरवासीयांइतकेंच आम्हांलाहि वाटतें. आमच्या राज्यघटनेंतील तत्त्वें व तिचें स्वरूप ह्यांचें रक्षण करण्यासाठीं आम्ही केलेले प्रयत्न सरळमार्गी होते कीं नाहीं ह्याचा निर्णय आमच्या देशांत आज रिप-ब्लिकन पक्षाखालीं स्वातंत्र्य, सामाजिक शांतता आणि आमच्या देशाची होणारी भरभराट ह्यावरूनच देतां येईल.

* * *

: ६ :

## राज्यघटना

### (अ) अधिकार–विभागणी

( ॲडाम ह्यांस, १७८७ )

चांगल्या शासनसंस्थेचें पहिलें तत्त्व असें कीं, त्या शासनसंस्थेनें आपले अधिकार अंमलबजावणी, न्याय आणि वैधानिक अशा भागांत विभागावेत

व शेवटच्या भागानें आपले अधिकार आणखी दोन किंवा तीन उपविभाग करून त्यांच्यांत विभागावे. इंग्लंडची राज्यघटना, जी पूर्वीच्या सर्व राज्य-घटनांच्यापेक्षां सर्वांच्या मतें जास्त चांगली आहे, ही अशी अधिकार–विभागणीच्या उद्दिष्टाला अधिक जवळची असल्यानें चांगली आहे, असें सिद्ध झालें म्हणजे योग्य दिशेनें आमचें एक पाऊल पुढें पडल्यासारखें होईल. मग आमच्या ध्येयाप्रद जाणारें शेवटचें पाऊल उचलणें सोपें होईल; कारण आमच्या राज्यघटनांची तुलना इंग्लंडच्या राज्यघटनेशीं करून त्या कशा चांगल्या आहेत हें आम्हांला दाखवितां येईल.

( Notes on Virginia, Query 13 )

आम्ही कांहीं 'निवडून दिलेल्या' अनियंत्रित शासनयंत्रासाठीं लढलों नाहीं, तर स्वातंत्र्याच्या तत्त्वावर आधारलेल्या, पण ज्याचे अधिकार समतोल प्रमाणांत निरनिराळ्या विभागांत विभागले गेलेले आहेत, असें शासनयंत्र आम्हांला हवें आहे..... म्हणजे कोणालाहि कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादांचें उल्लंघन करतां येणार नाहीं. कारण त्यांनीं तसें केलें तर दुसरे त्यांच्यावर निर्बंध घालतील व नियंत्रण ठेवतील.

( मॅडिसन ह्यांस, १७८७ )

राज्यकारभार करणाऱ्या शासनयंत्राची विभागणी वैधानिक, न्यायदान व अंमलबजावणी अशा विभागांत झालेली मला आवडते. कर बसविण्याचा अधिकार विधानसभेकडे दिलेला मला आवडतो व केवळ त्या कारणांसाठीं विधानसभा ही केवळ जनतेनें प्रत्यक्षपणें निवडून दिलेल्या सभासदांची असावी, हें तत्त्व मला मान्य आहे. मला वाटतें, विधानसभेचे असे निवडलेले सभासद सध्यांच्या कॉंग्रेसपेक्षां पुष्कळच कमी दर्जाचे असतील व पुऱ्या देशासाठीं व परराष्ट्रसंबंधाविषयीं कायदे करण्याची त्यांची पात्रताहि पुष्कळ कमी असेल. असें असलें तरी ह्यांत प्रत्यक्ष जनतेनें निवडलेले प्रतिनिधी ज्या विधानसभेंत नाहींत तिला कर बसविण्याचा हक्क नाहीं, हें तत्त्व अबाधित ठेवल्यामुळें आमचें जें हित साधणार आहे त्यापुढें हें नुकसान कांहींच नाहीं.

मराठी ग्रंथ ... अनुक्रम...

## (ब) मूलभूत हक्क

## ( Bill of Rights )

### राज्यघटनेंतील उणिवांवर टीका

**( मॅडिसन ह्यांस, १७८७ )**

मला काय आवडत नाहीं तें आतां मी तुम्हाला सांगतों. प्रथम, तींत मूलभूत हक्कांची तरतूद नाहीं. अशा तरतुदींत स्पष्टपणें आणि कुठल्याहि पद्धतीची बनवाबनवी न करतां धार्मिक स्वातंत्र्य,वृत्तपत्रस्वातंत्र्य,खड्या सैन्या-विरुद्ध रक्षण, मक्तेदारीवर नियंत्रण, हेबियस कॉर्पसचा कायदा कायम आणि पूर्ण रूपांत वापरण्याचा अधिकार, आणि आपल्या देशाच्या कायद्या-प्रमाणें,— अनेक देशांत प्रचलित असलेल्या कायद्याप्रमाणें नव्हे,— ज्या गुन्ह्यांबद्दल खटला होऊं शकतो त्या खटल्यांत ज्यूरींच्या साहाय्यानें काम-काज चालावें असा हक्क, ह्यांची तरतूद हवी.

### मूलभूत हक्क मिळावेत हा जनतेचा हक्क आहे

**( मॅडिसन ह्यांस, १७८७ )**

जें माझ्यापासून हिरावून नेण्याचा हक्क दुसऱ्याला आहे,त्यावर माझा हक्क असूं शकत नाहीं आणि मुलकी बाबतींत ज्यूरींच्या साहाय्यानें खटला चालावा हा हक्क हिरावून घेण्याचा हक्क कॉंग्रेसला आहे. मी पुढें जाऊन असें म्हणतों कीं, पृथ्वीच्या पाठीवरील कोणतेंहि सरकार असो, त्या सरकारविरुद्ध मूलभूत हक्कांचें रक्षण मिळावें हा जनतेचा हक्क आहे, आणि कुठल्याहि न्यायी सरकारनें हा हक्क नाकारूं नये किंवा तो मतभेदाचा प्रश्न होण्या-इतका त्याचा अर्थ अस्पष्ट असूं नये.

## हेबियस कॉर्पसचा अनियंत्रित हक्क

### (मॅडिसन ह्यांस, १७८८)

बंड किंवा उठाव झाले तरी हेबियस कॉर्पसचा हक्क हिरावून घेण्याचें कारण काय? ज्यांना पकडण्यांत येईल त्यांच्याविरुद्ध विशिष्ट गुन्हे केल्याचे आरोप ठेवावेत; अर्थातच न्यायाधीश त्यांना अटकेंत ठेवतील. आणीबाणीच्या काळीं सार्वजनिक शांतता राखण्यासाठीं एखाद्या माणसास अपुऱ्या पुराव्यावरहि अटकेंत ठेवणें सरकारला आवश्यकच वाटत असेल,तर त्याला पकडावें व त्याच्यावर खटला करावा, पुन्हा पकडावें व पुन्हा खटला करावा व आवश्यकता असेल तोंपर्यंत असें करीत रहावें व सरकारविरुद्ध नुकसानभरपाई मागण्याची सवलत द्यावी. इंग्लंडचा इतिहास वाचा. त्यांत ज्या प्रकरणीं हेबियस कॉर्पस कायदा रद्द करण्यांत आला होता, तीं प्रकरणें नीट तपासलीं तर असें दिसेल कीं फारच थोड्या बाबतींत हेबियस कॉर्पस रद्द करणें न्याय्य ठरलें असतें. त्यांतलीं कांहीं प्रकरणें राष्ट्रद्रोहाच्या आरोपाचीं आहेत. अशा बाबतींत आरोपीवर तावडतोब आरोप ठेवतां आला असता; तर कांहीं प्रकरणें हीं कट केल्याच्या खोट्या आरोपाचीं आहेत व अशा बाबतींत हेबियस कॉर्पस रद्द केल्यानें फायदा झाला; पण आतां ही संवयच झाली असून, हेबियस कॉर्पस कायमचाच रद्द होईल, अशी नागरिकांनीं आपल्या मनाची तयारी ठेवली आहे.

## मूलभूत हक्कांचा ( बिल् ऑफ राइटस् )

## सूचित विस्तार

### मॅडिसन ह्यांस, १७८९

तुम्ही मला आपलेपणानें पाठविलेल्या हक्कांच्या जाहीरनाम्याबाबत ( declaration of rights ) मीं कांहीं सांगितलेंच पाहिजे. हा जाहीरनामा मला आवडला; पण मला तो आणखी विस्तृत हवा होता. उदाहरणार्थ, पुढील बदल व विस्तार मला मनापासून आवडले असते :

" कलम ४— बोलण्याचे, लिहिण्याचे, व ज्यामुळें दुसऱ्याचें जीवित,

स्वातंत्र्य, मालमत्ता आणि अन्न धोक्यांत येईल किंवा केंद्र सरकारचे परराष्ट्रांशीं असलेले संबंध धोक्यांत येतील अशीं असत्यें सोडून इतर कांहींहि प्रसिद्ध करण्याचे जनतेचे हक्क हिरावून घेतले जाऊं नयेत.

कलम ७— पुढील अपवाद सोडून, इतर सर्व प्रकारची सत्यस्थिति न्यायलयासमोर मांडल्यावर,ते खटले ज्यूरीच्या साहाय्यानेंच चालवावेत : (१) आरमारी अधिकाराखालीं येणारे व ज्यांत परराष्ट्रीय माणसांचा संबंध असेल असे खटले; ( २ ) अमेरिकन लष्करांतील अधिकारी व सैनिक अथवा युद्धकाळांत युद्धकार्यांत असलेल्या मिलिशियाचे अधिकारी व सैनिक ह्यांचे लष्करी न्यायालयासमोर बंडाळीबद्दल चालणारे खटले; ( ३ ) आणि राज्यघटनेंत मान्य केलेले पदच्युतीचे खटले. ( Impeachments )

कलम ८—कोणत्याहि व्यक्तीस,त्या व्यक्तीनें हेबियस कॉर्पसचा फायदा मिळावा म्हणून मागणी केल्यावर व ती मागणी कायद्यानें प्रस्थापित केलेल्या न्यायालयाच्या न्यायाधीशानें फेंटाळून लावल्यावर. . .पेक्षां अधिक दिवस कैदेंत ठेवतां येणार नाहीं; जर त्या व्यक्तीनें हेबियस कॉपर्सचा फायदा घेण्याची आपली मागणी त्या व्यक्तीला अटकेंत ठेवणारावर बजावली असेल व त्याच्या मागणीची तपासणी होऊन त्या मागणीबाबत कांहींहि निर्णय दिला गेला नसेल तर त्या व्यक्तीला मागणी केल्या दिवसापासून पुढें. . . पेक्षां अधिक दिवस अटकेंत ठेवतां येणार नाहीं; हेबियस कॉर्पसची मागणी ज्या न्यायधीशाकडे मागतां येईल, अशा न्यायधीशाच्या निवासस्थानापासून जर अटक केलेली व्यक्ति. . . मैल दूर असेल तर. . . तासापेक्षां अधिक काळ अशा जागीं त्या व्यक्तीला अटकेंत ठेवतां येणार नाहीं; एक वर्षापेक्षां अधिक काळ हेबियस कॉर्पस रद्द करतां येणार नाहीं. राजधानीपासून, अथवा बंडखोर किंवा शत्रू ज्या छावणींत असतील,त्या छावणीपासून. . .मैलांपेक्षां अधिक अंतरावर असलेल्या ठिकाणीं हेबियस कॉर्पस रद्द करतां येणार नाहीं.

कलम ९— स्वतः लिहिलेलें साहित्य किंवा कलेच्या क्षेत्रांत स्वतः लावलेले शोध ह्या बाबतींत. . . वर्षांपेक्षां अधिक नसलेल्या

मुदतीसाठीं मक्तेदारी देण्यांत यावी, ती अधिक काळ चालू देऊं नये व इतर कुठल्याहि कारणांसाठीं देऊं नये.

कलम १०—काँग्रेसनें ज्या मुदतीसाठीं सैन्यांतील अधिकारी व सैनिक ह्यांचे पगार मंजूर केले असतील ती मुदत संपल्यावर वस्तुतः ते अधिकारी व सैनिक सैन्यांतून मुक्त झाले आहेत असें समजण्यांत यावें, व परराष्ट्रांशीं युद्ध चालू नसेल तेव्हां परराष्ट्राच्या कोणाहि नागरिकास अमेरिकन सैन्यांत नोकरी करतां येऊं नये."

मला असें वाटतें कीं, हे सर्व निर्बंध केवळ सत्तेच्या दुरुपयोगाविरुद्ध उपयोगी पडतील असेच आहेत.

हक्कांच्या जाहीरनाम्याला पाठिंबा देण्यासाठीं दिलेल्या निवेदनांत मला फार महत्त्वाचा वाटणारा एक मुद्दा तुम्ही गाळला आहे, तो म्हणजे न्यायालयांना मिळणारा कायद्याचा अधिकार. जर न्यायदान करणारांना स्वतंत्र ठेवलें व त्याचें कार्य केवळ त्यांच्या खात्यापुरतें मर्यादित ठेवलें, तर त्यांचें ज्ञान व चारित्र्य ह्यांमुळें त्यांच्यावर भरपूर विश्वास टाकतां येईल. खरें म्हणजे विद, ब्लेअर आणि पेंडल्टन ह्यांच्यासारख्या माणसांवर वाटेल तेवढा विश्वास टाकतां येईल. ह्या दुरुस्तीस तुमचा पाठिंबा आहे, हें पाहून मला आनंद झाला. हक्कांचा जाहीरनामा, मानवाला मिळालेल्या इतर दैवी देणग्यांप्रमाणें कांहीं प्रमाणांत गैरसोईचा आहे व आपल्या उद्दिष्टाच्या मानानें अपुराहि आहे. पण ह्या बाबतींत आपल्या नुकसानीपेक्षां आपल्याला होणारा लाभ कितीतरी प्रमाणांत अधिक आहे.

तुमच्या पत्रांत उल्लेखिलेल्या हरकतींच्या मुद्यांना थोड्या शब्दांत उत्तरें दिल्याशिवाय मला राहावत नाहीं :

(१) 'मध्यवर्ती सरकारला जे अधिकार दिले आहेत, त्यांत हे हक्क राखून ठेवले आहेत.' उत्तर : हक्कांच्या जाहीरनाम्याची आवश्यकता पडूं नये, अशा रीतीनें घटनात्मक कायदा तयार करतां येतो. त्या कायद्याची कक्षा जेवढी असेल तेवढ्या कक्षेंत जाहीरनाम्याचेंच महत्त्व कायद्याला आहे; जर कायद्यांत सर्व मुद्दे समाविष्ट असतील तर अधिक कांहीं करणें आवश्यक नाहीं. व्हर्जिनियांत दाखल करण्यासाठीं मीं एकदां राज्यघटनेचा

मसुदा तयार केला होता; तो पुढें प्रसिद्ध करण्यांत आला. त्या मसुद्यांत सार्वजनिक स्वातंत्र्याचीं सर्व थोर उद्दिष्टें मीं समाविष्ट केलीं होतीं व म्हणून हक्कांचा जाहीरनामा जोडण्याचा माझा हेतु नव्हता. बहुधा माझा उद्देश पूर्णता सफल झाला नसावा; पण चर्चेच्या ओघांत त्यांतील उणीवा इतरांनीं भरून काढल्या असल्या. ज्या घटनात्मक कायद्यांत कांहीं अतिशय महत्वाचीं कलमें त्यांची दखल न घेतां सोडलीं जातात व कांहींच्या विरुद्ध पर्यायानें विरोध दर्शविले जातात, त्या कायद्यांच्या बाबतींत पुरवणी म्हणून हक्कांचा जाहीरनामा जोडणें आवश्यक होतें. आमच्या नव्या फेडरल राज्यघटनेची स्थिति अशीच आहे. कांहीं हेतूंपुरती ही राज्यघटना आम्हांला एका राष्ट्रांत संघटित करते व हे हेतु साध्य करण्यासाठीं आम्हांला कायदे बनविणाऱ्या व ते अंमलांत आणणाऱ्या संघटना देते. अशा संघटनांना दिलेल्या अधिकारांचा दुरुपयोग होणार नाहीं, अशी आमचें रक्षण करण्याची तरतूद ह्या घटनेंत व्हावयाला हवी.

( २ ) 'पुरेशा प्रमाणांत कांहीं आवश्यक हक्क जाहीर करतां आले नाहींत.' उत्तर : मुळींच न मिळण्यापेक्षां अर्धी भाकरी मिळालेली बरी. आम्हांला आमचे सर्व हक्क मिळवतां आले नाहींत तरी जितके मिळवितां येतील तितके मिळवूं या.

( ३ ) 'फेडरल सरकारला मर्यादित अधिकार दिलेले असल्यानें व घटक राज्यें आपापल्या अधिकाराबांबत असूया निर्माण होण्याइतकीं दक्ष असल्यानें इतर कुठल्याहि प्रकारापेक्षां ह्या प्रकारांत आपल्याला अधिकच संरक्षण मिळतें.' उत्तर : ह्यांतील पहिला मुद्दा मांडण्याआधीं तोच पहिली हरकत होण्याचा संभव आहे. घटकराज्यांच्या दक्षतेवर विश्वास टाकण्याइतकीं तीं मौल्यवान खरीं, पण हीं घटक राज्यें प्रतिनिधी आहेत, हें लक्षांत ठेवा. आपला विरोध ज्या तत्त्वावर आधारायचा, तीं तत्त्वें ह्या प्रतिनिधींच्या हातीं दिलीं पाहिजेत. हक्कांचा जाहीरनामा ही कसोटी ठरेल व फेडरल सरकारचीं कृत्यें ह्या कसोटीवर घटक राज्यांना पारखतां येतील. ह्याच दृष्टीनें पाहिलें तर, हक्कांच्या जाहीरनाम्याची फेडरल सरकारलाहि आवश्यकता आहेच. कारण ह्याच कसोटीवर तें सरकार घटक राज्यांचा विरोध पारखूं शकेल.

(४) हक्कांचा जाहीरनामा अपेक्षित परिणाम घडवून आणूं शकत नाहीं, हें अनुभवानें सिद्ध झालें आहे खरें. पण सर्वच परिस्थितींत जरी तो अपेक्षित परिणाम घडवून आणूं शकत नसला तरी,त्याची पात्रता मोठी आहे व त्याचा परिणाम होत नाहीं असें क्वचित्‌च होतें. आधार दिला तर एरव्हीं पडणारी इमारत उभी राहाण्याची शक्यता अधिक असते. आधार न दिला तर ती उभी राहाण्याची शक्यता कमीच. हक्कांच्या जाहीरनाम्यामुळें होणारी गैरसोय व त्या जाहीरनाम्याची आवश्यकता असल्यामुळें होणारी गैरसोय ह्यांत महदंतर आहे.हक्कांच्या जाहीरनाम्यामुळें सरकारच्या उपयोगी हालचालीं-वरहि निर्बंध पडतात ही त्यामुळें होणारी गैरसोय होय. पण ह्यामुळें होणारे दुष्परिणाम थोडाच काळ टिकणारे, सौम्य आणि सुधारूं शकणारे असतात. उलट, हक्कांच्या जाहीरनाम्याच्या अभावामुळें होणारे दुष्परिणाम कायम स्वरूपाचे, दुःखदायक व न सुधारतां येण्यासारखे असतात. ते सतत बिघडत जातात.

आपल्या सरकारांत जे अंमलबजावणी करतात, केवळ त्यांच्यावर माझा रोंख नाहीं; माझ्या रोंखाचें मुख्य लक्ष्यहि ते नाहींत. जे कायदे करतात, त्यांच्या जुलुमाचीच सध्यां फार भीति वाटते व कित्येक वर्षें वाटत राहील. अंमलबजावणी करणाऱ्यांची भीति वाटायला लागेलच; पण अजून त्याला बराच अवकाश आहे. मला माहीत आहे कीं, आमच्यांतील कांहीं लोक आज येथें राजाची राज्यसत्ता प्रस्थापित करतील; पण त्यांची संख्या कमी आहे व त्यांचें वजनहि फारसें नाहीं. उगवती पिढी सर्वस्वी प्रजा-सत्ताकवादी आहे. राजसत्तेच्या काळांत आमचें शिक्षण झालें असल्यानें, कांहींच्या मनांत राजाची मूर्ति राहिली असली तर आश्चर्य नाहीं. आमच्या तरुण पिढीला प्रजासत्ताकवादाचें शिक्षण मिळालें आहे; त्या शिक्षणापासून आतां राजसत्तावादाकडे वळणें अशक्य आहे. इतिहासांत असें कधींच झालेलें नाहीं.

## राज्यघटना अधिक चांगली कशी करतां येईल ?

### ( मॅडिसन ह्यांस, १७८७ )

ह्या राज्यघटनेंत चांगलीं तत्त्वें समाविष्ट करून घेण्याचा व तींतून वाईट

तत्त्वें काढून टाकण्याचा सर्वांत उत्तम उपाय सांगण्याचा आव मी आणीत नाहीं. भविष्यकाळीं तींत सुधारणा होतील अशी आशा ठेवून ती स्वीकारायची का तिचा जनतेनें समतोल अभ्यास केल्यावर आणि जनतेला कोणते भाग नापसंत आहेत व कोणत्या भागाला जनतेची सम्मति आहे, हें पाहिल्यावर तिला सांगायचें, "तुमची इच्छा काय आहे तें आम्हांला कळलें आहे. तुम्ही तुमच्या फेडरल सरकारला अमुक अमुक अधिकार द्यायला तयार आहांत, पण त्याचबरोबर अमुक अमुक मूलभूत हक्क तुम्हांला मिळण्याची तरतूद हवी आहे आणि तुम्हांला धक्का देणाऱ्या कांहीं तरतुदी तींतून जायला हव्या आहेत. असेंच होऊं द्या. पुन्हा सर्व प्रतिनिधींना एकत्र पाठवा. त्यांना तुमच्या मूलभूत हक्कांचा पवित्र जाहीरनामा काढून ते प्रस्थापित करूं द्या आणि घटनेचे जे भाग तुम्हांला मान्य आहेत ते त्यांना स्वीकारूं द्या. त्यामुळें तुम्हांला सुखी होतां होईल, असे अधिकार फेडरल सरकारला मिळतील."

असें सांगतां येईल व अशामुळें लवकर, अधिक पूर्ण आणि स्थायी स्वरूपाच्या सरकारची स्थापना करतां येईल. कुठल्याहि परिस्थितींत, सध्यांचा प्रयत्न फसला तरी दुसरे प्रयत्न करण्याच्या बाबतींत तुम्हीं निरुत्साही होणार नाहीं, अशी मला आशा आहे. राष्ट्रकुटुंबाबावत आपण निराश होऊं शकत नाहीं.

## ( स्टुअर्ट ह्यांस, १७९१ )

वाजवीपेक्षां अधिक स्वातंत्र्य दिल्यानें होणारी गैरसोय फार कमी स्वातंत्र्य दिल्यानें होणाऱ्या गैरसोईपेक्षां मी जास्त पसंत करतों. घटक राज्यांचीं सरकारें मजबूत करणेंहि महत्त्वाचें आहे; आणि फेडरल राज्यघटनेंत कसलेहि बदल करून हें होण्यासारखें नसल्यानें, राज्यसरकारांनींच त्यांना स्वतःला किंवा जनरल सरकारला ओलांडतां येणार नाहीं, अशी राज्यघटनात्मक तटबंदी उभारून हें कार्य करावें. शहाणें सरकार स्थापणें हीच तटबंदी त्यांना आपल्या अधिकारांत बांधतां येईल. सरकार कमकुवत असलें तर प्रत्येक संघर्षांत त्याचा पराभव होईल. शहाणें व कर्तबगार सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीनें पुढील बदल करणें मी मह-

त्याचें समजतों : विधानसभेंतील प्रतिनिधींची संख्या कमी करून ( १०० पर्यंत ) त्या सभेला प्रतिष्ठा द्या; आणि मतदारांच्या संख्येनुसार त्यांचें प्रमाण बसवा. सिनेटर्स नेमण्याची अधिक चांगली पद्धत शोधून काढा.

राज्यप्रमुखाची जागा विधानसभेपासून अधिक स्वतंत्र करून, लायक माणसांना तिचें आकर्षण वाटेल असें करा, म्हणजे मतदारांना त्याची निवडणूक करूं द्या, त्याची मुदत वाढवा आणि त्याला पुन्हा निवडणुकीला उभें राहूं देऊं नका. स्वतंत्र असलेल्या राज्यकारभारांत जबाबदारी हें एक फार मोठें इंजिन आहे. त्याला त्या जबाबदारीचें ओझें पूर्णपणें वाटूं द्या. त्यासाठीं त्याचें एक्झिक्युटिव्ह कौन्सिल काढून घ्या. ह्या मार्गाचा, दोन्ही दृष्टींनीं चांगला अनुभव आलेला असून इतर मार्गांपेक्षां हा मार्ग अधिक चांगला असल्याचें सिद्ध झालें आहे. शक्य असेल त्या प्रत्येक मार्गानें न्यायदानखातें आदरणीय करा. उदाहरणार्थ, अधिकारपदावर शाश्वति, योग्य वेतन, त्यांच्या संख्येंत घट, उच्च शिक्षणविभूषित आणि कर्तृत्ववान असलेल्यांची संख्या प्रत्येक देशांत थोडी असते, आणि जे असे नसतात, त्यांना घेतले तर योग्य व लायक माणसांचे हात नालायकांच्यामुळें बांधले जातात. राज्ययंत्राच्या ह्या शाखेवर सर्व वाद मिटविण्याचा भार पडणार आहे, कारण अखेरचा निर्णय त्यांनींच द्यावयाचा आहे. घटनेच्या दुरुस्तीबद्दल माझ्या सर्वसाधारणतः ह्या अशा कल्पना आहेत; पण हेतु लक्षांत ठेऊन केलेले बदल मान्य करायला मी तयार आहें.

● ● ●

मराठी ग्रंथ ... स्थळप्रत.
अनुक्रम.................. दि. ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................

: ७ :

## घटक राज्यांचे अधिकार

### तोल सुंदर राखला आहे

( पी. फिझह्यू ह्यांस, १७९८ )

आतांपर्यंत घटक राज्यांबाबत फारच थोडा आदर दाखविला गेला आहे. जनरल गव्हर्मेंट व संघराज्य ह्यांच्या हिताच्या दृष्टीनेंहि हें योग्य आहे, असें मला वाटत नाहीं. तरीहि मी असें म्हणावयाचें धाडस करतों कीं, कांहीं काळानें हीं घटकराज्यें व त्यांचें केंद्र राज्य, सूर्याभोंवतीं जसे ग्रह फिरत असतात आणि आपल्या वजनाप्रमाणें आणि अंतराप्रमाणें एकमेकांवर परिणाम घडवून आणीत असतात, तसें करून आपली राज्यघटना ज्यावर आधारलेली आहे, तो सुंदर समतोलपणा राखतील व केवळ ग्रहांतच आढळणारें पूर्णत्व आपल्यांत आणून जगाला दाखवतील. जाणता मुत्सद्दी म्हणूनच प्रत्येक भागाचें वजन व त्याचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ह्यांचें रक्षणच करील, कारण एखाद्या घटकाला जर वाजवीपेक्षां अधिक दिलें गेलें तर समतोलपणा नष्ट होईल.

## घटक राज्यसरकारें म्हणजे

### आमच्या स्वातंत्र्याभोंवतालची तटबंदी

( डी. ट्रेसी ह्यांस, १८११ )

आमच्या ह्या देशांत आमच्या स्वातंत्र्याची संरक्षक तटबंदी म्हणजे

घटक राज्यें होत. आणि आमच्या क्रांतींतून मिळालेली आणि आमच्या सांप्रतच्या सरकारनें आम्हांला दिलेली शक्ति ही मनुष्यमात्रानें आजपर्यंत शोधून काढलेली सर्वांत उत्तम रक्षकशक्ति होय. सतरा निरनिराळीं राज्यें असून, परराष्ट्रसंबंधापुरतीं एका राज्यांत समाविष्ट झालेलीं आहेत. पण त्यांच्या अंतर्गत कारभाराबाबत तीं आपापल्यापरी पूर्णतः स्वतंत्र आहेत, तीं संघटित असून, प्रत्येकाला विधानसभा व राज्यपाल आहेत व त्यांची निवड जनता करते. प्रत्येकांत वृत्तपत्रस्वातंत्र्य असून, त्यामार्गें जनतेला ज्ञान मिळतें. हीं राज्यें एखाद्या माणसाच्या कारवायांना बळी पडून त्याच्या अंकित होण्याची कधींच शक्यता नाहीं. अशा माणसाच्या हातांत दडपशाहीचें कांहीं साधन आलें तरी त्याला ह्या राज्यांना अंकित करणें शक्य होणार नाहीं. ज्या एका राज्यांत असा माणूस राहात असेल तर तें राज्य जरी त्यानें दुबळें बनवून निष्क्रिय केलें तरी त्या राज्याभोंवतालचीं, आपल्या देशाच्या दोन हजार मैलांच्या परिघांत पसरलेलीं इतर सोळा राज्यें त्याविरुद्ध उठतील. हीं सर्व राज्यें संघटित असून, त्यांना चर्चा करण्यासाठीं विधानसभा आहेत, कुठलीहि उपाययोजना करण्यासाठीं त्यांना राज्यपाल आहे, घटनेप्रमाणें राज्यपाल घटक राज्याच्या नागरी सैनिकांचा ( मिलीशिया ), म्हणजे शस्त्र उचलण्यासारखा धडधाकट असलेल्या त्या राज्यांतील प्रत्येक नागरिकाचा, सेनापति असून मिलिशिया रेजिमेंट्स, बटालियन्स, पायदळ, घोडदळ, तोफखाना अशा भागांत संघटित आहे...

फ्रान्सचें प्रजासत्ताक सरकार कसलाहि संघर्ष न होतां कोसळून पडलें. कारण प्रांतांच्या संघटना स्थापन झाल्याच नव्हत्या व त्यामुळें अशा संघटनांच्या मार्गदर्शनाखालीं कायदेशीर हक्क म्हणून लोक संघटित होऊं शकले नाहींत; डायरेक्टरींतील खुर्च्या रिकाम्या होत्या व विधानसभेंतून सभासदांना हुसकून लावण्यासाठीं मूठभर सैनिक पुरले. त्यांनीं हुसकलेल्या सभासदांनीं राष्ट्राचा प्रमुख म्हणून त्यांच्या पुढाऱ्याला अभिवादन केलें; पण आमच्या देशांत अशा प्रसंगीं सतरापैकीं सोळा योग्य रीतीनें संघटित झालेलीं, कायद्यानुसार नेमलेला नेता असलेलीं, त्यांच्या कॉंग्रेसनें एक ध्येय समोर ठेवून एकत्र संघटित केलेलीं आणि जर कॅंग्रेसच संकटांत असेल तर विशेष अधिवेशन बोलावून त्या

मार्गें मार्गदर्शन घेणारीं राज्यें अशा सत्तालोलुप माणसांचा असा मुकाबला करतील कीं,त्याची महत्त्वाकांक्षा प्राथमिक अवस्थेंतच कायमची दबून जाईल.

## घटक राज्यसरकारें व केंद्रसरकार हीं भागीदार आहेत.

((?), १८२१, )

आमच्या घटक राज्यसरकारांच्यापेक्षां केंद्र (फेडरल) सरकार किंवा फेडरल सरकारापेक्षां घटक राज्यसरकार सरस आहेत, असें म्हणणें म्हणजे प्रस्थापित मताविरुद्ध घातकी मतप्रदर्शन करणें होय. सर्व अधिकार ज्या जनतेच्या हातीं आहेत, त्या जनतेनें शासनसंस्थेचे अधिकार विभागून दोन निरनिराळ्या खात्यांना दिले आहेत. ह्या विभागणीचें मुख्य स्वरूप परराष्ट्रीय व अंतर्गत असें आहे व ह्या दोन्हींचा कारभार चालविण्यासाठीं निरनिराळीं माणसें नेमलेलीं आहेत. जनतेनें त्यांना आपलीं कार्यें एकमेकांशीं जुळतीं घ्यावयास लावलीं असून, ते एकमेकांच्या कार्यांची तपासणी करतात व घटक राज्यांतील प्रमुख तीन खात्यांप्रमाणें एकमेकांत समतोलपणा राखतात; प्रत्येकास आपल्या अधिकारक्षेत्रांत पूर्ण अधिकार आहेत, पण आपलें कार्यक्षेत्र स्वतःच ठरविण्याचा किंवा दुसऱ्या खात्याचें कार्यक्षेत्र ठरवून देण्याचा अधिकार त्यांना नाहीं. हीं घटक राज्यें एकमेकांपासून निरनिराळ्या राष्ट्रांइतकींच स्वतंत्र असल्यानें, अशा राज्यघटनेंत येणाऱ्या मतभेदावर एकमेकांबद्दल सहानुभूति दाखविणें आणि दुसऱ्याच्या अधिकारांचा मान राखण्याची तयारी असणें, हा मतभेदाच्या जखमांवर मलमपट्टी करणारा मार्गच उपयोगी पडतो; आक्रमणाचा आणि सत्तालोभाच मार्ग नव्हे. म्हणून प्रत्येक पक्षानें सत्ताविभागणीच्या मर्यादा बेछूटपणानें ओलांडण्याऐवजीं त्या रेषेपासून शहाणपणानें दूर रहावें, दुसऱ्याला खेंचून घेण्याच्या हेतूनें त्या रेषेबाहेर फांस पसरवूं नयेत. परंतु आपल्या ह्या पद्धतीचें वैशिष्ट्य असें आहे कीं, निरनिराळ्या अधिकारांच्या गटांत मतभेद झाल्यास त्या दोन्ही गटांपैकीं कुणाकडेहि न्याय मागण्याऐवजीं त्यांना नेमणारे यांचे प्रतिनिधी शांतपणें अधिवेशनांत बसलेले

असतील, त्यांच्याकडे तो मागितला जातो. तोफेच्या तोंडीं न्याय देण्यापक्षां बुद्धीला हा मार्ग अधिक स्वीकारार्ह आहे.

## मध्यवर्ति सत्तेच्या अधिकारलोलुपतेस घटक राज्यांनीं विरोध करावा

### ( डब्ल्यू. बी. गाइल्स ह्यांस, १८२५ )

आमच्या सरकारची फेडरल शाखा घटक राज्यांसाठीं राखून ठेवलेले अधिकार बळकावण्यासाठीं तीव्र वेगानें पावलें उचलीत असल्याचें पाहून मला मनापासून दुःख होतें. एवढेंच नाहीं तर परराष्ट्रीय संबंध व अंतर्गत व्यवस्था ह्याबद्दल सर्व सत्ता आपल्या हातीं आहे, असे अर्थ लावून केंद्रित करीत आहे कीं, जर त्यांचें म्हणणें कायदेशीर मानलें तर त्यांच्या अधिकाराला मर्यादाच राहाणार नाहीं..... असें स्पष्ट दिसतें कीं, फेडरल सरकारच्या तिन्ही शाखांनीं आपले सहकारी असलेल्या घटक राज्यांच्या अधिकाऱ्यांचे राखीव अधिकार बळकाविण्यासाठीं संगनमत केलें आहे.

व्यापारनियंत्रणाचा त्यांना जो अधिकार दिला आहे,त्या अधिकाराखालीं ते शेती व कारखानदारीहि कायमची आणूं बघतात व त्या कृत्याला कायदेशीर निर्बंधाचें रूप देऊन उद्योगधंद्यांच्या एका शाखेचें आणि तेंहि अतिशय अडचणींत असलेल्या शाखेचें उत्पन्न दुसऱ्याच्या खिशांत, आणि तेंहि अतिशय भरभराटींत असलेल्यांच्या खिशांत घालतात. रस्ते बांधण्याचा त्यांना अधिकार आहे; पण त्या अधिकाराच्या नांवाखालीं ते रस्ते तयार करण्यासाठीं डोंगर पाडून टाकण्याचा, कालवे खोदण्याचा अधिकार बळकावतात आणि 'सर्वसाधारण सुखसोई' ह्या नांवांवर थोडी मखलाशी करून त्याखालीं असलेल्या अधिकारांत त्यांना जे अधिकार दिल्याचें स्पष्ट लिहिलेलें आहे, त्यापलीकडे जाऊन त्यांना त्या अधिकाराखालीं जें येतें असें वाटतें तें करतात किंवा तें 'सर्वसाधारण' सुखसोईसाठीं केल्याचें ढोंग करतात.

आपल्या राज्यघटनेचें रक्षण करण्याचें आपल्या हातीं कोणतें साधन आहे ? चर्चा आणि वाद ! त्यांच्याभोंवतीं असणाऱ्या दगडी खांबांशीं तुम्ही हवी

तर चर्चा करा. आम्ही स्वतः निवडलेले प्रतिनिधी !. . . ते त्यांच्याशीं सामील झाले आहेत,—कांहींचे सरकारविषयक दृष्टिकोन चुकीचे असल्यामुळें, कांहीं चारित्र्यहीनतेमुळें. जे चांगले आहेत त्यांच्याविरुद्ध बहुमत होण्याइतकी ह्या लोकांची संख्या आहे आणि जरी त्यांना एक, दोन किंवा तीन मतांचें मताधिक्य असलें तरी विरोध न जुमानतां आपल्या मर्जीप्रमाणें पुढें चालण्याइतकें ते निर्ढावले आहेत.

आपल्या अधिकारावर प्रत्यक्ष आक्रमण झालेलें लक्षांत घेण्याइतकें घटक राज्यांनीं जागरूक राहिलें पाहिजे; आक्रमण घडेल तसा त्याचा कडक शब्दांत निषेध केला पाहिजे.अशा आक्रमणाबद्दलचा निषेध करतांना हें केलें पाहिजे कीं, तें आक्रमण आम्ही सहन केलें ह्याचें कारण आम्हांला तें मान्य होतें असा नव्हे, किंवा अधिकार प्रस्थापित करण्याची ती प्रथा आम्ही मानतों असेंहि नव्हे, तर दुही माजवणें किंवा अन्याय सहन करणें ह्यापैकीं अन्याय सहन करण्याची दुहीपेक्षां सौम्य असलेली आपत्ति आम्ही स्वीकारतों, एवढेंच. व जोंपर्यंत असे अन्याय दुहीपेक्षां अधिक जाचक नाहींत तोंपर्यंतच ते सहन करूं. मी तर थोडें पुढें जाऊन असें म्हणेन कीं, घटनेंत पद्धतशीरपणें बदल करून फेडरल सरकारला घटक राज्यांना जोडणारे रस्ते व कालवे बांधण्याचा अधिकार द्यावा व तसें करतांना कॉंग्रेसमध्यें प्रस्थापित असलेल्या भ्रष्ट पद्धतींना आळा घालण्यासाठीं अशी तरतूद ठेवावी कीं, ह्या कामीं लागणाऱ्या खर्चाचा फेडरल सरकारला घटक राज्यांकडून मिळणारा वांटा त्या राज्यांतच खर्च करावा किंवा त्याच्या संमतीनें इतरत्र खर्चावा. मला वाटतें, हा मार्ग सर्वांत चांगला व सर्वांत सुरक्षित आहे.

• • •

: ८ :

# राष्ट्राध्यक्षपद

## अनियंत्रित अधिकार टाळण्यासाठीं

( Notes on Virginia Query 13. )

अटलांटिक महासागराच्या दोन्ही बाजूंस मनुष्यस्वभाव सारखाच आहे व सारख्या कारणांचे त्यावर होणारे परिणामहि एकसारखेच असणार. भ्रष्टाचार आणि जुलूम टाळायची वेळ ते आपल्या मानगुटीवर बसण्या- आधींची असते. लांडग्याचे दांत आणि नखें उपटण्यावर विश्वास टाकण्या- ऐवजीं लांडगा घराबाहेर ठेवणेंच अधिक बरें.

## राष्ट्राध्यक्ष अनियंत्रित सत्ता बळकावण्याचा धोका

( मॅडिसन ह्यांस, १७८७ )

दुसऱ्या ज्या मुद्याबद्दल मला तीव्र नापसंती वाटते, तो म्हणजे प्रत्येक अधिकाराची जागा, विशेषतः राष्ट्राध्यक्षाची नेमणूक, ही पाळीपाळीनें बदलण्यांत यावी हें तत्त्व प्रत्येक बाबतींत बाजूला सारण्यांत आलें. जर एखाद्या न्यायाधीशाला पुन्हा निवडून येण्याची सवलत असली तर तो जुना न्यायाधीशच नेहमीं निवडून येतो हें आपल्या बुद्धीला कळतें व अनुभवानें पटतें. मग तो जन्मभर अधिकारी होऊन बसतो. हें तत्त्व एकदां स्वीकारलें कीं कांहीं राष्ट्रांना तें इतकें महत्त्वाचें होऊन बसतें कीं, आपल्या राष्ट्राचा प्रमुख त्यांचा शत्रू किंवा मित्र असावा म्हणून ते पैसा व सैन्य ह्यांचा आधार घेऊनहि आपल्या राष्ट्राच्या कारभारांत हस्तक्षेप करतील. एखाद्या गॅलोमनला किंवा ॲंग्लोमनला तो ज्या राष्ट्रांशीं दोस्ती करील, त्यांच्याकडून

सर्व पाठिंबा मिळेल. एकदां त्याची निवड झाली आणि दुसऱ्या किंवा तिसऱ्या निवडणुकीच्या वेळीं त्याचा एका किंवा दोन मतांनीं पराभव झाला तर प्रतिस्पर्ध्याला पडलेलीं जास्त मतें खोटीं होतीं, त्याची फसवणूक झाली असा कांगावा करून, तो आपल्या हातीं असलेलीं अधिकारसूत्रें सोडायचा नाहीं; त्याला मतें देणारीं घटक राज्यें त्याला पाठिंबा देतील, जीं राज्यें कुठल्याहि पक्षांत सामील नसतील ती त्याला विशेष जोराचा पाठिंबा देतील व त्यासाठीं खोटें बोलण्यांत आपसांत एकजूट राखतील व इतर विरोधक घटक राज्यांना बाजूला काढतील; मग युरोपांतील एखादें राष्ट्र त्यांना मदत करील,तर दुसरें एखादें राष्ट्र बहुसंख्य असणाऱ्यांना मदत करील. अजून कांहीं वर्षांनंतर अमेरिकेच्या अध्यक्षांची निवडणूक युरोपांतील कांहीं राष्ट्रांना पोलंडच्या राजाच्या निवडणुकीपेक्षां अधिक महत्त्वाची वाटेल. ज्या ज्या देशांत राजा निवडण्याची पद्धत आहे, त्या त्या देशांचा प्राचीन किंवा अर्वाचीन इतिहास पहा व मला वाटतें ती भीति साधार आहे कीं नाहीं तें त्या अनुभवावरून ठरवा. रोमचे सम्राट्, जोंपर्यंत महत्त्व होतें तोंपर्यंत पोप, वंशपरंपरागत राजघराणें चालू होईपर्यंतचे जर्मनीचे सम्राट्, पोलंडचा राजा, ओटोमन अंकित राज्यांचे डेज्— हीं सर्व उदाहरणें पहा. जर निवडणुकांमुळें अशी अशांतता होत असेल, तर त्या जेवढ्या कमी घेतां येतील तेवढ्या बऱ्या असेंहि म्हणण्यांत येईल; पण अनुभवावरून असें म्हणतां येईल कीं, निवडणूक झाल्यावर त्या अधिकारपदाची पुन्हा निवडणूक होईल अशी खात्री पटवून, त्याला निवडणुकीचें महत्त्व कमी वाटायला लावलें तर निवडणुकींत अशांतता कमी होईल. जर अल्पकाळांत निवडलेला मनुष्य अधिकारपदावरून दूर जाणार असेल तर त्या माणसाच्या बाबतींत कुठलेंहि परराष्ट्र किंवा देशांतील पक्ष आपलें रक्त किंवा पैसा फुकट घालवणार नाहीं.

## अध्यक्षपदासाठीं वाटेल तितक्या वेळां उभें राहण्याच्या पात्रतेबद्दल भीति

## ( वॉशिंगटन ह्यांस, १७८८ )

दोन गोष्टींबद्दल मला तीव्र नापसंती आहे : (१) हक्कांच्या जाहीरनाम्याचा

अभाव. व्हर्जिनियानें केलेल्या विरोधामुळें हा अभाव दूर होऊन हक्कांचा जाहीरनामा स्वीकारण्यांत येईल, अशी मला आशा वाटते. ( २ ) अध्यक्ष-पदासाठीं वाटेल तितक्या वेळां निवडणुकीस उभें राहण्याची पात्रता. अशी तरतूद ठेवल्यानें अध्यक्षपद हें प्रथम अध्यक्षपदीं असणाऱ्याच्या हयातीभर टिकणारें व नंतर वंशपरंपरागत चालणारेंच होऊन बसेल अशी मला भीति वाटते. युरोपांत येण्यापूर्वी वंशपरंपरागत चालणाऱ्या राजपदाच्या पद्धतीचा मी विरोधक होतोंच, पण असे राजे कसे असतात हें प्रत्यक्ष पाहिल्यावर माझा विरोध दहा हजार पटींनीं वाढलेला आहे. ह्या राष्ट्रांतील अनिष्ट गोष्टींपैकीं बहुतेकींचा उगम राजेलोकांमुळें झालेला आहे व जें चांगलें आहे तें बहुतेक सर्व जे थोडे प्रजासत्ताकवादी आहेत, त्यांच्यामुळें घडलेलें आहे. मी तर पुढें जाऊन असेंहि म्हणेन कीं, युरोपांत जे राजे आहेत, त्यांच्यापैकीं कोणाच्याहि बुद्धीचा किंवा लायकीचा विचार केला तर अमेरिकेंतील जनता त्याला चर्चमधील कपडे ठेवायच्या खोलीचा राखणदार म्हणूनसुद्धां निवडून देणार नाहीं.

## वॉशिंग्टनला पुन्हा उभें रहाण्याबद्दल आग्रह

### ( वॉशिंग्टन ह्यांस, १७९२)

पुऱ्या युनियनचा विश्वास तुमच्यावर आहे. जनतेला हिंसेच्या व फुटीच्या मार्गीनें जाण्यास प्रवृत्त करण्यासाठीं जीं जीं कारणें सांगण्यांत येतात, त्या सर्व कारणांना तुम्ही अध्यक्षपदीं राहण्यानें चांगलेंच उत्तर मिळणार आहे. तुमच्यावर विसंबून राहण्याची शक्यता असली तर दक्षिणेकडील व उत्तरेकडील असे दोन्ही बाजूचे लोक तुमच्यावर विसंबून राहतील; आणि बहुप्रतिनिधित्वाचा पद्धतींत जी सुधारण केलेली आहे, ती परिणामीं अयशस्वी ठरली तर तुम्ही तिथें असल्यावर युनियनचें हित व घटक राज्यांतील शांतता ह्यांना बाध न आणणाऱ्या आणखी इतर मार्गांनीं प्रयत्न करतां येतील.

आज ज्या अधिकारावर तुम्ही आहांत, त्याचें तुमच्या मनावर पडणारें दडपण व कौटुंबिक जीवन जगण्यासाठीं तुम्ही करीत असलेली धडपड,

ह्यांची मला पूर्ण जाणीव आहे. पण कांहीं माणसांचें उच्च चारित्र्य असें असतें कीं, त्या व्यक्तीनें कसें आयुष्य जगावें हें सांगण्याचा वैशिष्ट्यपूर्ण अधिकार समाजाचा होऊन बसतो व मानवी समाजाच्या आजच्या व भविष्यकालीन हिताच्या दृष्टीनें त्या व्यक्तीला त्या क्षेत्रांतच ठेवण्याचा नियंत्रक अधिकारहि समाजाला मिळतो. आज तुमची स्थिति अशीच झाली आहे, आणि ईश्वरानेंहि तुमचें चारित्र्य घडवितांना व त्या चारित्र्याचा प्रभाव ज्या प्रसंगावर व्हावयाचा, ते प्रसंग घडवून आणतांना हेच निर्बंध तुमच्यावर घातले असते. आणि ह्या सर्व उद्दिष्टांचा विचार करूनच मी तुम्हांला विनंती करतों व तुमचें मत बदलावें असा आग्रह धरतों. केवळ व्यक्तिशः मला किंवा इतरांना वाटणाऱ्या काळजीमुळें नाहीं, कारण आमच्यासाठीं तुम्ही त्याग करावा असा आग्रह करण्याचा आम्हांला अधिकार नाहीं.

## अध्यक्ष वॉशिंग्टन ह्यांचे राजकीय विचार

### ( जे. मेलिश ह्यांस, १८१३ )

जनरल वॉशिंग्टनच्या मनांत फेडरॅलिझमचा एकहि विचार नव्हता. ते अँग्लोमन नव्हते, राजसत्तावादि नव्हते किंवा विभक्तवादाचे पुरस्कर्ते नव्हते. जनतेला स्वयंशासन जेवढ्या प्रमाणांत अंमलांत आणतां येईल तेवढें द्यावें असें त्यांचें प्रामाणिक मत होतें. त्यांच्यांत व माझ्यांत फक्त एकाच मुद्यावर मतभेद होते. जनतेंत स्वाभाविकपणें प्रामाणिकपणा किती असतो, जनता किती प्रमाणांत योग्य निर्णय घेऊं शकते व स्वतःचा राज्यकारभार स्वतः चालवितांना तो जनता किती प्रमाणांत सुरक्षितपणें चालवील व त्याचें क्षेत्र केवढें असावें, ह्याबाबतींत त्यांच्यापेक्षां माझा जनतेवर अधिक विश्वास होता. सध्यां अस्तित्वांत असलेल्या सरकारला आपली लायकी सिद्ध करण्यास संधि मिळावी व त्यासाठीं आपल्या शरीरांतील रक्ताचा शेवटचा बिंदु खर्चावा लागला तरी तो आपण खर्चूं, असा आपला निश्चय त्यांनीं माझ्याजवळ हजार वेळां बोलून दाखविला आहे.

## अध्यक्षांसाठीं चार-चार वर्षांची दोन वेळां मुदत

## ( जॉन टेलर ह्यांस, १८०५ )

तेव्हांपासून मला असें वाटावयास लागलें आहे कीं, ७ वर्षें ही मुदत फार मोठी असून, एखाद्या माणसानें जर गैरकृत्य केलें तर ह्या मुदतीच्या मध्येंहि शांततेच्या मार्गानें त्याला त्याच्या स्थानावरून दूर करण्याची सोय पाहिजे. एकूण आठ वर्षांची मुदत ठेवून, त्यांतल्या पहिल्या चार वर्षांनंतर अधिकारपदावरून दूर करण्याची तरतूद असल्यास, अनुभवानें योग्य ठरलेल्या माझ्या तत्त्वाप्रमाणेंच तें होईल. ह्या तत्त्वाला अनुसरूनच माझी दुसरी मुदत संपल्याबरोबर मी निवडणुकींस उभा राहिलों नाहीं. अशा पद्धतींत असा धोका आहे कीं, जनतेनें कौतुक केलें आणि आपलेपणा दाखविला कीं, एखादा इसम स्वतः म्हातारा व मूर्ख होईतों आपल्या अध्यक्षपदाला चिकटून राहील; जन्मभर तो निवडून येऊन आपल्या अधिकाराला चिकटण्याची त्याला संवय लागेल व मग निवडून येणाऱ्याच्या आयुष्यभर त्याला अधिकारावर राहण्यासाठीं निवडणुका घेण्यांत येतील. जनरल वॉशिंग्टन ह्यांनीं ८ वर्षांनंतर स्वखुषीनें निवृत्त होऊन आदर्श घालून दिला. मी त्यांचेंच अनुकरण करीन. असें आणखी कांहीं व्यक्तींनीं करून प्रथा पाडली, कीं एखाद्याला अधिक दीर्घ मुदतीसाठीं अध्यक्षपदावर राहावयाचें असलें तरी ह्या प्रथेमुळें त्याला तसें करण्यास अडचण वाटेल.

## अनेक प्रमुख असण्याऐवजीं एकच असण्याचे फायदे

## ( डी. ट्रूसी ह्यांस, १८११ )

जेव्हां आपलें सध्याचें सरकार आपण स्थापन केलें, तेव्हां... राज्यकारभार चालविण्यासाठीं सर्वोच्च सल्लागार मंडळ नेमावें असा विचार आपण करीत होतों. असाच प्रयोग त्या वेळीं फ्रान्समध्यें चालू होता, तर आपल्याकडे एकच प्रमुख नेमून आपण काय होतें तें पाहात होतों. दोन्ही परस्परविरोधी योजनांकडे आपण तुलनात्मक दृष्टीनें पाहून त्यांतली कोणती स्वीकारावी ह्याचा विचार करीत होतों. अल्पकाळांतच फ्रान्समधील प्रयोग अयशस्वी ठरला......त्या प्रयोगाच्या अपयशाचीं कारणें म्हणजे डायरेक्टरींतील

सभासदांत असलेले मतभेद व हेवेदावे. जेव्हां सर्वच सभासद समान दर्जाचे असतात व त्यांच्यांतील मतभेदावर नियंत्रण ठेवून निर्णय घेणारा प्रमुख नसतो, तेव्हां असें होणारच. १७८४ सालीं आपणहि असा एक प्रयोग केला होता. त्या वेळीं आपल्या संघराज्यांत असलेल्या तेरा घटक राज्यांपैकीं प्रत्येक राज्याचा एक प्रतिनिधि घेऊन घटक राज्यांची समिति आपण स्थापली व जेव्हां कॅाँग्रेसची बैठक चालू नसेल, तेव्हां ह्या समितीनें कारभार चालवावा असें ठरविलें. पण त्यांच्यांत निरनिराळे गट व पंथ तयार झाले व आपसांतील मतभेदांमुळें त्यांना एकमेकांशीं सहकार्य करणें अशक्य झालें व शेवटीं त्यांनीं स्वतःची समिति बरखास्त करून घेतली व राज्यकारभाराचे प्रमुख म्हणून त्यांनीं जें कार्य करावयाचें तें त्यांनीं सोडल्यामुळें राज्यकारभाराला कॅाँग्रेसचें अधिवेशन पुन्हा हिवाळयांत भरेपर्यंत कोणी प्रमुखच राहिला नाहीं. त्या वेळीं ह्या प्रकारचा दोष दोन किंवा तीन व्यक्तींच्या स्वभावावर ठेवण्यांत आला; परंतु हा दोष मनुष्यस्वभावाचाच आहे, हें शहण्या माणसांना कळत होतें.

फ्रेंच डायरेक्टरलाहि ह्याच कारणानें अपयश आल्यानें जोंपर्यंत सर्व-साधारण मनुष्यस्वभाव आहे हा असा आहे, तोंपर्यंत तत्त्वशः अनेक प्रमुखांचें मंडळ कितीहि चांगलें वाटत असलें तरी तें अव्यवहार्यच असतें अशी खात्री पटते. त्याचबरोबर आपल्या एकट्या असलेल्या प्रमुखानें जगाच्या इतिहासांत सर्वांत जास्त घडामोडींच्या ठरलेल्या गेल्या बावीस वर्षांत ज्या शांतपणें राज्यकारभार चालविला तो पाहून ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचें उत्तर सांपडलें असा विचार बुद्धीला पटतो.

मंत्रिमंडळाच्या सल्ल्याच्या साहाय्यानें... अध्यक्षास... त्यांच्या माहितीचा व शहाणपणाचा फायदा होतो, त्यांचे दृष्टिकोन त्याला एकत्र आणतां येतात, आणि राज्यकारभाराच्या सर्व शाखांतील कार्यांत एकसूत्रीपणा व एकमार्गीपणा आणतां येतो.

अंमलबजावणीच्या अधिकाराबाबत केलेल्या ह्या रचनेचें श्रेष्ठत्व येथें स्पष्ट झालेलें आहे... आपल्या पहिल्या अध्यक्षांच्या कारकीर्दीत त्यांच्या मंत्रिमंडळांतील चारहि सभासदांत, राजनिष्ठ व प्रजासत्ताकवादी

ह्यांच्यांत जेवढे तीव्र मतभेद होऊं शकतात, तेवढ झाले. अध्यक्षांचें तें मंत्रिमंडळ ही जर डायरेक्टरी असती, तर बीजगणितांतील नियमाप्रमाणें अनुकूल व प्रतिकूल मतांनीं एकमेकांना निष्क्रिय करून टाकलें असतें व पूर्ण निष्क्रियतेची अवस्था निर्माण झाली असती; पण अध्यक्षांनीं प्रत्येकाचें म्हणणें व प्रत्येकाचीं कारणें शांतपणें ऐकून घेतलीं, कोणत्या मार्गानें जावयाचें तें ठरविलें व त्या मार्गावर राज्यकारभाराचा शकट, होणाऱ्या प्रक्षोभाची दखल न घेतां चालू ठेवला. मंत्रिमंडळांतील व्यक्तींचे आपसांत असलेले मतभेद जनतेला माहीत होते, पण त्याचबरोबर तो राज्यशकट योग्य मार्गावर सतत चालू ठेवण्यासाठीं आपण एक नियंत्रक शक्ति पुरविलेली आहे, ह्याची खात्री असल्यानें जनता निर्भय होती. ह्या सर्व घटनांत मी स्वतःच असल्यानें पूर्ण माहितीच्या आधारेंच मी बोलतों आहें.

तिसऱ्या अध्यक्षांच्या कारकीर्दींत * आठ वर्षें त्यांच्या मंत्रिमंडळांतील सहाहि सभासदांच्या एकदिलानें काम करण्यामुळें मतभेदाशिवाय गेलीं. इतिहासांत याला दुसरी तोड नाहीं. ह्या आठ वर्षांच्या काळांत मंत्रिमंडळाच्या सभासदांत आपसांत एकहि अप्रिय विचार आला नाहीं किंवा शब्द उच्चारला गेला नाहीं. पुष्कळदां आमच्या बैठकीला सुरुवात होतांना आमच्यांत मतभेद असत, परंतु चर्चा करून व एकमेकांना आपलें म्हणणें पटवून देऊन एकमतानें निर्णय घेण्यांत आम्हांला कधींहि अपयश आलें नाहीं. परंतु जरी हे सभासद समजूतदार आणि लायक असले,तरी त्यांपैकीं प्रत्येकाला जर समान अधिकार व स्वातंत्र्य असतें तर परिस्थिति टिकली असती असें मला वाटत नाहीं. त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलेल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा जर स्पष्ट भाषेंत आंखून दिल्या गेल्या नसत्या,प्रथम किरकोळ वाटणारे त्यांचे आपसांतील द्वेष व हेवेदावे पुढें वाढूं दिले असते, दुसऱ्यांत फूट पाडून स्वतःचें महत्त्व वाढवून घेण्याची संधि दिली गेली असती, तर विरोधाला अगदीं सौम्य स्वरूपांत जरी सुरुवात झाली असती तरी पुढें तो चांगलाच कणखर झाला असता. पण निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्षांच्या हातीं

* जेफर्सन स्वतःच तिसरा अध्यक्ष होता : १८०१–०९

दिल्यानें अंतर्गत मतभेदाला वाव राहिला नाहीं व जे बाहेरून फूट पाडण्याचा प्रयत्न करतात, त्यांना अध्यक्षांच्या अधिकारांत कांहींहि बदल होणार नाहींत हे स्पष्ट माहीत असल्यानें, त्यांची फूट पाडण्याची इच्छा मनांतल्या मनांतच मेली.

मी स्वतः राज्यकारभार चालविणाऱ्या सत्ताधारी यंत्रणेंत काम केल्यानें, तो कारभार चालविण्यासाठीं एकाच व्यक्तीची नेमणूक करावी ह्या मताला मी अनुकूल झालों असें नाहीं; कारण मी जें कार्य केलें तें दुय्यम आणि उच्च अशा दोन्ही दर्जांचें होतें व मला काय वाटलें व माझी काय इच्छा होती हें माझें मला कळतें असें समजलें तर मी म्हणतों कीं, जेव्हां जेव्हां माझे अधिकार मी दुसऱ्याला देत असें, तेव्हां तेव्हां मला आयुष्यांतला सर्वोच्च आनंद होत असे. दुसऱ्या माणसावर सत्ता गाजविल्यानें कुठल्याहि विचारी माणसाला स्वतःला कसें सुख वाटेल तेंच मला कळत नाहीं...

राज्यकारभाराचा प्रमुख एकटाच असला, तो हुशार व कर्तबगार असला व त्यानें आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं सर्व तत्त्वें गुंडाळून ठेवलीं, तर तो सर्व सत्ता बळकावूं शकेल व ती वंशपरंपरागत बनवूं शकेल. पण जगाच्या इतिहासांत एकापेक्षां अधिक प्रमुख असलेल्या सरकारांतील एखाद्या व्यक्तीनें सत्ता बळकावण्याचीं जेवढीं उदाहरणें आहेत, त्यापेक्षां एकच प्रमुख असलेल्या पद्धतींत त्या स्थानीं असलेल्या व्यक्तीनें सत्ता बळकावण्याचीं उदाहरणें कांहीं जास्त नाहींत. म्हणून एकापेक्षां अधिक प्रमुख नेमल्यानें हा धोका कमी होतो असें मला वाटत नाहीं. जेव्हां त्यांच्यांत हेवेदावे, गटबाजी सुरू होतात, तेव्हां निर्माण होणाऱ्या अव्यवस्थेंतूनच हा धोका निर्माण होण्याचा संभव अधिक असतो.

* * *

अनुक्रम .......... वि.
.................... नों. दि. ..........

: ९ :

# न्यायदानखातें

## न्यायदानखातें निर्भय आणि स्वतंत्र असण्याची आवश्यकता

### ( जी. विद् (Wythe) ह्यांस, १७७६)

सरकारच्या सर्व शाखांची प्रतिष्ठा आणि स्थैर्य, जनतेची नीतिमत्ता, जनतेंतील सद्‌गुण हीं निःपक्षपातीपणानें आणि कौशल्यानें न्यायदान करणाऱ्या न्यायदानखात्यावर इतकीं अवलंबून आहेत कीं, त्यासाठीं न्यायदानखातें हें कायदे बनविणाऱ्या व कायदे अंमलांत आणणाऱ्या खात्यांपासून निराळेंच असावें; म्हणजे ह्या दोन्ही खात्यांवर न्यायदानखात्याचा आणि दोन्ही खात्यांचा न्यायदान खात्यावर निर्बंधात्मक बोज राहील. म्हणून न्यायाधीश म्हणून नेमलेलीं माणसें नेहमीं कायद्याचें ज्ञान व अनुभव असलेलीं, ज्यांचें चारित्र्य संशयातीत आहे अशीं; भरपूर शांत व दक्ष अशीं असावींत; परस्परविरोधी हितसंबंधामुळें त्यांची मनःशांति ढळूं नये व कुठल्याहि व्यक्तीवर किंवा गटावर तीं अवलंबून असूं नयेत. म्हणून त्यांची नेमणूक, त्यांची वर्तणूक चांगली असेतोंपर्यंतच असावी व त्यांचें वेतन कायद्यानें ठरवून द्यावें.

प्रतिनिधीगृहानें गैरवर्तणुकीबद्दल राज्यपाल व सल्लागार–मंडळ ह्यांच्यासमोर त्यांची न्यायालयीन चौकशी करावी व आपला बचाव करण्यासाठीं त्यांना संधि व वेळ देण्यांत यावा; पण जर त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाले तर त्यांना आपल्या स्थानावरून पदच्युत करावें व इतरहि योग्य वाटणाऱ्या शिक्षा द्याव्या.

## न्यायाधीशांवर जनतेनें निर्बंध घालावेत

## ( अर्नाल्ड ह्यांस, १७८९ )

जेथें जेथें शक्य असेल जेथें तेथें सरकारी यंत्रणेच्या प्रत्येक खात्याशीं जनतेचा संबंध असावा, असें आम्हां अमेरिकनांना वाटतें. ह्या एकाच मार्गानें सरकार आपला कारभार दीर्घ काळ सातत्यानें व प्रामाणिकपणें चालवूं शकेल.

(१) जनता प्रत्यक्ष कारभार चालविण्यास अपात्र आहे व कारभार चालविणारी व्यक्ति निवडण्यास जनता पात्र आहे. म्हणून आमच्या देशांत दर चार वर्षांनीं जनता अशा व्यक्तीची निवड करते. (२) कायदे करण्याचा जनतेला अधिकार नाहीं. म्हणून, आमच्या देशांत कायदे करणारांची निवड जनता करते. (३) एखाद्या कृत्याच्या कायदेशीरपणाचा न्याय देण्यास जनता अपात्र आहे, पण सत्याची पारख करण्यास ती पूर्णपणें पात्र आहे. म्हणून ज्यूरींच्या रूपानें सत्यासत्यतेचा निर्णय जनता घेते व कायदेशीरपणाबाबतचा निर्णय कायमचा न्यायाधीशावर सोंपविते. पण आपणां सर्वांना माहीत आहे कीं, कायम न्यायदान करणाऱ्या न्यायधीशालाहि लांच खाण्याचा मोह होतो, एखाद्याला संतुष्ट करण्यासाठीं, कुणाशीं नातें आहे म्हणून, पक्ष-प्रेम, राज्यकारभारांतील किंवा वैधानिक गटाशीं असलेली निष्ठा, अशा कारणांनीं ते चुकीच्या मार्गानें जातात. म्हणून न्यायदानाच्या बाबतींत, ज्याचें मन पक्षपाती आहे, अशा न्यायाधीशापेक्षां बारा प्रामाणिक ज्यूरींनीं दिलेलें मत अधिक बरोबर असण्याचा संभव आहे. म्हणून कुठल्याहि कारणानें कां असेना, न्यायाधीश पक्षपाती आहे असें ज्यूरींना वाटलें, तर सत्यतेबद्दल जसा ते निर्णय घेतात तसाच न्यायाधीशाला बाजूला ठेवून कायदेशीरपणाबद्दलहि निर्णय घेण्याचा अधिकार ज्यूरींना आहे. न्यायाधीश पक्षपाती आहे असा संशय असल्याशिवाय ह्या अधिकाराचा वापर ज्यूरींना कधींच करतां येत नाहीं. आणि हा अधिकार त्यांना असल्यामुळें इंग्लिश स्वातंत्र्याचा ते फार मोठा आधार आहेत. न्यायदानखातें जनतेच्या संबंधापासून अलिप्त ठेवावें का वैधानिक कार्य अलिप्त ठेवावें असा प्रश्न मला कोणी विचारला तर वैधानिक कार्य जनतेपासून

अलिप्त ठेवावें, असें मत मी देईन. कायदे करण्यापेक्षां कायद्यांची अंमलबजावणी करणें अधिक महत्त्वाचें आहे. पण जेथें शक्य असेल तेथें तिन्ही खात्यांशीं जनतेचा संबंध ठेवणें अधिक चांगलें.

## न्यायाधीश जनतेनें निवडावेत

### ( एस्. कर्शेवाल ( Kercheval ) ह्यांस, १८१६ )

कायद्याचें चांगलें ज्ञान असलेले न्यायाधीश निवडण्यास जनता अपात्र असल्याचें सांगण्यांत येतें. हें खरें आहे कीं नाहीं तें मला माहीत नाहीं व ज्या बाबतींत आपल्याला संशय असेल, त्या बाबतींत आपण तत्त्वानुसार वागणें चांगलें. अशा निवडणुकींत, इतर निवडणुकांप्रमाणेंच, जनता माणसाच्या नांवलौकिकाच्या आधारेंच निर्णय घेईल व सध्यां नेमणुकी करतांना ज्या चुका होतात, त्यापेक्षां जास्त चुका ह्या पद्धतीनें होणार नाहींत. निदान एका घटक राज्यांत ही पद्धत यशस्वी रीतीनें वापरून पाहिलेली आहे. गेलीं दोन शतकें कनेक्टिकटमधील न्यायाधीश जनता दर सहा महिन्यांनीं निवडते व त्या सतत जबाबदारीचें एवढें प्रभावी नियंत्रण आहे कीं, निवडलेला न्यायाधीश बदलावा लागल्याचें एखादेंच उदाहरण असेल.

## राज्यघटनात्मक बाबतींत न्यायदानखात्याची अरेरावी

### ( टी. रिची ह्यांस, १८२० )

... युनायटेड स्टेट्स्‌मधील न्यायदानखातें म्हणजे आपल्या गणराज्याचा पाया कमजोर करण्यासाठीं सतत भूमिगत राहून हळूच खोदकाम करणारे शिपाईच होत. आपल्या राज्यघटनेचा अर्थ लावतांना ते जनरल व सुप्रीम अशींच सरकारचीं रूपें सांगतात. त्यामुळें सर्व गोष्टींवर त्यांचें वर्चस्व चालेल... त्यांच्या पांच वकिलांनीं जें कृत्य धाडसानें केलें तसें धाडस तें करतात कीं काय तें पाहायचें आहे. त्यांनीं तसें धाडस केलें तर... मी म्हणेन कीं, अशा कृत्याविरुद्ध प्रत्येकानें आपला आवाज उंचावला पाहिजे व आणखी पुढें जाऊन आपला हात उचलला पाहिजे...

न्यायालयीन चौकशी ( इंपीचमेंट ) अव्यवहार्य असल्याचा अनुभव

आल्यानें ( तें केवळ एक बुजगावणें आहे ) त्यांना आपण जन्मभर सुरक्षित आहों असें वाटतें; जनतेच्या मताची कदर करण्याच्या जबाबदारीपासून ते हळू हळू निसटून जात आहेत....एखाद्या गुप्त बैठकींत गडबडीनें मत घेण्यांत येतें, कित्येकदां फक्त एकाच बहुमताच्या आधारावर; पण तें सांगतांना मात्र निर्णय एकमतानें घेण्यांत आल्याचें सांगण्यांत येतें...हें काम एखादा कावेबाज मुख्य न्यायाधीश आपल्या भित्र्या किंवा आळशी सहकाऱ्यांचा संमतीनें करीत असतो व हा न्यायाधीश कायद्याचा अर्थ आपल्या स्वतःच्या मनाला वाटेल तसा लावीत असतो...

न्यायदान करणारे राजाच्या लहरीवर किंवा एकट्या प्रमुखाच्या लहरीवर चालणारे नसावेत, स्वतंत्र असावेत हें चांगलें, पण राष्ट्राच्या इच्छेची कदर न करण्याचें स्वातंत्र्य त्यांना असणें म्हणजे, निदान प्रजासत्ताक राज्यांत तरी, शिष्टाचारांचा भंग होय.

## न्यायदानखातें अरेरावी झालें तर जुलमी होईल
## ( जार्विस ह्यांस, १८२० )

राज्यघटनात्मक बाबतींत न्यायाधीशांचा निर्णय अखेरचा मानणें हें फार भयंकर तत्त्व आहे व तें स्वीकारलें तर कांहीं मूठभर लोकांच्या जुलमाखालीं दबून राहाणें आपल्याला भाग पडेल. आमचे न्यायाधीश सर्वसाधारण माणसांइतकेच प्रामाणिक आहेत—जास्त प्रामाणिक नाहींत. इतर माणसांप्रमाणेंच त्यांनाहि आपल्या पक्षाबद्दल तीव्र प्रेम वाटतें, सत्तेचा लोभ असतो आणि आपल्या गटाला विशेष सवलती मिळाव्यात असें वाटत असतें... त्यांच्या हातीं सत्ता जाणें अधिक धोक्याचें आहे, कारण ते जन्मभर अधिकारपदावर असतात...

## फेडरल न्यायदानखात्यावर निर्बंध ठेवले नाहींत तर तें लोकशाही नष्ट करील
## ( सी. हॅमंड ह्यांस, १८२१ )

फेडरल न्यायदानखात्याच्या संघटनेंत आपल्या फेडरल सरकारच्या विनाशाचे जंतु आहेत. हें माझें मत बरेंच जुनें आहे आणि तें बोलून दाख-

विण्यांत मीं कधीं संकोच केला नाहीं. ( मात्र मला तें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करायला आवडत नाहीं किंवा त्या मताचा मी प्रणेता आहें, असें सांगावेंसें वाटत नाहीं. ) आपलें फेडरल न्यायखातें हें एक बेजबाबदार व्यक्तींचा गट असून ( त्याची न्यायालयीन चौकशी म्हणजे एक निर्जीव बुजगावणें आहे ) गुरुत्वाकर्षणासारखा तो गट रात्रंदिवस आपलें कार्य करीत राहतो, रोज थोडी थोडी प्रगति करीत राहतो, आवाज न होऊं देतां चोरासारखीं आपलीं पावलें पुढें टाकीत राहतो, आणि अधिकारक्षेत्रावर हळूहळू आक्रमण करतो. अखेरीस राज्यांच्या हातून हा गट सर्व सत्ता हिरावून घेईल व एका सत्तेखालीं सर्व सत्ता आणील. ह्याला माझा विरोध आहे; कारण जेव्हां अंतर्गत व्यवहार व परराष्ट्रीय संबंध हे सारे लहान–मोठ्या बाबतींत, केंद्रीय सत्ता म्हणून वॉशिंग्टनमध्यें केंद्रित होतील, तेव्हां दुसऱ्या राज्यसरकारांना दुसऱ्यावर निर्बंध ठेवणें अशक्य होईल व ज्या सरकाराच्या तावडींतून आपण आपली सुटका करून घेतली,त्या सरकारसारखेंच हें सरकार जुलमी होईल. मग युरोपांत आहे तशीच इथेंहि परिस्थिति होईल. प्रत्येक मनुष्य निव्वळ हत्यार म्हणूनच जगूं शकेल. आपले व ह्यांचे कर्मचारी एकाच भट्टींत तयार झालेले आहेत, एकाच प्रकारच्या साहित्यापासून बनविले गेले आहेत, एकाच हातानें घडविले गेले आहेत. ज्या खोल गर्तेत आपण सारे गडप होणार आहोंत,त्या गर्तेत मुकाट्यानें पडणाऱ्या आपल्या शासनयंत्राकडे जर घटक राज्यें निराश होऊन फक्त पहात राहतील तर केवळ चाबकाच्या फटकाऱ्याचेंच नियंत्रण मानणाऱ्या मनुष्य-स्वभावाबद्दल रडण्यावांचून आपल्याला दुसरा इलाज राहणार नाहीं व स्वयंशासनास नालायक असलेल्या, त्याच्या वल्गना म्हणजेच त्याचा खरा इतिहास ठरेल.

## फेडरल न्यायाधीशांवर आळा घालायचा असेल तर त्यांची नेमणूक दर सहा वर्षांनीं करावी

**( प्लेझंटस् ह्यांस, १८२१ )**

राज्यघटनेवर न्यायदानखातें जे आघात करीत आहे,त्यांना आळा घालायचें कठीण कार्य करण्यासाठीं मला सर्वांत उत्तम मार्ग असा दिसतो कीं त्यांची

नेमणूक ( सीनेटची मुदत असते त्या ) सहा वर्षांसाठींच करावी व दोन्ही गृहांच्या संमतीनें त्यांची फेरनेमणूक अध्यक्षाला करतां येण्याची तरतूद ठेवावी. हें जर पुरेसें स्वातंत्र्य नाहीं असें कोणी म्हणत असेल तर पुरेसें स्वातंत्र्य म्हणजे काय तेंच मला कळत नाहीं...

न्यायाधीशांनीं राज्यघटनेला आणलेली विकृति ही नेहमींच त्यांच्या निर्णयांत झालेली चूक आहे असें समजलें जाईल. कारण अशा चुकीसाठीं त्यांना शिक्षा होऊं नये, असें तत्त्व आहे. त्यामुळें न्यायालयीन शिक्षेला ( इंपीचमेंट ) भिण्याचें त्यांना कांहींच कारण नाहीं. पण जर दर सहा वर्षांनीं दोन्ही सभागृहांत त्यांच्या वागणुकीची चौकशी होईल असें त्यांना कळलें तर त्यांना थोडी तरी भीति वाटेल. जर सर्वोच्च शासनयंत्राची एक शाखा राष्ट्राच्या निर्बंधाबाहेर असेल तर त्या सरकारला प्रजासत्ताक सरकार म्हणणें चुकीचें आहे.

* * *

: १० :

# राज्यघटनेंत बदल होऊं शकतात

## आतांपर्यंत झालेल्यांत सर्वोत्तम राज्यघटना

( हंफ्रेज ह्यांस, १७८९ )

सध्यां अमेरिकेंत घडत असलेल्या घटनांनीं माझें मन आनंदानें भरून येतें. त्याचें पहिलें कारण असें कीं, जेव्हां तेव्हां आपला कारभार चुकीच्या मार्गानें जाईल, तेव्हां तेव्हां जनतेची सद्भावना हस्तक्षेप करून त्या चुका सुधारील ह्या माझ्या विश्वासास त्यामुळें बळकटी येत आहे. राज्यांतील

शहाणीं माणसें एकत्र बोलावून, सैन्याची जमवाजमव करून नव्हे. राज्यघटनेंत बदल करण्याचें उदाहरण, आपण ह्यापूर्वी घालून दिलेल्या उदाहरणांप्रमाणेंच जगाला मोलाचें वाटेल. आपल्या चर्चेतून आपण तयार केलेली राज्यघटनासुद्धां मनुष्यजातीला आजपर्यंत मिळालेल्या राज्यघटनांत सर्वोत्कृष्ट आहे.

**(मार्श ह्यांस, १८०१ : N. Y. Pub. Lib. Ms. 11, 84)**

अमेरिकेची राज्यघटना आपल्या देशांतील जनतेनें एकत्र येऊन व आपलें ज्ञान एकत्र करून बनविलेली आहे. त्यामुळें जर सरकार शुद्ध प्रातिनिधिक पद्धतीनें संघटित केलेलें असेल, भीति व दडपशाही ह्यांऐवजीं माणसाचे विचार, त्याची सद्बुद्धि; समाजविरोधी वृत्तीऐवजीं त्याच्यांत असलेल्या समाजोपयोगी वृत्ती; ह्यांवर तें आधारलेलें असेल, तर तें त्याच्या सर्व नैतिक हक्कांच्या बाबतींत त्याला पूर्ण पाठिंबा देऊं शकेल व सर्व अनैतिक कृत्यांपासून त्याचें रक्षण करूं शकेल हें सिद्ध करण्याची जबाबदारी आपल्यावर पडते.

## लेखी राज्यघटनेमुळें राजकीय तत्त्वें स्पष्ट होतात

**( डॉ. प्रीस्टले ह्यांस, १८०२ )**

राज्यघटनेचा आराखडा तयार झाला, तेव्हां मी युरोपमध्यें होतों व ती स्वीकारली गेल्यावरच मी पाहिली. राज्यघटना वाचल्यावर मी मॅडिसन ह्यांना एक कडक पत्र लिहून धर्मस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य, ज्यूरींच्या साहाय्यानें खटला चालविण्याची तरतूद, हेबियस कॉर्पस, खड्या सैन्याऐवजीं नागरिकांच्या मिलिशियाची योजना व युनियन सरकारला जे अधिकार सुपूर्द केलेले नव्हते ते सर्व राज्यसरकारांच्याकडे राखून ठेवले असल्याचा स्पष्ट उल्लेख, ह्यांची तरतूद करण्याची मागणी केली. त्यांनीं कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनांत त्याप्रमाणें दुरुस्ती सूचना मांडल्या व त्या मान्य झाल्यावर घटक राज्यांनीं त्यांना सम्मति दिली आणि त्या सध्यां आहेत त्याप्रमाणें समाविष्ट करून घेण्यांत आल्या. राज्यघटनेबाबत मीं एवढेंच कार्य केलें. जनता विकारवश झाली म्हणजे लेखी

दा. क. 13909

राज्यघटनेचासुद्धां भंग होऊं शकतो हें खरें असलें, तरी जागरूक नागरिकांना त्या लेखी तत्त्वांभोंवतीं जमून जनतेला आवाहन करतां येतें; त्यामुळें जनतेलाहि आपल्या राजकीय पक्षांचीं तत्त्वें स्पष्ट कळतात.

## पण राज्यघटना पवित्र नसतात—

### ( एम्. कर्शेवल ( kercheval ) ह्यांस, १८१६ )

कांहीं लोक राज्यघटनांकडे धार्मिक श्रद्धेनें पाहातात व मंदिराच्या कमानींसारख्या त्या पवित्र मानून, त्यांना स्पर्श करणें निषिद्ध समजतात. पूर्वजांचें ज्ञान सर्वसाधारण माणसांपेक्षां वरच्या दर्जाचें होतें असें मानून त्यांनीं जें कांहीं केलें असेल त्यांत सुधारणा करण्याचा कुणालाच अधिकार नाहीं असें समजतात... राज्यघटनांत आणि कायद्यांत सतत आणि निराधार बदल करीत राहावें असें मला वाटत नाहीं. कांहीं सौम्य प्रकारचे दोष खपवून घ्यावेत असें मला वाटतें... पण मानवी मनाच्या प्रगतीबरोबरच कायदे व संस्था हीं प्रगत झालीं पाहिजेत हें मला माहीत आहे... जसे नवे शोध लागतात, नवीं सत्यें उजेडांत येतात, परिस्थिति बदलेल त्याप्रमाणें वागणूक आणि शिष्टाचार जसे बदलत जातात, तशा संस्थाहि बदलून अद्ययावत राहिल्या पाहिजेत. आपल्या रानटी पूर्वजांनीं घालून दिलेल्या नियमांनुसारच समाजांनीं वागलें पाहिजे असा आग्रह धरणें म्हणजे लहानपणीं एखाद्या मुलाला होणारा सदरा तो मोठा झाल्यावरहि त्यानें घातला पाहिजे असा आग्रह धरण्यासारखेंच आहे... प्रत्येक पिढीला... आपल्या सुखी जीवनास योग्य वाटेल अशा प्रकारचें सरकार निवडण्याचा हक्क आहे... ...असें करण्याची संधि दर १९ किंवा २० वर्षांनीं मिळावी अशी तरतूद राज्यघटनेंतच केली पाहिजे... ह्या पृथ्वीच्या पाठीवर जें जें असेल त्याची मालकी देहानें जगत असलेल्या तेव्हांच्या पिढीकडे, त्या पिढीच्या आयुष्यकाळांत असते. आपल्या हिताचें काय आहे तें सांगण्याचा हक्क केवळ त्यांचाच आहे...हा मार्ग जर बंद केला तर बळाचा उपयोग करून ते आपलें म्हणणें स्पष्ट करतील व इतर राष्ट्रांच्याप्रमाणें आपणहि जुलूम, बंड आणि सुधारणा ह्या दुष्ट वर्तुळांत फिरत राहूं व असेंच नेहेमीं घडत राहील.

## —किंवा कायमच्याहि नसतात

### ( जे. कार्टराइट ह्यांस, १८२४ )

ज्यांत कधींहि बदल करतां येणार नाहींत असें ( आमच्या राज्यघटना-विषयक कायद्याचें ) स्वरूप ठेवतां येईल ? एका पिढीला दुसऱ्या पिढीस व इतर सर्व भावी पिढ्यांस बंधनांत अडकवून ठेवतां येईल का ? मला वाटतें, असें करतां येणार नाहीं. ईश्वरानें पृथ्वी, तीवर जिवंत असलेल्या माणसांच्यासाठीं बनविली आहे; मृतांच्यासाठीं नव्हे. हक्क आणि सत्ता हीं व्यक्तींचीं असूं शकतात, वस्तूंची किंवा पदार्थांचीं, ज्यांना इच्छाशक्ति नाहीं अशांचीं असूं शकत नाहींत. मृत माणसें म्हणजे तर वस्तूहि नव्हेत. . .माणसांच्या रूपानें जेव्हां हीं माणसें जिवंत होतीं तेव्हां त्यांच्या हातीं असलेले हक्क आणि अधिकार कशाशीं संबंधित आहेत ? एखाद्या पिढीचें बहुमत जोंपर्यंत त्या जागीं आहे व मावळलेल्या पिढीच्या हातीं असलेले हक्क व अधिकार जोंपर्यंत ह्या पिढीच्या हातीं आहेत, तोंपर्यंतच त्या पिढीचे निर्णय त्यांच्यावर बंधनकारक राहातील व आपल्या गरजेप्रमाणें कायदे व संघटना ह्यांत तिला बदल करतां येतील. म्हणून माणसाच्या परंपरागत, अनिर्बंध हक्कांशिवाय बाकी सर्व बदलतां येतें.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३४४०८ वि: [illegible]
क्रमांक २४४२ नों. दि. २८-[illegible]

: ११ :

# राजकीय अर्थव्यवस्था

## ( १ ) शेती आणि व्यापार

### व्यापारी अर्थव्यवस्थेपेक्षां शेतीवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेचे फायदे

**( जे ह्यांस, १७८५ )**

असंख्य माणसांना शेतीचें काम देतां येईल एवढी जमीन आपल्याजवळ आहे. शेतकरी हे पृथ्वीवरील सर्वांत जास्त मोलाचे नागरिक होत. ते सर्वांत उत्साही, सर्वांत अधिक स्वतंत्र व सर्वांत अधिक सद्‌गुणी आहेत, आणि आपल्या देशाशीं त्यांचे घनिष्ट हितसंबंध असतात; आणि त्या देशाच्या हिताशीं आणि स्वातंत्र्याशीं ते एकरूप झालेले असतात. म्हणून जोंपर्यंत त्यांना शेतावर कामधंदा मिळूं शकतो तोंपर्यंत त्यांना खाणमजूर किंवा कुशल कामगार म्हणून कामाला लावणें मी योग्य समजत नाहीं. ह्या क्षेत्रांत काम करणाऱ्यांची संख्या व ह्या क्षेत्रांतील उत्पादन हीं देशांतर्गत किंवा देशाबाहेरील मागणीच्यापेक्षां अधिक होईपर्यंत आपल्या नागरिकांना काम मिळत राहील. सध्यां तशी स्थिति नाहीं व अजून बऱ्याच काळपर्यंत येणारहि नाहीं. अशी परिस्थिति आल्याबरोबर गरजेपेक्षां अधिक असलेलीं माणसें इतर कामधंद्यांत अडकवावीं. मला अशा माणसांना कारखान्यांत कामगार बनविण्यापेक्षां खलाशी बनविलेलें आवडेल, कारण ह्या दोन प्रकारच्या लोकांच्या स्वभावाची तुलना

केली तर खलाशी मला अधिक मोलाचे नागरिक वाटतात. यांत्रिक कामें करणारे कामगार दुर्गुण पसरवितात आणि सर्वसाधारणतः त्यांच्याच साहाय्यानें राष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट केलें जातें, असें माझें मत आहे. महासागरी जीवनांत आपण सहभागी होणें आवश्यक आहे, असा निर्णय आपल्या जनतेनें घेतला असून त्यांच्या प्रस्थापित संवयीमुळें सागरी जीवनाचे मार्ग त्यांना खुले असावेत असें त्यांना वाटतें.

पण ह्याचा परिणाम काय होईल? वारंवार लढाया होत राहतील, ह्याबद्दल शंका नाहीं. समुद्रावर त्यांच्या मालमत्तेवर हल्ले करण्यांत येतील, आणि परराष्ट्रीय बंदरांत त्यांचे अपमान होतील. त्यांना कर्जबाजारीपणाच्या, करार मोडल्याच्या, गुन्हे केल्याच्या, बेकायदा वस्तू नेल्याच्या, अशा खोट्या आरोपांवरून तुरुंगांत टाकण्यांत येईल. मग त्याबद्दल आपल्याला कांहीं वाटो कीं न वाटो, त्यांची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून आपण अशा अपमानांचा निषेध केला पाहिजे. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर आपल्या सागरी व परराष्ट्रीय व्यापाराची भरपाई वारंवार युद्धें करून केली गेली पाहिजे. आपण कितीहि न्यायी असलों तरी ह्यांतून आपली सुटका नाहीं. त्यासाठीं आपल्यासारखेंच इतर राष्ट्रांनींहि न्यायी बनणें आवश्यक आहे. आपल्यांत न्यायबुद्धि असली तर, आपल्यांतील न्यायबुद्धीच्या अभावामुळें होऊं शकणाऱ्या लढाया आपण टाळूं, पण इतरांच्या अन्यायामुळें होणाऱ्या लढाया आपण कशा टाळणार? त्यांना शिक्षा करण्याचें आपल्यांत सामर्थ्य आणण्यामुळें... कारण जर आपण एका अपमानाची शिक्षा दिली नाहीं तर त्यांतून अनेक अपमानांचा जन्म होतो.

**( हॉगेनडॉर्प ह्यांस, १७८५ )**

आपल्या राज्यांना व्यापार हातीं घेण्यासाठीं उत्तेजन देण्याबाबत माझें मत काय आहे तें तुम्हीं विचारलेंत. जर मला माझें तत्त्व अंमलांत आणतां आलें असतें तर, त्यांनीं व्यापारी किंवा खलाशी होऊं नये. उलट, युरोपचा मान ठेवूनहि चीनसारखा मार्ग स्वीकारावा असें मीं म्हटलें असतें. ह्याप्रमाणें आपण युद्धें टाळावींत व आपले सर्व नागरिक शेतकरी व्हावेत. जर आपली संख्या इतकी मोठी झाली कीं, आपल्या उत्पादनामुळें देशांतील

व देशाबाहेरील बाजारपेठा भरून गेल्या,तर शेतकऱ्यांनीं पुरेसें उत्पादन करून उरलेल्या वेळेचा उपयोग कारखान्यांतील उत्पादनांत घालवावा किंवा आवश्यकतेपेक्षां अधिक असलेल्या माणसांनीं कारखान्यांत कामें करावींत किंवा सागरी जीवन पत्करावें. पण हा दिवस यावयास अजून बराच काळ लागेल आणि अजून बराच काळ आपण आपले कामगार युरोपांत राहूं द्यावेत व युरोपनें कच्चा माल आणि अन्नहि अमेरिकेकडून घ्यावें.

## अमेरिकेनें केवळ शेतीच करावी का ?

( से ह्यांस, १८०४ )

आपल्या देशाच्या व युरोपांतील जुन्या देशांच्या परिस्थितींत असलेला फरक राजकीय अर्थव्यवस्थेचा विचार करतांना लक्षांत घेतला पाहिजे... उदाहरणार्थ, युरोपांत अन्नाचा पुरवठा ठराविक आहे किंवा फार थोड्या प्रमाणांत, गणिती हिशेबानें वाढतो... तेथें पडिक राहिलेल्या विस्तृत सुपीक जमिनी आहेत आणि मेहेनत करणाराला लौकर लग्न करून वाटेल तेवढें कुटुंब पोसणें शक्य होतें. आपलें अन्नोत्पादन आपल्या कामगारसंख्येच्या तुलनेनें भूमितीच्या प्रमाणांत वाढतें व आपली जननसंख्या कितीहि जास्त असली तरी तिचें पालनपोषण होतें.

तेथें कारखान्यांत उत्पादन करणाऱ्या कामगारांना शेतकऱ्यांच्या बरोबर काम करायला लावणें ही उत्तम श्रमविभागणी मानतात. म्हणजे शेतकरी दोन्ही वर्गांच्या कामगारांना अन्न पुरवितो व कारखान्यांतील कामगार दोन्ही वर्गांच्या कामगारांसाठीं कपडा व इतर आवश्यक वस्तू पुरवितो. पण ही व्यवस्था येथें सर्वोत्तम ठरेल का ? प्रथमदर्शनीं पाहिलें असतां व आपला अभिमान दुखावला जाऊं नये म्हणून 'हो' म्हणावेंसें वाटतें. का आमच्या सर्व कामगारांना शेती करायला लावणेंच अधिक श्रेयस्कर पडेल ? असें केलें तर आजच्यापेक्षां दुप्पट किंवा तिप्पट जमीन लागवडीखालीं आणतां येईल; दुप्पट किंवा तिप्पट धान्य पिकवतां येईल आणि आपल्या गरजा भागवून उरलेलें धान्य आज उपाशी राहाणाऱ्या युरोपांतील लोकांसाठीं पाठवून देतां येईल व ह्या धान्याच्या बदली युरोपांतील लोक आपल्याला कपडा व इतर आवश्यक वस्तू तयार करून देऊं शकतील. ही

व्यवस्था अधिक नैतिक ठरेल. निसर्ग–नियमच आपलें हित व आपलीं कर्तव्यें ठरवून देत असतात......हा प्रश्न सोडवितांनाहि आपण कामगारांपेक्षां शेतकऱ्यांच्या ऐहिक व नैतिक गरजांकडे अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. माझ्या व्यवसायक्षेत्रामुळें मी फक्त प्रश्न विचारूं शकतों. मला माहिती असली तरी माझ्या व्यवसायामुळें मला त्या प्रश्नांचीं उत्तरें देणें शक्य झालें नसतें.

## ( २ ) राष्ट्रीय कर्ज

## एका पिढीला दुसऱ्या पिढीवर कर्जाचा बोजा ठेवण्याचा हक्क नाहीं

**( मॅडिसन ह्यांस, १७८९ )**

एका पिढीला दुसऱ्या पिढीवर बंधनकारक बोजा टाकतां येतो किंवा नाहीं ह्याचा विचार युरोपांत किंवा अमेरिकेंतहि झाला नाहीं. पण हा प्रश्न इतका महत्त्वाचा आहे कीं, त्यांचा निर्णय घेतला पाहिजे; एवढेंच नव्हे, तर प्रत्येक सरकारनें तो एक मूलभूत प्रश्न म्हणून स्वीकारला पाहिजे. समाज-संघटनेच्या प्राथमिक तत्त्वांच्या ज्या विचारधारेंत आपण बुडून गेलों आहों, तीमुळें हा प्रश्न माझ्या मनांत उभा राहिला. व एका पिढीला दुसऱ्या पिढीवर कसल्याहि कर्जाचा बोजा टाकतां येत नाहीं हें मला वाटतें, पुराव्यानिशीं सिद्ध होण्यासारखें आहे. ह्या बाबतींत माझे पुढील विचार माझ्या दृष्टीनें स्वयंसिद्ध असलेल्या तत्त्वांवर आधारलेले आहेत. ही पृथ्वी तीवर जिवंत असलेल्यांची आहे. त्यांना तो हक्क फक्त भोगवट्याचा आहे. मृतांचा तिच्यावर अधिकारहि नाहीं किंवा त्यांना तिच्याबाबत हक्कहि नाहींत. एखाद्या व्यक्तीनें व्यापलेला पृथ्वीचा भाग त्याच्या मृत्यूबरोबर त्याचा राहात नाहीं, समाजाच्या मालकीचा होतो. जर समाजानें असे निरनिराळे तुकडे ताब्यांत घेण्याबद्दल कांहीं नियम केलेले नसले तर जो पहिल्यानें अशा जमिनीचा ताबा घेईल, त्याला ती मिळेल व सर्वसाधारणतः असा ताबा मृताच्या बायकोस व मुलास मिळेल. जर जमीन ताब्यांत घेण्यासंबंधीं त्यांनीं नियम बनविलेले असतील तर त्या नियमानुसार, ती जमीन,

मृताच्या बायकोला आणि मुलांना किंवा त्यांच्यापैकीं कोणा एकाला, किंवा मृताच्या कायदेशीर वारसाला मिळेल. तेव्हां ती जमीन मृताच्या सावकारालाहि देतां येईल. पण मुलाला, वारसाला किंवा सावकाराला ती जमीन निसर्गदत्त अधिकार म्हणून न मिळतां ज्या समाजाचा तो घटक असतो व ज्या समाजाचे कायदे त्याच्यावर बंधनकारक असतात, त्या समाजाच्या कायद्यानुसार मिळते. म्हणून आपल्या ताब्यांत असलेल्या जमिनीवर कर्ज काढून बोजा निर्माण करण्याचा कोणत्याहि माणसास निसर्गदत्त अधिकार नाहीं, किंवा त्याच्यामागून त्याचा व्यवसाय चालविणारांच्यावरहि त्याला तो कर्जाचा बोजा फेडण्याची जबाबदारी टाकतां येत नाहीं. कारण त्याला तसें करतां आलें तर आपल्या हयातींतच तो अनेक भावी पिढ्यांचे श्रम खाऊन बसेल व मग ती जमीन मृत माणसाच्या मालकीचीच राहील व असें घडणें आमच्या तत्त्वाविरुद्ध आहे.

समाजाच्या व्यक्तिगत घटकाच्या बाबतींत जसें हें सत्य आहे, तसेंच तें त्या व्यक्तींच्या समुदायाच्या बाबतींतहि खरें आहे; कारण व्यक्तींच्या हक्कांची बेरीज म्हणजेच समाजाचे हक्क. जेव्हां आपण ह्या कल्पना असंख्य व्यक्तींना लागू करतों तेव्हां त्या स्पष्ट असाव्यात म्हणून आपण अशी कल्पना करू या कीं, माणसांची एक सर्व पिढी एकाच दिवशीं जन्माला आली आहे, एकाच दिवशीं सज्ञान झाली आहे, एकाच दिवशीं मेली आहे व वयांत आल्यावर तिनें एकत्र, एका नव्या पिढीला जन्म दिला आहे. एकविसाव्या वर्षीं सर्व सज्ञान झाले व त्यानंतर चौतीस वर्षें ते जगले असें आपण समजूं. कारण कायद्यानें सज्ञान माणसाची आयुर्मर्यादा तेवढी मानली आहे. म्हणजे एकामागें एक पिढ्या एकाच क्षणीं सज्ञान होतील व एकाच क्षणीं मरतील. अशा परिस्थितींत माझें म्हणणें असें कीं, अशा प्रत्येक पिढीच्या जीवनकाळांत ही पृथ्वी पूर्णपणें त्यांचा हक्क म्हणून त्यांच्या मालकीची आहे. दुसरी पिढी पहिल्या पिढीकडून जेव्हां ह्या पृथ्वीचा ताबा घेते तेव्हां तिला ती बोजारहित मिळते. तिसऱ्या पिढीला दुसऱ्या पिढीकडून ती तशीच मिळते व ह्या क्रमानें पुढील पिढयांना मिळत राहील. पण पहिल्या पिढीनें जर पृथ्वीवर कर्जाचा बोजा ठेवला तर मग पृथ्वी त्या मेलेल्यांच्या मालकीची राहील,

जिवंत असणाऱ्यांच्या मालकीची नव्हे; म्हणजे आपल्या हयातींत जेवढीं कर्जें फेडतां येतील त्यापेक्षां अधिक कर्जें एका पिढीला काढतां येणार नाहींत. एकविसाव्या वर्षीं जर कर्ज काढलें तर त्याचा बोजा त्यांच्यावर व त्यांच्या जमिनीवर चौतीस वर्षें राहील, बाविसाव्या वर्षी तेहतीस वर्षें, तेविसाव्या वर्षीं बत्तीस वर्षें व ह्याप्रमाणें चौपन्नाव्या वर्षी फक्त एकच वर्षासाठीं राहील. कारण त्या वयानंतर त्यांच्या आयुर्मर्यादेची एवढीच मुदत शिल्लक रहाते. पण एका व्यक्तीच्या व पिढीच्या आयुष्यक्रमांतील फरक लक्षांत घेणें आवश्यक आहे. व्यक्ती ह्या केवळ समाजाच्याच घटक असतात. व सर्व समाजानें बनविलेल्या कायद्याचें व्यक्तीवर बंधन असतें. ह्या कायद्यानुसार मृताच्या जमिनीचा ताबा घेऊन ती सावकाराच्या ताब्यांत देतां येईल, किंवा मृताच्या मुलानें सावकाराचें कर्ज फेडण्याची जबाबदारी घेतली तर त्याला ती देतां येईल. पण आपण मघांशीं जमेस धरलें त्याप्रमाणें जेव्हां सर्व पिढीच, म्हणजे समाजच मरतो व नवी पिढी किंवा समाज त्या मृतांच्या जागीं येतो तेव्हां पूर्ण बदल होतो व नव्या पिढीची जमीन, तिसऱ्या एखाद्या समाजाला त्या समाजानें मृत पिढीला दिलेलें कर्ज त्या पिढीला फेडतां आलें नसलें तरी देण्याचा उच्चाधिकार असलेली शक्ति अस्तित्वांतच नसते.

आपणांस ह्या तत्त्वाची स्पष्ट कल्पना यावी म्हणून आपण मानलेल्या नियमित लुप्त होणाऱ्या पिढ्यांच्या बाबतींत जें तत्त्व सत्य आहे, तेंच तत्त्व निसर्गनियमाप्रमाणें रोज बदलत असलेल्या व्यक्तींच्या पिढ्यांच्या बाबतींतहि सत्य आहे. व्यवहारांत अडकलेल्या पिढींतील बहुसंख्य लोक चौतीस वर्षें व्यवहार चालवीत राहतील; नंतर नव्या पिढींतील बहुसंख्य लोक ताबा घेतील. तेव्हां जुन्या पिढीनें आपले करार चौतीस वर्षांपेक्षां अधिक मुदतीचे करूं नयेत. ह्याचें तात्पर्य मग असें निघतें कीं, राष्ट्राचे प्रतिनिधी किंवा स्वतः सर्व एकत्रित जमलेलें राष्ट्र, आपल्या आयुर्मर्यादेबाहेर जाईल असें, म्हणजे चौतीस वर्षांपेक्षां अधिक मुदतीचें, कर्ज कायदेशीरपणें काढूं शकत नाहीं.

## अर्थव्यवस्थेचे हे दोन नियम पाळा

**( एल्. वुलियम्स ह्यांस, १८२०,**
N. Y. Pub. Lib. Ms, iv, 486. )

कर्ज काढून किंवा कर बसवून जीं कर्जें फेडावयाचीं असतील, त्यांच्या

बाबतींत अर्थव्यवस्थेचे दोन नियम फार कांटेकोरपणें पाळले जावेत : ( १ ) ठराविक मुदतींत मुद्दल व व्याज ह्या दोन्हींची फोड होऊं शकेल, असा कर बसविल्याशिवाय कर्ज काढावयाचें नाहीं. मी ही मुदत १० वर्षे ठरवीन... ( २ ) ज्या विशिष्ट कारणासाठीं कर्ज काढावयाचें त्या कारणांसाठींच खर्च झाल्याशिवाय कर्ज काढूं नये किंवा कर बसवूं नये.

## राष्ट्रीय कर्जांमुळें आपत्ती येतात; अधःपतन होतें

### ( गॅलाटिन ह्यांस, १८०९)

कुठल्याहि युद्धांत अडकण्यापूर्वी आपलीं राष्ट्रीय कर्जें फेडण्यावरच आपल्या प्रजासत्ताकाचें भवितव्य अवलंबून आहे, असें मी समजतों... जर कर्जांचा डोंगर वाढून प्रचंड झाला तर तें फेडणें कठीण होईल व मग इंग्लंड-मध्यें झालें त्याप्रमाणें कर्जबाजारीपणा, लांचखोरी, अधःपात व शेवटीं क्रांति ह्या मार्गानें जाणें आपल्याला भाग पडेल.

### ( एस्. कर्शोवाल ह्यांस, १८१६ )

जनतेला भिणाऱ्यांपैकीं मी नाहीं. आपलें स्वातंत्र्य सतत टिकून राहाण्यासाठीं आपल्याला जनतेवर विसंबून राहावयाचें आहे, श्रीमंतांवर नाहीं. आणि जनतेचें स्वातंत्र्य आपल्याला टिकवून धरायचें असलें तर आपल्यावरील कर्जाचें ओझें सतत वाढवीत ठेवण्याची सवलत आपण आपल्या राज्यकर्त्यांना देतां कामा नये. काटकसर व स्वातंत्र्य, का उधळे-पणा व गुलामगिरी ही निवड आपण केली पाहिजे. आपण काढलेलीं कर्जें फेडण्यासाठीं आपल्याला आपल्या अन्नपाण्यावर, आपल्या गरजांवर व सुखसोईंवर, आपल्या श्रमांवर व आपल्या मनोरंजनावर, आपल्या व्यवसायावर आणि आपल्या तत्त्वावर, इंग्लंडमध्यें आहेत तसे कर जर आपल्याला आपल्या लोकांवर बसवावे लागले तर इंग्लंडमधील जनतेप्रमाणें आपल्या लोकांनाहि दिवसाच्या चोवीस तासांपैकीं सोळा तास काम करावें लागेल. ह्या सोळा तासांच्या कामापैकीं पंधरा तासांची कमाई सरकारला कर्ज फेडण्यासाठीं व रोजचा सरकारी खर्च चालविण्यासाठीं द्यावी लागेल व मग सोळाव्या तासाची कमाई आपल्याला पोटभर भाकरी देण्यास पुरत

नसल्यामुळें, इंग्लंडांतील जनतेप्रमाणें आपल्यालाहि ओट हें निकृष्ट धान्य व बटाटे खाऊन राहावें लागेल; विचार करण्यासहि वेळ राहाणार नाहीं व आपला कारभार गैरपद्धतीनें चालविणाऱ्यांना त्याचा जाब विचारण्याचा मार्ग आमच्या हातीं राहाणार नाहीं. उलट, आपल्याच नागरिकबंधूंच्या माने-भोंवतीं त्यांनीं लावलेल्या फांसाच्या लोखंडी सांखळीचे आंकडे ठोकून मजबूत करण्याचें त्यांचें काम करून जगण्याची पाळी अपल्यावर येईल. त्यांच्या जमीनमालकांप्रमाणें आमचे मोठे जमीनमालकहि, ज्या इस्टेटी ते आपल्या आहेत असें म्हणतात व ज्या वास्तविक सरकारच्या असून विश्वस्त म्हणून त्यांच्या ताब्यांत दिलेल्या आहेत,परदेशांत भटकत राहातील, आणि त्यांच्या जमीनदारांप्रमाणेंच आमच्या जमीनदारांच्या वांट्यालहि दारिद्य येईल, त्यांना कोणी विचारणार नाहीं आणि त्यांना हद्दपारीचें जीवन जगायला लागून राष्ट्रवैभवाच्या कल्पनांतच समाधान मानावें लागेल. ह्या उदाहरणावरून आम्हांला एकच घडा शिकायला मिळतो. तो हा कीं, खाजगी मालकीची संपत्ति, सार्वजनिक किंवा खाजगी उधळपट्टीनें नष्ट होते. सर्व सर-कारांत ही प्रवृत्ति आहे. एकदां तत्त्वापासून दूर गेलें कीं ती प्रथा पडते व दुसऱ्यांदां तत्त्वभ्रष्ट होण्याला आधारभूत होते व दुसऱ्या वेळीं केलेली तत्त्व-भ्रष्टता तिसऱ्या वेळेला आधारभूत होते व ह्याप्रमाणें होत होत शेवटीं समाजांतील बहुसंख्य लोकांना दुसऱ्याच्या हातांतील खेळणें होऊन बसण्याचें दुःखी जीवन जगावें लागतें व पापाचरण करणें व दुःखी आयुष्य जगणें ह्याखेरीज दुसऱ्या कसल्याहि संवेदना त्यांच्यांत राहत नाहींत. ह्या सर्व आपत्ती खेंचून आणण्याचें कार्य राष्ट्रीय कर्जरूपी घोडा करतो. त्याच्या मागो-माग करांचा बोजा, दुःसह जीवन आणि जुलूम येतात.

## ( ३ ) कर

## संरक्षणासाठीं कर आवश्यक आहेत

### ( वॉशिंग्टन ह्यांस, १८८८ )

एकंदर परिस्थितीचा आढावा घेतल्यावर माझी अशी खात्री झाली आहे कीं, करांचे सर्व मार्ग अनुसरणें राष्ट्राच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें आवश्यक ठरण्यासारखी परिस्थिति बहुतेक निर्माण होईल. युरोपांतील भांडणांत आपण

पडूं नये. उलट सर्व राष्ट्रांशीं शांततेचे व व्यापारी सबंध वाढावेत, असें माझें ठाम मत असलें तरी अमच्या शेजाऱ्यांशीं व्यापारी संबंध ठेवण्याचा आमचा नैसर्गिक हक्क हिरावून घेणाऱ्या जुलमी राष्ट्रांच्या वृत्तींतून युद्धाचा भडका उडेल हें कोण नजरेआड करील? युरोपांतील मागणीपेक्षां अमेरिकेचें उत्पादन लवकरच जास्त होईल; मग उरलेल्या उत्पादनाचें आपण काय करणार? त्याचा उपयोग जे आमच्या खंडांतील भूमीवर आहेत व ज्यांना आमचा माल पाहिजे आहे अशांच्या बाजारपेठा, बळाचा उपयोग करून काबीज करण्यासाठीं केला जाईल. आम्हांला युद्धांत गुंतविणारीं इतर कारणेंहि स्पष्ट आहेत व युद्ध म्हटलें कीं त्यासाठीं कर व कर्ज ह्यांचे सर्व मार्ग अवलंबावे लागतात.

## सरकारनें कडक काटकसर करावी

**( प्रथम वार्षिक संदेश, ८, डिसेंबर १८०१ )**

अधिकारांच्या जागा व त्यांवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढविण्याची व नागरिकांवर जास्तींत जास्त आर्थिक भार टाकण्याची सर्वसाधारण प्रवृत्ति पाहून असें वाटतें कीं, खर्चांत काटकसर करण्याची प्रत्येक संधि आपण कामीं आणली पाहिजे. श्रम करणाराला जेमतेम पुरेल एवढेंच त्याच्या श्रमाचें फळ ठेवून, उरलेल्याचें रक्षण करण्याऐवजीं सरकार स्वतःच भक्षण करीत असल्याचें दृश्य येथें दिसूं नये.

## राष्ट्रीय वार्षिक अंदाजपत्रकाची आवश्यकता

**( गॅलाटिन ह्यांस, १८०४ :**
N. Y. Pub. Lib. Ms. II 476. )

( १ ) मुलकी, ( २ ) लष्करी, ( ३ ) नाविक खात्यांना दरवर्षी लागणाऱ्या खर्चाचे, खातेवार निरनिराळे आंकडे कॉंग्रेसपुढें प्रतिवर्षी मांडून आपण भावी राज्यकर्त्यांना आदर्श घालून देणें श्रेयस्कर नाहीं का होणार? आपल्या राज्यकारभारांत लांचखोरी व वाममार्ग अवलंबण्याची प्रवृत्ति शिरूं नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजायचे असतील तर सार्वजनिक खर्च कमींत कमी करण्यावरच सत्ताधारी राज्ययंत्रणेचें स्थान अवलंबून ठेवावें.

जनतेला तात्त्विक बाबतींत निर्णय घेतां आला नाहीं तरी निरनिराळ्या काळीं झालेल्या खर्चाचे आंकडे पाहून निर्णय घेतां येईल.

## कर बसविण्यावर जनतेचें सतत नियंत्रण पाहिजे

((?) १८१३ : N. Y. Pud. Lib. Ms. IV, 190)

कर दर वर्षी किंवा दर दोन वर्षांनीं नव्यानें बसवून चालू ठेवण्यांत यावेत. कारण सार्वजनिक खजिन्यावर राष्ट्राचें सतत नियंत्रण असण्याच्या बंधनापासून प्रामाणिक सरकारनें आपली सुटका करून घ्यावयाची इच्छा ठेवू नये व लांचलुचपत असलेल्या सरकारला तशी मोकळीक देऊं नये.

## गरीबांच्या उपयोगासाठीं श्रीमंतांवर कर

( ड्युपाँ-डि- नेम्युअर्स ह्यांस, १८११ )

( Dupont de Nemoures )

आयातीवरील कर आपण सर्वांनीं मान्य केला आहे; कारण त्याचा भार सर्वस्वी श्रीमंतांवर पडतो... मीठ सोडलें तर ह्या देशांतील जो गरीब मनुष्य त्याच्या शेतांत पिकलेले किंवा त्याच्या कुटुंबीयांनीं बनविलेले किंवा अमेरिकेंत तयार झालेले पदार्थ वापरतो त्याला एक छदामहि कर म्हणून जनरल सरकारला भरावा लागत नाहीं, आणि मिठाचें उत्पादन, जें आपण हातीं घ्यावयास हवें आहे, आपण हातीं घेतलें तर त्याला मिठावरहि कर भरावा लागणार नाहीं. एकदां राष्ट्रीय कर्ज फिटलें कीं सरकारी उत्पन्न त्या जबाबदरींतून मोकळें होईल. गरजा भागविल्यावर राहिलेलें उत्पन्न कालवे खोदण्यासाठीं, रस्ते व शाळा बांधण्यासाठीं उपयोगी येईल व मग शेतकऱ्याला स्वतःच्या कमाईची एक पैहि द्यावी न लागतां, केवळ श्रीमंतांच्याकडून घेतलेल्या पैशाच्या आधारावर देशाचा राज्यकारभार चाललेला दिसेल, त्याच्या मुलांना शिक्षण मिळेल आणि देशाची भरभराट होऊन त्याचें नंदनवन झालेलें त्याला आपल्या डोळ्यांनीं पाहातां येईल. आपण जो मार्ग आतां स्वीकारला आहे तो ह्या ध्येयाप्रत पोंचतो.

( कोझियस्को ह्यांस, १८११ )

आपल्या क्वेकर पद्धतीबद्दल आपल्याला कितीहि दोष दिला गेला तरी

कालांतरानें तीच पद्धत शहाणपणाची ठरेल व आपल्या नागरिकांच्या सुखां-तून आणि भरभराटींतून त्या पद्धतीचे गुण सिद्ध होतील. मला असें वाटतें कीं, आपल्या सरकारचेंहि हेंच ध्येय असावें व आपल्या राज्यपालांचेंहि हेंच कर्तव्य असावें. ज्या प्रतिष्ठेच्या कल्पनेचा सद्गुणाशीं किंवा सुखाशीं कांहीं संबंध नसतो, अशा प्रतिष्ठेच्या अतिरेकी कल्पनेच्या आहारीं जाऊन, अथवा रागाच्या भरांत किंवा नागरिकांच्या ज्या घटनांशीं संबंध नाहीं अशा व्यक्ति-गत घटनांमुळें उत्तेजित झालेल्या शासकांच्या प्रतिष्ठेच्या कल्पनांना बळी पडून, माणसांची कत्तल करणें किंवा आपल्या अधिकाराखालीं असलेले प्रदेश उध्वस्त करणें हें नव्हे.

## ( ४ ) बँकांचे व्यवहार

## मक्तेदारी असलेल्या बँकेपासून धोका

### ( गॅलाटिन ह्यांस, १८०३ )

ही संघटना ( बँक ऑफ द युनायटेड स्टेट्स् ) आपल्या राज्यघटनेच्या तत्त्वाविरुद्ध व स्वरूपाविरुद्ध असलेली सर्वांत कडवी विरोधक संघटना होय. आतां आपलें राष्ट्र... मजबूत व संघटित आहे... पण समजा, कांहीं अनुचित घटना एकामागून एक घडल्या व प्रजासत्ताक सरकार आणी-बाणीच्या अशा परिस्थितींत राज्यकारभार नीट चालवूं शकेल कीं नाहीं अशी शंका नागरिकांच्या मनांत उपस्थित झाली, किंवा सरकारी अधिकाऱ्यां-वरील जनतेचा विश्वास अशा घटनांमुळें उडाला तर अशा, अमेरिकेंतल्या प्रत्येक भागांत शाखा असल्यामुळें सर्व देशभर पसरलेल्या व मध्यवर्ती संघटनेच्या आज्ञेनुसार काम करणाऱ्या संघटनेला सरकार उलथून पाडणें शक्य होईल. आत्मनियोजित संघटनेच्या दडपणाखालीं असलेल्या किंवा मध्यवर्ती सरकारखेरीज इतर कुठल्याहि संघटनेच्या दडपणाखालीं असलेल्या कुठल्याहि सरकारच्या सुरक्षिततेबद्दल मला शंका वाटते...

सर्व अमेरिकाभर शाखा असलेली ही बँक युद्धकाळांत काय वाटेल ते अडथळे आणूं शकेल. आपण शांततेचा तह करावा अशी आज्ञा ती आप-ल्याला देईल व तिचें म्हणणें न ऐकलें तर ती आपली मदत बंद करील.

अशा परिस्थितींत अशा सामर्थ्यवान् व विरोधी संघटनेला आधिक विस्तार आपण करूं द्यावा काय?... आतां आपण सामर्थ्यवान् असतांना, हा शत्रु आपण राज्यघटनेच्या अधिकाराखालीं पूर्णपणें आणणें हें राज्यघटनेबाबतचें आपलें पहिलें कर्तव्य आहे.

## मोठ्या बँकांपेक्षां छोट्या बँका बऱ्या

### (जे. डब्ल्यू. एपेस ह्यांस, १८१३)

पण मग असें विचारण्यांत येईल कीं, आपणांस बँका नकोच आहेत कीं काय? व्यापाऱ्यांना व इतरांना गरजेच्या वेळीं अल्पमुदतीचीं कर्जें देण्याची असलेली ही सोय आपण काढून घेणार कीं काय? माझें उत्तर असें कीं, आपल्याला बँका पाहिजेत; पण ग्रेटब्रिटन सोडून जगांतील इतर देशांत असलेल्या बँकांप्रमाणें त्या असाव्यात. येणाऱ्या बिलांच्या रकमांच्या तारणावर रोख रकमांखेरीज इतर सोई करणारी एकहि बँक युरोपखंडांत नाहीं (निदान मी तेथें असेंपर्यंत एकहि नव्हती.) ज्याच्याजवळ कर्जाऊ देण्यासाठीं रक्कम आहे अशाखेरीज सावकारीचा धंदा करण्याचा कोणासहि नैसर्गिक हक्क नाहीं. म्हणून आमच्यापैकीं ज्यांच्याजवळ कर्जाऊ देण्यासाठीं रोख भांडवल आहे व तें सावकारीखेरीज ज्यांना इतरत्र अडविण्याची इच्छा नाहीं, त्यांनीं बँका सुरू कराव्यात व बिलांच्या तारणावर रोख रकमा किंवा ज्यांची रोख रक्कम राष्ट्रांत कुठेंहि मिळतें अशा नोटा द्याव्यात. त्यांना उत्तेजन देण्यासाठीं पाहिजे तर सध्या कायद्यानें ठरविलेल्या दरापेक्षां अधिक व्याज आकारण्याची परवानगी, त्यांनीं अल्पमुदतीसाठींच कर्जें द्यावींत ह्या अटीवर द्यावी.

## श्रीमंत उच्चवर्गीयांकडून प्रजासत्ताकाला धोका

### (डॉ. जे. बी. स्टुअर्ट ह्यांस, १८१७)

इंग्लडच्या उदाहरणावरून आपल्याला भीतिदायक धडा मिळतो. आपण इंग्लंडच्या परिस्थितीचें अनुकरण केलें तर त्या परिस्थितीचे इंग्लंडमध्यें झाले तसेच परिणाम येथेंहि होतील, ह्याचा आपण विचार करीत नाहीं. सध्यां आलेली बँका काढण्याची लाट हें असेंच अनुकरण होय. ह्या लाटेमुळें

श्रीमंतांचा एक उच्च वर्ग निर्माण झाला असून, त्यानें सरकारच्या आज्ञांचा अपमान करायला सुरुवात केली आहे व त्यांच्या सरकारशीं झालेल्या संघर्षांत त्यांना जरी कांहीं प्रमाणांत पराभव स्वीकारावा लागला तरी त्यांचीं तत्त्वें बदलत नाहींत किंवा बदलणार नाहींत. समाजाच्या ज्या वर्गांतून आपल्या विधानसभांचे प्रतिनिधी निवडून येतात त्या वर्गांत हें वातावरण खोलवर पसरलें आहे. त्यांचीं तत्त्वें चांगलीं आहेत, पण त्यांचा पैसा वाईट आहे व अशा रीतीनें राज्यसंघटनेनें ज्यांना आपल्या तत्त्वांचें रक्षण करण्यासाठीं नेमलें आहे ते आपल्या कर्तव्यापासून दूर जात आहेत. कागदीं चलन सोईचें आहे हें मान्य, पण त्याचा दुरुपयोगहि अटळ आहे व किमती ठरविण्याचें प्रमाण निरुपयोगी ठरविल्यामुळें खाजगी मालमत्ता ठेवणें हा जुगार ठरतो हें नाकारतां येत नाहीं. ह्यावर आम्ही राज्यघटनात्मक निर्बंध घालूं शकूं का ?

* * *

: १२ :

# समाज—कल्याण

## (१) वर्ग

### आळशी उच्चवर्णीय निरुपयोगी

### ( डी म्युनिअर ह्यांस, १७८६ )

...आळशीपणानें आपल्या कुटुंबाच्या संपत्तीवर जगणाऱ्या, काम करण्यांत अपमान वाटणाऱ्या व जे श्रम गरीबवर्गीची दौलत आहेत अशा दुसऱ्याच्या श्रमांचें फळ खाऊन आपलें जीवन जगणाऱ्या उच्चवर्णीयांपेक्षां कष्टाळू शेतकऱ्याला समाजांत अधिक उच्च प्रतिष्ठेचें स्थान आहे.

## अमेरिकेंत वर्गभेद नाहींत

### (डी म्युनिअर ह्यांस, १७८६)

कायदेशीरपणें नेमले गेलेले अधिकारी व नागरिक ह्यांखेरीज अमेरिकेंत मनुष्या-मनुष्यांत इतर कसलेहि भेद मानले गेले नाहींत हें लक्षांत घेतलें पाहिजे. नागरिकांतील सर्वांत गरीब नागरिक आणि लक्षाधीश हे समान मानले जातात, आाणि जेव्हां त्यांच्या हक्कांचा संघर्ष होतो तेव्हां साधारणतः गरीबालाच जास्त सहानुभूति दाखविली जाते. एखाद्या चांभाराला किंवा दुसऱ्या कारागिराला जर त्याच्या लोकांनीं अधिकारपदावर निवडून दिलें, तर त्या अधिकारपदावर तो जातांच कायद्यानें त्या अधिकाराला दिलेला मान त्याला मिळतो आणि त्याच्या आज्ञा मानल्या जातात असा अनुभव आहे. चंद्रावर वस्ती आहे कीं नाहीं याबद्दल येथील जनता जितकी अज्ञानी आहे तितकीच जन्मामुळें किंवा अधिकारामुळें माणसामाणसांत भेद कां पडावा ह्याबद्दल आहे. असे भेद असतात असें त्यांनीं ऐकलें आहे आणि ते चुकीचे आहेत हें त्यांना माहीत आहे.

## युरोपांतील वर्गव्यवस्था नष्ट होण्याच्या मार्गावर

### (ॲडाम्स ह्यांस, १८३३)

युरोपांतसुद्धां माणसांचीं मनें बदलूं लागलीं आहेत. जे वाचतात व विचार करतात त्यांच्या मनांत शास्त्रांनीं नवा प्रकाश पाडला आहे आणि अमेरिकेच्या उदाहरणामुळें त्यांच्या मनांत योग्य विचार येऊं लागले आहेत. ह्याचा परिणाम म्हणजे जन्मामुळें समाजांत उच्च स्थान मिळण्याच्या प्रघाताविरुद्ध शास्त्र, हुषारी व धैर्य या गुणांनीं बंड करायला सुरुवात केली आणि जन्मावर आधारलेल्या वर्गव्यवस्थेची समाजाला घृणा वाटूं लागली. हें बंड पहिल्या प्रथम अयशस्वी झालें... पण ह्या पहिल्या आपत्तीमुळें वाटणाऱ्या भीतींतून जग लौकरच बाहेर पडेल. शास्त्रें प्रगत असतात आणि हुशारी व कर्तृत्व हीं फार तत्पर असतात... उच्चवर्गांत जन्म घेतल्यानें उच्च दर्जा मिळण्याची प्रथा हळूहळू नाहींशी होत जाईल.

## स्वाभाविक उच्चवर्ग विरुद्ध कृत्रिम उच्चवर्ग

(अॅडाम्स ह्यांस, १८१३)

मी कबूल करतों...कीं माणसांत एक स्वाभाविक उच्चवर्ग असतो. हा उच्चवर्ग हुषारी व सदाचार ह्यांवर आधारलेला असतो. पूर्वी शारीरिक बळामुळें मनुष्याला उच्चवर्गांत पोंचतां येत असे. पण बंदुकीच्या दारूमुळें बलवान् आणि अशक्त ह्या दोघांच्या हातीं सारखेंच सामर्थ्य आलें आणि सौंदर्य, विनोदी स्वभाव, नम्रता इत्यादि गुणांप्रमाणेंच शारीरिक बळ हेंहि दुय्यम महत्त्वाचें ठरलें. संपत्ति आणि जन्म ह्यांवर आधारलेला कृत्रिम उच्चवर्गहि आहे; पण त्या वर्गाजवळ हुषारी नाहीं किंवा सदाचार नाहींत, आणि ते असते तर मग हे लोक पहिल्या प्रकारच्या उच्चवर्गांत जाऊन बसले असते. स्वाभाविक उच्चवर्ग म्हणजे समाजाला मार्गदर्शन देण्यासाठीं, समाजाचे विश्वस्त म्हणून आणि समाजाची शासनव्यवस्था चालविण्यासाठीं निसर्गानें दिलेली बहुमोल देणगी होय...

मग ह्या स्वाभाविक उच्चवर्णीयांना अधिकारांच्या जागीं निवडून देतां देईल अशी परिणामकारक व्यवस्था ज्या शासनव्यवस्थेंत आहे ती शासनव्यवस्था सर्वोत्तम समजावी असें कां म्हणूं नये? कृत्रिम उच्चवर्ग हा शासनव्यवस्थेंत उपसर्ग निर्माण करणारा घटक आहे आणि ह्या वर्गाला उच्चस्थानीं जातां येणार नाहीं अशी तरतूद केली पाहिजे... माझ्या मतें सर्वांत उत्तम उपायांची तरतूद आपल्या सर्व राज्यघटनांत आहे. त्यांनीं कृत्रिम उच्चवर्गीयांऐवजीं स्वाभाविक उच्चवर्गीय स्वीकारण्याचें, भुश्यापासून गहूं वेगळा काढण्याचें स्वातंत्र्य आपल्या नागरिकांना दिलें आहे. सर्वसाधारणतः जनता जे खरोखरीच सद्‌गुणी व शहाणे आहेत त्यांनाच निवडून देईल. संपत्तीचा मोह होण्याचीं, उच्च जन्माकडे पाहून डोळे झांकण्याचीं कांहीं उदाहरणें घडतील; परंतु त्यांचें प्रमाण समाजाला धोक्यांत आणण्याएवढें असणार नाहीं.

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यानंतर भरलेल्या आपल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनांत आपण परंपरागत मिळणारे जमिनींचे मालकी हक्क नष्ट करणारा कायदा सम्मत केला. त्यानंतर आपण जमिनीचे मालकी हक्क

वडील मुलाकडे जाण्याची असलेली सवलत नष्ट करणारा कायदा केला व मृत्युपत्र न करतां मेलेल्यांची जमीन सर्व मुलांत सारख्या प्रमाणांत वांटली जावी अशी व्यवस्था केली... ह्या कायद्यांचे मसुदे मींच तयार केले होते व ह्या कायद्यामुळें कृत्रिम उच्चवर्गाच्या मुळावरच कुऱ्हाड बसली. मीं दुसरा तयार केलेला कायद्याचा एक मसुदा जर आपल्या विधानसभेनें मान्य केला असता तर आपलें कार्य पूर्ण झालें असतें. सर्वसाधारणतः शिक्षणाचा प्रसार अधिक विस्तृत भागांत करणाऱ्या कायद्याचा हा मसुदा होता. ह्या मसुद्यांत, प्रत्येक काउंटी पांच ते सहा चौरस मैलांच्याच भागांत विभागावयाची...प्रत्येक विभागांत लिहिणें, वाचणें आणि अंकगणित मोफत शिकविणारी शाळा काढावयाची, त्या शाळेंतील हुशार विद्यार्थ्यांची दरवर्षी निवड करून त्यांना सरकारी खर्चानें जिल्ह्याच्या शाळेंत अधिक शिक्षणासाठीं पाठवावयाचें व ह्या जिल्हा–शाळांतून पुन्हा हुशार विद्यार्थी निवडून विद्यापीठांत उच्च शिक्षणासाठीं पाठवावयाचे व विद्यापीठांत सर्व उपयोगी शास्त्रें शिकविण्याची व्यवस्था करावयाची, अशी व्यवस्था होती.अशा रीतीनें समाजाच्या प्रत्येक थरांतून कर्तृत्वाला व हुषार लोक निवडून त्यांना पूर्ण शिक्षण देऊन, जबाबदारीच्या सार्वजनिक जागा काबीज करण्याच्या स्पर्धेत श्रीसंत व उच्चवर्गांत जन्माला आलेल्यांशीं मुकाबला करण्यास सिद्ध करतां आलें असतें... हा कायदा जरी अजून स्वीकारला गेला नाहीं..तरी योग्य वेळीं कोणीतरी देशभक्त हा कायदा पुढें मांडील व त्याला आपल्या शासनव्यवस्थेच्या महत्त्वाचा आधारस्तंभ 'बनवील.

अमेरिकन राज्यांच्या स्थापनेपूर्वी जुन्या काळांतील माणसें अत्यंत छोट्या क्षेत्रांत किंवा दाटीदाटीनें जगत व अशा परिस्थितींतून निर्माण होणाऱ्या दुर्वर्तनांत बुडून जात. ह्याखेरीज इतर कसल्याहि परिस्थितीची नोंद इतिहासांत नाहीं. अशा माणसांच्या सोईसाठीं सरकार स्थापलें तर तें आज अमेरिकन राज्यांत असलेल्या माणसांसाठीं स्थापलेल्या सरकारांपेक्षां निराळें झालें असतें. आपल्या राज्यांत स्वतःला कसण्यासाठीं माणसाला जमीन मिळूं शकते किंवा त्याला एखादा धंदा काढावयाचा असला तर त्याला व्यवस्थित जगतां येईल एवढा मोबदला तर मिळतोच,पण वृद्धापकाळांत श्रम करण्याची

आवश्यकता राहात नाहीं. आपल्या मालमत्तेसाठीं किंवा आपल्या व्यवसायासाठीं प्रत्येकाला न्याय व सुव्यवस्था पाहिजे आहे. अशा माणसांना त्यांच्या सार्वजनिक व्यवहारावर नियंत्रण ठेवतां येईल व त्यासाठीं त्यांना जरूर तें स्वातंत्र्य मिळेल. असें स्वातंत्र्य जर युरोपांतील शहरांत असलेल्या उच्चवर्णीयांच्या हातीं दिलें तर ते त्याचा उपयोग सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचा विध्वंस करण्यासाठीं करतील.

## अमेरिकन शेतकरी हा वर्गव्यवस्थेच्या मार्गांतील अडथळा आहे

(एच्. जी. स्पाफोर्ड ह्यांस, १८१४)

आपला देश व आपली राज्यघटना ह्यांच्याशीं एकनिष्ठ राहाण्याऐवजीं इंग्लंड व राजवंश ह्यांच्याशीं निष्ठा दाखविणाऱ्या व्यापाऱ्यांना, धर्मोपदेशकांना आणि वकिलांना तुम्ही जो दोष दिलात, त्यांत मीहि तुम्हांला पाठिंबा देतों. पण व्यापाऱ्यांना स्वतःचा देशच नसतो. ज्या ठिकाणाहून त्यांना नफा मिळतो त्या ठिकाणाबद्दल त्यांना जेवढी आपुलकी वाटते तेवढी ते ज्या तुकड्यावर राहातात त्या तुकड्याबद्दल त्यांना वाटत नाहीं. प्रत्येक देशांत, प्रत्येक काळांत धर्मोपदेशकांनीं स्वातंत्र्यास विरोधच केला आहे. स्वतः केलेल्या दुष्कृत्यांच्या रक्षणासाठीं ते नेहमींच जुलमी राज्यकर्त्यांना पाठिंबा देऊन, त्यांच्या दुष्कृत्यांना उत्तेजन देत आले आहेत. आपल्या लायकीच्या आधारावर संपत्ति व सत्ता मिळविण्यापेक्षां अशा युतीनें दोन्हीहि सुलभपणें मिळूं शकतात व ती मिळविण्यासाठीं ह्या धर्मोपदेशकांनीं मानवाला शिकविण्यांत आलेला सर्वांत शुद्ध धर्महि विकृत केला व त्याला रहस्याचें, अवाढव्य शब्दावडंबराचें स्वरूप देऊन मानवजातीस तो समजणार नाहीं असा केला. कारण त्यामुळेंच आपला स्वार्थ साधण्यासाठीं त्यांना धर्माचा सुरक्षितपणें उपयोग करतां येतो.

वकिलांच्या बाबतींत मात्र ही भावना नवीनच आहे. आपल्या मातृभूमींत ते आपल्या राज्यघटनांत असलेल्या स्वातंत्र्याच्या तत्त्वांना भक्कम पाठिंबा देत आले. पण तेथेंहि ते आतां बदलले आहेत.

माझ्या लॉर्ड कूकवरील पुस्तकाऐवजीं ब्लॅकस्टोनचें पुस्तक लावल्यामुळेंच बहुतांशीं हा बदल घडला, असें मला वाटतें. वस्तुतः ब्लॅकस्टोन व ह्यूम ह्यांनीं सर्व इंग्लंडला टोरी करून सोडलें व तरुण अमेरिकनांना ते टोरी करीत आहेत. ह्यूमच्या किंवा ब्लॅकस्टोनच्या मोहक कावेबाजपणाला बळी न पडण्याइतक्या ह्या अमेरिकनांच्या स्वातंत्र्यविषयक भावना तीव्र नाहींत. बोनापार्टनें लाखों लोकांचे प्राण घेतले. त्याच्या ह्या कृत्याबद्दल त्याला ईश्वरापुढें जाब द्यावा लागेल. पण त्याच्या लाखों सैनिकांपेक्षां ह्या दोन पुस्तकांनीं, विशेषतः पहिल्या पुस्तकानें, मानवी स्वातंत्र्य दडपण्याचें कार्य अधिक केलें आहे.

आपल्या स्वातंत्र्यरक्षणाच्या कामीं मला सैनिकी हल्ल्याचें भय वाटत वाटत नाहीं. पण मीं बरेंच पाहिलें असल्यानें व मला बरीच जाणीव झालेली असल्यानें इंग्लिश पुस्तकें, इंग्लिश गैरसमज, इंग्लिश शिष्टाचार आणि आमच्यांतील माकडचेष्टा करणारे, ढोंगी आणि कट करणारे, ह्यांची मला जास्त भीति वाटते. अशा फितुरीपासून रक्षण करण्याचें सामर्थ्य मला फक्त आपल्या सर्वत्र शेती करणाऱ्या नागरिकांत,त्यांच्या साध्या हृदयांत, त्यांच्या स्वतंत्र जीवनांत आणि त्यांना हांक दिली तर आपल्या शहरांतून रहात असलेल्या ह्युमिस्टांचा नायनाट करून,आपण ज्या तत्त्वांसाठीं इंग्लंडपासून निराळे झालों त्या तत्त्वांचें रक्षण करण्याच्या त्यांच्यांत असलेल्या शक्तींत आहे.

## इंग्लिश कामगारांशीं तुलना करतां अमेरिकन कामगार सुस्थितींत आहे.

### (टी. कूपर ह्यांस, १८१४)

आपल्या जनतेपैकीं बहुसंख्य लोक कामकरी आहेत. शारीरिक किंवा व्यावसायिक मेहनत न करतां जगूं शकणारे श्रीमंत आपल्याकडे थोडे आहेत व त्यांची संपत्तीहि मध्यम आहे. कामकरीवर्गांपैकीं बहुतेकांच्या मालकीच्या मालमत्ता आहेत; स्वतःची जमीन ते स्वतः कसतात, त्यांचीं कुटुंबें आहेत व श्रीमंत आणि संपन्न वर्गाकडून आपल्या श्रमांचा चांगला मोबदला ते मिळवूं शकत असल्यानें, त्यांना भरपूर अन्न मिळतें, भरपूर

कपडे वापरतां येतात, फार श्रम करावे लागत नाहींत आणि कुटुंबांचें पालनपोषण ते चांगल्या रीतीनें करूं शकतात. त्यांना आपलें सारें कौशल्य व सामर्थ्य पणाला लावून श्रम करावे लागत नाहींत. कारण त्यांच्या मालाला युरोपसारखी किंमत मिळाली नाहीं, तरी तो खात्रीनें विकला जातो.

उलट, जे श्रीमंत व सुखवस्तु आहेत, त्यांना युरोपांत ज्याला ऐश्वर्य म्हणतात त्याची ओळखसुद्धां नाहीं. श्रम करणाऱ्यांच्यापेक्षां त्यांना थोडेंअधिक संपन्न जीवन जगतां येतें, एवढेंच! ह्यापेक्षां समाजाची निराळी अवस्था आपल्याला हवी आहे का?

ह्या तुलनेंतून ज्यांना त्यांच्या रंगामुळें, अमेरिकेच्या कांहीं भागांत, सक्तीनें दुसऱ्याच्या मालकीखालीं श्रम करावे लागतात, त्यांना मीं वगळलेलें नाहीं. इंग्लंडमध्यें मजुरी करणारांच्यापेक्षां अशा कामगारांनाहि अधिक चांगलें अन्न मिळतें, अधिक उबदार कपडे मिळतात व कमी श्रम करावे लागतात. ते अनेक कुटुंबांत रहात असल्यानें त्यांच्या सर्व गरजा भागविल्या जातात. इंग्लंडमधील फारच थोड्या मजुरांच्या वांट्याला असें सुरक्षित जीवन येतें. त्यांच्यावर शारीरिक सक्ति केली जाते हें खरें आहे. पण मग लाखों ब्रिटिश सैनिकांच्या आणि खलाशांच्या बाबतींतहि शारीरिक सक्ति केली जाते व जेव्हां म्हातारपणामुळें किंवा अपघातामुळें त्यांना श्रम करणें अशक्य होतें, तेव्हां जगावयाचें कसें ही विवंचना त्यांना पडते. आपल्याकडील कामगाराला ही विवंचना नाहीं. आफ्रिकन माणसाप्रमाणेंच ब्रिटिश खलाशालाहि, आपल्या व्यक्तिगत बाबतींत असलेल्या नैसर्गिक हक्कांच्या विरुद्ध जाऊन, आपल्या मनाविरुद्ध सक्तीनें गुलामगिरी पत्करावी लागतेच कीं नाहीं? शिवाय ज्याप्रमाणें सैनिक, खलाशी आणि गुलाम ह्यांच्यावर शारीरिक सक्ति केली जाते त्याचप्रमाणें इंग्लंडमधील कामगाराला, जीवनाच्या गरजा भागविणें अशक्य करून, मालकाच्या जुलुमापुढें मान तुकविण्याची नैतिक सक्ति सहन करावी लागतेच ना? पण माझ्या हेतूबद्दल गैरसमज करून घेऊं नका. मी गुलामगिरीची तरफदारी करीत नाहीं. परदेशी माणसावर आपण करीत असलेल्या जुलुमाचें समर्थन मी दुसऱ्या देशांत, त्यांच्या लोकांवर होत असलेल्या जुलुमाचें उदाहरण देऊन करूं इच्छित नाहीं. उलट, ह्या नैतिक व राजकीय गुलामगिरीचा नायनाट करण्यासाठीं एखादा

व्यवहार्य मार्ग सांपडत असेल तर तो शोधण्यासाठीं मी वाटेल तो त्याग करायला तयार आहें. मी सध्यां एका वर्गाच्या माणसांची स्थिति आणि त्यांच्यावरील जुलुमामुळें त्यांना सहन करावें लागणारें दुःख ह्याची दुसऱ्या वर्गाच्या माणसांच्यावर होणाऱ्या जुलुमाशीं व त्यांना सहन कराव्या दुःखाशीं तुलना करीत आहें. मी दोन्ही निषिद्ध मानतों.

आतां दोन्ही देशांतील सुखांची बेरीज करून पाहूं या. इंग्लंडमध्यें फक्त उच्चवर्गीय लोकच सुखानें राहातात व त्यांचें मजुरांशीं व दरिद्री असलेल्यांशीं काय प्रमाण पडतें तें माझ्यापेक्षां तुम्हांला जास्त चांगलें माहीत आहे. दर शंभर माणसांत चार श्रीमंत माणसें आहेत, असें मीं जर मानलें तर दर पंचवीस माणसांत एक श्रीमंत असें त्यांचें प्रमाण पडतें. अमेरिकेंत हें प्रमाण ८० लाख माणसांत शून्य असें आहे, म्हणजे कोणीच श्रीमंत नाहीं. इंग्लंडांतील श्रीमंतांना संरक्षणाचें साधन आहे व तें आमच्याजवळ नाहीं असें म्हटलें जातें. हें कसें ? आम्ही काय पुरुष नाहींत ? अहो, पण आमचे पुरुष आपल्या घरीं इतक्या सुस्थितींत आहेत कीं, रोज एक शिलिंग मिळतो म्हणून त्यासाठीं ते स्वतःला बंदुकीचें लक्ष्य बनवून दुसऱ्याची ताबेदारी पत्करणार नाहींत. म्हणून आमच्या रक्षणासाठीं आम्ही खडें सैन्य ठेवूं शकत नाहीं; कारण त्यांत शिपाईगिरी करायला आमच्याकडे दरिद्री लोकच नाहींत. ग्रीक व रोमन लोकांच्याजवळहि खडें सैन्य नव्हतें व तरीहि त्यांना स्वतःचें रक्षण करतां आलें. आपल्या राज्यकर्त्यांच्या हातीं खड्या सैन्यासारखें जुलुमी हत्यार न देण्याची व्यवस्था ग्रीकांनीं कायदे करून व रोमनांनीं आपल्या नागरिकांच्या तेजस्वी वागणुकींतून केली. प्रत्येक नागरिकाला सैनिक बनवून जेव्हां देशाची हांक येईल तेव्हां लढण्यासाठीं बोलवायचें अशी त्यांची पद्धत होती. त्यामुळें ते अजिंक्य ठरले व त्याच मार्गानें आम्हीहि अजिंक्य ठरूं.

## ( २ ) शिक्षण

### लोकप्रिय शिक्षणच लोकशाहीचें रक्षण करूं शकेल

**( नोट्स् ऑन व्हर्जिनिया, क्वेरी १४ )**

पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक शासनव्यवस्थेंत कांहींतरी दोष असतोच;

लांचलुचपतीचे व अधःपाताचे जंतु असतातच; कावेबाज माणसें ते शोधून काढतात व दुष्टपणानें हे जंतू वाढवून बळकट करतात. जनतेवर सत्ता गाजविणाऱ्या लोकांच्याच हातीं शासनव्यवस्था सोंपविली तर प्रत्येक सरकारचा अधःपात होतो. शासनसंस्थेचें रक्षण करावयाचें झाल्यास, त्यांचीं मनें कांहीं प्रमाणांत सुधारलीं पाहिजेत... सार्वजनिक शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठीं आपल्या राज्यघटनेंत दुरुस्ती केली पाहिजे. सर्व जनतेला आपल्या शासनसंस्थेंतील नियंत्रणांत भाग घेतां आला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला... सर्वोच्च नियंत्रक अधिकारांत भाग घेतां आला तर आपलें सरकार सुरक्षित राहील.

## (विद (Wythe) ह्यांस, १७८६)

जनतेंत ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं केलेला कायदा हा आमच्या सर्व कायद्यांत सर्वांत महत्त्वाचा कायदा आहे. स्वातंत्र्य आणि सुख टिकविण्यासाठीं दुसरा कोणताहि इतका विश्वसनीय पाया आपल्याला घालतां येणार नाहीं. राजे, सरदार आणि धर्मोपदेशक हें समाजाच्या सुखाचे रक्षणकर्ते आहेत, असें जर कुणाला वाटत असलें तर त्याला येथें (पॅरिसला) पाठवून द्या. त्याची ती चूक दुरुस्त करायला ह्यासारखी दुसरी शाळा सबंध विश्वांत सांपडायची नाहीं. ह्या माणसाचें असें वर्णन करणें म्हणजे आम जनतेच्या सुखाविरुद्ध बेछूटपणें कट उभारणें होय, हें त्याला आपल्या स्वतःच्या डोळ्यांनीं पाहावयास मिळेल. त्याचा झालेला परिणाम ह्या देशांतच सर्वत्र विशेषानें दिसतो. ह्या देशाची जमीन सर्वांत सुपीक आहे, हवा सर्वांत उत्तम आहे, लोक सुस्वभावी, मनमिळाऊ व आनंदी वृत्तीचे आहेत आणि असे लोक, निसर्गानें सर्व अनुकूलता देऊनहि दारिद्र्याखालीं चिरडून गेले आहेत व त्यांच्यावर हें दारिद्र्य राजे, सरदार आणि धर्मोपदेशक ह्यांनींच लादलें असून,त्याला दुसरें कोणीहि जबाबदार नाहीं. तेव्हां महाराज, अज्ञानाविरुद्ध आघाडी उघडा व सामान्य जनतेला शिक्षण देण्यासाठीं कायदे करा, तो सुधारा. ह्या आपत्तीपासून आपलें रक्षण केवळ जनताच करूं शकते हें आपल्या लोकांना कळूं द्या व ह्या कामासाठीं बसवावा लागणारा कर राजांना, सरदारांना आणि धर्मोपदेशकांना द्याव्या लागणाऱ्या कराच्या मानानें एकसहस्रांशहि नसल्याचें त्यांना सांगा; कारण आपली जनता अज्ञानी राहिली तर आपल्या बोकांडीं

राजे, सरदार व धर्मोपदेशक येऊन बसतील. येथील जनतेच्या मानानें इंग्लंडच्या जनतेवर कमी दडपशाही होते, असें मला वाटतें. पण थोडें निरीक्षण केलें तर असें दिसतें कीं, एकतंत्री राज्यसत्ता प्रस्थापित करण्याकडे त्यांची मनोवृत्ति अधिक झुकते हें त्याचें कारण आहे. उच्च कुळ, संपत्तिवैभवाचें प्रदर्शन ह्याचें त्यांना कौतुक वाटतें. आपण अमेरिकेंत त्यांच्याबद्दल ज्या कल्पना बाळगतों त्याप्रमाणें ते लोक स्वतंत्र वृत्तीचे नाहींत. त्यांच्यांतील विद्वानांची संख्या कमी आहे व त्यांची विद्वत्ताहि कमी आहे आणि ह्या देशांतील लोकांशीं तुलना करतां त्यांचीं मनें पूर्वग्रह दोषापासून फारशीं मुक्त झालेलीं नाहींत.

**( प्राइस ह्यांस, १७८९ )**

जेव्हां जेव्हां जनतेला पुरी माहिती असते,तेव्हां तेव्हां स्वतःची शासन-व्यवस्था चालविण्याच्या बाबतींत जनतेवर विश्वास टाकतां येतो. जेव्हां जेव्हां गैरव्यवस्था जनतेचें लक्ष वेधून घेण्याइतक्या अवस्थेला पोंचते तेव्हां तेव्हां त्या व्यवस्थेंतील दोष जनता काढून टाकील असा विश्वास बाळगायला हरकत नाहीं; आवश्यकता भासणें आणि ती पुरी करणें हा वरील बाबतींत एकमेव पुरावा आहे, असें मला वाटतें.

## शेतीचें शिक्षण

**( डेव्हिड वुइल्यम्स ह्यांस, १८०३ )**

ज्या मार्गांनीं शिक्षणाच्या क्षेत्रांत चालना निर्माण केली,त्याच मार्गांचा अवलंब करून शेतीचें महत्त्व लोकांना पटवून दिलें पाहिजे. हें पहिल्या प्रतीचें शास्त्र आहे. ह्या शास्त्रांत केमिस्ट्री, नॅचरल फिलॉसॉफी, मेकॅनिक्स, मॅथे-मॅटिक्स, नॅचरल हिस्टरी, बोटनी अशीं महत्त्वाचीं शास्त्रें येतात. प्रत्येक कॉलेजांत आणि विद्यापीठांत शेतीचा वर्ग आणि शेतीचे प्राध्यापक ह्यांना मानाचें स्थान मिळालें पाहिजे. जे तरुण आपलें उच्च शिक्षण शेती विषय घेऊन पुरें करतील व आपल्या शिक्षणांत सर्वोच्च स्थान शेतीला देतील... त्यांनीं इतर वर्गांत गर्दी करण्याऐवजीं आपल्या बापाच्या, स्वतःच्या किंवा

इतर कोणाच्या शेतावर कामाला जावें व सध्यां उपेक्षेनें मागें पडत असलेल्या ह्या व्यवसायाचें पुनर्जीवन करावें.

फुकट शिक्षण देणाऱ्या शाळांनीं आज समाजाला नको असलेल्या व्यवसायांचें शिक्षण देण्यापेक्षां विद्यार्थ्यांना शेतीचें शिक्षण द्यावें व त्यांना शेतीवर पाठवून तें शास्त्र समृद्ध करावें व राष्ट्राचें उत्पादन खाण्याऐवजीं त्यांत भर टाकावी. प्रत्येक सरकारी यंत्रणेंत असलेलीं अनावश्यक कार्यालयें हळूहळू बंद केलीं तर शेतावर काम करायला माणसें मिळतील व त्यांच्यावरील भारहि कमी होईल. ह्या मार्गांनीं उद्योग वाढेल व दारिद्र्य कमी होईल.

## अज्ञान समाज आपलें स्वातंत्र्य टिकवूं शकत नाहीं

### ( कर्नल यान्सी ह्यांस, १८१६ )

आजच्या सुसंस्कृत जगांत आपण अज्ञानीहि राहूं आणि स्वतंत्र्यहि राहूं अशी जर एखाद्या राष्ट्राची अपेक्षा असेल तर जें भूतकाळांत कधीं झालें नाहीं व भविष्यकाळीं होणार नाहीं तें साध्य करण्याची अपेक्षा असें राष्ट्र ठेवीत आहे, असें म्हणावें लागेल. प्रत्येक शासनयंत्राच्या अधिकारीवर्गाला आपल्या लहरीनुसार जनतेचें स्वातंत्र्य आणि मालमत्ता हिरावून घेण्याची इच्छा असते. स्वातंत्र्य आणि मालमत्ता हीं फक्त जनताच सुरक्षित ठेवूं शकते; व जनतेला जर ज्ञान नसेल तर तीहि त्यांचें रक्षण करूं शकत नाहीं. जेथें वृत्तपत्रस्वातंत्र्य आहे आणि जेथील प्रत्येक नागरिक वृत्तपत्र वाचूं शकतो तेथें सर्व कांहीं सुरक्षित राहातें.

### ( जार्विस ह्यांस, १८२१ )

जनतेच्या अधिकारांचें रक्षण स्वतः जनतेशिवाय दुसरें कोणी करूं शकेल असें मला वाटत नाहीं. जेव्हां जनता आपलें नियंत्रण योग्य प्रकारें करूं शकणार नाहीं असें वाटतें तेव्हां तिचें स्वातंत्र्य हिरावून घेणें हा त्यावरील उपाय नाहीं, तर जनतेला शिक्षण देऊन तिच्यांत ही योग्यता निर्माण करणें हा होय.

## ज्ञानवृद्धीमुळें मानवी सुखांत भर पडते

### ( डॉ. वॉटरहाउस ह्यांस, १८१८ )

माझ्या आयुष्यांत शास्त्र व कला ह्यांची झालेली प्रगति व त्या क्षेत्रांत

लागलेले शोध मी पाहतों, तेव्हां सध्यांच्या पिढीच्या आयुष्यांतहि अशीच प्रगति होईल असा मला विश्वास वाटतो. एखाद्या स्त्रीस चेटकीण समजून तिला जाळणाऱ्या आपल्या पूर्वजांच्यापेक्षां आपले बापजादे अधिक प्रगत होते, त्यांच्यापेक्षां आपण अधिक प्रगत आहों व माझी खात्री आहे कीं, त्याचप्रमाणें नवी पिढीहि आपल्यापेक्षां जास्त प्रगत होईल.

((?), १८२१)

इतर कुठल्याहि राज्यपद्धतीपेक्षां प्रजासत्ताक पद्धतींत शास्त्रांचें महत्त्व अधिक आहे आणि आपल्यासारख्या बाल्यावस्थेंत असलेल्या देशाला आपल्या शास्त्रांच्या प्रगतीसाठीं जुन्या राष्ट्रांच्या ज्ञानावर, आमच्या-पेक्षां चांगल्या असलेल्या त्यांच्या साधनांवर व प्रगतीवर बरेंच अवलंबून राहावें लागेल. परदेशांतून येणारा हा ज्ञानाचा प्रकाश अडवून धरणें म्हणजे अनंत काळ अंधःकारांत जीवन जगणें होय.

## अमेरिकन तरुणांना शिक्षणासाठीं युरोपांत कां पाठवावयाचें ?

(बॅनिस्टर ह्यांस, १७८५)

पण अमेरिकन तरुणाला शिक्षणासाठीं युरोपांत कां पाठवावयाचें ? अमेरिकन उपयोगी शिक्षणाचे हेतु काय ? जुन्या वाङ्मयाची माहिती, आधुनिक भाषा— मुख्यतः फ्रेंच, स्पॅनिश आणि इटालियन,—गणित, नॅचरल फिलॉसॉफी, नॅचरल हिस्टरी, सिव्हिल हिस्टरी आणि नीतिशास्त्र. नॅचरल फिलॉसॉफी ह्या विषयांत मी रसायनशास्त्र व शेती ह्यांचा व नॅचरल हिस्टरी ह्या विषयांत बोटनी आणि इतर संलग्न विषय यांचा समावेश करूं इच्छितों. आधुनिक भाषा बोलण्याचा सराव अमेरिकेंत होऊं शकत नाहीं हें खरें आहे; पण इतर सर्व विषय युरोपांत जितके चांगले शिकावयास मिळतात तितकेच चांगले विअल्यम व मेरी कॉलेजांतहि शिक-विले जातात. जेव्हां कॉलेजशिक्षण संपतें आणि आपल्या सार्वजनिक जीवनाची तयारी तरुणाला करावी लागते, तेव्हां त्याची दृष्टि वकील किंवा डॉक्टर होण्याकडे असते. जर त्यानें वकील व्हावयाचें ठरविलें तर मि. विद (Wythe) ह्यांच्याखेरीज आणखी तो कोणाकडे जाणार ? त्यानें डॉक्टर

व्हावयाचें ठरविलें तर त्याला युरोपांत जावेंच लागतें. म्हणजे ज्यांना वैद्यकीय शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनाच युरोपांत जाणें आवश्यक आहे.

एखाद्या तरुणाला युरोपांत पाठविण्याचे गैरफायदे आपण पाहूं या. त्या सर्वांची यादी काढली तर एक ग्रंथच होईल. मी कांहीं निवडक देतों. एखादा तरुण इंग्लंडला गेला तर तो दारू प्यायला, रेस खेळायला आणि मुष्टियुद्ध करायला शिकतो. इंग्लंडमधील शिक्षणाचीं हीं वैशिष्ट्यें आहेत. इंग्लंडमधील व युरोपांतील इतर देशांतील शिक्षणाची परिस्थिति पुढीलप्रमाणें आहे. युरोपांतील ऐश्वर्याची व उधळेपणाची आवड त्याच्या मनांत तयार होते व आपल्या देशांतील साध्या जीवनाचा त्याला तिरस्कार वाटूं लागतो. युरोपांतील उच्चवर्गीयांच्या प्रतिष्ठित जीवनाची त्याच्या मनावर छाप पडते व मग त्याच्या स्वतःच्या देशांत असलेल्या गरीब-श्रीमंतांतील समानतेचा त्याला तिटकारा वाटतो; उच्चवर्ग किंवा राजवंश ह्यांच्याबद्दल त्याच्या मनांत सहानूभुति निर्माण होते, त्याला कधींहि उपयोगी न पडणाऱ्या परकीयांशीं त्याची मैत्री होते व ज्या वयांत व मनोवस्थेंत त्याला आपल्या देशबांधवांशीं चिरकाल मैत्रीचे व निष्ठेचे संबंध प्रस्थापित करतां येतात तो काळ निघून जातो. मानवजातीला असलेल्या सर्वांत प्रबल विकाराला, त्याच्या स्वतःच्या व इतरांच्या सुखाचा नाश करणाऱ्या स्त्रीच्या मोहाला तो बळी पडतो किंवा वेश्यांच्या नादीं लागून स्वतःची प्रकृति खराब करून घेतो, आणि ह्या दोन्ही संवयींमुळें वैवाहिक निष्ठा सभ्य गृहस्थास न शोभणारी व सुखास पोषक नसते असें समजूं लागतो. युरोपांतील स्त्रियांचे भडक व उत्तान पोषाख त्याला आठवतात आणि त्याच्या स्वतःच्या देशांतील साध्या, प्रेमळ स्त्रियांबद्दल त्याला तीव्र नावड वाटूं लागते. आपल्या आयुष्यांतील पहिल्या सुखाचे क्षण जेथें त्याला मिळतात, त्या स्थळांची सुखद स्मृति त्याच्या मनांत रेंगाळत राहाते व तो आपल्या देशाला परत येतो तो परका बनून! आपली आर्थिक स्थिति चांगली ठेवण्यासाठीं घरांत कराव्या लागणाऱ्या काटकसरीची त्याला कल्पना नसते. आपली मातृभाषा तो एखाद्या परदेशी माणसासारखा बोलतो व लिहितो. त्यामुळें स्वतंत्र देशांत आपल्या मायभाषेंत आवेशयुक्त लेखन किंवा वक्तृत्व करणाऱ्यांना समाजांत जें प्रतिष्ठेचें स्थान मिळतें, त्याला

तो मुकतो. मी तुम्हांला सांगतों कीं, लेखनांतील किंवा भाषणांतील शैली ही लहान वयांतच तयार होते. कारण त्या वयांत कल्पनाशक्ति तजेल असते, मनावर कायम स्वरूपाचे संस्कार होतात. ज्याच्या आयुष्याच्या पंधरापासून वीस वर्षांपर्यंतचा काळ आपल्या मायदेशाबाहेर, जेथें त्याची मातृभाषा बोलली जात नाहीं, अशा परदेशांत गेला आहे व तरीहि जो आपली मातृभाषा डौलदार शैलीनें लिहूं किंवा बोलूं शकतो, असा एकहि मनुष्य मीं पाहिलेला नाहीं. ज्याला दोन्ही भाषांत निर्दोष लेखन करतां येतें असें एकहि उदाहरण नाहीं. त्याच्या तारुण्यांत जी भाषा सर्वांत जास्त परिचित असेल ती त्याची मातृभाषा होते. तेव्हां मला असें वाटतें कीं, युरोपांत शिक्षणासाठीं येणाऱ्या अमेरिकन तरुणाचें ज्ञान, चारित्र्य, प्रकृति, चांगल्या संवयी आणि त्याचें सुख ह्या बाबतींत नुकसान होतें. असें नुकसान होत असावें असा संशय मी युरोपांत येण्यापूर्वी मला होता; पण येथें आल्यापासून मी जें पाहातों आहें आणि ऐकतों आहें, त्यावरून मला वाटत होतें त्यापेक्षां हे परिणाम अधिक गंभीर असल्याचें सिद्ध झालें आहे. आपली नजर अमेरिकेवर टाका : सर्वांत विद्वान, सर्वोत्तम वक्ते, ज्यांच्यावर देशबंधूंचें प्रेम व विश्वास आहे व ज्यांना त्यांनीं उच्चस्थानीं मानलें आहे असे लोक कोण आहेत ? ज्यांचें शिक्षण अमेरिकन जनतेंतच झालेलें आहे, ज्यांचे शिष्टाचार, संवयी, नीतिमत्ता हीं अमेरिकन जनतेच्या शिष्टाचारांशीं, संवयींशीं, नीतिमत्तेशीं एकरूप झालेलीं आहेत, अशींच हीं माणसें आहेत.

## लोकप्रिय शिक्षणांतच माणसाचें सुख आहे

### (सी. सी. ब्लाचली ह्यांस, १८२२)

परिस्थिति सुधारण्यासाठीं, सदाचारांचें महत्त्व पटविण्यासाठीं आणि मानवी सुखांत भर टाकण्यासाठीं प्रकाश आणि ज्ञान सर्वत्र पसरविणें हाच एक उपाय आहे, असें मी मानतों. प्रत्येक झाडाला फळें येतील किंवा प्रत्येक वनस्पतीपासून अन्न मिळेल अशी अपेक्षा ठेवणें जसें व्यर्थ आहे, तसेंच कुठल्याहि मार्गानें प्रत्येक माणूस सदाचारी बनेल ही अपेक्षाहि व्यर्थ आहे. कांटेरी झुडुपांचें रूपांतर कधीं लता-वेलींत होणार नाहीं; पण संस्कारांनीं

बोचकपणा कमी करतां येईल व त्यांच्यांत सुधारणा करून तीं उपयोगी बनवितां येतील. मानवी समाजांत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून जे प्रयत्न आज होत आहेत, त्यांमुळें मानवी वंशाच्या सुखांत भरपूर भर पडेल असें मला वाटतें. ही प्रगति अनंतकाल होत राहिली नाहीं तरी अमर्याद होत राहील.

* * *

: १३ :

# वृत्तपत्रें

## स्वतंत्र वृत्तपत्रें : जनतेच्या स्वातंत्र्याचे एकमेव रक्षक

(कॅरिंग्टन ह्यांस, १७८७)

विचारांतीं माझें असें मत झालें आहे कीं, सुबुद्ध जनता हेंच सर्वोत्कृष्ट सैन्य आहे. एखाद्या क्षणीं जनता आपला मार्ग सोडून गेली तरी लौकर ती चूक ती सुधारते. राज्यप्रमुखांच्या वागणुकीची परीक्षक जनता हीच आहे, आणि जनतेकडून झालेल्या चुकांमुळेंहि राज्यकर्त्यांना आपल्या शासनसंस्थेच्या तत्त्वांनुसार चालण्याची आवश्यकता पटते. जनतेच्या चुकांबद्दल तिला कडक शासन करणें म्हणजे सार्वजनिक स्वातंत्र्याच्या रक्षणाचा एकमेव मार्ग दडपून टाकणें होय. जनतेच्या हातून अस्वाभाविक वागणूक होऊं नये, ह्यासाठीं वृत्तपत्रांतून राज्यव्यवस्थेबद्दल तिला पूर्ण माहिती देणें व वृत्तपत्रें समाजांतील जास्तींत जास्त व्यक्तींच्या हातीं जातील असा प्रयत्न करणें हा मार्ग आहे. जनमतावर

आपली शासनव्यवस्था आधारलेली असल्यामुळें जनमत बरोबर असावें अशी खबरदारी आपण सर्वांत प्रथम घेतली पाहिजे. मला जर कोणी विचारलें कीं, तूं वृत्तपत्रांशिवाय सरकार किंवा सरकारशिवाय वृत्तपत्रें, ह्यांतलें काय पसंत करशील, तर मी ताबडतोब म्हणेन कीं मला सरकार नसलें तरी चालेल; पण वृत्तपत्रें द्या. माझें म्हणणें असें आहे कीं, प्रत्येक मनुष्यास वृत्तपत्र मिळावें व त्याला तें वाचतां यावें. जे समाज (अमेरिकेंतील रेड इंडियन समाजाप्रमाणें) कुठल्याहि शासनसंस्थेशिवाय जगतात त्या समाजांत, युरोपांतील शासनसंस्थेखालीं जगणाऱ्या समाजापेक्षां, अधिक सौख्य आहे अशी माझी खात्री आहे. प्रथम उल्लेख केलेल्या समाजांत कायद्यांचें कार्य जनमत करतें व कायदा जसें चारित्र्याचें प्रभावी रक्षण करतो, तसेंच जनमतहि करतें. युरोपांतील समाजांत, शासनाच्या नांवाखालीं दोन वर्ग पाडण्यांत आले आहेत.– एक लांडग्यांचा व दुसरा शेळ्यांचा. हें सांगण्यांत मी कांहीं अतिरेक करीत नाहीं. युरोपचें हें सत्यदर्शन आहे. म्हणून आपल्या जनतेचें स्वातंत्र्यप्रेम हा मोलाचा ठेवा माना आणि तिची जिज्ञासा जागृत ठेवा. त्यांच्या चुकांबद्दल त्यांना कडक शासन करूं नका; पण त्यांना ज्ञान देऊन त्यांचीं मनें आपल्या बाजूला वळवून घ्या. सार्वजनिक कारभाराकडे जनता लक्ष देईनाशी झाली तर तुम्ही व मी, कॅाँग्रेस व विधानसभा, न्यायाधीश आणि राज्यपाल—सारे लांडगे होऊं. कांहीं व्यक्तिगत अपवाद असले तरी तो आपला सर्वसाधारण स्वभावधर्म आहे. स्वबांधवाला गिळणारा मनुष्य हा एकच प्राणी आहे, असें अनुभव सांगतो; कारण युरोपांतील सरकारांच्या बाबतींत आणि तेथें श्रीमंत गरीबांची जी शिकार करीत आहेत, ती पाहून मला सौम्य शब्द वापरतां येत नाहींत.

**( वॉशिंग्टन ह्यांस, १७९२ )**

प्रत्येक सरकारला टीकाकार असावेत आणि जेथें वृत्तपत्रस्वातंत्र्य असेल तेथें ज्याला टीकाकार नाहीं, असें सरकार राहाणारहि नाहीं. सरकार जर सदाचारी असेल तर योग्य टीकेच्या हल्ल्याला तोंड देऊन आपला बचाव करण्याच्या बाबतींत त्याला भीति वाटूं नये. धर्म, कायदा किंवा राजकारण ह्यांत सत्य बाहेर आणण्यासाठीं निसर्गानें टीकेखेरीज दुसरा कुठलाहि मार्ग मनुष्याला दिलेला नाहीं.

## वृत्तपत्रस्वातंत्र्य हा मनुष्यजातीनें दडपशाहीवर मिळविलेला विजय होय

### ( व्हार्जिनिया आणि केंटकी ठराव, १७९९ * )

सार्वजनिक कार्य करणाऱ्या सर्व प्रकारच्या व्यक्तींच्या लायकीबद्दल व कृत्यांबद्दल लिहिण्यांत वृत्तपत्रांनीं जें स्वातंत्र्य घेतलें तें नेहमींच्या कायद्याच्या कक्षेंत काटोकाट बसण्यासारखें नव्हतें. . .प्रत्येक गोष्टीचा योग्य उपयोग करतांना कांहीं प्रमाणांत दुरुपयोगहि होणें अटळ आहे व हा नियम इतर कुठल्याहि क्षेत्रांपेक्षां वृत्तपत्रांना अधिक लागू पडतो. घटक राज्यांनीं अवलंबिलेल्या मार्गांवरून असें स्पष्ट होतें कीं,सबंध वृक्षाची काटछाट करून, त्याचीं फळें देण्याची शक्ति कमी करण्यापेक्षां त्यावरील बांडगुळें फोंफावलीं तरी चालतील असें त्यांनीं ठरविलें आहे. वृत्तपत्रांनीं स्वातंत्र्याचे केलेले दुरुपयोग माहीत असूनहि,जगांतील दुष्कृत्यें व जुलूम ह्यांच्यावर सुविचार आणि मानवाबद्दलची सहानुभूति ह्यांनीं मिळविलेल्या विजयांचें श्रेय कृतज्ञतापूर्वक वृत्तपत्रांनाच दिलें पाहिजे, हें ज्यांना माहीत आहे आणि वृत्तपत्रांच्या साह्यानेंच अमेरिकेनें स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपलें स्थान मिळविलें व त्यांच्याच साह्यानें आपल्या सुखाला शुभदायक ठरलेली राजकीय घडी बसविली ह्याची ज्यांना जाणीव आहे, त्यांना घटक राज्यांच्या ह्या धोरणांतील शहाणपणाबद्दल शंका राहाणार नाहीं.

## पण वृत्तपत्रें चिथावणीस मदत करतात

### ( एल्ब्रिज गेरी ह्यांस, १८०१ )

अनेक भावनांचें मिश्रण करणें वृत्तपत्रांना फायद्याचें वाटत नाहीं. धर्मोपदेशकांप्रमाणें जनतेंत औत्सुक्य निर्माण करून व अनेक पंथ प्रस्थापून तीं आपलें अस्तित्व टिकवून धरतात. राजकारणांतील किंवा धार्मिक विषयांतील निरनिराळ्या मतांच्या संघर्षामुळेंच आपण वृत्तपत्रांकडे आकर्षित होतों व आपली ही संघर्षाची भूक भागविणाऱ्यांना मोकळ्या हातानें

---

* ह्यांतला कांहीं भाग मॅडिसननें लिहिला आहे.

पैसे देतों......तेव्हां वृत्तपत्रें आपल्यांतील मतैक्य आणि शांतता टिकू देणार नाहींत. तसें झालें तर त्यांचा आपल्याला कांहीं उपयोग राहाणार नाहीं व मुद्रकांना छापखाने बंद करून नांगर हातीं धरावे लागतील.

**( पिक्टेट ह्यांस, १८०३ )**

कुठल्याहि सुसंस्कृत देशांत आजवर घेतला गेला नसेल एवढा वृत्तपत्र-स्वातंत्र्याचा गैरफायदा येथें घेतला गेला आहे. पण वृत्तपत्रांचा योग्य उपयोग व दुरुपयोग ह्यांना विभागणारी रेषा ओढणें फार कठीण असल्यानें, सत्य कोणतें व असत्य कोणतें हें ठरविण्याचें कार्य न्यायधीशांच्या हातीं देण्याऐवजीं जनतेवरच सोंपविणें आपल्याला अधिक चांगलें वाटेल आणि आतांपर्यंत जनतेनें हें कार्य आश्चर्य वाटण्याइतकें बरोबर केलें आहे.

**( जज टायलर ह्यांस, १८०४ : N. Y. Pub. Lib. MS. Ill, 334 )**

मनुष्याची वागणूक सुविचार आणि सत्य ह्यांच्यावरच आधारलेली असावी हें तत्त्व प्रस्थापित करण्यासाठीं आपण जो लक्षवेधक प्रयोग करीत आहों, त्यांच्यासारखा प्रयोग क्वचित्‌च झाला असेल.तेव्हां माणसाला सत्याप्रत नेणारे सर्व मार्ग आपण उघडे ठेवले पाहिजेत. त्यांतला आजपर्यंत सर्वांत परिणामकारक ठरलेला मार्ग म्हणजे वृत्तपत्रस्वातंत्र्य. आपल्या कृत्यांची चौकशी होण्याची भीति ज्यांना वाटते, ते म्हणूनच प्रथम वृत्तपत्रस्वातंत्र्य दाबून टाकतात. त्या स्वातंत्र्याचे दुरुपयोग झाले असतांहि लोकांनीं ते ज्या निर्धारानें सहन केले व सत्य व असत्य ह्यांतील भेद ज्या जाणतेपणानें ओळखला तो निर्धार व जाणतेपणा लक्षांत घेतला तर सत्य व असत्य दोन्हीहि ऐकून त्यावर बिनचूक निर्णय घेण्याबाबत त्यांच्यावर निश्चितपणें विश्वास टाकावयास हरकत नाहीं हें स्पष्ट झालें आहे. त्यांच्या मनावर दडपण टाकणें किंवा संपत्तीचा नि मोठेपणाचा देखावा करून त्यांचे डोळे दिपवणें ह्याचीहि फारशी आवश्यकता नाहीं. उलट, अशा अस्वाभाविक साधनांचा उपयोग करण्याऐवजीं, त्यांच्या विचारबुद्धीचा आणि प्रत्येक घटनेचा सर्वसाधारण व्यवहारबुद्धींतून अर्थ लावण्याच्या गुणाचा आदर करणें हा अधिक खात्रीचा उपाय होय.

## वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या दुरुपयोगामुळें वाईट वाटतें; पण तें केलें पाहिजे.

(दुसरें उद्‌घाटन, ४, मार्च १८०५)

वृत्तपत्रांच्या तोफखान्यानें आपल्याविरुद्ध भडिमार सुरू केला असून, त्यांच्या बदफैली मनांत जें कांहीं येईल व जें कांहीं छापतां येईल त्याचा ते मारा करीत आहेत. स्वातंत्र्यासाठीं व शास्त्रांच्या प्रसारासाठीं आवश्यक असलेल्या या संस्थेची ही अधोगति पाहून वाटतें कीं, यामुळें वृत्तपत्रांची उपयुक्तता कमी होते व त्यांच्या सुरक्षिततेस धोका येतो. खोटें व बदनामकारक लिखाण करण्याविरुद्ध अनेक घटक राज्यांत अस्तित्वांत असलेल्या कायद्यांच्या आधारें अशा वृत्तपत्रांना शिक्षा करून सुधारतां आलें असतें; परंतु सरकारी अधिकाऱ्यांना जरुरीचीं कामें असल्यानें तसें करावयास वेळ नाहीं व म्हणून ह्या वृत्तपत्रांना जनतेच्या रागाची शिक्षा भोगण्यासाठीं मोकळें सोडण्यांत आलें आहे.

शिवाय त्यामुळें चर्चास्वातंत्र्य दिलें तर राजसत्तेचा पाठिंबा नसतांहि, सत्याचें रक्षण आणि प्रचार होऊं शकतात कीं नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं आणि एखादें सरकार, त्याच्या राज्यघटनेंतील तत्त्वांना ईर्षेनें आणि शुद्ध मार्गांनीं एकनिष्ठ राहून वागत असतांना, आणि जगापासून झांकून टाकावें असें एकहि कृष्णकृत्य करीत नसतांना, खोट्या आरोपांच्या आणि बदनामीच्या माऱ्यानें नष्ट होऊं शकतें कीं काय हें पहाण्यासाठीं हा प्रयोग योग्य मार्गांनीं पूर्णपणें करून पहाण्यांत यावा. ही गोष्टहि जगाचें लक्ष वेधून घेण्यासारखी आहे. हा प्रयोग करून पाहिला. जें झालें तें तुम्हीं पाहिलेंच आहे. शांत वृत्तीनें, मनावर ताबा ठेवून, आमच्या नागरिक बंधूंनींहि पाहिलें आहे. हे अत्याचार कोठून केले गेले तेंहि त्यांनीं पाहिलें आहे. आपल्या सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांनीं पाठिंबा दिला आणि जेव्हां राज्यघटनेनें त्यांना निवडणुकीच्या मार्गानें आपला निर्णय घेण्याचें आवाहन केलें, तेव्हां त्यांनीं आपला निर्णय जाहीर केला. त्यांच्या निर्णयामुळें ज्यांनीं त्यांची सेवा केली होती, त्यांचा बहुमान झाला आणि मनुष्य

आपले व्यवहार चालविण्यास समर्थ आहे असें मानणाऱ्या त्यांच्या मित्राला त्या निर्णयामुळें समाधान वाटलें.

ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, खोटें व बदनामीकारक लिखाण प्रसिद्ध करणाऱ्यांविरुद्ध इलाज करण्यासाठीं घटक राज्यांनीं जे कायदे केले आहेत, त्यांची अंमलबजावणी होऊं नये; ज्याला हें करण्यासाठीं वेळ असेल, त्यानें कायद्याच्या शक्तीचा वापर करून ह्या दुरुपयोगांना आळा घालून ते सुधारल्यास तें त्याचें कृत्य म्हणजे सामाजिक नीति व शांतता ह्यांच्या रक्षणाच्या दृष्टीनें समाजसेवाच ठरेल. पण ह्या प्रयोगामुळें हेंहि स्पष्ट झालें आहे कीं, जर वृत्तपत्रें सत्याला धरून लिहितील तर त्यांच्यावर कायद्याचें नियंत्रण ठेवणें अनावश्यक ठरेल व जेव्हां असत्याच्या आधारावर मतप्रदर्शन केलें जाईल तेव्हां दोन्ही बाजूंचें म्हणणें ऐकून घेऊन, जनमत आपला निर्णय देईल व असत्यावर आधारलेलीं मतें सुधारील. ह्या उपायाखेरीज वृत्तपत्रांचें अमर्याद स्वातंत्र्य व त्या स्वातंत्र्याचा बदफैली उपयोग ह्यांना एकमेकांपासून विभागणारी दुसरी रेषा आंखतां येणार नाहीं. ह्यांतूनहि जर कांहीं दुष्कृत्यें सुटलीं तर जनमताकडून होणाऱ्या तपासणीच्या मार्गानेंच हा उपाय अधिक प्रभावी केला पाहिजे.

## (टी. वोर्टमन ह्यांस, १८१३)

मी जर एखाद्या वृत्तपत्राचा प्रकाशक असतों तर त्यांतील मजकुराची 'परराष्ट्रीय,' 'राष्ट्रीय' इत्यादि विषयांत विभागणी करावयाच्याऐवजीं मी पुढीलप्रमाणें विभागणी केली असती : (१) सत्य (२) संभवनीय (३) दुजोरा मिळत नाहीं. (४) असत्य..... आजकाल वृत्तपत्रांतील मजकुराचा आधार देऊन एखादें सत्य सांगणें ही बदनामीच ठरते. आणि धादांत खोटें लिहून, आपल्या देशांतील वृत्तपत्रांनीं स्वतःच्या उपयोगितेचा इतका नाश केला आहे कीं, बोनापार्टनें शोधून काढलेलीं सर्व बंधनें एकत्र केलीं असतीं तरी त्यांचा वाईट परिणाम झाला नसता.

* * *

: १४ :

## अल्पसंख्य नीग्रो

## गुलामगिरीचे गुलमांच्या मालकावर होणारे दुष्परिणाम

( Notes on Virginia, query 18 )

मालक व त्याचा गुलाम ह्यांच्यांतले संबंध म्हणजे उसळणाऱ्या विकारांचा सतत वापर करणें, एकानें दुसऱ्यावर निर्लज्ज जुलूम करणें व त्या जुलुमापुढें मोठ्या नामुष्कीनें दुसऱ्यानें नमणें. आमचीं मुलें हें पाहातात व त्याचें अनुकरण करावयास शिकतात; कारण मनुष्य हा अनुकरणशील प्राणी आहे. त्याच्या ह्या प्रकृतिधर्मांमुळेंच त्याला मिळणारें शिक्षण तो आत्मसात् करतो. दुसरें जें कांहीं करीत असेल तें करण्यास शिकण्यांत पाळण्यापासून थडग्यापर्यंतचें त्याचें आयुष्य जातें. दुसऱ्याबद्दल सहानुभूति वाटत नसल्यानें किंवा आत्मप्रेमांतहि तशी प्रवृत्ति त्यांच्यांत नसल्यानें, पालकाला आपल्या गुलामावरील राग आंवरतां येत नसेल तर निदान आपलें मूल समोर आहे हें कारणहि मनावर संयम ठेवण्यास पुरेसें सबळ आहे; पण सर्वसाधारणतः तसें मानलें जात नाहीं. पालक आपल्या तुफानी रागाला मोकळी वाट करून देतात, मूल बघत असतें, रागाचें तें रूप आत्मसात् करतें, छोट्या गुलामांच्या सहवासांत तसेंच वागतें, आपल्या नीच विकारांना मोकळी वाट करून देतें व अशा रीतीनें जुलमी वातावरणांत वाढल्यामुळें, तें शिक्षण घेऊन रोज जुलूम करण्याची तालीम घेतल्यामुळें, त्याच्यावर त्याचा भयंकर ठसा उमटल्यावांचून रहात नाहीं.

अशा परिस्थितींत आपले शिष्टाचार व नीतिमत्ता ह्यांवर परिणाम होऊं न देणारा मनुष्य अपवादच समजावा लागेल.

आणि जो राजकारणधुरंधर नागरिकांतील निम्म्या लोकांना उरलेल्यांचे अधिकार पायदळीं तुडवूं देतो, कांहींचे जुलूम करणाऱ्यांत रूपांतर करतो, त्याला शाप तरी कोणते द्यावेत? कारण जर गुलामाला ह्या जगांत स्वतःचा देश हवा असेल तर त्याला, ज्या देशांत तो जन्मला ज्या देशाखेरीज दुसरा देश शोधला पाहिजे. कारण त्याच्या मायदेशांत तो दुसऱ्यासाठीं श्रम करीत जगतो, त्या देशांत त्याला त्याच्या नैसर्गिक वृत्ती बंधनांत जखडून ठेवाव्या लागतात; त्या देशाला सोडून त्यानें दुसरा देश तरी शोधला पाहिजे किंवा आपलें अपमानास्पद जिणें भविष्यकालीन सर्व पिढ्यांनाहि जगायला लावलें पाहिजे.

जनतेचा नैतिक अधःपात जेव्हां होतो तेव्हां तिची श्रमशक्तीहि नष्ट होते. उष्ण हवेंत ज्या माणसाला स्वतःसाठीं दुसऱ्याला राबवून घेतां येतें तो स्वतःसाठीं श्रम करणार नाहीं. हें इतकें खरें आहे कीं, गुलामांचे मालक असलेल्यांपैकीं फारच थोडे मेहेनत करतांना दिसतात. मानवी स्वातंत्र्य ही ईश्वरी देणगी आहे व ईश्वरी प्रकोपाखेरीज इतर कोणत्याहि कारणाखेरीज त्या स्वातंत्र्याचा नाश करावयाचा नाहीं ह्या तत्त्वावरील जनतेची श्रद्धा जर आपण नष्ट केली, तर त्या एकमेव श्रद्धेवर आधारलेलें राष्ट्राचें स्वातंत्र्य सुरक्षित राहील असें म्हणतां येईल का? ईश्वर न्यायी आहे आणि त्याची न्यायबुद्धि कांहीं कायमची झोंपून राहाणार नाहीं, ह्याची मला जाणीव झाली कीं, माझ्या देशाच्या भवितव्यतेच्या कल्पनेनें माझा थरकांप होतो.

## शापांतून मुक्त होण्याची आशा

### ( डी म्युनिअर ह्यांस, १७८६ )

मनुष्य हें केवढें अजस्र, केवढें अनाकलनीय यंत्र आहे! आपल्या स्वातंत्र्यासाठीं मनुष्य कष्ट, दुष्काळ, चाबकाचे फटकारे, तुरुंगवास आणि प्रत्यक्ष मरणहि स्वीकारतो आणि दुसऱ्याच क्षणाला ह्या सर्व दिव्यांतून ज्या उद्दिष्टावरील प्रेमानें तो गेला असता, त्या उद्दिष्टांची शिकवण ऐकायला

तयार न होतां, आपल्या मानवी बंधूंना अशा भीषण गुलामगिरींत टाकतो कीं, आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं तो ज्या परिस्थितीविरुद्ध बंड करून लढला त्या परिस्थितींत युगभर जगणें परवडलें, पण त्यानें स्वतः लादलेल्या गुलामगिरींत तासभर जगणें अधिक भयंकर ठरावें. पण आपण शांतपणें सर्वसत्ताधारी शक्ति आपल्या दुःखी बांधवांची गुलामगिरींतून मुक्तता करण्याची तयारी करीत आहे, अशी आशा बाळगली पाहिजे. जेव्हां त्यांच्या अश्रूंनीं माप भरून वाहूं लागेल, जेव्हां त्यांच्या कण्हण्याच्या आवाजानें आकाश झांकाळून जाईल, तेव्हां खात्रीनें न्यायाची देवता त्यांच्या दुःखामुळें जागी होईल.

## गुलाम मुक्त करण्याचे प्रयोग

### ( ई. बॅनक्रॉफ्ट ह्यांस, १७८९ )

गुलामगिरीची ज्यांना संवय लागली आहे, अशा माणसांना स्वतंत्र करणें, त्यांना सोडून देणें म्हणजे मुलांना टाकून देण्यासारखें आहे. व्हर्जिनियांतील कित्येक क्वेकर कुटुंबांनीं आपल्या गुलामांना आपल्या शेतावर कुळें म्हणून नेमलें... पण... कोणतें पीक काढायचें तें त्यांना जमिनीच्या मालकाला ठरवून द्यावें लागलें व प्रत्येक हंगामांत हवामानाप्रमाणें त्यांच्याकडून कामें करून घ्यावीं लागलीं. पण सगळ्यांत दुःखदायक घटना म्हणजे त्याला त्यांच्यावर रोज सारखी देखरेख ठेवावी लागली, सक्तीनें त्यांना काम करायला लावावें लागलें आणि त्यासाठीं चाबकानें झोडपावेंहि लागलें. गुलामगिरींत मनुष्य चोर बनला नाहीं तर त्याची नीतिमत्ता खूपच प्रबल असली पाहिजे. ज्याला स्वतःची मालमत्ता ठेवण्यास कायदा प्रतिबंध करतो, त्याला बळजबरी केल्याशिवाय मालमत्ता जमूं शकते हें मानणें फार कठीण...

ह्या प्रयोगांचे परिणाम जरी निरुत्साही करणारे असले तरी मीं अमेरिकेला परत आल्यावर पुढील प्रयोग करून पहावयाचें ठरविलें आहे. माझ्याजवळ जितके गुलाम आहेत तितके जर्मन घेऊन येण्याचा मी प्रयत्न करीन. मी प्रत्येकीं ५० एकरांचीं शेतें पाडून त्या जर्मनांना व माझ्या

गुलामांना तीं शेतें देईन व त्यांना एकत्र ठेवीन. त्यांचीं मुलें वाढतील तेव्हां त्या मुलांना मालमत्तेची संवय होईल व भविष्याचा ते विचार करतील. ते उत्तम नागरिक होतील ह्याबद्दल मला शंका नाहीं.

## नीग्रो वंशच कमी प्रतीचा आहे हें खरें आहे काय ?

**( बॅनेकर ह्यांस, १७९१ )**

आपल्या कृष्णवर्णीय बांधवांना निसर्गानें इतर वर्णीय माणसांप्रमाणेंच बुद्धि दिली आहे, व आज त्यांच्यांत दिसत असलेला बुद्धिमत्तेचा अभाव हा त्यांना आफ्रिकेंत आणि अमेरिकेंत जें लाजिरवाणें जिणें जगावें लागतें त्याचा परिणाम आहे हें सिद्ध करावयास व त्यांच्या सध्यांच्या मानसिक दुरवस्थेंतून त्यांची जास्तींत जास्त लौकर शारीरिक व मानसिक प्रगति होऊन ते योग्य दर्जाला यावेत ह्यासाठीं एखादी योजना सुरू करावयास मी खरोखरीच सर्वांत अधिक उत्सुक आहें.

* * *

: १५ :

# अल्पसंख्य अमेरिकन रेड-इंडियन्स

## स्वतंत्र व सुखी होण्याचा इंडियन्सना हक्क आहे

**( दुसरें उद्घाटन, ४ मार्च १८०५ )**

ह्या देशांतील आदिवासी जनतेचा इतिहास लक्षांत घेऊन त्यांच्याकडे मी सहानुभूतीनें पाहातों. मनुष्याचे गुण आणि हक्क निसर्गानें त्यांनाहि दिले आहेत. त्यांना स्वातंत्र्य अतिशय प्रिय आहे. ज्या देशांत ते रहात होते,

त्यांत त्यांना कसलीहि उणीव नव्हती. आपलें जीवन निर्भयपणें जगावयास मिळावें एवढीच त्यांची इच्छा होती. इतर भागांतील लोकांचा लोंढा ह्या त्यांच्या भागांत शिरला. हा लोंढा वळवून दुसऱ्या दिशेनें पाठविण्याची ताकद त्यांच्यांत नव्हती किंवा त्याला तोंड द्यायची त्यांना संवयहि नव्हती. ते ह्या लोंढयांत सांपडून बुडून तरी गेले किंवा त्यांना त्याच्या वेगापुढें माघार घ्यावी लागली. आतां ज्या छोट्या प्रदेशांत त्यांना रहाणें भाग पाडलें आहे, तो ह्या शिकारी लोकांना अपुरा आहे. माणुसकीच्या दृष्टीनें पाहिलें तर आपण त्यांना शेती व घरेलु उद्योग शिकविले पाहिजेत. त्यांना जीवनांतलें आपलें स्थान टिकवतां येईल अशा दृष्टीनें उद्योगी बनाविलें पाहिजे आणि शरीरस्वास्थ्याबरोबरच मन व चारित्र्य ज्या समाजांत प्रकट होतात, त्या समाजांत जगण्यासाठीं त्यांची तयारी करून घेतली पाहिजे. म्हणून आपण त्यांना शेतीचीं व घरगुती कामांचीं भरपूर हत्यारें पुरविलीं आहेत, जीवनाच्या प्राथमिक गरजा कशा भागवायच्या तें शिकविण्यासाठीं आपण त्यांना शिक्षक दिले आहेत व आपल्यांतील कोणीहि त्यांच्यावर आक्रमण केलें तर त्याविरुद्ध कायद्यानें आपण त्यांना संरक्षण दिलें आहे.

पण त्यांना सुधारण्याच्या ह्या प्रयत्नांच्या मार्गांत... फार मोठे अडथळे आहेत. अशा प्रयत्नांना त्यांच्या शारीरिक संवयी, त्यांच्या वेडगळ समजुती, अज्ञान,अभिमान आणि ज्यांना त्यांच्या सांप्रत अवस्थेंत महत्त्व मिळालें आहे, पण ते सुधारले तर ज्यांचें तें महत्त्व नष्ट होईल अशी भीति वाटते अशा त्यांच्यांतील स्वार्थी व कावेबाज लोकांची शिकवणूक ह्यांना तोंड द्यावें लागतें. अशीं माणसें त्यांच्या मनांत त्यांच्या पूर्वजांनीं घालून दिलेल्या परंपरेबद्दल धार्मिक श्रद्धा तयार करतात. जें बापजाद्यांनीं केलें असेल तेंच सर्वकाळीं सर्वांनीं केलें पाहिजे अशी शिकवण देतात. विचार करणें हें चुकीचें आहे व शारीरिक, नैतिक किंवा राजकीय बाबतींत विचार करून वागणें हें धोक्याचें आहे; ईश्वरानें जसें जन्माला घातलें तसेंच राहाणें हें त्यांचें कर्तव्य आहे; अज्ञानांत सुरक्षितता आहे, ज्ञान धोक्याचें असतें, असें त्यांना शिकवितात. थोडक्यांत, मित्रांनो, त्यांच्यांत बुद्धि आणि कडवी अंधश्रद्धा ह्यांचा संघर्ष चाललेला आपल्याला पाहावयास मिळतो.

त्यांच्यांतहि तत्त्वज्ञानाचे विरोधक आहेत व त्यांना सद्यःस्थितींत बदल व्हावयास नको आहे, सुधारणेची त्यांना भीति वाटते व विचार करून विचारांनीं पटेल तसें वागण्याऐवजीं जुन्या संवयीप्रमाणें त्यांनीं वागावें म्हणून आपलें सारें कर्तृत्व हे लोक पणाला लावतात.

## रेड–इंडियन्सनीं शांततेच्या व मैत्रीच्या वातावरणांत रहावें.

### ( वुल्फ ह्यांस आणि मँडार देशाच्या लोकांना, १८०६ )

माझ्या मित्रांनो आणि मुलांनो, विशाल समुद्रापलीकडे राहाणाऱ्या जुन्या देशाचे आम्ही वंशज आहोंत; पण आम्ही व आमचे बापजादे ह्या देशांत इतकीं वर्षें राहिले आहेत कीं, तुमच्याप्रमाणेंच आमचाहि जन्म ह्या देशांच्या भूमींतून झाला आहे, असें आम्हांला वाटतें. आम्ही स्वतःला आतां त्या विशाल समुद्रापलीकडील देशाचे वंशज समजत नाहीं तर आम्ही स्वतःला आमच्या रेड बांधवांच्या कुटुंबांतलेच एक समजतों...

मी तुम्हांला सांगितलेंच कीं, तुम्ही व इतर रेड इंडियन माझीं मुलें आहांत आणि एका कुटुंबांतील भावंडें जशीं सुखासमाधानानें एकत्र राहातात तसें तुम्हीं राहावें अशी माझी इच्छा आहे. एकमेकांचें नुकसान करण्यापेक्षां शेजाऱ्यांनीं एकमेकांना मदत करणें कितीतरी चांगलें व त्यामुळें त्यांना कितीतरी सुख मिळतें. तुम्हीं एकमेकांशीं युद्धें करायचीं थांबविलींत, सर्व मानवांशीं तुम्हीं जर स्नेहाचे संबंध ठेवले, तर तुम्ही आपला सर्व वेळ स्वतःसाठीं व स्वतःच्या कुटुंबासाठीं अन्न–वस्त्र मिळविण्यांत खर्च करूं शकाल, युद्धांत तुमचे पुरुष ठार होणार नाहींत आणि रात्रीं आपले शत्रू आपल्याला ठार मारतील किंवा पळवून नेतील अशी भीति मनांत न ठेवतां सुखानें तुमचीं बायका–मुलें झोंप घेऊं शकतील. तुमची संख्या घटण्याऐवजीं वाढेल आणि तुम्हांला शांततेचें व सुबत्तेचें जीवन जगतां येईल.

## सरकारी मदत व मार्गदर्शन घेण्यासाठीं

### ( शॉनी देशाच्या प्रमुखांस, १८०७ )

जेव्हां गोरे लोक ह्या देशांत आले तेव्हां ते थोडे होते व तुम्ही खूप होतां; आतां आम्ही खूप आहों व तुम्ही

थोडे आहांत. कां ? कारण आम्ही जमिनीची मशागत करतों व आमच्या मुलाबाळांना खायला भरपूर अन्न पिकवितों. उलट तुमचीं मुलें दरवर्षी कांहीं काळ तरी भुकेलीं राहातात, त्यांना घाणेरड्या वस्तू खाव्या लागतात, तुमच्या शिकारी छावण्यांत तीं हवेंत उघड्यावर पडतात, त्यांना रोग होतात व तीं मरतात. तुमची संख्या ह्यामुळें घटत चालली आहे.

आम्ही जगतों तसें जगण्यास तुम्ही शिकूं इच्छितां. सुतार व लोहार तुम्हांला हवे आहेत. माझ्या मुलांनों, तुम्हांला ते मिळतील. तुमच्या बायका–मुलांची तुम्हांला काळजी घेतां यावी, तुमची संख्या वाढावी व तुम्हीं सुदृढ व्हावें म्हणून तुम्हांला शिक्षण देण्यासाठीं आमच्यानें करतां येईल तें सारें आम्ही करूं. आम्ही खरेच तुमचे मित्र आणि बंधू आहोंत व युद्धांत आम्ही आमचें रक्त सांडण्यास जितके नाखूष आहोंत, तितकेंच तुमचेंहि सांडण्यास आहोंत. म्हणून सर्व राष्ट्रांशीं शांततेचे संबंध ठेवून तुम्ही जगावें असें आम्ही तुम्हांला उत्तेजन देतों. म्हणजे तुमच्या बायका–मुलांचें जीवित संकटांत राहाणार नाहीं, त्यांना निर्भयपणें जगतां येईल. आपल्या बांधवांचें भलें करण्यानेंच माणसाचा बहुमान होतो, त्यांचा निःपात करण्यानें नव्हे.

## रेड इंडियन्सना शेतकरी म्हणून स्थायिक होऊं द्या

### (कॅप्टन हेन्ड्रिक, डेलावेर्स, मोहिकॉन्स

### आणि मुन्री ह्यांना, १८०८ (?))

आमच्या संख्येंत झालेल्या वाढीचें व तुमच्या संख्येंत झालेल्या घटीचें तूं जें चित्र रेखाटलेंस तें माझ्या मुला, अगदीं योग्य आहे. त्यांचीं कारणें फार स्पष्ट आहेत व त्यावरील उपाय योजणें सर्वस्वी तुमच्या हातीं आहे. हरणांच्या आणि रानटी रेड्यांच्या शिकारीवर तुम्ही जगत आलांत. आतां हे प्राणी पश्चिमेकडे हांकलले गेले. त्यांचा पाठलाग करण्यासाठीं तुम्ही किनारपट्टी विकलीत व पश्चिमेकडे गेलांत. ते प्राणी जसे दुर्मिळ होत गेले तसें तुमचें अन्न घटत गेलें. वर्षांतला कांहीं काळ तुम्हांला उपाशी राहावें लागतें व ह्या काळांत जंगलांत मिळणाऱ्या कंदमुळांखेरीज व घाण वस्तूं

खेरीज तुम्हांला कांहींहि खावयास मिळत नाहीं. अन्न थोडें व अशुद्ध मिळालें म्हणजे रोग होतात व तुमचीं मुलें मरतात व त्यामुळें फारच थोडीं मुलें मोठीं झालीं व तुमची संख्या घटली. सतत होणाऱ्या लढाया व दारूचे दुष्परिणाम ह्यांमुळेंहि तुमची संख्या कमी व्हावयास मदत झाली.

उलट, गोरीं माणसें जमिनीची मशागत करतात. गुरें, डुकरें व इतर घरगुती प्राणी पाळतात. हरणांची किंवा रानरेड्यांचीं शिकार जितकी करतां येईल त्यापेक्षां अशा पाळलेल्या प्राण्यांची संख्या कितीतरी अधिक असते. अन्नवस्त्र असल्यामुळें त्यांना खूप मुलें पोसतां येतात व त्यांची संख्या दर वीस वर्षांनीं दुप्पट होतें. कबुतरांच्या थव्यांसारखे हे नवे लोक मोठ्या संख्येनें देशांत पसरतात व ते असेच पसरत राहतील. माझ्या मुलांनों, जर आम्हांला आमची संख्या कमी करायची असती तर आम्हीं जमिनीची मशागत करणें सोडलें असतें, हरणें व रानरेडे ह्यांची शिकार केली असती आणि एकमेकांशीं सतत लढलों असतों. आम्हीं असें केलें तर आमची संख्या तुमच्याइतकी कमी होईल आणि तुम्हांला तुमची संख्या वाढवावयाची असेल तर हरिण व रानरेडा ह्यांची शिकार करण्याचें सोडून द्यावें लागेल; एकमेकांशीं शांततेंत राहावें लागेल आणि जमिनीची मशागत करावी लागेल.

तेव्हां माझ्या मुलांनों, आपली संख्या वाढविणें व आपला समाज बनविणें हें केवळ तुमच्या हातीं आहे. तेव्हां मी तुम्हांला विनवून सांगतों कीं, तुम्हांला ज्या जमिनी आहेत त्यांत प्रत्येकाला एक शेत द्या, त्याला त्या शेताला कुंपण घालूं द्या, नांगरूं द्या, त्या शेतावर उबदार घर बांधूं द्या आणि तो जेव्हां मरेल तेव्हां तें शेत त्याच्या बायकोला व मुलांना मिळूं द्या. जमिनीची मशागत कशी करावी हें शिकणें सर्वांत सोपें आहे. तुमच्या स्त्रियांना तें माहीत आहे व तुम्हांला मदत व्हावी म्हणून तुम्हांला नांगर, वखर आणि भांडीं कशीं बनवायचीं तें शिकवायला आम्ही सदैव तयार आहों. शेतकाम जर बायकांच्याऐवजीं पुरुष करतील तर बायका कुटुंबासाठीं सूत कातायला व कपडे विणायला शिकतील. अशा प्रकारें तुम्हांलाहि पुष्कळ मुलें पोसतां येतील, तुमची संख्याहि दर वीस वर्षांनीं दुप्पट होईल आणि लौकरच तुमच्या मित्रांनीं तुम्हांला दिलेली जमीन गजबजून जाईल

...एकदां तुम्हांला मालमत्ता मिळाली कीं, तिचें व माणसांचें रक्षण करण्यासाठीं व तुमच्यांतील गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठीं तुम्हांला कायदे व न्यायाधीश हवेसे वाटतील.

ह्यासाठीं आमचे कायदे चांगले आहेत, असें तुम्हांला आढळून येईल. त्या कायद्यांच्या रक्षणाखालीं जगावेंसें तुम्हांला वाटेल. तुम्ही आमच्यांत मिसळाल, आमच्या थोर संघटनांत भाग घ्याल व तुमचा–आमचा एकजिनसी समाज होईल आणि आपण सारे अमेरिकन होऊं. तुमचे–आमचे बेटी–व्यवहार होतील, तुमचें रक्त आमच्या नसांतून खेळूं लागेल आणि ह्या विशाल बेटावर आमच्याबरोबर सर्वत्र पसरेल.

* * *

: १६ :

# धर्ममार्ग

## तत्त्व

### ( डॉ. रश ह्यांस, १८०० )

त्या धर्मगुरूंना असें वाटतें कीं, माझ्या हातीं जे अधिकार दिले जातील त्यांचा उपयोग मी त्यांच्या योजनांना विरोध करण्यासाठीं करीन. आणि त्यांचा हा समज बरोबर आहे; कारण मनुष्याच्या मनावर जुलमी अत्याचार करणाऱ्या प्रत्येक प्रकाराविरुद्ध लढण्याची शपथ मी ईश्वराला साक्षी ठेवून घेतली आहे. माझ्यापासून त्यांना एवढीच भीति आहे; आणि त्यांच्या मतें ती पुरेशी आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थ...
अनुक्रम ३४५०६ वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

## (१) सहिष्णुता

## सहिष्णुतेचीं तत्त्वें

( Notes on Religion, October, 1776 (?) )

सहिष्णुतेच्या कर्तव्यांच्या कक्षा कोणत्या?

(१) चर्चच्या नियमाविरुद्ध हट्टानें वर्तन करणाऱ्याला आपल्यांत ठेवून घेण्याचें सहिष्णु वृत्तीचें बंधन कुठल्याहि चर्चवर नाहीं.

(२) दुसऱ्या धार्मिक पक्षाचा आहे, म्हणून कुठल्याहि व्यक्तीच्या सामाजिक संबंधांत तिच्याविरुद्ध मनें कलुषित करण्याचा आपल्याला हक्क नाहीं. एखाद्यानें जर सरळ मार्ग सोडण्याची चूक केली तर तें त्याचें दुर्दैव होय; त्यानें तुझें नुकसान होत नाहीं व म्हणून, तो पुढील जन्मांत दुःखी होईल असें तुला वाटतें म्हणून त्याला ह्या जन्मांत तूं शिक्षा करूं नयेस; उलट धर्मग्रंथांतील शिकवणीप्रमाणें त्याला उदार मनानें वागावयास पाहिजे.

प्रत्येक चर्च स्वतंत्र असल्यामुळें एका चर्चचा दुसरा चर्चवर अधिकार चालतो, न्यायाधीशानें तशी आज्ञा दिली असली तरी, शक्य नाहीं... कल्पना करा, कॉन्स्टॅन्टिनोपलमध्यें दोन चर्चेस्, एक आर्मिनियनांचें व दुसरें काल्विनिस्टांचें, आहेत. तर एकाचा दुसऱ्यावर अधिकार चालेल का? जें चर्च कर्मठ धर्मनिष्ठ आहे, त्याला असा अधिकार आहे असें म्हणतां येईल का? प्रत्येक चर्चला आपण कर्मठ धर्मनिष्ठ आहों असें वाटतें; पण दुसऱ्या चर्चला ही त्या चर्चची समजूत चुकीची वाटते.

आपल्या आत्म्याची काळजी घेणें हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पण समजा, एखादा आपल्या आत्म्याकडे दुर्लक्ष करीत असला तर? आणि समजा, तो आपल्या प्रकृतीची किंवा मालमत्तेची हेळसांड करीत असला तर? सरकारचा संबंध ह्यांपैकीं कशाशीं अधिक येतो? त्यानें गरीब होऊं नये किंवा आजारी पडूं नये असा कायदा न्यायधीश करील का? दुसऱ्यापासून दुखापत होऊं नये ह्यासाठीं कायदा आपलें रक्षण करतो; पण स्वतःलाच आपण दुखापत करून घ्यायची असें ठरविलें तर कायदा आपलें

रक्षण करूं शकत नाहीं. माणसांचें त्यांच्या मनाविरुद्ध प्रत्यक्ष ईश्वरहि रक्षण करूं शकत नाहीं...

माझा माल बाजारांत आणण्याची आज्ञा जर न्यायाधीशानें मला दिली तर मी तो आणीन. कारण त्याच्या हातून चूक झाली व माझा माल गेला तर त्या नुकसानीची जबाबदारी तो घेतो; पण स्वर्गांत माझें नुकसान होणार नाहीं अशी हमी तो कशी देईल ?

मी माझें आयुष्य स्वतःच्या विचारानें जगण्याऐवजीं मला मार्ग दाखविण्याचा अधिकार न्यायाधीशाला देऊं शकत नाहीं; कारण मला जसा स्वर्गाचा रस्ता माहीत नाहीं तसाच त्यालाहि तो माहीत नाहीं व मला योग्य मार्गानें जावें असें त्याला वाटणार नाहीं.

## धार्मिक स्वातंत्र्याच्या आवश्यकतेबद्दल विचार

### ( Notes on Virginia, Query 17 )

आमच्या सदसद्विवेक बुद्धीवरील आमचा हक्क आम्ही कधींच सोडला नाहीं, कधीं सोडूं शकलों नाहीं. आमच्या सद्सद्विवेकबुद्धीचा जाब आम्ही फक्त ईश्वरालाच देऊं लागतों. सरकारचे कायदेशीर अधिकार ज्या आमच्या कृत्यांपासून दुसऱ्याला दुखापत होईल अशाच कृत्यांपुरते मर्यादित आहेत. पण माझा शेजारी जर देवांची संख्या वीस आहे असें, किंवा देव अजिबात नाहींच असें म्हणाला तर त्यामुळें मला दुखापत होत नाहीं; त्यामुळें कांहीं माझा खिसा कापला जात नाहीं कीं माझा पाय मोडत नाहीं. न्यायालयांत त्याच्या म्हणण्यावर कोणी विश्वास ठेवणें शक्य नाहीं, असें कोणी म्हणणार असेल, तर मग त्याचें म्हणणें नाकारा आणि त्याला दोषी ठरवा. त्या सक्तीनें तो अधिकच बिघडेल व ढोंगी बनेल; पण सद्वचनी बनणार नाहीं. हट्टानें तो आपल्या चुकांना चिकटून बसेल, पण त्या कधींच सुधारणार नाहीं.

चुका टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे विचार व चिकित्सा. विचाराला आणि चिकित्सेला वाव द्या म्हणजे खोट्या धर्मकल्पनांची कसून परीक्षा ते घेतील व त्यांना चव्हाट्यावर आणतील व अशा प्रकारें खऱ्या धर्माला उच-

रून धरतील. चिकित्सा व विचार ह्यांचें शत्रुत्व फक्त असत्याशीं आहे. जर रोमन सरकारनें चिकित्सास्वातंत्र्य दिलें नसतें तर ख्रिश्चनधर्माला वावच मिळाला नसता. सुधारणेच्या काळीं जर चिकित्सास्वातंत्र्य दिलें नसतें तर ख्रिश्चन धर्माच्या अधःपाताला आळा बसला नसता. जर आज चिकित्सास्वातंत्र्य नाकारलें तर आज होत असलेल्या अधःपाताचें रक्षण तर होईलच; पण आणखी नव्या प्रकारें अधःपात होण्यास उत्तेजन मिळेल.

आम्हीं काय खावें आणि कोणतें औषध घ्यावें हें जर सरकारनें ठरवायचें असलें तर आज आमचे आत्मे ज्या अवस्थेंत आहेत, तीच अवस्था आमच्या शरीराची होईल. फ्रान्समध्यें एकदां उलटीचें औषध देणें किंवा अन्न म्हणून बटाटा खाणें मना करण्यांत आलें होतें. शास्त्रांचे नियम ठरवून देण्याचें कार्य जेव्हां सरकार करतें तेव्हां फ्रान्सच्या सरकारप्रमाणेंच त्याची स्थिति होते. पृथ्वी गोल आहे असें म्हटल्याबद्दल गॅलिलियोला न्यायासनासमोर खेंचण्यांत आलें; कारण पृथ्वी सपाट आहे असें सरकारनें जाहीर करून टाकलें होतें. गॅलिलियोला शपथ खाऊन आपली चूक कबूल करावयास लावण्यांत आलें. पण गॅलिलियोची चूक पुढें बरोबर ठरली आणि पृथ्वी गोल आहे असें सिद्ध झालें. डेस्कार्टेझनें असें जाहीर केलें कीं, पृथ्वी आपल्या कक्षेभोंवतीं फिरते व एक प्रचंड जलप्रवाहाचा भोंवरा तिला गति देतो. तो ज्या सरकारच्या अधिकाराखालीं राहात होता तें शहाणें होतें. हा प्रश्न मुलकी अधिकारकक्षेंत येत नसल्यानें तें शहाणें सरकार त्या प्रश्नाच्या वाटेला गेलें नाहीं; नाहींतर आपणच सरकारच्या हुकुमामुळें त्या जलप्रवाहाच्या भोंवऱ्यांत सांपडलों असतों. पुढें ह्या भोंवऱ्याच्या कल्पनेचा बुडबुडा फुटला. पुढें न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियमहि सरकारी हुकुमानें सक्तीचा करून जितका प्रस्थापित झाला असता त्यापेक्षां बुद्धीला पटल्यामुळें अधिक पक्का झाला. बुद्धि आणि प्रयोग ह्यांना वाव देण्यांत आला व त्यांच्यापुढें गैरसमजुतींनीं पळ काढला. विचार चुकीचे असले म्हणजे त्यांना सरकारी पाठिंब्याचा आधार आवश्यक वाटतो. सत्य स्वतःच्या पायांवर उभें राहूं शकतें.

तुम्ही सक्तीनें मतें बनवायला लागा; मग न्यायाधीश म्हणून कोणाला

नेमाल ?—ज्या माणसांच्या हातून चुका होतात, जीं माणसें खाजगी किंवा सार्वजनिक स्वार्थासाठीं हीन विकारांच्या आधीन होतात त्यांना. आणि मानवी विचारांची घडण सक्तीनें कां करावयाची ? सर्वांचे विचार सारखे असावेत म्हणून. पण सर्वांचे विचार एकसारखे असावेत का ? जसे सर्वांचे चेहरे किंवा सर्वांचीं शरीरें एकसारखीं असूं नयेत तसे विचारहि एकसारखे असूं नयेत. भिन्न मतें असणें हें धर्मभावनेच्या हिताचेंच आहे. जे अनेक धार्मिक पंथ आहेत ते एकमेकांवर नजर ठेवून एकमेकांची परीक्षा करीत असतात.

आणि सर्वांचे विचार एकसारखे घडविणें शक्य आहे का ? ख्रिश्चन धर्माची सुरुवात झाल्यापासून लक्षावधि निष्पाप पुरुषांना, स्त्रियांना आणि बालकांना जाळण्यांत आलें, त्यांचा छळ करण्यांत आला, त्यांना दंड करण्यांत आले, तुरुंगांत डांबून ठेवण्यांत आले; पण एकसारखे विचार घडविण्याच्या उद्दिष्टाकडे आपण एक इंचभरहि सरकूं शकलों नाही. सक्तीचा परिणाम तरी काय झाला ? अर्धें जग मूर्ख झालें व उरलेलें ढोंगी बनलें. पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र बदमाषी आणि चुका ह्यांना पाठिंबा मिळाला.

पृथ्वीच्या पाठीवर एक अब्ज लोक राहातात ह्याची जाणीव आपण ठेवूं या. धर्मांचे बहुधा एक हजार निरनिराळे प्रकार ह्या लोकांत रूढ आहेत. त्या हजारांपैकीं एक आपला आहे. त्या हजारांतला एकच प्रकार आणि तोहि आपला जर बरोबर असेल तर उरलेले नऊशेंनव्याण्णव धर्मपंथ त्या सत्याभोंवतीं आपण गोळा करावेत. पण इतकी प्रचंड संख्या असलेल्या त्या धर्मपंथांना आपण सक्तीनें एकत्र आणूं शकणार नाहीं. विचारानें त्यांना पटविणें आणि त्यांचीं मनें वळविणें हेंच मार्ग व्यवहार्य होत. ते अनुसरायचे असले तर चिकित्सास्वातंत्र्य असणें आवश्यक आहे व हें स्वातंत्र्य जर आपणच नाकारलें तर इतर त्याचा फायदा घेणार कसे ?

पण प्रत्येक घटक राज्यानें कुठल्यातरी धर्माला पाठिंबा दिला आहे, असें एक चौकस म्हणतो. पण मी म्हणतों, दोन राज्यांनीं एकाच धर्माला पाठिंबा दिलेला नाहीं... पेन्सिल्वानिया आणि न्यूयॉर्क हीं आपल्या संघराज्यांतील दोन घटक राज्यें धर्मास पाठिंबा न देतां दीर्घकाळ व्यवस्थित

चाललीं आहेत...त्यांची सतत भरभराटच होत आहे. धर्माला भरपूर पाठिंबा आहे, धर्मांच्या अनेक प्रकारांना आहे हें खरें; पण सारे चांगले आहेत ...आपल्यापेक्षां त्यांना कांहीं जास्त गुन्हेगार फांशीं द्यावे लागत नाहींत. धर्मभेदाचा उपद्रव आपल्यापेक्षां त्यांना अधिक होत नाहीं. उलट, त्यांच्यांतील गुण्यागोविंदानें राहाण्याच्या वृत्तीला दुसरी तोड नाहीं. आणि ह्याचें एकमेव कारण म्हणजे त्यांची अमर्याद सहिष्णुता. धार्मिक मतभेद मिटविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें हा होय. हा सुखाचा शोध त्यांना लागला आहे. हा प्रयोग आपणहि करून पाहूं या आणि आपल्याला शक्य आहे तोंपर्यंत जुलमी कायदे झुगारून देऊं या.

**( डुफीफ ह्यांस, १८१४ )**

कोणतीं पुस्तकें विकलीं जावींत आणि आपण कोणतीं पुस्तकें वाचावींत ह्यांचे परवाने देणारा एखादा नियंत्रक आपल्याला हवा आहे का? आणि आपल्या नागरिकांनीं असुकच धार्मिक मतें मानावींत असें कोण सांगेल? कुणाचें मोजमाप प्रमाण धरून आम्हीं आमचीं मतें लांब–आंखूड करावींत? आमचा न्यायाधीश एखादा धर्मोपदेशक होणार का आमच्यासारख्याच एखाद्या साध्या माणसानें आपले विचार प्रमाणभूत मानून आम्हीं काय वाचावें व कशावर विश्वास ठेवावा हें ठरवायचें आहे? तुम्ही विचार करूं शकतां किंवा नाहीं हें नागरिकांना विचारणें हा त्यांचा अपमान आहे आणि विचारांच्या व सत्याच्या कसोटीवर धर्म टिकणार नाहीं, असें समजणें ही धर्माची बदनामी आहे.

## व्हर्जिनियाच्या विधानसभेंत संमत झालेला धार्मिक स्वातंत्र्य प्रस्थापित करणारा कायदा

**( १७८६ )**

सर्व शक्तिमान् ईश्वरानें मनुष्याचें मन स्वतंत्र निर्माण केलें ह्याची पुरी जाणीव असल्यानें :

त्याच्यावर ह्या ऐहिक जगांतील शिक्षांनीं किंवा नागरिकी हक्कांवर मर्यादा आणून दडपण आणण्याचे प्रयत्न करणें म्हणजे ढोंगीपणा आणि नीचवृत्ति

ह्यांना जन्म देणें आणि आपलीं धर्मतत्त्वें सांगणाऱ्या प्रत्यक्ष ईश्वराच्या मार्गापासून दूर जाणें होय; कारण त्याची सत्ता मनावर आणि शरीरावर चालत असूनहि, आणि सर्वशक्तिमान् असल्यानें त्याला मनावर आणि शरीरावर सक्ति करणें शक्य असूनहि, त्यानें तसें केलें नाहीं.

मुलकी किंवा धार्मिक कायदे करणाऱ्यांनीं आणि राज्यें करणाऱ्यांनीं, त्यांच्या स्वतःच्या हातून चुका होणें शक्य असतांना आणि ते स्वतः सर्व-साधारण माणसें असतांना, दुसऱ्याच्या श्रद्धेवर अधिकार गाजविण्याचा आपल्याला हक्क आहे, असा अपवित्र समज करून घेऊन आणि आपलीं मतें आणि विचारसरणी हींच केवळ सत्य आणि बिनचूक आहेत असें समजून तीं दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करून, खोटे धर्म सर्व जगभर, सर्वकामीं प्रस्थापित केले आणि ते चालू ठेवले.

ज्या तत्त्वांवर माणसाचा विश्वास नाहीं, त्या तत्त्वांचा प्रसार करण्यासाठीं त्याला सक्तीनें पैसे द्यावयास लावणें म्हणजे जुलूम करणें आणि पाप करणें होय.

एवढेंच नव्हे, तर त्याच्या स्वतःच्या धर्मपंथांतील एखाद्या विशिष्ट धर्मगुरूला आर्थिक मदत करण्याची त्याच्यावर सक्ति करणें म्हणजे ज्या धर्मोपदेशकाचें शील तो आदर्श मानतो व सदाचाराकडे प्रवृत्त करण्याची ज्याची शक्ति परिणामकारक आहे असें त्याला वाटतें, त्या धर्मोपदेशकाला आर्थिक मदत करण्याचें त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेणें होय, आणि धर्मकार्य करणाऱ्यांना, त्यांची वागणूक पसंत असल्यानें मिळणारें आणि त्यांनीं मानवजातीला ज्ञान देण्यासाठीं मनापासून आणि सतत कष्ट करावे म्हणून त्यांना अधिक उत्तेजन देणारें व्यवहारी पारितोषिक त्यांच्या-पासून हिरावून घेतल्यासारखें होईल.

आमचीं धार्मिक मतें जशीं शास्त्र किंवा भूमिती ह्यांवर आधारलेलीं नाहींत,तसेच आमचे नागरिकी हक्कहि आमच्या धार्मिक मतांवर आधारलेले नाहींत.

म्हणून अमकें धार्मिक मत स्वीकारल्याशिवाय किंवा अमक्या धार्मिक मताचा त्याग केल्याशिवाय विश्वासाचा किंवा वेतनाचा लाभ ज्यांत होतो,

अशा अधिकारांच्या जागांवर काम करण्यास मिळणार नाहीं असा निर्बंध नागरिकांवर घालणें म्हणजे इतर नागरिकांप्रमाणेंच त्याचा त्या सवलतीवर व लाभावर हक्क आहे, तो त्याच्यापासून हिरावून घेणें होय.

जे त्या धर्माचें अनुयायित्व बाह्यात्कारी पत्करतात, आचारतात, अशांना ऐहिक मानाच्या व धनलाभाच्या जागांच्या मक्तेदारीची लांच दिल्यानें, ज्या धर्माला उत्तेजन देण्याचा उद्देश असतो त्याचीं तत्त्वेंच भ्रष्ट होतात.

आणि ज्यांना अशा लाभाचा मोह आंवरतां येत नाहीं ते गुन्हेगार आहेत हें जरी खरें असलें तरी त्यांना आकर्षित करण्यासाठीं त्यांच्यासमोर आमिषें धरणारेहि निर्दोष नव्हेत.

कांहीं तत्त्वांचा कल वाईट आहे अशा समजुतीनें आपल्या अधिकारांचें अतिक्रमण करून वैचारिक क्षेत्रांत शिरणाऱ्या व तत्त्वप्रसारावर किंवा आचरणांवर निर्बंध घालणाऱ्या न्यायधीशाचें कृत्य सहन करावें हें म्हणणें तर्कदुष्ट आहे व त्यामुळें धार्मिक स्वातंत्र्य तावडतोब व पूर्णपणें नष्ट होतें; कारण तो न्यायाधीश अशा वृत्तीचा असल्यामुळें तो आपल्या मतांच्या आधारावरच न्याय देईल व त्याच्या मतांशीं जुळणाऱ्या भावना तो स्वीकारील व न जुळणाऱ्या भावनांना ती दोषी ठरवील.

जेव्हां तत्त्वाचें रूपांतर शांततेचा व सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या कृत्यांत होतें, तेव्हां सरकार आणि सरकारी अधिकारी ह्यांनीं योग्य कारणा-णासाठीं हस्तक्षेप करण्याची वेळ येऊन ठेपते.

आणि अखेरीस सत्य थोर असतें आणि कोणाचा हस्तक्षेप न झाला तर तें टिकून राहतें; चुकांचा मुकाबला करणारें सत्य हें योग्य आणि प्रभावी हत्यार आहे आणि जर मनुष्यानें हस्तक्षेप करून सत्याचीं नैसर्गिक शस्त्रास्त्रें, चर्चा व वादस्वातंत्र्य, हिरावून घेतलीं नाहींत तर सत्याला असत्याशीं होण्याऱ्या संघर्षात कसलीच भीति वाटावयाचें कारण नाहीं; जेव्हां असत्याचें खरें रूप दाखविण्याचें स्वातंत्र्य असतें तेव्हां असत्य धोका देऊं शकत नाहीं.

**त्यामुळें जनरल असेंब्ली असा कायदा करीत आहे कीं,** कुठल्याहि माणसावर मंदिरांत जाण्याची किंवा धार्मिक पूजा, पूजा-

स्थानें किंवा धर्मगुरु ह्यांना मदत करण्याची सक्ति करण्यांत येणार नाहीं, किंवा त्याच्या धार्मिक मतांमुळें किंवा धार्मिक श्रद्धेमुळें त्याच्यावर कसलीहि सक्ति केली जाणार नाहीं, निर्बंध घातले जाणार नाहींत, त्याला मारहाण होणार नाहीं किंवा त्याच्या शरीरावर किंवा मालमत्तेवर बोजे ठेवले जाणार नाहींत; उलट, सर्व माणसांना आपले धार्मिक आचारविचार पाळण्याचें आणि धार्मिक बाबतींत चर्चा करून आपलीं मतें कायम ठेवण्याचें पूर्ण स्वातंत्र्य राहील आणि त्यामुळें त्यांचे नागरिकी हक्क कमी होणार नाहींत, वाढणार नाहींत किंवा त्यांच्यावर कसलाहि परिणाम होणार नाहीं.

ही विधानसभा जनतेनें फक्त सर्वसाधारण कायदे करण्यासाठीं निवडून दिलेली आहे. आणि आम्हांला असलेल्या अधिकारांप्रमाणेंच समान अधिकार असलेल्या, भविष्यकाळीं निवडून येणाऱ्या विधान-सभांवर आमच्या ह्या विधानसभेचा अधिकार चालणार नाहीं व त्यांच्यावर ह्या विधानसभेला निर्बंध घालतां येत नाहींत, हें स्पष्टपणें माहीत असूनहि, आणि हा कायदा बदलतां येणार नाहीं, असें म्हटलें तरी त्या म्हणण्याला कायदेशीर आधार नाहीं हें माहीत असूनहि, असें म्हणण्याचें स्वातंत्र्य आम्हांला असल्यानें, आम्ही जाहीर करतों कीं, ह्या कायद्यानें स्पष्ट केलेले हक्क हे मानवांचे नैसर्गिक हक्क आहेत आणि हा हा कायदा सम्मत झाल्यानंतर, ह्या कायद्यानें केलेल्या तरतुदी रद्द करण्या-साठीं किंवा त्यांच्या मर्यादा कमी करण्यासाठीं दुसरा एखादा कायदा कर-ण्यांत आला तर तो कायदा मानवांच्या नैसर्गिक हक्कांचा भंग करणारा कायदा ठरेल.

## धार्मिक स्वातंत्र्याच्या कायद्याचें युरोपांत कौतुक

( विद (Wythe) ह्यांस, १७८६ )

आपल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या कायद्याची सर्वत्र वाहवा होत आहे. ह्या राजदरबारांत असलेल्या युरोपांतील इतर राष्ट्रांच्या वकिलांनीं आपापल्या राजांना पाठविण्यासाठीं मला ह्या कायद्याच्या प्रती मागितल्या व सध्यां छापत असलेल्या अनेक पुस्तकांत विशेषतः एनसायक्लोपिडियांत ( ज्ञान-

कोशांत ) हा पूर्ण कायदा उध्दृत करण्यांत आला आहे. ज्या येथील देशांत अज्ञान, अंधश्रद्धा, गरीबी, प्रत्येक प्रकारची शारीरिक व मानसिक दडपशाही हीं जनतेच्या मानगुटीला इतकीं पक्कीं बसलीं आहेत कीं, त्यांच्या त्या पकडींतून जनता कधींहि सुटण्याची आशा वाटत नाहीं, त्या देशांतहि ह्या कायद्यामुळें बराच चांगला परिणाम होईल असें मला वाटतें. युरोपांतील सर्व राजांनीं जर आपल्या प्रजेच्या मनावरील अज्ञान व अंधश्रद्धा ह्यांची पकड सोडवून त्यांचीं मनें मोकळीं करावयाचीं असें ठरविलें, आणि आज जेवढ्या उत्साहानें ते ह्या अपगुणांची पकड जनतेच्या मानगुटीवर बसवीत आहेत तेवढ्याच उत्साहानें ती सोडविण्याचें कार्य केलें, तरी आपल्या देशांतील सामान्य माणसें जें उच्च प्रतीचें जीवन जगत आहेत त्या पातळीला यावयास ह्या जनतेला एक हजार वर्षेंहि अपुरीं पडतील. आणि आपलीं माणसेंहि जर, मध्यें पसरलेल्या विशाल महासागरांमुळें आपल्या बापजाद्यांपासून निराळीं झालीं नसतीं व त्यांच्यापासून किंवा जुन्या जगांतील इतर समाजापासून होणाऱ्या विषबाधेपासून दूर ठेवलीं गेलीं नसतीं, तर आज माणसाच्या सहभावनेच्या छत्राखालीं त्यांनाहि सुखासमाधानानें जगतां आलें नसतें.

## श्रद्धास्वातंत्र्य

### [ एडवर्ड डाउसे ह्यांस, १८०३ ]

असहिष्णुतेपुढें शरण जाण्यासारखें एकहि कृत्य मी करणार नाहीं किंवा एकहि शब्द बोलणार नाहीं किंवा दुसऱ्यांच्या धार्मिक मतांची चौकशी करण्याचा हक्क मी कधींहि मान्य करणार नाहीं. उलट, श्रद्धास्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठीं, प्रसंगीं एखाद्या चुकीच्या मतालाहि स्वातंत्र्य देणें हें तुझें, माझें व इतर सर्वांचें कर्तव्य आहे. धार्मिक श्रद्धेचें स्थान दडपशाहीला मिळावें म्हणून जनमत बिथरविण्याचे भयंकर प्रयत्न करण्याचें धाडस जे करीत आहेत, त्यांना खालीं खेंचण्यासाठीं आपण मनानें व कृतीनें एक झालें पाहिजे.

## चर्च व सरकार ह्यांचें विभक्तीकरण :

## ‘ घृणास्पद युति ’

### ( ॲटर्नी–जनरल लिंकन ह्यांस, १८०२ )

मला मानपत्रें आवडत नाहींत, पण मी तीं टाळूं शकत नाहीं. तेव्हां त्यांना उत्तरें देण्याच्या वेळीं मी त्या प्रसंगांचा उपयोग जनतेच्या मनांत कांहीं उपयोगी सत्यें व तत्त्वें पेरण्यासाठीं करतों, त्यांच्या राजकीय विचार-सरणींत तीं रुजून व त्यांचीं मुळें खोलवर पोंचून कदाचित् मजबूत होतील. मी आतां पाठवीत असलेल्या, बाप्टिस्टांनीं मला दिलेल्या मानपत्रांत, राज्यघटनेनें दिलेल्या अधिकाराखालीं चर्च व सरकार ह्यांच्यांतील कराराचा निषेध केला आहे. माझ्या पूर्वींचे अध्यक्ष जाहीर करीत आले त्याप्रमाणें मी उपास आणि थँक्सगिव्हिंग जाहीर कां करीत नाहीं ह्याचा खुलासा करण्याची संधि मिळावी म्हणून मी बरेच दिवस वाट पहात होतों, ती ह्या अनुषंगानें मला मिळाली... न्यूइंग्लंडचे धर्मगुरु त्यामुळें दुखावले जातील ह्याची मला कल्पना आहे; पण धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्याला हे धर्मगुरु क्षमा करतील किंवा शांततेनें जगूं देतील अशी अपेक्षा करण्यांत अर्थ नाहीं.

### ( रेव्ह. सॅम्युएल मिलर ह्यांना, १८०८ )

धार्मिक संस्था, त्यांचीं तत्त्वें, शिस्त किंवा कृत्यें ह्यांच्यांत हस्तक्षेप करण्यास राज्यघटनेनें अमेरिकेच्या सरकारला प्रतिबंध केलेला आहे, असें मी समजतों...धार्मिक कृत्यें, शिस्त किंवा तत्त्वें ह्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं न्यायाधीशाला आमंत्रण पाठविणें धर्माच्या हिताचें असेल असें मला वाटत नाहीं... आपल्या विचारबुद्धीला पटेल असें प्रत्येकानें वागावें व माझी विचारबुद्धि मला असें सांगतें कीं,अमेरिकेच्या अध्यक्षाला दिलेले अधिकार मुलकी क्षेत्रांतच चालतात; आपल्या जनतेच्या धार्मिक बाबतींत मार्गदर्शन करण्याचा त्याला अधिकार नाहीं.

### ( जे. फिशबॅक ह्यांस, १८०९ )

वाचनानें, चिंतनानें आणि आजच्या काळाचा विचार करून माझी

खात्री पटली आहे कीं, ज्या नीतिकल्पनांच्या बाबतींत सर्व धर्मांचें एकमत आहे, त्याच नीतिकल्पना पाळण्यांत समाजाचें हित असतें. ( खून, चोरी, लूटमार, खोटी साक्ष देणें ही सर्वांनींच निषिद्ध ठरविलीं आहेत ) व ज्या कल्पनांच्या बाबतींत सर्व धर्मांचे मतभेद आहेत व ज्यांचा नीतिमत्तेशीं संबंध नाहीं, अशा कल्पनांच्या बाबतींत आपण हस्तक्षेप करूं नये. सर्व धर्मांत चांगलीं माणसें आहेत व एका धर्मांत जितकीं चांगलीं माणसें आहेत तितकींच दुसऱ्या धर्मांतहि आहेत. आपल्या शरीरांप्रमाणेंच मनुष्यांच्या मनांची घडण आणि त्यांच्या क्रिया ह्यांतील वैविध्य आपल्या निर्मात्यानेंच तयार केलेलीं आहेत व म्हणून समानतेच्या मोजमापाचा निर्बंध त्यांच्यावर लावणें हें कांहीं धार्मिक कर्तव्य होऊं शकत नाहीं.समाजाच्या हिताच्या दृष्टीनें सदाचार आवश्यक असल्यानें, ईश्वरानें त्याच्या कल्पना आपल्या मनावर इतक्या खोल ठसविल्या आहेत कीं, आपल्या मेंदूनें शोधलेल्या सूक्ष्म भेदांनीं त्या पुसल्या जाणार नाहींत. जीझसनें ज्या नैतिक कल्पना विषद केल्या आहेत त्या पाळण्याचें कर्तव्य आम्हां सर्वांना मान्य आहे.

( सी. क्रे. ह्यांस, १८१५ )

सरकारनें आणि धर्मानें पंथभेद माजवले, दडपशाही केली आणि जनतेच्या कमाईवर आळस पोसण्याच्या क्लृप्त्या काढल्या. सरकारजवळ सम्राट्, राजे, राजपुत्र आणि उमराव ह्यांची संघटना आहे, तर धर्माच्या संघटनेंत पोप, कार्डिनल, आर्चबिशप व बिशप, धर्मोपदेशक हे येतात. सारांश नरमांसभक्षक केवळ अमेरिकेच्या जंगलांतच आढळतात असें नव्हे, तर प्रत्येक जिवंत समाजाच्या रक्तावर ते मजेनें ताव मारीत असतात.

## ज्यूंच्या बाबतींत सहिष्णुता

( डी- ला- मॉट ह्यांस, १८२० )

मनुष्य स्वयंशासन करूं शकतो आणि धार्मिक दुहीवर आराम देणारें सर्वांत परिणामकारक मलम म्हणजे धार्मिक स्वातंत्र्य. हीं दोन समाजाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचीं सत्यें जगापुढें सिद्ध करणारा पहिला देश म्हणजे माझी मायभूमि आहे, ह्याची जाणीव माझ्या मनाचें समाधान करते...

विशेषतः ज्यूंना त्यांचे सामाजिक हक्क परत देतांना मला विशेष सुख वाटतें. लौकरच ते शास्त्रांच्या क्षेत्रांत इतरांच्या बरोबरीनें भाग घेतील व पुढें राज्यकारभारांतहि तसेंच करतील, अशी मला आशा वाटते.

## (२) ख्रिश्चन धर्मावरील टीका

### शुद्ध नीतितत्त्वांतील विकृति

### (एस्. कर्तोवल ह्यांस, १८१०)

ज्यू धर्माचें पुनरुज्जीवन करणाऱ्या थोर व्यक्तीचा मृत्यु होऊन थोडे दिवस लोटतात न लोटतात, तोंच स्वतःला त्याचे खास अनुयायी म्हणवून घेणारे त्याच्या तत्त्वांपासून च्युत झाले आणि त्यांनीं त्या तत्त्वांना विकृत रूप देऊन त्यांचें मानवांना गुलाम बनविणारें आणि त्यांच्यावर दडपशाही करणाऱ्यांना धर्म आणि सरकार ह्यांच्यांत सामर्थ्यवान् बनविणारें यंत्र बनविलें. आजपर्यंत मानवाला मिळालेलीं सर्वोत्कृष्ट नीतितत्त्वें अशुद्ध केलीं व स्वतःच्या हातीं अधिकार व संपत्ति यावी म्हणून त्यांचा कृत्रिम अर्थ लावला व त्यांचें क्षेत्र मर्यादित केलें. विचारी माणसें त्यांचीं भ्रष्ट व मूळतत्त्वांना विरोधी असलेलीं मतें स्वीकारायला तयार नसल्यानें त्यांच्याविरुद्ध हे लोक नास्तिक असल्याची ओरड करतात. वास्तविक हे लोकच जीझसनें सांगितलेल्या खऱ्या तत्त्वांच्या प्रगतीचा मार्ग रोंखतात आणि वस्तुतः ते ख्राइस्टविरोधक आहेत.

### शब्दिक गूढवाद

### (ॲडाम्स ह्यांस, १८१३)

तीन म्हणजे एक, एक म्हणजे तीन; आणि तरीहि तो एक म्हणजे तीन नव्हे, आणि ते तीन म्हणजे एक नव्हत... अशा शाब्दिक गूढावर आपला विश्वास बसला असल्याचें ढोंग आतां प्रामाणिक माणसाला करतां येत नाहीं. पण धर्मगुरूंचा धंदा, अधिकार आणि कायदा ह्या शाब्दिक गूढांत आहे. ह्या खोट्या धर्मांचें त्यांनीं पसरविलेलें कोळ्याचें जाळें झटकून टाका म्हणजे त्यांना शिकार पकडणें अशक्य होईल. मग क्वेकर्स राहातात तसें

आपण सर्व पाद्र्यांच्याशिवाय राहूं, स्वतःचे नीतिनियम स्वतः बनवूं, सदसद्विवेकबुद्धि जसा मार्ग दाखवील तसें वागूं व जें कोणालाहि कळत नाहीं व म्हणून ज्यावर कोणाचाहि विश्वास बसणें शक्य नाहीं, असें कांहींहि बोलणार नाहीं.

( डॉ. वॉटरहाउस ह्यांस, १८५१ )

जीझसनें शिकविलेलीं साधीं धर्मतत्त्वें पाद्र्यांनीं इतकीं विद्रूप केलीं आहेत व त्यांच्यावर प्लेटो, ॲरिस्टॉटल् व इतर गूढवाद्यांच्या शब्दांचीं इतकीं कलमें केलीं आहेत कीं, ते विकृत शब्द वाचणाऱ्याला, ते 'सर्मन ऑफ द माउंट' देणाऱ्या पवित्र उपदेशकाचे शब्द आहेत,अशी कल्पनाहि करवणार नाहीं. तरीहि नांवाच्या महत्त्वाची जाणीव असल्यानें,हे लोक स्वतःला ख्रिश्चन म्हणवून घेतात. खरें म्हणजे हे गूढवादी आहेत, निदान जीझसचे चेले तरी नाहींत.

## अनाकलनीय तत्त्वप्रणालि

( कॅरी ह्यांस, १८१६ : N. Y. Pub. Lib. Ms. IV 409 )

नीतितत्त्वांपासून भिन्न असलेल्या, धर्मविषयक मतप्रणालीबाबत जे शब्दप्रयोग माणसांना स्वतःला किंवा दुसऱ्या कुणालाहि कळत नाहींत व जे कळणें मानवी मनाच्या शक्तीबाहेरचें आहे, त्यासाठीं जगाच्या सुरुवातीपासून तों आजपर्यंत मनुष्यजात आपसांत भांडत, लढत, जाळपोळ व एकमेकांचा छळ करीत आली आहे. मी त्या रिंगणांत उतरणें म्हणजे वेड्यांच्या संख्येंत आणखी एकाची भर टाकणें होय.

## ज्ञानविस्ताराला होणारा विरोध शिक्षणानें नाहींसा केला पाहिजे

( व्हॅन डेर केम्प ह्यांस, १८२० )

जीझसनें शिकविलेला व स्वतः आचरलेला खरा, साधा धर्म पुन्हा एक दिवस प्रस्थापित होईल. त्याच्या मृत्यूनंतर अल्पावधींतच तो खरा धर्म गूढांत गुरफटला गेला व तेव्हांपासून सामान्य माणसाच्या नजरेपासून

लपविला गेला. ह्या कृष्णवर्णीय अभ्रपटलाचें आच्छादन भेदून नष्ट करण्या-साठीं सर्वसाधारण माणसाच्या मनाला शिक्षणानें बळकटी आणली पाहिजे.

## ( ४ ) जीझसचें चारित्र्य

### त्याची श्रेष्ठतम नीतिमत्ता

### ( डब्ल्यू. शॉर्ट ह्यांस, १८२० )

जीझसनें सांगितलेलीं सर्व तत्त्वें मला मान्य आहेत, असें समजून चालू नका. मी जडवादी आहें तर जीझस अध्यात्मवादी होता. पश्चात्तापामुळें पापांचें क्षालन होतें असें त्याचें म्हणणें, तर पाप केलें तर त्याची भरपाई करण्यासाठीं चांगलीं कृत्यें करणें आवश्यक आहे,असा माझा आग्रह असतो. पण त्याचें निष्पाप चारित्र्य, त्याच्या शुद्ध आणि श्रेष्ठतम नीतिकल्पना, त्याची अस्खलित स्फूर्तिदायक शिकवण, ती देतांना तो वापरीत असलेल्या नीतिकथांचें मनोहर सौंदर्य, ह्यांचें मला कौतुक वाटतें व कित्येकदां, खरोखरी पौर्वात्यासारखा अतिरेक करून त्याचें वर्णन करावेंसें वाटतें. ह्या माझ्या स्तुतीशीं सर्वच सहमत होतील असेंहि नाहीं. त्याच्या चरित्रकारांनीं त्याच्या तोंडीं जे उपदेश व प्रवचनें घातलीं आहेत, त्यांतील पुष्कळसें कल्पनेचें सौंदर्य आहे, त्यांतल्या नीतिकल्पना बरोबर आहेत,आणि दुसऱ्याचें हित करण्याची आल्हाद-दायक भावना त्यांत आहे; तर कांहींत इतकें अज्ञान, इतकी असंभाव्यता, इतकें असत्य, इतकें ढोंग व थोतांड आहे कीं,असे परस्परविरोधी गुण एकाच व्यक्तींत असणें शक्य नाहीं असें म्हणावेंसें वाटतें. तेव्हां मी त्या अशुद्ध धातूंतून सोनें बाजूला काढतों; जें सत्य आणि सुंदर आहे तें त्याचें आहे व जें असत्य आहे तें त्याच्या अनुयायांपैकीं मूर्खांनीं किंवा बदमाषांनीं लिहि-लेलें आहे असें समजतों. अशा भंपक व ढोंगी लोकांपैकीं पॉल हा सर्वांत मोठा ढोंगी होता व जीझसच्या तत्त्वांना भ्रष्ट करणारा पहिला मनुष्य होता.

### त्याचें मन आणि श्रद्धा

### ( डब्ल्यू. शॉर्ट ह्यांस, १८२० )

जनतेंतील अंधश्रद्धा दूर करण्याचें कार्य नेहमींच घातक असतें. धर्म आणि विचार ह्यांच्यांत जीझसला नेहमींच तारेवरची कसरत करावी लागली

आणि त्याचें पाऊल थोडें जरी डाव्या किंवा उजव्या बाजूला पडलें असतें तर ज्या अंधश्रद्धेच्या पूजकांनीं इस्रायलच्या ॲब्राहाम, इसाक व जॅकोब ह्यांच्या कुलदेवतेचें क्रूर आणि भावनाहीन असें वर्णन केलें आहे, त्या रक्त-पिपासू व स्वतःच क्रूर व भावनाहीन असलेल्यांच्या हातीं तो पडला असता. त्याला कायद्याच्या जाळ्यांत पकडण्यासाठीं ते सतत टपून बसलेलेच होते. तेव्हां हे सांपळे टाळण्यासाठीं, त्यानें तत्त्ववेत्त्यांच्या शब्दांचा गैरअर्थ लावला, चुकीचे संदर्भ दिले तर तें समर्थनीय आहे. त्यांचींच शस्त्रें वापरून त्यानें आपला बचाव केला. आपण शारीरिक दृष्टीनें प्रत्यक्ष ईश्वराचे पुत्र आहोंत असें म्हणून मानवजातीवर आपल्याला लादण्याचा जीझसचा हेतु नव्हता, अशी त्या विषयांत ज्यांना माझ्यापेक्षां जास्त कळतें त्यांच्या लिखाणावरून माझी खात्री पटली आहे. पण आपणास ईश्वरी प्रेरणा मिळाली आहे अशी त्यालाहि खात्री वाटत असल्याची शक्यता आहे. त्याच्या लहानपणापासून त्याला आत्मसात् कराव्या लागणाऱ्या ज्यू धर्माचा आधार ईश्वरी सामर्थ्याची कल्पना हाच आहे. आपल्या कल्पनेंतील कल्पना ते ईश्वरी आज्ञा म्हणून लिहून ठेवीत...आपल्या निर्मळ अंतःकरणांतील उत्साहानें प्रेरित होऊन, शिक्षण मिळालेलें नसतांहि अस्खलित बोलण्याच्या आपल्या सामर्थ्याची जाणीव होऊन, त्यानेंहि हे आपले अप्रतिम गुण ईश्वराची देणगी असल्याचें मानलें असेल. सॉक्रेटिसला जसें डेअिमन देव आपलें खास रक्षण करतो असें वाटत असे, तशीच जीझसचीहि ही समजूत असावी.

## ( ५ ) व्यक्तिगत श्रद्धा

## " ....स्वतःचा विचार करतों तेव्हां "

### ( हॉपकिन्स ह्यांस, १७८९ )

धर्म, तत्त्वज्ञान, राजकारण किंवा इतर कांहीं असो, जेव्हां जेव्हां मला स्वतःला विचार करतां येतो, तेव्हां तेव्हां एखाद्या पक्षाची किंवा गटाची विचारसरणी मी मानायला तयार नसतों व म्हणून मी स्वतः फेडरॅलिस्ट नाहीं. अशी विचारसरणी मानणें म्हणजे आपलें नैतिक स्थान आणि

स्वातंत्र्य घालविणें होय. एखाद्या पक्षाच्या आधाराशिवाय जर मला स्वर्गात जातां येणार नसेल तर मी जाणारच नाहीं.

## "मी खरा ख्रिश्चन आहें"

### ( सी. थॉम्पसन ह्यांस, १८१६ )

मी स्वतः खरा ख्रिश्चन आहें. म्हणजे जीझसच्या तत्त्वांचा मी खरा अनुयायी आहें. मला नास्तिक म्हणणाऱ्या व स्वतःला ख्रिश्चन म्हणवून घेणाऱ्या प्लेटोच्या अनुयायांपेक्षां व धर्मग्रंथांवर प्रवचनें देणाऱ्यांपेक्षां मी निराळा आहें. कारण त्या धर्मग्रंथांच्या लेखकानें जें कधीं पाहिलें नाहीं किंवा लिहिलें नाहीं तें सांगून हे लोक त्यावर आपलीं तत्त्वें आधारतात. जुन्या रहस्य-वादांतून त्यांनीं अशी अनाकलनीय पद्धत शोधून काढली आहे कीं, ज्यूंच्या मूर्तीपूजेंतून समाजाला बाहेर काढणारा जीझस स्वतः जरी ह्या पृथ्वीवर पुन्हा आला तरी, त्याला त्यांतलें कांहींहि ओळखूं येणार नाहीं.

## "धर्मगुरूंची भीति वाटत नाहीं"

### ( एच. जी. स्पाफोर्ड ह्यांस, १८१६ )

मला धर्मगुरूंची भीति वाटत नाहीं. त्यांनीं आपलें पावित्र्य दुखा-वल्याचा आव आणून रागानें, ढोंगीपणानें माझ्यावर ओरडून, स्वतः खोटें बोलून आणि माझी बदनामी करून आपल्या तोफखान्याचा मारा माझ्या-वर केला आहे; पण त्यामुळें मला एक क्षणभरहि दुःख झालें नाहीं. पौर्वात्यांपासून तो पाश्चिमात्यांपर्यंत ह्या धर्मगुरूंच्या वागणुकीचा मीं अभ्यास केला आहे. ज्यांना ते फसवतात ते किती अज्ञानी आहेत हें पाहून कमी–अधिक प्रमाणांत खबरदारीनें वागण्यापलीकडे मला ह्या लोकांच्या वाग-णुकींत कांहींच फरक दिसला नाहीं. न्यूइंग्लंडमध्यें त्यांचें वर्चस्व खूपच आहे. त्या भागांतील माणसें असामान्य धैर्य दाखवायला धजतच नाहींत.

## सत्कृत्यें करा, दुष्कृत्यांपासून दूर रहा

### ( ई. स्टाइल्स ह्यांस, १८१९. )

मी ( काल्विनिस्ट ) नाहीं. मी स्वतःच एक संप्रदाय आहें. मी ज्यू नाहीं व म्हणून त्यांचीं धर्मतत्त्वें मानीत नाहीं. त्यांची अशी श्रद्धा आहे कीं,

न्यायी ईश्वर, बापानें केलेल्या पापाची शिक्षा त्याच्या मुलांना, तिसऱ्या व चवथ्या पिढीपर्यंत देतो; त्या धर्माच्या सुधारकानेंहि ईश्वर चांगला व निर्दोष असल्याचें सांगितलें; पण ईश्वराबद्दलची कल्पना मात्र स्पष्ट केली नाहीं. तेव्हां ईश्वराची निश्चित कल्पना देण्यायोग्य आपल्याजवळ शब्द किंवा कल्पनाशक्ति नाहीं, असें त्याच्याप्रमाणेंच मीहि समजतों. आणि हें पाहिल्यावर जर आपण सर्वांनीं असें मानलें कीं, ईश्वराची व्याख्या करतां येणार नाहीं, तर मग आपण सारे एका पंथाचे, सत्कृत्यें करणारे व दुष्कृत्यें टाळणारे होऊं. त्यांचीं कुठलींहि तत्त्वें दुही माजवीत नाहींत. मानवी इतिहासांतील सर्वांत नैतिक आणि उदात्त असलेल्या व मानवांत भेद माजविण्याऐवजीं असलेले भेद दूर करणाऱ्या धर्माची तत्त्ववेत्त्यांनीं उगीचच शाब्दिक बजबजपुरी माजविली आहे. धर्मद्वेषाचा दोष मी जे आपल्याला जीझसचे धर्मोपदेशक म्हणवितात व त्याच्या साध्या शिकवणुकीवर आपल्या धर्माधर्मविवेकाचीं कलमें चढवितात, त्यांना देतों. त्यानें शिकविलेल्या औदार्याच्या मर्यादांचें उल्लंघन घडावें इतका मी कधींकधीं त्यांच्यावर संतापतों.

* * *

: १७ :

# परराष्ट्रीय संबंध

## १ युद्ध

### निसर्गतः मनुष्य हिंस्र वाटतो

(अॅडाम्स ह्यांस, १८२२)

आजच्या बातमीबद्दल सांगायचें तर युरोपांतील नरमांसभक्षक एकमेकाला खायला उठले आहेत, असें दिसतें. रशिया आणि तुर्कस्थान

ह्यांच्यांतील युद्ध म्हणजे घार आणि साप ह्यांच्यांतील संग्राम होय. ह्यांतल्या कोणी कोणाचाहि नाश केला तरी जगांतील एक विध्वंसक शक्ति कमी होईल. मनुष्यजातीचा हा भांडखोर स्वभाव एक निसर्गनियमच दिसतो व त्यानें विश्वनियमानुसार होणाऱ्या संख्यावाढीस आळा बसतो. खुराड्यांतले कोंबडे एकमेकांना ठार करतात. अस्वलें, बैल, सांबार– तेंच करतात. जंगली अवस्थेंत असलेला घोडाहि प्रत्येक लहान घोड्याला ठार मारीत असतो व जेव्हां तो त्या युद्धांत थकतो, म्हातारा होतो, तेव्हां एखादा तरुण घोडा त्याला ठार मारून त्याचा घोड्यांचा झनानखाना बळकावतो. क्वेकर धोरण हें किती चांगलें आहे, हें आपण सिद्ध करूं शकूं असा मला विश्वास वाटतो. लढवय्या-पेक्षां अन्नदाता चांगला. पृथ्वीच्या एका भागाचा हे वेडे विध्वंस करीत आहेत. त्यांचा उपयोग पृथ्वीचा दुसरा भाग सुधारण्यास होतो हें त्यांतल्या त्यांत समाधानाचें आहे. आपण सुधारणेचा मार्ग स्वीकारूं या. रशियन लोक गाईचीं शिंगें धरीत असतांना आणि तुर्की तिचें शेपूट पकडून ठेवीत असतांना आपण तिचें दूध काढूं या.

## युरोपांतील वाघ आणि सिंह

### ( डॉ. बेंजामिन रश ह्यांस, १८०३ )

युरोपांत काय भयंकर वेळ आली आहे! वाघ–सिंहांचें केवढें घनघोर हें युद्ध! सामान्य गुराढोरांनीं ह्या प्रचंड रणकंदनाकडे कसें पाहावें? कुणा-चीहि बाजू घेऊं नये हें नक्की. त्यांनीं जर एकमेकांची जुलमी शक्ति नष्ट केली तर एकाची भूमीवरील व दुसऱ्याची समुद्रावरील जुलमी शक्ति नष्ट होईल व तें पुन्हा सिद्ध होईतों जगाला कदाचित् शांतता मिळेल.

## युरोपांतील क्रौर्याची घृणा

### ( कर्नल ड्युएन ह्यांस, १८१३ )

दैनंदिन राजकारणाचा मला कंटाळा आला आहे हें खरें आहे. अर्वा-चीन काळापेक्षां प्राचीन काळाचा इतिहास वाचणें मला अधिक आवडतें. आंतरराष्ट्रीय संबंधांतील सर्व नीतितत्त्वें नष्ट झालेलीं पाहून व माझ्यावेळच्या

मेकड कावेबाजपणानंतर चॅथॅम व तुर्गोत ह्यांनीं स्थापन केलेले प्रामाणिकपणाचे व विश्वासाचे संबंध दूर सारून पुन्हा सर्व नीतिनियम धुळीला मिळविणाऱ्या लफंगेगिरीनें वर्चस्व मिळवावें, ह्याचें मला मरणप्राय दुःख होतें.

## इंग्लंड व फ्रान्स यांचा लुटारूपणा

**( जे. मॉरी ह्यांस, १८१२ )**

समुद्रावर असलेलें इंग्लंडचें वर्चस्व व जमिनीवर असलेलें फ्रान्सचें वर्चस्व हीं दोन्ही जगाची शांतता व भरभराट ह्यांचा नाश करणारीं आहेत, असें आमचें मत असून आपलीं नैतिक कर्तव्यें पार पाडण्यापुरतीच त्यांची शक्ति कमी व्हावी असें आम्हांला वाटतें. बोनापार्ट समुद्रावरील स्वातंत्र्य मिळण्यासाठीं लढतो आहे व ग्रेटब्रिटन मानवजातीच्या मुक्तीसाठीं लढत आहे, ह्या दोन्हीवरहि आमचा विश्वास नाहीं. जगांतील इतर राष्ट्रांची सत्ता, संपत्ति व साधनें आपल्या हातीं यावींत हाच ह्या दोघांचाहि हेतु आहे.

## स्वातंत्र्याची व शांततेची आशा

**( ॲडाम्स ह्यांस, १८२१ )**

ज्ञानाची व स्वातंत्र्याची प्रगति होत आहे अशी आशा हृदयांत बाळगूनच मी मरेन. शतकानुशतकें मनुष्याचें मन खग्रास ग्रहणासारखें झांकाळलेलें आपण इतिहासांत एकदां खरोखर पाहिलें आहे. हें ग्रहण उत्तरेकडून येणाऱ्या रानटी लोकांच्या टोळधाडीनें लावलें. त्यांनीं सुधारलेल्या जगांतील देश पादाक्रांत केले, तेथील राज्यकारभार बळकावले. पुन्हा असें झालें,— दक्षिणेंतील धान्य, दारू आणि तेल ह्यांचा मोह वाटून उत्तरेंतील रानटी लोकांच्या टोळधाडी जर पुन्हा ह्या संपन्न देशांत येऊन स्थायिक झाल्या,— तर मुद्रणकला आणि पुस्तकांचें वाचन ह्यांच्या द्वारेंच आपल्या मनाची पातळी आपल्याला राखतां येईल व जित समाजाचीं मनें जेत्या रानटी लोकांच्याप्रमाणें अधोगतीला पोंचण्याऐवजीं जेत्यांचींच मनें जित लोकांच्या उच्च पातळीवर आणतां येतील. आणि युरोपांतहि रानटीपणा व जुलूम ह्यांनीं जर ज्ञान आणि स्वातंत्र्य झांकाळून टाकलीं तर तेथील जनतेलाहि ज्ञान व स्वातंत्र्य ह्यांचा मार्ग हा देश दाखवील.

थोडक्यांत, ४ जुलै १७७६ रोजीं प्रज्वलित झालेल्या ज्योतीनें जगाच्या पाठीवर इतका प्रकाश पसरविला आहे कीं, जुल्मी सत्तेच्या कमजोर पुढाऱ्यांना आतां ही ज्योत विझवतां येणार नाहीं. उलट ह्या प्रकाशापुढें त्यांचें व त्यांच्या अनुयायांचें अस्तित्वच नाहींसें होईल.

## आम्हांला युद्धांत अडकायचें नाहीं

## समुद्र सोडून द्या आणि युद्धाच्या कचाट्यांतून सुटा

( Notes on Virginia, query 22 )

युद्धांत भाग घेणें हिताचें आहे, हें राष्ट्रांना पटविण्यासाठीं खोट्या गणिताचा इतका उपयोग क्वचित्‌च केला गेला असेल. एखादें शहर काबीज करण्यासाठीं, छोटासा प्रदेश मिळविण्यासाठीं, एखाद्या ठिकाणचीं झाडें तोडण्याचा हक्क मिळविण्यासाठीं किंवा एखाद्या ठिकाणीं मासे मारण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठीं दीर्घ काळ युद्ध करण्यांत जो पैसा खर्च होतो, तोच पैसा जर जें आज त्या राष्ट्राचें आहे तें सुधारण्यासाठीं, रस्ते बांधण्यासाठीं, नद्यांचे जलमार्ग मोकळे करण्यासाठीं, बंदरें बांधण्यासाठीं, कलाकौशल्यांची प्रगति करण्यासाठीं व गरीब व बेकार असणाऱ्यांना कामधंदा देण्यासाठीं खर्च झाला, तर युद्धांत लढणारे देश अधिक सामर्थ्यवान, अधिक संपन्न, अधिक सुखी होतील. आपण ह्या शहाणपणाच्या मार्गानें जाऊं असा मला विश्वास वाटतो.

आणि युद्धांत अडकून पडण्याचें प्रसंग जास्तींत जास्त टाळतां येण्यासाठीं आपण समुद्र सोडून द्यावा, कारण समुद्रावरच आपला इतर राष्ट्रांशीं संघर्ष येण्याची शक्यता आहे. आम्हांला पाहिजे असलेला माल इतरांनीं आम्हांला आणून द्यावा व आमच्या गरजा भागवून आम्हांला जें देतां येईल तें इतरांनीं आमच्याकडून घेऊन जावें. त्यामुळें युरोपांतील राष्ट्रांना आपली मालमत्ता बळकावण्याची संधीच मिळणार नाहीं व आपल्या नागरिकांना शेतीवर आपलें सर्व लक्ष केंद्रित करतां येईल. मी पुन्हा बजावतों कीं, शेतकरी हेच जगांतील सर्वांत जास्त सद्‌गुणी आणि स्वतंत्र नागरिक होत. जेव्हां शेतीवर सर्वांचें भागणार नाहीं तेव्हां समुद्रावर ते काम करूं शकतील;

पण आपल्या नागरिकांच्या संवयी लक्षांत घेतल्या तर त्यांचा व्यापाराकडे अधिक ओढा आहे. ते व्यापार करणारच. आणि कांहीं वेळां मग युद्धेंहि अटळ ठरणार. त्यांत आपल्या चुकांनीं आणि आपल्या हातून घडणाऱ्या अन्यायांनीं निर्माण होणारीं अर्धीं युद्धें टाळणें व उरलेल्या अर्ध्यांची चांगली तयारी करणें एवढेंच शहाण्या माणसांच्या हातीं आहे.

**( पेंडलटन ह्यांस, १७९९ )**

दर्यावर्दी व्यापारांत गुंतलेल्या आपल्या देशबांधवांचीं मनें जर त्यांचा त्या व्यवसायांत गुंतलेला पैसा देशांतील व्यापारांत गुंतविण्यासाठीं आपण वळवूं शकलों व अंतर्गत व्यापारांतून परदेशांना हुसकून लावून त्यांना त्याऐवजीं दर्यावरील वाहतुकीचा व्यापार करण्यास अनुकूल बनविलें; परराष्ट्रीय कचेऱ्या बंद केल्या आणि कुठल्याहि राष्ट्राचें लढाऊ जहाज आपल्या बंदरांत येऊं न दिलें तर काय बहार होईल!

## तटस्थतेसाठीं योजना

**( ई. रटलेज ह्यांस, १७९७ )**

तटस्थ देशांचें आपल्याबद्दल काय मत आहे, तें मला माहीत नाहीं; पण युद्धांत अडकलेलीं राष्ट्रें आपल्याला फारसें मानीत नाहींत. ते आपल्याला मारीत असलेल्या लाथाबुक्क्यांवरून हें स्पष्ट होतें. जर ह्या वादळांतून आपण सुरक्षितपणें बाहेर पडलों तर आपल्याला शांतता मिळेल आणि आपल्या परराष्ट्रीय संबंधाची नवी निराळी घडी बसवितां येईल. जसे प्रत्येक कृत्यामागें त्या कृत्याचे परिणाम आपोआपच येतात, तसेंच आपल्याला इतर राष्ट्रांनीं दुखविलें तर त्यांनाहि त्याची हानि पोंचली पाहिजे आणि स्वहितासाठीं त्यांनीं आपल्याशीं न्यायी वर्तन केलें पाहिजे. व्यापाराखेरीज कुठल्याहि राष्ट्रांशीं दुसरे कसलेहि संबंध आपण ठेवूं नयेत. पण हें सर्व प्रत्यक्षांत घडण्याआधीं काळ, स्वभाव, शहाणपणा व प्रसंगीं स्वहिताचा त्याग करण्याची तयारी आवश्यक आहेत, आणि हीं सर्व साधनें आपल्या हातीं कितपत येतात तें कदाचित् आपल्या मुलांच्या पिढीला पहावयास मिळेल. आपल्या आयुष्यांत आपण तें नक्कीच पाहूं शकणार नाहीं.

## युरोपांतील जाळ्यांत फसण्याचें भय

### ( डब्ल्यू. शॉर्ट ह्यांस, १८०१ )

युरोपांतील राजकारणाच्या जाळ्यांत अडकलें जाण्यासारख्या गोष्टींची आम्हांला भीति वाटते. सर्वसाधारणतः तटस्थ धोरण ठेवणेंच आमच्या हिताचें ठरेल; पण त्यासाठीं युरोपांतील कुठल्याहि गटावर आपण अवलंबून राहूं नये. त्यांचे आपसांतील हितसंबंध एकमेकांत असे गुंतलेले आहेत कीं, एखादें राष्ट्र तरी कसलें तरी आमिष दाखवून एका गटांतून दुसऱ्या गटांत वळविलें जाणार. एखाद्या खोट्या तत्त्वाला मूक सम्मति देण्यापेक्षां अशा गटांच्या जाळ्यांत अडकणें अधिक हानिकारक ठरेल.

### ( तिसरा वार्षिक संदेश, १७, ऑक्टोबर १८०३ )

युरोपांतील राष्ट्रें व त्यांच्या एकमेकांशीं असलेल्या गुंतागुंतीच्या राजकीय हितसंबंधांपासून एका विशाल महासागरानें आपल्याला वेगळें केलें असल्यानें व आपलें व त्यांचें उत्पादन व आपल्या व त्यांच्या गरजा लक्षांत घेतां, आपणांस व त्यांनाहि आपल्याशीं व्यापार करणें व मैत्रीचे संबंध ठेवणें हितकारक असल्यानें, त्यांच्यापैकीं कुठल्याहि राष्ट्राला आपल्या वाटें जाणें किंवा आपल्याला त्याच्या व्यवहारांत हस्तक्षेप करणें हिताचें ठरणार नाहीं. निसर्गानें आपल्या देशाला पृथ्वीवर जें अद्वितीय स्थान दिलें आहे, परराष्ट्रापासून दूर राहून कष्ट, शांतता आणि सुख ह्यांच्यामागें जाण्याची, सर्वांशीं मैत्रीचे संबंध ठेवण्याची व परस्परविरोधी मतांतील संघर्ष—बलाऐवजीं विचारांच्या मार्गानें सोडविण्याची जी संधि निसर्गानें आपल्याला दिली आहे, ती जर आपण फेंकून दिली तर तो मोठाच मूर्खपणा ठरेल. तेव्हां आपल्यासारख्या शासनव्यवस्थेंत, आपल्या देशानें कोणत्या मार्गानें जावें, कोणतीं मतें ठेवावींत हें नागरिकांनीं ठरविणें आणि आपल्याला हितकारक ठरणारे मैत्रीचे संबंध कमी होतील किंवा युरोपांतील आजच्या आपत्तिकारक परिस्थितींत आपल्या हितसंबंधांत गोंधळ व व्यत्यय निर्माण होतील, अशीं मतें व ग्रह आपल्या मनांतून काढून टाकणें किती आवश्यक आहे तें स्पष्ट होईल.

## दर्यावर्दी तटस्थता

### ( तिसरा वार्षिक संदेश, १७, ऑक्टोबर १८०३ )

ह्या संघर्षांत आपण न्याय्य वर्तणूक ठेवून व सतत उदार राहून सर्व लढाऊ राष्ट्रांची मैत्री संपादन करणें हें आमचें धोरण राहील. आमची तशीच इच्छा आहे व आमचें हितहि त्यांतच आहे. समुद्रावर संकटांत असलेल्या त्यांच्या लढाऊ जहाजांचें आम्ही आदरातिथ्य करूं; पण त्यामुळें कोणालाहि चिडवणार नाहीं, शांतता राखण्यासाठीं आवश्यक तेवढें पोलिस-दल आम्ही आमच्या बंदरांत ठेवूं; ज्या युद्धांत आपल्या देशानें भाग घेत-लेला नसेल त्या युद्धांत आम्ही आमच्या नागरिकांना लढूं देणार नाहीं; जे नागरिक किंवा परदेशीय, अधिकार नसतांना आपल्या जहाजावर अमेरिकेचा झेंडा लावतील व त्या कृत्यांमुळें खऱ्या अमेरिकन जहाजांबद्दल इतरांच्या मनांत संशय निर्माण करतील व ज्या कृत्यांना आम्ही जबाबदार नाहीं अशा कृत्यांची भरपाई करण्याची जबाबदारी आमच्यावर लादतील, त्यांना आम्ही कडक शासन करूं. आमच्या नागरिकांच्या व जहाजांच्या बाबतींत न्याय्य तेंच धोरण ठेवण्यांत व त्यांच्याशीं न्याय्य तीच वर्णूतक करण्यास आम्ही सर्व राष्ट्रांना भाग पाडूं व स्वतंत्र राष्ट्राच्या प्रतिष्ठेस शोभेल अशीच वर्तणूक ठेवूं व अपमान किंवा वारंवार होणारे अन्याय सहन न करतां, त्यांचे परिणाम भोगूं.

### ( ब्लडगुड व हॅमंड ह्यांस, १८०९ )

आंतरराष्ट्रीय संबंधांत आजपर्यंत पवित्र मानलीं गेलेलीं नीतितत्त्वें आज सारें जग सशस्त्र होऊन पायदळीं तुडवीत असतांना, आमच्या मनांत प्रक्षोभ होणार नाहीं असें समजणें चुकीचें ठरेल. जेव्हां ही रानटी हिंसा होत होती, तेव्हां त्यांत सामील असलेल्या सर्व राष्ट्रांपासून दूर राहाणें, युद्धानें होणारा अटळ विध्वंस, लोकांच्या वागणुकीवर व नीतिमत्तेवर त्याचे होणारे अनिष्ट परिणाम व स्वतंत्र देशांना त्यापासून असणारे धोके ह्यांपासून दूर राहाणें, आणि आपल्या साधनसामुग्रीची वाढ करून परराष्ट्रांच्या कारवायांची भीति नाहीं इतकें बलवान् होणें हेंच शहाणपणाचें होतें.

## अमेरिकेच्या युद्धविरोधी धोरणांचें स्वरूप

### ( अर्ल ऑफ बुशन ह्यांस, १८०३ )

सर्वशक्तिमान् ईश्वरानें आकाशाखालीं असलेला सर्व जलसंचय एकत्र करतांना, तुमच्या व आमच्या अर्धभूगोलांतील जमिनी निरनिराळ्या ठेवल्या व तसें करतांना तो म्हणाला, निदान इथें तरी शांतता नांदू दे. ईश्वराच्या ह्या कृत्याबद्दल मी त्याला धन्यवाद देतों. शांतता व सर्व राष्ट्रांशीं स्नेहसंबध हें दीर्घकाळ आमच्या देशाचें स्वभाव-वैशिष्टय राहील व आमच्या देशांतील समृद्धीचा युरोपांतील राष्ट्रांच्या मनावर परिणाम होऊन आमच्या उदाहरणावरून त्यांना बोध घेतां येईल, अशी मला आशा आहे. माझ्या देशाला शांतता मिळावी ही माझी इच्छा कांहीं प्रत्येक अन्यायापुढें मान तुकविण्याच्या तत्त्वावर आधारलेली नाहीं,तर आम्ही जर योग्य व स्नेहाच्या मार्गानें गेलों तर इतरहि आमच्याशीं न्यायाचे व स्नेहाचे संबंध ठेवतील ह्या तत्त्वावर आधारलेली आहे.

## अमेरिकन स्वातंत्र्याचा प्रकाश
## मानवजातीच्या हितासाठीं जतन करून ठेवला पाहिजे

### ( वॉशिंग्टनच्या नागरिकांना, ४, मार्च १८०९ )

जगांतील इतर राष्ट्रांतील आपलें स्थान उच्च पण दराऱ्याचें आहे. जगांतील एकमेव प्रजासत्ताक राज्याचें हें भवितव्य आपल्या हातीं आहे. आपलें प्रजासत्ताक हें मानवी हक्कांचें एकमेव स्मारक, स्वातंत्र्य व स्वयं-शासनाची पवित्र ज्योत प्रज्वलित ठेवणारें एकमेव पवित्र स्थान आहे. ह्या ज्योतीच्या हितकारक प्रकाशाची जाणीव जर जगांतील इतर भागांत राहाणाऱ्यांना झाली तर ह्या पवित्र ज्योतीवरच त्यांच्या भागांतील स्वातंत्र्य-ज्योति प्रज्वलित केल्या जातील. तेव्हां मानवाला प्रिय असणारें सर्व कांहीं आपल्या प्रजासत्ताकांत आहे, असें समजून सर्व मानवजातीनें त्याच्या भरभराटींत आनंद व त्याच्या अडचणींत दुःख मानलें पाहिजे. आणि ह्याची जाणीव झाली कीं, आपल्या हिताचा किंवा सोईचा वाटेल तेवढा त्याग करण्याचा उत्साह आम्हांला कां वाटू नये ? आमच्यांत एकी राहावी

म्हणून आणि मानवी आशाआकांक्षांच्या मंदिराचें हें प्रवेशद्वार सुरक्षित राहावें म्हणून आमच्या मनांत आणि वृत्तींत आम्ही पाहिजे तेवढें जुळतें घेऊं.

**( न्यूयॉर्कच्या विधानसभेस, १८०९ )**

बाहेरील जगांत इतरत्र पसरलेल्या अनास्थेंत, मानवी स्वातंत्र्याच्या अवशेषांचें एकमेव स्थान म्हणून आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणें व त्यासाठीं व्यक्तिगत व स्थानिक हिताचा त्याग करणें हें आपल्या हिताच्या दृष्टीनें, भविष्याच्या दृष्टीनें आणि अखिल मानवजातीच्या हिताच्या दृष्टीनें आपलें कर्तव्य आहे. आपण सामर्थ्यवान् असल्याची बढाई मारणारे राजे जेथें सहजासहजीं नामोहरम झाले... तेथें आमच्या स्वातंत्र्याच्या ह्या रचनेला आज आपल्याला सहन करावा लागला तसा बारीकसा धक्का बसण्यापलीकडे जर अधिक इजा पोंचली नाहीं तर स्वयंशासनाच्या हितचिंतकांना व हितशत्रूंना एक उपयोगी धडा शिकावयास मिळेल.

## युरोपशीं तुलना केली तर अमेरिका स्वर्ग आहे

**( डॉ. जोन्स ह्यांस, १८१० )**

आपण एकटे आहों असें मानलें तर आपल्या अडचणी फार कठीण आहेत. पण युरोपांतील देशांच्यापुढील अडचणींशीं त्यांची तुलना केली तर आमच्या अडचणी म्हणजे स्वर्गांतील सुखेंच होत, असें मानलें पाहिजे. युगानुयुगें चालत आलेल्या संक्रमणाच्या सृष्टि-क्रमांत, मानवी इतिहासांत पूर्वी कधींहि न घडलेल्या प्रचंड व भयंकर स्थित्यंतरांच्या काळांत नियतीनें आम्हांला आणून ठेवलें आहे. एक आपवाद सोडला तर युरोपांतील प्रत्येक राज्य धुळीला मिळालें आहे; त्यांना पादाक्रांत करणारा जेता आपत्ति व विध्वंस पसरवीत पृथ्वीतलावर हिंडतो आहे; चांचेगिरी करीत विशाल सागरावर दुःख व नाश पसरवीत तरंगतो आहे. खरोखरीच..... आपली ही भूमि पुष्पशय्या आहे. आणि जगांतील साऱ्या विध्वंसांतून जी शासनपद्धति आम्हांला सुरक्षितपणें ओढून काढील, ती इतिहासांत अमर ठरेल. आमच्यांतहि छोटे मतभेद व द्वेष, मत्सर आहेत; आपलीं रक्ताळलेलीं डोकीं घेऊन इतर राष्ट्रें गिळीत हिंडणारे सैतान इतरत्र आहेत. पण

सुदैवानें ह्या राक्षसांना पोहतां येत नाहीं, अशा जलवासी सैतानांना जमिनीवर सरपटतां येत नाहीं व म्हणून आम्ही जर त्यांच्या वाटेला गेलों नाहीं तर त्यांच्या हातींहि सांपडणार नाहीं. पण जर कां त्यांच्या तडाख्यांत आम्ही सांपडलों तर त्यांच्या पंज्यांचे तडाखे व शेपट्यांचे फटकारे आमच्या वांट्याला येतील.

## तटस्थतेचे फायदे

### ( एपेस ह्यांस, १८११ )

जगांत जी वेडेपणाची स्पर्धा चालली आहे तींत आम्ही सामील न झालों तर आमच्या प्रतिष्ठेला बाध येईल...ह्यावर माझा विश्वास बसत नाहीं. आरामखुर्चीत बसून राजकारण करणाऱ्यांची टीका जर बाजूला केली,—असे लोक प्रत्येक देशांत सर्वकाळीं असतात,—तर अटलांटिक महासागराच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या प्रत्येक देशाची प्रतिष्ठा, सत्ता, स्वातंत्र्य, कायदे व मालमत्ता धुळीला मिळविणाऱ्या संघर्षांत आपण आपल्या देशांत शांतता राखली व त्याची भरभराट केली हें कृत्यच शहाणपणाचें ठरेल. युरोपांतील कोणत्या राष्ट्रानें आपली प्रतिष्ठा आमच्यापेक्षां अधिक चांगली राखली? स्पेन का पोर्तुगाल, का इटली, स्वित्सर्लंड, हॉलंड, आशिया, ऑस्ट्रिया, इतर जर्मन राज्यें, स्वीडन, डेन्मार्क का रशिया? कोणी? का फ्रान्स व इंग्लंड ह्यांची बदनामी आम्हीं आमच्या प्रामाणिकपणाबद्दलच्या नांवलौकिकापेक्षां अधिक उच्च समजावी? का आम्हीं ह्या विध्वंसाच्या काळांतहि जी भरभराट, जें स्वातंत्र्य शाबूत ठेवलें त्याच्याबदली इंग्लंड-फ्रान्सच्या प्रचंड विस्ताराचा परिणाम म्हणून एका बाजूला असलेला जुलूम व दुसऱ्या बाजूला असलेली दिवाळखोरी व शरणागति स्वीकारावी?

## जाळ्यांत न सांपडणें हें आमचें मूलभूत धोरण

### ( प्रेसिडेंट मन्रो ह्यांस, १८२३ )

युरोपांतील अशांततेंत कधींहि अडकून पडायचें नाहीं, हें आमचें मूलभूत धोरण असावें. आपलें दुसरें मूलभूत धोरण—अटलांटिकच्या ह्या बाजूला असलेल्या देशांच्या व्यवहारांत युरोपच्या देशांना कधींहि हस्तक्षेप

करूं न देणें. दक्षिण व उत्तर अमेरिकेचे हितसंबंध युरोपच्या हितसंबंधांपेक्षां पूर्णपणें निराळे आहेत व ते पूर्णतः आपसांतील आहेत. त्यामुळें अमेरिकेनें युरोपपेक्षां निराळी, आपली स्वतःची पद्धत ठेवावी. युरोप एकतंत्री जुलमाचें माहेरघर बनण्याची धडपड करीत असतां, आपण मात्र हा अर्धभूभाग स्वातंत्र्याचें माहेरघर बनविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

(प्रेसिडेंट मन्रो ह्यांस, १८२३)

युरोपांतील भांडणांत प्रत्यक्ष भाग न घेणें अमेरिकेचें मूलभूत धोरण असावें, असें मी सतत मानीत आलों. त्यांचे राजकीय हितसंबंध आमच्यापेक्षां निराळे आहेत. त्यांचे आपसांतील हेवेदावे, त्यांच्यांतील सत्तेचा समतोलपणा, त्यांचे गुंतागुंतीचे गट, शासनव्यवस्थेचीं त्यांचीं तत्त्वें व तिचे प्रकार हीं सर्व आम्हांला अपरिचित आहेत. सतत युद्ध करणारीं तीं राष्ट्रें आहेत. त्यांच्या सर्व शक्ति ते त्यांच्या लोकांचे श्रम, मालमत्ता व जीवित ह्यांचा विध्वंस करण्यांत खर्ची करतात. उलट, त्यांच्या बरोबर विरुद्ध धोरणानें वागण्याची आमच्यासारखी संधि इतरांना कधीं मिळाली नव्हती. आमचें धोरण शांतता राखण्याचें, सर्व मनुष्यमात्राशीं मैत्रीचे संबंध ठेवण्याचें, आमच्या बुद्धीचा व सर्व साधनांचा उपयोग विनाशासाठीं करण्याऐवजीं आमची स्थिति सुधारण्यासाठीं करण्याचें आहे. युरोपशीं सहकार्य करण्याचे फारच थोडे प्रसंग आमच्यापुढें येतील व थोड्या धोरणानें व दूरदर्शीपणानें ते सांभाळून घेतां येतील. आमच्या अर्धगोलांत राहाणाऱ्या आमच्या बांधवांपैकीं आज कोणीहि आमच्याशीं युद्ध करण्याच्या अवस्थेंत किंवा मनःस्थितींत नाहीं व पुढें युगभर तरी असणार नाहींत. युरोपच्या ज्या राष्ट्रांनीं आपले पाय दक्षिण किंवा उत्तर अमेरिकेंत रोंवले होते, त्यांच्या पायांखालील जमीन आता सरकूं लागली असून लौकरच त्यांच्या शेजारपणांतून आपण मुक्त होऊं.

* * *

अनुक्रम ३४४९९ वि: निवांध्य
क्रमांक १४४०२ नों. दि. २४-३-६३

: १८ :

## इंग्लंड

# ब्रिटिश जुलमाविरुद्ध बंड

## ( रँडॉल्फ ह्यांस, १७७५ )

ग्रेटब्रिटनशीं एकजूट व्हावी असें मनापासून वाटणारा माझ्याखेरीज दुसरा मनुष्य साऱ्या ब्रिटिश साम्राज्यांत मिळणार नाहीं असें मी जेव्हां म्हणतों, तेव्हां महाराज, आपण माझ्यावर विश्वास ठेवावा. पण माझ्या निर्मात्या ईश्वराची शपथ घेऊन सांगतों कीं, ब्रिटिश पार्लमेंटनें सुचविलेल्या अटीवर एकजूट मानण्याआधीं मी मरण पत्करीन. माझ्याप्रमाणेंच साऱ्या अमेरिकेचेंहि हेंच म्हणणें आहे असें मला वाटतें. आम्ही निराळें होऊन आमचें स्वातंत्र्य जाहीर करण्यासाठीं आम्हांला कसल्याहि प्रलोभनाची किंवा बलाची आवश्यकता नाहीं. आम्हांला फक्त इच्छाशक्ति पाहिजे व आमच्या राजाच्या कृपाछत्राखालीं ही इच्छाशक्ति सतत वाढत आहे. एका मोहिमेंत होणाऱ्या रक्तपातानेंच आमचें भवितव्य ठरेल व अशी मोहीम काढून रक्तपात करावयाचें ठरलें आहे, ह्याबद्दल मला दुःख होतें. आमच्या देशाचे किनारे गुलामींतून मुक्त करण्यासाठीं जर आमच्या देशांतील वारे आणि लाटा संघटित झाल्या नाहींत आणि जनरल हौ ( Howe ) आणीत असलेली कुमक जर सुरक्षितपणें ह्या किनाऱ्यावर पोंचली तर बोस्टन सोडून बाहेर पडण्याचा व पुन्हा मार खाण्याचा त्याला उत्साह राहाणार नाहीं, अशी आम्हांला आशा वाटते. राजदंड हातीं घेतलेल्या जुलमी माणसाला भिऊन, त्याच्या हाताखालीं मान घालून बसणारे

व आम्हांला झोडपून काढणाऱ्या त्याच्या दंडुक्याचीं चुंबनें घेणारे पशू आम्ही नव्हेत, ह्याची खात्री त्याला पटविण्यासाठीं जनरल हौला आम्हीं खरपूस मार दिलाच पाहिजे.

## इंग्लंडनें केलेल्या अन्यायांशीं आमचें शत्रुत्व आहे; इंग्लंडच्या जनतेशीं नव्हे

### (रॉडनी ह्यांस, १८१५)

इंग्लंड आपलें धोरण बदलील अशी आशा मी देवाजवळ व्यक्त करीत असतों. समान पातळीवरून ज्याच्याशीं संबंध ठेवण्यास मी उत्सुक आहें, असें साऱ्या पृथ्वीवर दुसरें एकहि राष्ट्र नाहीं. समानतेखेरीज इतर कोणत्याहि भूमिकेवरून मी आपला दोस्तीचा हात कोणापुढेंहि करणार नाहीं. त्यांच्यांतले कांहीं लोक मी व्यक्तिशः इंग्लंडचा शत्रु असल्याचें सांगत असतात हें मला माहीत आहे. पण जे मूर्ख आहेत त्यांचा किंवा जे मला मूर्ख समजतात त्यांचाच ह्या सांगण्यावर विश्वास बसेल. इंग्लंडनें केलेल्या आमच्या अपमानाशीं आणि आम्हांला केलेल्या जखमांशीं मी जरूर शत्रुत्व ठेवतों. इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेंत जीं निंद्य तत्त्वें आहेत त्या तत्त्वांशीं आणि दुसऱ्या राष्ट्रांशीं संबंध ठेवतांना ज्या तत्त्वांनुसार ते ठेवले जातात त्यांच्याशीं मी शत्रुत्व ठेवतों. पण जर इंग्लंडनें आपल्या राजकीय धोरणांत नीतिनियमांना स्थान दिलें व आमच्याशीं वागतांना जर स्वच्छ वर्तणूक केली, निदान तटस्थ राहण्याचें ठरविलें, तर मी पुन्हा सांगतों कीं, ज्यांच्या मैत्रीसाठीं मी एवढा त्याग करायला तयार होईन, असा इंग्लंडखेरीज दुसरा एकहि देश नाहीं. शत्रु म्हणून इतर कुठल्याहि राष्ट्रापेक्षां इंग्लंड अधिक नुकसान करूं शकतें आणि शांततेचा काळ असो कीं युद्धाचा, आमच्यांत अंतर्गत अशांतता माजवण्याचीं सर्वांत जास्त साधनें त्यांच्याच हातीं आहेत.

## इंग्लंडमधील अधःपात : अमेरिकेला इशारा

### (लोगान ह्यांस, १८१६)

जो मनुष्य मुत्सद्दी ह्या नात्यानें अप्रामाणिकपणें वागतो, तो आयुष्यांत कोणीहि झाला तरी अप्रामाणिकपणेंच वागेल. प्रत्येक व्यक्तीला बंधनकारक अस-

लेले नीतिनियम अशा लाखों व्यक्ती एकत्र आल्या कीं, त्यांना लागू पडत नाहींत हें म्हणणें विचित्र आहे. आपलें सरकार आपल्या नागरिकांबाबतच्या कर्तव्यांत अतिशय दक्ष असल्यामुळें, इतर राष्ट्रांशीं संबंध ठेवतांनाहि नीतिनियमांचें कांटेकोरपणें पालन करतें ह्याबद्दल मला फार समाधान वाटतें... आपण होऊन अन्याय केल्याचा दोष आम्हांला कोणी देणार नाहीं. ह्या बाबतींत सरकारची निंद्य वागणूक आणि नागरिकांच्या वागणुकींतील सचोटी ह्यांतील इंग्लंडमध्यें असलेली तफावत जगांत आश्चर्य करण्यासारखी आहे. सदाचार आणि हित ह्यांची फारकत करतां येत नाहीं, ह्या तत्त्वाचें प्रात्यक्षिक आतां इंग्लंड देत आहे. नागरिकांची त्यांत अखेर हानि होणार आहे; पण त्या हानीचा सर्वांत जास्त बोजा पिढीजाद अमीरउमरावांवर पडणार आहे व तें योग्यच आहे; कारण ह्या आपत्तीची ते गेल्या कित्येक पिढ्यांपासून तयारी करीत आले आहेत. ह्या उदाहरणावरून धडा घेऊन आपल्या देशांत असलेल्या थैलीशहांच्या संघटनांमार्फत जन्माला येणारी उमीर–उमरावशाही जन्मतःच चिरडून टाकूं अशी मला आशा वाटते. ह्या नव्या वर्गानें आपल्या सरकारशीं सामना करण्याचें आव्हान दिलेंच आहे आणि आपल्या देशाच्या कायद्यांचा अवमान करण्यासहि सुरुवात केली आहे.

* * *

: १९ :

## फ्रान्स

## फ्रेंचांचें जीवन व नीतिमत्ता ह्यावरील टीका

### ( बेलिनी ह्यांस, १७८५ )

युरोपच्या परिस्थितीबद्दल जी फुशारकी मारण्यांत येते त्याबाबत मी काय म्हणतों तें सविस्तर ऐका. मी त्या परिस्थितीचा तुम्हांला तपशील देण्याची आवश्यकता नाहीं. पण अमेरिकेच्या पहाडांतून आलेल्या एका जंगली माण-

साला ह्या परिस्थितीबद्दल काय वाटतें तें जाणून घेण्यास तुम्ही कदाचित् उत्सुक असाल. ह्या परिस्थितीपासून शिकण्यासारखें कांहीं नाहीं हें मी खात्रीनें सांगतों. येथील समाजाची स्थिति कींव करण्यासारखी आहे. येथील प्रत्येक मनुष्य हातोडा तरी आहे किंवा ऐरण तरी आहे, हें व्होल्टेअरचें म्हणणें येथें पदोपदीं प्रत्यक्षांत दिसतें. आपण ज्यांच्या अंकित होणार आहों असें बोललें जातें व जेथें ईश्वराच्या व त्याच्या पत्न्यांच्या वैभवानें आपले डोळे दिपणार आहेत व जेथें मानवी समाजांतील असंख्य लोक त्यांच्या पायांखालीं तुडवले गेलेले आपण पाहाणार आहोंत असें सांगण्यांत येतें, त्या देशाचें हें सत्य-दर्शन आहे. समाजांतील बहुसंख्य लोक अशा रीतीनें शारीरिक व नैतिक दडपशाहीखालीं चिरडले जात असतांना जे थोर आहेत, त्यांची स्थिति मीं अगदीं जवळून पाहाण्याचा, त्यांच्या ज्या वैभवानें त्रयस्थ प्रेक्षकाचे डोळे दिपून जातात त्या वैभवाची माहिती करून घेण्याचा आणि विशेषतः अमेरिकेंतील समाजाच्या प्रत्येक वर्गाला जें सौख्य मिळतें, त्या सौख्याशीं त्यांच्या त्या परिस्थितीची तुलना करण्याचा प्रयत्न मीं केला आहे. ह्या उच्च समाजांतील तरुणांचा बहुतेक वेळ प्रेमप्रकरणें करण्यांत जातो, तर वयानें मोठे असणारे लोक महत्त्वाकांक्षेपायीं कट करण्यांत आपला बहुतेक वेळ घालवितात. त्यांच्यांत वैवाहिक सौख्याला स्थान नसल्यानें तें ज्या गृहसौख्यावर आधारलेलें असतें तें गृहसौख्य आस्तित्वांतच नाहीं. त्यांची जागा विकारांना प्रबळ करणाऱ्या प्रकरणांनीं घेतली असून, त्यांत कांहीं क्षण मनुष्य सौख्यांत बुडून जात असला तरी कित्येक दिवस व महिने अस्वस्थतेंत व यातना भोगण्यांत जात असतात. जें गृहसौख्य अमेरिकन नागरिकांना मिळतें व ज्याच्यामुळें त्यांना मनःशांति मिळून ते आपल्या विचाराप्रमाणें व प्रकृतिमानाप्रमाणें कष्ट करीत असतात व अशा कष्टांमधूनच मिळणारे विश्रांतीचे क्षण ज्या सुखांत ते घालवीत असतात, त्याच्याशीं तुलना करतां ही स्थिति अगदीच हीन होय.

## फ्रेंच संस्कृतींत कौतुक करण्यासारखें काय आहे ?

**( बेलिनी ह्यांस, १७८५ )**

भोजनाचा आनंद घेण्यांत ते आमच्या बरेच पुढें आहेत; कारण चवदार

अन्नाबरोबरच दारू पिण्यावर ते मर्यादा ठेवूं शकतात. मेजवानीचा शेवट ते पिऊन पशूसारखे तर्रर होण्यांत होऊं देत नाहींत. समाजांतील सर्वांत खालच्या वर्गांतहि दारू पिऊन धुंद झालेला माणूस मीं अजून पाहिला नाहीं. त्यांची वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला, संगीत ह्यांचा आनंद मी किती लुटला तें जर सांगायला लागलों तर मला शब्द अपुरे पडतील. ह्या कलांच्या क्षेत्रांत ते चमकतात. विशेषतः संगीत ही कला खरोखरीच आनंददायी आहे व आपल्यांतील तिच्या अभावामुळें आपण किती सौख्यास मुकलों तें सांगणें कठीण आहे. संगीतासाठीं मी त्यांचा मत्सर करतों असें कबूल करायला मी तयार आहें आणि मोझेसच्या दहा आज्ञांचें उल्लंघन करूनहि मी संगीत प्रिय मानायला तयार आहें.

## मालमत्तेच्या केंद्रीकरणामुळें फ्रान्समध्यें दारिद्र्य वाढतें

**( मॅडिसन ह्यांस, १७८५ )**

मी फॉटन्ब्लोला चालत जात असतां गांवाबाहेर पडल्याबरोबर माझ्याच वेगानें चालणाऱ्या व मी जात असलेल्या बाजूसच जात असलेल्या एका गरीब स्त्रीबरोबर मी चालूं लागलों. मजुरी करणाऱ्या गरिबांची स्थिति समजावून घेण्याची इच्छा असल्यानें मी तिच्याशीं बोलूं लागलों... मीं तिला ती काय काम करते व तिची परिस्थिति कशी आहे तें विचारलें. तिनें मला सांगितलें कीं, ती दिवसा मजुरीचें काम करीत असे व तिला रोजीं ४ पेन्स मजुरी मिळे. तिला दोन मुलें पोसावीं लागत व तिला घरासाठीं वर्षाला ७१ दिवसांच्या कमाईएवढें भाडें द्यावें लागे. पुष्कळदां तिला काम मिळत नसे व त्यामुळें उपाशी राहावें लागे...... आम्ही जवळ जवळ मैलभर बरोबर चालत गेलों. तिला सोडून जातांना मीं तिला एक शिलिंग दिला तेव्हां कृतज्ञतेनें तिला रडें आलें......

ह्या प्रसंगामुळें मालमत्तेची विषम वांटणी झाल्यामुळें ह्या देशांतील... आणि युरोपभर पसरत असलेल्या दारिद्र्याबद्दल माझ्या डोक्यांत विचार येऊं लागले. ह्या देशांतील सर्व मालमत्ता अगदीं थोड्या लोकांच्या हातीं आहे... हे लोक राष्ट्रांतील तरुणांना नोकर म्हणून ठेवतात ( कांहींच्याकडे २००

घरगडी आहेत ) . . .जे बहुसंख्य आहेत— म्हणजे गरीब, त्यांना काम मिळूं शकत नाहीं. ज्या देशांत पडीक असलेली खूप जमीन आहे त्या देशांत कष्ट करायला तयार असणाऱ्यांनाहि भीक कां मागावी लागते ह्याचा मी विचार करूं लागलों. . . मालमत्तेची समान वांटणी करणें अव्यवहार्य आहे, ह्याची मला खात्री पटली आहे.पण ह्या प्रचंड प्रमाणांत झालेल्या असमान वांटणीचा परिणाम म्हणून बहुसंख्य लोकांना दारिद्र्यांत खितपत पडावें लागतें. अशा परिस्थितींत मालमत्तेची पोटवांटणी करण्यासाठीं कायदे करणाऱ्यांनीं शोधावे तेवढे मार्ग थोडेच ठरतील. . . ही भूमि सर्व मानवजातीला तीवर कष्ट करून जगण्यासाठीं दिलेली आहे. . . प्रत्येकाला ह्या जमिनीचा निदान थोडा तरी हिस्सा मिळावा अशी व्यवस्था करण्याची वेळ आतां आली आहे. छोट्या जमिनींचे मालक हे राष्ट्राचे खरे भूषणास्पद घटक होत.

## अमेरिकन राज्यक्रांतीनें फ्रेंचाचीं मनें उत्तेजित झालीं

### ( डॉ. प्राइस ह्यांस, १७८९ )

तरीहि अमेरिकन युद्धानें ह्या देशांतील विचारी लोकांना अनियंत्रित शासनपद्धतींत लागलेल्या गाढ झोंपेंतून खडबडून जागें केलें. अमेरिकेला जे आले होते त्यांच्यांतील अधिकारीसुद्धां बहुतेक तरुणच होते व त्यामुळें त्यांच्यावर संवयींचा आणि पूर्वग्रहांचा पगडा कमी असल्यानें सर्वसाधारण बुद्धीला पटेल व सर्वसाधारण जनतेच्या जें हिताचें असेल तें मानायला ते तयार होते. ह्यामुळें उत्तेजित होऊन ते परत आले. वृत्तपत्रांवर बंधनें असूनहि तीं ह्या तत्त्वांचा प्रचार करूं लागलीं, आपसांतील चर्चेंतहि स्वातंत्र्याचें नवें वारें खेळूं लागलें, स्त्री-पुरुष राजकारणाची चर्चा करूं लागले व व्यापक तत्त्वज्ञान असलेला एक उत्साही नवा पक्ष अस्तित्वांत आला. ह्या पक्षाचें नांव देशभक्तांचा पक्ष आहे, असें समजूं या. ज्या राज्यसत्तेखालीं हा पक्ष जगत आहे ती करीत असलेल्या जुलमांची ह्या पक्षाला जाणीव आहे व ती राज्यसत्ता बदलावयाची तो पक्ष संधि पाहात आहे. सर्व राज्यांतील प्रामाणिक लोकांना ह्या पक्षानें आपल्यांत सामावून घेतलें आहे. लेखक, सुखवस्तु, तरुण उमराव, जे कांहीं प्रमाणांत नव्या विचारांमुळें ह्यांत आले तर कांहीं संप्रदाय म्हणून सामील झाले; कारण ह्या भावना म्हणजे आतां

एक संप्रदाय बनलेला आहे व त्यामुळें बहुतेक तरुणी ह्या पक्षांत आल्या आहेत.

## फ्रेंच राज्यक्रांतीच्या यशाचा अमेरिकन राज्यक्रांतीवर परिणाम होईल

### ( मॅसन ह्यांस, १७९१ )

फ्रान्समध्यें नवें सरकार भक्कम व्हावें ह्याबद्दल मी उत्सुक आहें. कारण माझी खात्री आहे कीं, जर फ्रान्सचें हें नवें सरकार मजबूत झालें तर साऱ्या युरोपवर क्रांति आज ना उद्यां पसरेल. उलट, जर ह्या सरकारला पायबंद बसला तर इतर देशांतील स्वातंत्र्याच्या चळवळींनाहि पाऊल मागें घ्यावें लागेल. आपल्या सरकारच्या स्थैर्याच्या दृष्टीनेंहि फ्रान्समधील नवें सरकार स्थापन होऊन मजबूत होणें आवश्यक आहे. नाहींतर त्याची इंग्लिश राज्यघटनेसारखी अर्धवट अवस्था व्हायची.

## फ्रेंच राज्यक्रांति पसरेल अशी आशा

### ( सिंक्लेअर ह्यांस, १७९१ )

पॅरिसहून राजा पळाल्याची व त्याला पुन्हा पकडण्यांत आल्याची बातमी नुकतीच आपल्याला कळली आहे. अशी सुंदर राज्यक्रांति अयशस्वी करण्याचें सामर्थ्य जर एका माणसाच्या हातीं असलें तर तें दुर्दैव होय. असें सामर्थ्य कोणाजवळहि नसावें असें मला वाटतें व तसें तें नाहीं, असा विश्वास मला वाटतो. माझी खात्री आहे कीं, जगभर भरडल्या गेलेल्या जनतेच्या हितासाठीं ही राज्यक्रांति यशस्वी होईल आणि जगभर पसरेल.

## राज्यक्रांति झाली तरी फ्रान्सशीं केलेले तह बंधनकारक आहेत.

### ( फ्रान्सशीं असलेले करार मोडावयाचा अमेरिकेला अधिकार आहे किंवा नाहीं ह्याबद्दल मत, २८, एप्रिल १७९३ )

अमेरिकेच्या प्रजासत्ताकानें अनियंत्रित राज्यसत्तेखालीं असलेल्या फ्रान्सशीं एकजूट केली. फ्रान्सनें आपली शासनव्यवस्था बदलली व तें राष्ट्र

प्रजासत्ताक होईल असें जाहीर केलें; भरपूर स्वातंत्र्य देणाऱ्या प्रजासत्ताकाचा आराखडा तयार केला व मध्यंतरींच्या काळांत प्रजासत्ताक म्हणूनच आपला राज्यकारभार चालविला. आणि आतां असें सुचविण्यांत येत आहे कीं, अमेरिकेनें फ्रान्सशीं केलेले तह रद्द समजण्यांत यावेत. कारण खरें सांगावयाचें तर सांप्रतचें सरकार जर हे तह झाले तेव्हां फ्रान्समध्यें सत्तारूढ असतें तर तह करण्यांत आलेच नसते. फ्रान्स प्रजासत्ताक राष्ट्र असतें तर त्याच्याशीं एकजूट केली नसती, असें कोणता अमेरिकन म्हणेल? किंवा पूर्वीच्या अनियंत्रित राज्यकारभाराइतकेंच कुठल्याहि प्रकारचें प्रजासत्ताक आम्हांला स्वीकाराई नाहीं असें कोण म्हणेल? ...माझा निष्कर्ष असा आहे कीं, फ्रान्समध्यें शासनव्यवस्थेंत बद्दल झाला असला तरी तह आपल्यावर अजूनहि बंधनकारक आहेत.

## बोनापार्ट : आम कत्तल करणारा खुनी

### ( माडाम डी स्टेल ह्यांस, १८२३ )

एक दिवस येईल कीं एखादी न्यायी पिढी त्यांच्या वीराला (बोनापार्टला) त्यानें कमावलेलें एकमेव महत्त्वाचें स्थान बहाल करील; त्याला मानवी वंशाचा सर्वांत मोठा विध्वंसक ठरवील. ज्या वर्षी लाखों लोक ठार झाले नाहींत, दारिद्र्यांत, दुःखांत लोटले गेले नाहींत असें त्याच्या लष्करी आयुष्यांत एखादें तरी वर्ष गेलें आहे का पहा! त्याच्या हस्तें झालेल्या खुनांचें, जाळपोळीचें, विध्वंसांचें, दुष्काळाचें व दुःखाचें स्मरण म्हणून ज्या युरोपच्या रणक्षेत्रावर स्मारक उभारावें लागणार नाहीं, असें एखादें तरी रणक्षेत्र दाखवा!

## फ्रान्स अजूनहि स्वतंत्र होईल

### ( बी. ऑस्टिन ह्यांस, १८१६ )

प्रजासत्ताकाचा रक्षक न्यायाधीश म्हणून त्याच्या हातीं दिलेल्या सत्ता-साधनांचा उपयोग त्या प्रजासत्ताकाला उलथून पाडण्यासाठीं व स्वतःसाठीं व स्वतःच्या कुटुंबीयांच्या स्वार्थासाठीं लष्करी अनियंत्रित राज्यव्यवस्था स्थापण्याचें स्वदेशद्रोही कृत्य करण्याऐवजीं जर बोनापार्टनें आपल्या देशांत

स्वतंत्र सरकार स्थापून त्याला पाठिंबा देण्यासाठीं त्यांचा प्रामाणिकपणें उपयोग केला असता तर फ्रान्स आज स्वतंत्र व शांत राहिलें असतें; व उलट फ्रान्सचें उदाहरण समोर ठेवून युरोपांतील प्रत्येक देशांत प्रजेचें कांहीं प्रमाणांत तरी नियंत्रण असलेल्या राज्यसत्ता स्थापन झाल्या असत्या. त्याच्या भयंकर दुरभिनामुळें ह्या तत्त्वाची होणारी एकमेव प्रगति बंद झाली व तें रक्ताच्या नद्यांत बुडून गेलें. त्या नद्या अजूनहि ओसरल्या नाहींत. त्याच्यामुळें झालेल्या भयंकर विध्वंसाची व मानवी दुःखाची मोजदाद अजून पुरी व्हावयाची आहे. पण राष्ट्रांच्या नजरा आतां विवाक्षित ध्येयावर स्थिर झाल्या आहेत व तें ध्येय साध्य करण्यासाठीं व मानवाचें दुःख निवारण करण्यासाठीं राष्ट्रें पुढें पाऊल टाकतील. आपण सुंदर बीजाचें रोपण केलें आहे व त्या बीजाला जन्म देणाऱ्या आपल्या मायभूमींत असलेल्या वृक्षाची आपण किती मनापासून काळजी घेतली पाहिजे!

* * *

: २० :

# दक्षिण अमेरिका

## ईश्वर त्यांची सुटका करो!

### (कोसियस्को ह्यांस, १८११)

आणि इकडे लक्ष द्या! आणखी एका पुरुषाला आपल्या सामर्थ्यांची जाणीव झाली असून,तो आपल्याला बंधनांत ठेवणाऱ्या शृंखला तोडीत उभा राहात आहे, आणि तोहि पृथ्वीच्या ह्या गोलार्धांत. सर्व स्पॅनिश अमेरिका

बंड करून उठली आहे. कांहीं घटक-राज्यांत बंडखोरांना यश आलें असून, ते सर्वत्र यशस्वी होतील. पण ह्यांत धोका असा आहे कीं, त्यांना गुलामींत ठेवणाऱ्या क्रूर सत्तेच्या कारवाईमुळें त्यांचीं मनें लहान मुलांसारखीं अज्ञानी राहिलीं आहेत व लहान मुलांप्रमाणेंच ते स्वयंशासनास अपात्र आहेत. स्वार्थी लोक व धर्मगुरु ह्यांच्या कारवायांच्या संकटांतून जर ते बाहेर पडले तर सर्व-साधारण व्यवहारज्ञानानें इतर सर्व व्यवस्थित होईल. ईश्वर त्यांची सुरक्षित-पणें सुटका करो.

## दाक्षिण अमेरिकेच्या स्वातंत्र्याची आशा

### ( लाफायेत ह्यांस, १८१३ )

दाक्षिण अमेरिका स्वतंत्र व्हावी ह्या सदिच्छेंत मीहि सहभागी आहें. परकीयांच्या गुलामगिरींतून ते मुक्त होतील, ह्याबद्दल मला शंका नाहीं. पण मीं जो अभ्यास केला आहे त्यावरून तेथील जनता आपलें स्वातंत्र्य टिकवून ठेवील असा विश्वास मला वाटत नाहीं. त्यांचा समाज अज्ञानाच्या अंधःकारांत बुडून गेला आहे व त्यांच्यावर जुलूम व अंधश्रद्धा ह्यांनीं जबरदस्त परि-णाम केला आहे. त्यांचे धर्मगुरु त्यांना आपल्या मनाप्रमाणें वाटेल तें करायला लावतात व जरी त्यांच्यांत कांहीं लायक पुढारी असले तरी जनता शहाणी असल्याशिवाय तिच्याशीं ते एकनिष्ठ राहाणार नाहींत. त्यामुळें अनेक प्रांतांत लष्करी हुकूमशाही निर्माण होईल असें मला वाटतें. अशांचें संघराज्य बनूं शकणार नाहीं. राजांचें प्रजासत्ताक बनणें अशक्य असतें. पण त्यांच्यांत भविष्यकाळीं आपसांत होणाऱ्या लढायांमुळें व भांडणांमुळें जनतेला त्यांना क्रियाशील बनवावें लागेल व आपलीं धोरणें अंमलांत आणण्याच्या कार्यांत तिला सहभागी करून घ्यावें लागेल. त्यांच्या मनांत अखेरीस प्रकाश पडेल व आपला आदर्श समोर ठेवून व आपल्या उदाहरणावरून स्फूर्ति व मार्गदर्शन घेऊन ते स्वयंशासनास अखेरीस पात्र ठरतील. त्यांच्याबद्दल जास्तींत जास्त एवढीच आशा मी ठेवूं शकतों. कावेबाजपणाच्या आहारीं न जातां अज्ञान आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवूं शकेल हें निसर्गाच्या नियमाविरुद्ध आहे असें मी मानतों.

## युरोपांतील राष्ट्रांना अमेरिकन भू-भागाबाहेर ठेवा

### ( डॉ. क्रॉफर्ड ह्यांस, १८१२ )

युरोपांतील राष्ट्रें एकमेकांविरुद्ध टपून बसावींत, व त्यामुळें आत्मरक्षणासाठीं त्यांना त्यांचें सर्व सैन्य स्वदेशांतच ठेवावें लागून पृथ्वीच्या इतर भागांतील शांततेचा भंग होऊं नये अशी आपण खास प्रार्थना केली पाहिजे. आपल्या अर्धभूगोलाचा कायदा अंमलांत आणण्याइतके आपण बलवान् झालों कीं अटलांटिक महासागराच्या मध्यावरून जाणारें याम्योत्तरवृत्त हें युद्ध व शांतता विभागणारी रेषा असल्याचें आपण ठरवूं व त्या रेषेच्या आपल्याकडील बाजूला कोणतेंहि युद्धकृत्य होऊं देणार नाहीं.

### ( व्हॉन हम्बोल्ट ह्यांस, १८१३ )

धर्मगुरूंचें वर्चस्व ज्या समाजांत आहे अशा समाजानें स्वतंत्र सरकार स्थापन केल्याचें इतिहासांत एकहि उदाहरण नाहीं...न्यू-स्पेन व अमेरिका ह्यांचा शेजार असल्यानें व त्यामुळें त्यांचे एकमेकांशीं संबंध येतील त्यामुळें त्यांच्या उच्चवर्गीय नागरिकांना शिक्षण मिळेल व खालच्या वर्गापुढें ते आदर्श राहतील. मेक्सिकोला...आपली प्रगति दक्षिणेंतील प्रांतांपेक्षां अधिक अनुकूल स्थितींत करून घेतां येईल. दक्षिण प्रांतांत शेवटीं लष्करी एकतंत्री कारभार प्रस्थापित होईल अशी मला भीति वाटते. त्यांच्या समाजांत असलेले जातिभेद, आपसांतील त्यांचे हेवेदावे, त्यांच्यांतील भयंकर अज्ञान व धर्मवेड, ह्यांचा कावेबाज पुढारी गैरफायदा घेतील व प्रत्येक समाजाचा दुसऱ्या समाजाला गुलाम बनविण्यासाठीं उपयोग केला जाईल. ...पण अखेरीस त्यांच्यावर कसल्याहि प्रकारच्या शासनव्यवस्थेचें वर्चस्व असलें तरी तीं सर्व सरकारें अमेरिकन असतील व युरोपांत सतत चालू असलेल्या भांडणांत त्यांना फसवूं दिलें जाणार नाहीं.

युरोपियन राष्ट्रांनीं पृथ्वीचा निराळा भाग व्यापला आहे, त्यांच्या स्थानामुळें त्यांचे रीतिरिवाज निराळे आहेत, त्यांचे जे हितसंबंध आहेत त्यांत आपण कधींहि पडावयाचें नाहीं असें आपलें धोरण आहे. अमेरिकेला स्वतःला एक अर्ध-भूगोल मिळाला आहे. तिचे स्वतःचे हितसंबंध स्वतंत्र राखले गेले पाहिजेत व युरोपांतील हितसंबंधांपेक्षां अमेरिकेचे हितसंबंध

कमी महत्त्वाचे मानले जाऊं नयेत. पृथ्वीच्या इतर भागांत युद्धाचा वणवा पेटला तरी त्याच्या ठिणग्या समुद्र पार करून आपल्याकडे येऊं नयेत अशी व्यवस्था आपण अमेरिकेला निसर्गानें ज्या सुरक्षित स्थळीं ठेवलें आहे त्याचा फायदा घेऊन करावी. आम्ही असेंच धोरण ठेवूं. पन्नास वर्षांत अमेरिकेची लोकसंख्या पांच कोटी होईल* व पन्नास वर्षें तर कशींहि निघून जातील.

## सर्व अमेरिकनांची एकी आवश्यक आहे

**(एका मित्रास (?), १८२०:**
N. Y. Pub. Lib., Ms, IV, 490)

अमेरिकेंतील सर्व राष्ट्रांत बंधुभावाचे संबंध असावेत अशी माझी इच्छा आहे. व अमेरिकन धोरण ठरविण्यांत त्यांनीं एकत्र यावें व तें धोरण युरोपच्या धोरणापेक्षां निराळें असावें व त्याचा युरोपशीं संबंध नसावा. आमचे गोलार्ध विभागणाऱ्या सागरावर, आम्हांला विभागणारी रेषा असणारें यामोत्तरवृत्त आम्हांला लवकरच लागेल. त्या वृत्ताच्या आपल्याकडील बाजूला युरोपियन वारा व पलीकडील भागांत अमेरिकन वारा ऐकायला येऊं नये, आणि जेव्हां युरोप युद्धाच्या खाईंत लोटलें जाईल तेव्हां आपल्या प्रदेशांत सर्वत्र शांतता असेल. युरोपांतील लोकसंख्या अधिक वाढत असल्यानें व सर्व लोकांना राहावयास पुरेशी जागा नसल्यामुळें, लोकसंख्या आटोक्यांत ठेवण्यासाठीं त्यांना युद्धें हवीं असतात असें ते म्हणतात. येथें भरपूर जागा आहे, लोकसंख्या विरळ आहे व जनसंख्या वाढविण्यासाठीं शांततेची गरज आहे.जमीन भरपूर असल्यानें ह्या नव्या जन्मलेल्या लोकांना तींतून अन्न व सुख मिळतें.त्यामुळें तेथील व येथील समाजांचीं तत्त्वें एकमेकांपासून सर्वस्वी भिन्न आहेत. व दक्षिण व उत्तर अमेरिकांच्या सागरांवर व भूमीवर युरोपियन राष्ट्रांच्या भयंकर स्पर्धेला आळा घालण्याचें आवश्यक धोरण कोणताहि देशभक्त अमेरिकन आपल्या नजरेआड करणार

---

* जेफर्सनचें भविष्य जवळ जवळ खरें ठरलें. १८७० मध्यें अमेरिकेची लोकसंख्या ४ कोटी होती, १८८० मध्यें ५ कोटी व १९२० मध्यें ती १२ कोटींपेक्षां अधिक होती. — **संपादक.**

नाहीं अशी मला आशा वाटते...युनायटेड स्टेट्स् व ब्राझिल ह्यांच्या नौका एकाच कुटुंबांतील बंधुत्वाच्या भावनेनें आणि एकाच हिताकडे लक्ष ठेवून एकत्र जात असलेल्या पाहून मला फार आनंद वाटेल.

## अमेरिकेनें स्पॅनिश प्रांत घ्यावेत का ?

### (प्रेसिडेंट मन्रो ह्यांस, १८२३)

पण आपण स्वतःला प्रथम एक प्रश्न विचारला पाहिजे. आमच्या संघराज्याला जोडून घेण्यासाठीं आम्ही एक किंवा अधिक स्पॅनिश प्रांत घेऊं इच्छितों का ? आमच्या राज्यांत समाविष्ट करून घेण्यास चांगला देश ह्या दृष्टीनें मीं क्युबाकडे कधींच पाहिलें नाहीं हें मी कबूल करतों.

फ्लोरिडा पॉइंट व क्युबा बेट ह्यांच्यामुळें मेक्सिकोच्या आखातावर व त्याच्या सीमांवर असलेल्या देशावर व ज्या देशांतील नद्या ह्या आखातास मिळतात त्या देशांवर आपल्याला जें नियंत्रण ठेवतां येईल, त्यामुळें राजकीय दृष्ट्या आपल्याला अधिक स्वास्थ्य लाभेल. तरीहि, क्यूबाची सम्मति असली तरी, असा ताबा आपल्याला युद्धाशिवाय मिळणार नाहीं हें मला कळत असल्यानें व क्यूबाचें स्वातंत्र्य हें आमचें दुसरें ध्येय असल्यानें व तें (स्वातंत्र्य विशेषतः, इंग्लंडपासून मिळणारें स्वातंत्र्य) युद्धाशिवाय मिळणें शक्य असल्यानें, माझी पहिली इच्छा, भविष्यकाळीं पुन्हा संधि मिळेल अशा आशेवर, बाजूला सारण्यास मी मुळींच मागेंपुढें पाहाणार नाहीं व युद्ध करून आणि त्या देशाचें शत्रुत्व पत्करून तो देश आपल्याला जोडण्यापेक्षां इंग्लंडशीं शांततेचे व मैत्रीचे संबंध ठेवून क्युबाचें स्वातंत्र्य मी स्वीकारीन.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों० दि० ....................

# परिशिष्ट १

## सिद्धतत्त्वें आणि नीतिवचनें

जेफर्सननें प्रतिपादलेलीं तत्त्वें म्हणजे स्वतंत्र समाजाला मिळालेलीं सिद्धतत्त्वें आणि नीतिवचनें होत.

—ॲब्राहाम लिंकन, १८५९

### शिक्षण

मनुष्यजातींत ज्ञानाचा प्रसार व्हावा अशी प्रामाणिक इच्छा माझ्या-इतकी दुसऱ्या कोणाला नसेल आणि स्वतंत्र व सुव्यवस्था राखणाऱ्या सर-कारला बळकटी आणण्यासाठीं त्याचा किती उपयोग होईल ह्याबद्दल मला जेवढा विश्वास वाटतो, तेवढा दुसऱ्या कोणालाहि वाटत नसेल. ( ह्यू एल्. व्हाइट ह्यांस, १८१०.)

आजच्या सुसंस्कृत जगांत आपण अज्ञानीहि राहूं आणि स्वतंत्रहि राहूं, अशी जर एखाद्या राष्ट्राची अपेक्षा असेल तर जें भूतकाळांत कधीं झालें नाहीं व भविष्यकाळीं होणार नाहीं तें साध्य करण्याची अपेक्षा असें राष्ट्र ठेवीत आहे, असें म्हणावें लागेल. ( कर्नल यान्सी ह्यांस, १८१६.)

कांटेरी झाडांचें रूपांतर कधीं लतावेलींत होणार नाहीं; पण संस्कारांनीं त्यांचा बोचकपणा कमी करतां येईल व त्यांच्यांत सुधारणा

करून तीं उपयोगी बनवितां येतील. . .मानवी समाजांत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून जे प्रयत्न आज होत आहेत, त्यांमुळें मानवी वंशाच्या सुखांत भरपूर भर पडेल असें मला वाटतें. ( कॉर्नेलियस सी. ब्लाचली ह्यांस, १८२२. )

## समता

आमचे जे पूर्वज येथें आले ते कामगार होते, वकील नव्हते. ( राइट्स् ऑफ ब्रिटिश अमेरिका, १७७४ )

संपत्तीच्या आधारावर निर्माण होणारा उच्चवर्ग समाजाला अहित-कारक ठरतो; हितकारक नव्हे. ( आत्मचरित्र, १८२१ )

माणसांत निसर्गतः उच्चवर्ग आहे. हा उच्चवर्ग शील व बुद्धि ह्यांवर आधारलेला असतो... हा नैसर्गिक वर्गभेद म्हणजे निसर्गानें मानवाला दिलेली एक मूल्यवान् देणगी आहे असें मी समजतों. ह्या देणगीचा उद्देश समाजाला ज्ञान मिळावें, त्यांच्यांत परस्परांबद्दल विश्वास निर्माण व्हावा व समाजनियंत्रण व्यवस्थित व्हावें हा आहे. ( ॲडाम्स ह्यांस, १८१३ )

पुढील सत्यें आम्ही स्वयंसिद्ध मानतों : सर्व माणसें जन्मतः समान असतात; जन्मतःच ईश्वर त्यांना हक्क देतो व ते हक्क केव्हांहि हिरावून घेतां येत नाहींत. अशा हक्कांत जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि जीवन सुखी करण्याचा हक्क हे हक्क येतात. ( स्वातंत्र्याचा जाहीरनामा, १७७६ )

स्वभावधर्माप्रमाणें माणसांचे दोन वर्ग पडतात : ज्यांना समाजाची भीति वाटते व जे समाजाबद्दल साशंक असतात... आणि जे स्वतःला समाजापैकीं एक समजतात, समाजावर विश्वास टाकतात व सार्वजनिक हित समाजाच्या हातांत सर्वांत अधिक सुरक्षित राहातें व समाज त्या हिताचा सर्वांत प्रामाणिक रक्षणकर्ता आहे, अशी मनापासून श्रद्धा ठेवून समाजावर प्रेम करतात. ( एच्. ली ह्यांस, १८२४ )

आपल्या कुटुंबाच्या संपत्तीच्या आधारावर जगून काम करण्यांत अपमान मानणाऱ्या व इतर माणसांच्या श्रमांचें जें फळ वास्तविक समाजांतल्या गरिबांच्या उपयोगी पडावें तें स्वतः खाऊन हीन जीवन जगणाऱ्या आळशांपेक्षां, कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला मानवी समाजांत अधिक उच्च स्थान आहे. ( डी म्युनिअर ह्यांस, १७८६. )

'तूं माझा भाऊ आहेस' असें सांगून प्रत्येक माणसापुढें माझ्या स्नेहाचा आणि एकीचा हात पुढें करावयास मी तयार आहें. ( ब्रेझर ह्यांस १८१९ : N. Y. Pub. Lib., Ms, V, 142. )

## परराष्ट्रीय संबंध

सर्व राष्ट्रांशीं व्यापारी संबंध ठेवावयाचे, पण कुठल्याहि गटांत सामील व्हावयाचें नाहीं हें आमचें ध्येय–धोरण असावें. ( टी. लोमॅक्स ह्यांस, १७९९ )

नवे तह करून युरोपांतील भांडणांत आपण गुंतावें, त्यांच्यांतील शक्तीचा समतोलपणा राखण्यासाठीं त्या कत्तलखान्यांत शिरावें, अथवा स्वातंत्र्याच्या तत्त्वांविरुद्ध युद्ध करणाऱ्या राजांच्या गोटांत शिरावें असें मला वाटत नाहीं. ( एल्ब्रिज गेरी ह्यांस, १७९९ )

अमेरिका खंड निसर्गानें अशा सुरक्षित जागीं वसविलें आहे कीं, त्यामुळें पृथ्वीच्या दुसऱ्या भागांत जरी युद्धाचा वणवा भडकला तरी त्याच्या ठिणग्या अमेरिकेला इतर जगापासून विभागणाऱ्या सागरावरून येऊन अमेरिकेपर्यंत पोंचूं नयेत. ( बॅरन व्हॉन हम्बोल्ट ह्यांस, १८१३ )

अखिल मानवजातीशीं स्नेहाचे आणि शांततेचे संबंध ठेवावेत हे आमचें सर्वांत शहाणपणाचें धोरण आहे. ( डयुमा ह्यांस, १७८६ )

सर्व राष्ट्रांशीं शांततेचे, व्यापारी आणि प्रामाणिक मैत्रीचे संबंध ठेवावयाचे; पण कुणाशींहि एकजुटीचे करार करून त्यांत अडकावयाचें नाहीं. ( पहिलें उद्घाटन, १८०१. )

## कायदे व राज्यघटना

कायदे करण्यापेक्षां ते अंमलांत आणणें अधिक महत्त्वाचें असतें. ( अर्नाउड ह्यांस, १७८९ )

शाश्वत राज्यघटना कोणत्याहि समाजाला बनवितां येत नाहीं किंवा शाश्वत कायदाहि नाहीं ( मॅडिसन ह्यांस, १७८९ )

हें यंत्र ( राज्यघटना ) आहे तशा स्थितींत माझ्या आयुष्यभर टिकेल व जे माझ्यानंतर येतील त्यांना आपल्या मनाप्रमाणें तें कसें दुरुस्त करून घ्यावें तें कळेल. ( प्लेझंटस् ह्यांस, १८२१ )

आपल्या अखिल राष्ट्रांतील ज्ञान एकत्र आणून अमेरिकेची राज्यघटना बनविली आहे. ( ए. मार्श ह्यांस, १८०१ : N. Y. Pub. Lib. MS, II, 84 )

विकारांच्या अथवा नैराश्याच्या आहारीं जाऊन लेखी राज्यघटनांचाहि भंग करण्यांत येत असला तरी ज्या तत्त्वाभोंवतीं समाजाला एकत्र होण्यासाठीं आवाहन देतां येईल अशीं तत्त्वें लेखी राज्यघटनेंतच मिळतात. आपल्या राजकीय पंथाची तात्त्विक चौकटहि जनतेला लेखी राज्यघटनेमुळें मिळते. ( डॉ. प्रीस्टले ह्यांस, १८०२ )

अमेरिकेची राज्यघटना म्हणजे स्वतंत्र राष्ट्रांनीं एकत्र येऊन केलेला करार होय. अशा बाबतींत सर्वत्र पाळण्यांत येणारे नियम ह्या करारालाहि लागू आहेत. ( एडवर्ड एव्हरेट ह्यांस, १८२६. )

ईश्वरानें आम्हांला जेव्हां जन्माला घातलें, तेव्हांच आम्हांला स्वातंत्र्यहि दिलें. पाशवी बल जीवित व स्वातंत्र्य नष्ट करूं शकेल; पण त्यांना एकमेकांपासून विभागूं शकणार नाहीं.

जो समाज स्वतंत्र आहे व ज्याला आपलें स्वातंत्र्य टिकवून धरावयाचें आहे, त्या समाजाला सशस्त्र नागरिक दल (मिलिशया) हें सर्वांत उत्तम रक्षक–साधन होय. ( आठवा वार्षिक संदेश, १८०८. )

नाविक दल आमच्या स्वातंत्र्यावर घाला घालूं शकणार नाहीं किंवा रक्तपाताचा प्रसंग आमच्यावर ओढवूं शकणार नाहीं; पण सैन्य मात्र हें दोन्ही करूं शकेल. ( मन्रो ह्यांस, १७८६. )

अत्यल्प स्वातंत्र्यामुळें होणाऱ्या दगदगीपेक्षां अतिस्वातंत्र्यानें होणारा उपद्रव सहन करायचास मी तयार आहें. ( ए. स्टुअर्ट ह्यांस, १७९१. )

माझी उपाययोजना चुकली असेल; पण शक्य असेल त्या मार्गानें सार्वजनिक स्वातंत्र्यास बळकटी आणण्याच्या व बहुसंख्यांच्या श्रमावर जगून तें स्वातंत्र्य आपल्या हातीं ठेवून गोंधळ घालणाऱ्या लोकांपासून तें दूर ठेवण्याच्या माझ्या उद्दिष्टांपासून मी कधींहि ढळणार नाहीं. ( जज टायलर ह्यांस, १८०४ N. Y. Pub. Lib, Ms. III 33. )

स्वातंत्र्याचा हा गोल आतां गतिमान् झाला असून, तो सर्व पृथ्वी-भोंवतीं प्रदक्षिणा घालील, निदान पृथ्वीच्या ज्या भागांत सुधारणेचा प्रकाश पोंचला आहे त्या भागांत तरी तो भ्रमण करील अशी माझी श्रद्धा आहे. कारण ज्ञान व स्वातंत्र्य हीं एकमेकांच्या हातांत हात घालून भ्रमण करतात. ( टी. कॉक्स ह्यांस, १७९५. )

सरकारच्या स्वाधीन करूं नयेत असे कांहीं हक्क असतात आणि तरीहि अशा हक्कांवर सरकार सतत आक्रमण करीत असल्याचें आढळतें. विचार-

स्वातंत्र्य, भाषण व लेखनमार्गें विचार प्रदर्शित करण्याचें स्वातंत्र्य, व्यापार-स्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य हे ते हक्क होत. ( हंफ्रेज ह्यांस, १७८९ )

स्वातंत्र्याचें मैदान इंच–इंच करून काबीज करावें लागतें. वेळोवेळीं जें आपल्या हातीं पडेल त्याबद्दल समाधान मानून आणखी भूमि काबीज करण्यासाठीं आपण सतत पुढें पाऊल टाकलें पाहिजे. स्वहितासाठींसुद्धां माणसांना कार्यप्रवृत्त करण्यास वेळ लागतो. ( क्रे ह्यांस, १७९० )

स्वातंत्र्य आकुंचित होत जावें आणि शासनसंस्थेचें क्षेत्र वाढत राहावें ही नैसर्गिक प्रगति होय. (कॅरिंग्टन ह्यांस, १७८८.)

मनुष्याचें स्वातंत्र्य आणि सुख... हीं कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारचीं एकमेव उद्दिष्टें होत. ( कॉसियझको ह्यांस, १८१०. )

माणसाच्या शरीरापेक्षां त्याच्या मनावर संस्कार करणें हा त्याला सुधारण्याचा अधिक व्यवहार्य मार्ग होय. ( पेन ह्यांस, १७९२. )

मत असणें आणि योग्य मार्गानें तें राखणें हा माझ्या दृष्टीनें केव्हांहि गुन्हा होणार नाहीं. किंवा त्यामुळें व्यक्तीचें अहित होणार नाहीं. ( सॅम्युएल ॲडाम्स ह्यांस, १८०१. )

स्वातंत्र्याच्या उसळणाऱ्या सागरापेक्षां एकतंत्री कारभाराची शांतता... मित्रीं माणसें अधिक पसंत करतात. ( माझी ह्यांस, १७९६. )

माझ्या मतांपेक्षां निराळीं मतें व्यक्त करण्याचा दुसऱ्याचा हक्क मी जास्तींत जास्त मोकळेपणानें स्वीकारतों. ( ॲबिगेल ॲडाम्स ह्यांस, १८०४. )

माझ्या मतांपेक्षां निराळें मत एखाद्यानें व्यक्त केलें, कीं मी स्वतःला सांगतों, ‘ त्याला आपलें मत व्यक्त करण्याचा माझ्याइतकाच हक्क आहे.

मीं त्याला कां हरकत घ्यावी. त्याच्या चुकीमुळें माझें कांहींच नुकसान होत नाहीं. आणि सर्वांशीं वाद घालून त्यांना माझें मत स्वीकारणें भाग पाडायला मी काय डॉन क्विक्झोट आहें?' (थॉमस जेफर्सन रँडॉल्फ ह्यांस, १८०८.)

धर्मगुरूंनीं बुजबुजलेल्या समाजाचें सरकार स्वतंत्र राहिल्याचें इतिहासांत एकहि उदाहरण नाहीं, अशी माझी खात्री आहे. (बॅरन व्हॉन हॅम्बोल्ट ह्यांस, १८१३.)

(पुस्तकांतील) विधानें खोटीं असलीं तर तसें सिद्ध करा; विचार तर्कदुष्ट असले तर ते खोडून काढा; पण कृपा करून दोन्ही बाजू ऐकूं द्या. (डुफीफ ह्यांस, १८१४)

स्वातंत्र्याच्या ह्या उफाळलेल्या सागरांत सतत लाटा उसळत असतात. (लाफायेट ह्यांस, १८२०.)

समाजांतील बहुतेक लोक कांहीं आपल्या पाठीवर खोगीर घेऊन जन्माला येत नाहींत, किंवा ईश्वरकृपेनें आणि कायदेशीर हक्क म्हणून ह्या बहुसंख्यांच्या पाठीवर स्वार होण्यासाठीं कांहीं सुदैवी अल्पसंख्य पायांत बूट-पाटलोण चढवून जन्मत नाहींत. (वेटमन ह्यांस, १८२६.)

ज्यांना समाजाची भीति वाटते त्यांच्यापैकीं मी नाहीं. आपलें स्वातंत्र्य सतत टिकण्यासाठीं त्यांच्यावरच अवलंबून राहावयाचें आहे; श्रीमंतांवर नव्हे. (सॅम्युअल कर्शेवल ह्यांस, १८१६.)

जें कांहीं मानवी स्वातंत्र्य शिल्लक राहिलें असेल त्याचे एकमेव रक्षक म्हणून, स्वहितासाठीं, भाविष्यकाळासाठीं आणि अखिल मानवजातीच्या हितासाठीं, सर्व जगाला हादरून सोडणाऱ्या ह्या काळांत आपल्या पवित्र

मातृभूमीचें रक्षण करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे. ( न्यूयॉर्क राज्याच्या विधानसभेपुढें, १८०९. )

मतावर दडपण टाका : मग न्यायाधीश नेमाल तरी कुणाला ? ज्यांच्या हातून सहज चुका होतात त्यांना, का जे व्यक्तिगत किंवा सार्वजनिक स्वार्थासाठीं विकाराधीन होतात त्यांना ? ( नोट्स् ऑन व्हर्जिनिया, क्वेरी १७. )

## राजसत्ता

कुठल्याहि राजाच्या वंशांत, वीस पिढ्यांत, सामान्य बुद्धीचा एकापेक्षां जास्त मनुष्य जन्माला आलेला नाहीं. ( हॉकिन्स ह्यांस, १७८७. )

आपल्या राज्यघटनेंतील सर्व दोष लक्षांत घेऊनहि... आपल्या सरकारची युरोपांतील सरकारांशीं तुलना करणें म्हणजे स्वर्गाशीं नरकाची तुलना करणें होय. ( जोसेफ जोन्स ह्यांस, १७८७. )

ह्या देशांतील ( युरोपांतील ) क्वचित् एखादी आपत्ति सोडली तर बहुतेकांचें मूळ त्यांच्या राजसत्तेंत आहे. ( वॉशिंग्टन ह्यांस, १७८८. )

अमेरिकेंतल्या चर्चच्या कपडे ठेवायच्या खोलीचा रक्षक म्हणूनसुद्धां निवडायची ज्याची बुद्धि वा लायकी आहे, असा एकहि राजा युरोपांत नाहीं. ( वॉशिंग्टन ह्यांस, १७८८. )

प्रजासत्ताकाचा कारभार चालविण्यासाठीं राजसत्तावाद्यांची नेमणूक करणें म्हणजे निरीश्वरवादी माणसाला मंदिराचा पुजारी बनविण्यासारखेंच आहे. ( जनरल गेट्स् ह्यांस, १८१० : N. Y. Pub. Lib. Ms. II, 6. )

राजांचें प्रजासत्ताक अशक्य आहे. ( लाफायेत ह्यांस, १८१३, N. Y. Pub. Lib. Ms. IV. 214-15 )

एक असत्य विकत घेणें म्हणजे दुसरें शोधून काढण्यासाठीं आगाऊ रक्कम देणें होय. (डब्ल्यू. बर्वेल ह्यांस, १८०८ : N. Y. Pub, Lib., Ms, IV, 45.)

ज्याला सत्याची भीति वाटत नाहीं, त्याला असत्याची भीति वाटायचें कांहींच कारण नाहीं. (लोगान ह्यांस, १८१६, N. Y. Pub. Lib., Ms, IV, 375.)

सद्‌गुण आणि आस्था ही अविभाज्य असतात. (लोगन ह्यांस, १८१६, N. Y. Pub. Lib., Ms, IV, 411.)

कांचेच्या घरांत रहाणाऱ्यांनीं दगडफेंकीची लढाई सुरू करूं नये. (आर. वॉल्श ह्यांस, १८२०.)

प्रत्येक कार्यासाठीं योग्य वेळा असतात : चढाईसाठीं आणि माघार घेण्यासाठीं; विश्रांति घेण्यासाठीं आणि काम करण्यासाठीं (श्वेट ह्यांस, १८२१ : N. Y. Pub. Lib., Ms, V, 38.)

तरुण माणसाच्या वागणुकीसाठीं नीतिवचनें :*

(१) पैसे मिळण्यापूर्वी ते खर्चू नका.

(२) ज्याची तुम्हांला आवश्यकता नाहीं, तें केवळ स्वस्त मिळतें म्हणून विकत घेऊं नका; शेवटीं तुम्हांला तें महागच पडेल.

(३) अभिमानाची किंमत भूक, तहान आणि थंडीवाऱ्यापेक्षां जास्त पडते.

---

* "वागणुकीसंबंधींच्या नियमांचें एक पुडकें मी पाठवीत आहें. आपल्या संग्रहांत त्याला मोझेसच्या दहा आज्ञांच्या खालोखाल स्थान मिळावें."

(४) जें आज करतां येईल तें उद्यांवर ढकलूं नका.

(५) जें तुम्हांला स्वतःला करतां येतें त्यासाठीं दुसऱ्याला त्रास देऊं नका.

(६) तुम्हांला वाटेल तसा विचार करा व दुसऱ्यालाहि तसेंच करूं द्या; म्हणजे मतभेद राहाणार नाहींत.

(७) कधींहि न घडलेल्या गोष्टींबद्दलहि आपण कितीतरी दुःख करीत बसतों.

(८) सुलभ मार्गानें प्रत्येक अडचण सोडवायला लागा.

(९) रागावलां असलात तर बोलायला सुरुवात करण्याआधीं १० अंक मोजा. राग फारच आला असेल तर १०० अंक मोजा.

(१०) जेवतांना कमी खाल्ल्याबद्दल किंवा कमी प्यायल्याबद्दल कधीं पश्चात्ताप करावा लागत नाहीं हें लक्षांत ठेवा. (चार्ल्स क्ले ह्यांस, १८१७.)

सार्वजनिक जबाबदारीचें काम स्वीकारलें म्हणजे फायदाहि होत नाहीं, कीं सुखहि लागत नाहीं. आपल्या कुटुंबापासून व स्वतःच्या कामापासून होणारी ती एक सन्मान्य हद्दपारी होय. (एफ्. विलिस ह्यांस, १७९०.)

माणसांवर सत्ता गाजविण्याची मला महत्त्वाकांक्षा नाहीं. निरपेक्ष बुद्धीनें करावें लागणारें तें दुःखदायक कार्य आहे. (ॲडाम्स ह्यांस, १७९६.)

ख्रिश्चन माणसांप्रमाणें अत्याचार व कुचाळकी सहन करणें हें आपलें कर्तव्यच आहे, हें देशभक्तानें लक्षांत ठेवलें पाहिजे. (जज सलिव्हन ह्यांस, १८०५.)

सरकारांतील दुय्यम स्थान हें सोपें आणि मानाचें आहे; सर्वोच्च स्थान म्हणजे वैभवशाली दुःख होय. (एल्ब्रिज गेरी ह्यांस, १७९७.)

ज्या राष्ट्रांतील जीवन शांतपणें व सुखानें व्यतीत होतें व काळाच्या

इतिहासांत ज्याची नोंद घ्यावी लागत नाहीं, तें राष्ट्र धन्य होय. माझ्या देशाला हें भाग्य लाभावें अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. ( कॉम्ते डियोदाती ह्यांस, १८०७. )

आनंदी वृत्ति मी सर्वांत अधिक मोलाची मानतों. ( डॉक्टर रश ह्यांस, १८०८. )

आपल्या दौर्बल्याची जाणीव नसण्यानें तें अधिक उघडें पडतें. ( डॉक्टर रश ह्यांस, १८११. )

व्यापाऱ्यांना मातृभूमि नसते. ( होरॉशियो जी स्पाफोर्ड ह्यांस, १८१४. )

राष्ट्राविरुद्ध केलेला एकहि गुन्हा शेवटीं पचत नाहीं. ( डी मार्बोइस ह्यांस, १८१७. )

स्वप्नें स्वस्त असलीं तर आशेच्या आनंदाचीं स्वप्नें निराशेच्या दुःखा-इतकींच स्वस्त पण अधिक सुखद असतात, असें माझें तत्त्वज्ञान आहे. ( डी मार्बोइस ह्यांस, १८१७. )

आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग धर्मदाय कार्यासाठीं खर्च करणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे असें मी समजतों. ( डॉ. रॉजर्स व डॉ. स्लॉटर ह्यांस, १८०६ )

## नीग्रोंची गुलामगिरी

गुलामीच्या अवस्थेंत जर मनुष्य चोर झाला नाहीं तर त्याची नीतिमत्ता बरीच वरच्या दर्जाची असली पाहिजे. ज्याला आपली मालमत्ता ठेवण्यास कायद्यानें प्रतिबंध केला आहे, त्याला मालमत्ता ही शारीरिक

बळाखेरीज इतर कुठल्याहि तत्त्वावर आधारलेली असते, ह्याची कल्पना येणें कठीण. ( ई. बॅनक्रॉफ्ट ह्यांस, १७८९ )

इतर वर्णीय लोकांप्रमाणेंच आपल्या कृष्णवर्णीय बंधूंना ईश्वरानें बुद्धिमत्ता दिली आहे ह्याचा पुरावा मिळावा अशी माझ्याइतकी इच्छा जगांत क्वचित्‌च दुसऱ्या कुणाला असेल. ( बी. बॅनेकर ह्यांस, १७९१ )

ह्या लोकांची मागणी न्यायप्रियतेच्या व देशप्रेमाच्या दृष्टीनें अगदीं योग्य आहे. त्यांची ती मागणी आतांपर्यंत अयशस्वी झाली ह्याचा नैतिक दोष आपल्यावर आहे.... पण काळाच्या पावलांबरोबर मुक्तिदिन जवळ येत आहे. ( ई. कोल्स ह्यांस, १८१४ )

मालक व गुलाम ह्यांच्यांतील संबंध म्हणजे एका बाजूनें तुफान उसळणाऱ्या जुलमाचे आणि दुसऱ्या बाजूला त्या जुलमापुढें मान तुकवून अपमानित घृणास्पद जीवन जगणाऱ्यांचे संबंध होत. ( नोट्स् ऑन व्हर्जिनिया, क्वेरी १८. )

## राजकीय अर्थशास्त्र

आपल्या आर्थिक भरभराटीचे आधारस्तंभ असलेल्या शेती, कारखानदारी, व्यापार व नौकानयन ह्या क्षेत्रांना स्वतःची भरभराट करून घेण्याचें स्वातंत्र्य दिल्यास तीं अधिक मजबूत होतात. ( पहिला वार्षिक संदेश, १८०१ )

ही पृथ्वी तीवर जीवंत असणाऱ्यांची आहे, मृतांची नव्हे. ( मॅडिसन ह्यांस, १७८९. )

शेतकरी, कारखानदार, व्यापारी व समुद्रवाहनें चालविणारे ह्यांचे हितसंबंध एकमेकांत असे गुंतलेले असतात कीं, त्या सर्वांना योग्य स्थान देणें... हें वस्तुस्थितीची योग्य माहिती असणें व निश्चित तत्त्वानुसार काम करणें

ह्यावर अवलंबून आहे. असा मेळ क्वचित्‌च जमतो. ( लिथगो ह्यांस, १८०५, N. Y. Pub. Lib. Ms. III, 217 )

आपण काढलेल्या कर्जांचा बोजा घेऊन भविष्याच्या पाठीवर स्वार होण्याचा आम्हांला अधिकार नाहीं, असें आम्हीं समजतों. ( (?) १८१३ : N. Y. Pub. Lib. Ms. IV 194. )

आपल्या आयुष्यभरांत व्याज व मुद्दल परत करतां येतील एवढेंच कर्ज काढणें हा सुरक्षितपणाचा कायदेशीर व प्रामाणिकपणाचा एकमेव (पैसा उभा करण्याचा)मार्ग होय. ((?) १८१३ : N.Y.Pub. Lib. Ms.IV,196)

इतर राष्ट्रांच्या भरभराटीबरोबरच प्रत्येक राष्ट्र भरभराटीस येतें हा एक प्रकारचा नैसर्गिक नियम आहे. ( टिकनोर ह्यांस, १८१६ N. Y. Pub. Lib. Ms. IV, 339. )

आपली कर्जें आपल्या हयातींतच फेडावींत ही जबाबदारी प्रत्येक पिढीला आहे. हें तत्त्व जर पाळलें गेलें तर जगांतलीं अर्धी युद्धें टळतील. ( डेस्टट डी ट्रेसी ह्यांस, १८२०. )

कर्ज आणि क्रांति हीं कारण व परिणाम ह्या नात्यानें अविभाज्य आहेत. ( सॅम्युएल स्मिथ ह्यांस, १८२१. )

द्राक्षाच्या दारूवर ( वाइन ) कर बसविणें म्हणजे चैनीवर कर बसविणें होय, हें म्हणणें मला चुकीचें वाटतें; उलट लोकांच्या आरोग्यावरीलच हा कर आहे असें समजलें पाहिजे. फक्त श्रीमंतांनींच अशी दारू प्यावी व मध्यमवर्गीय व गरीब जनतेनें व्हिस्कीचें विष प्यावें,असा हा वैधानिक जाहीरनामाच आहे. व्हिस्कीमुळें ह्या वर्गाची मोठ्या प्रमाणांत हानि होत आहे. ( क्रॉफर्ड ह्यांस, १८१८. )

मालमत्तेची पोटवांटणी करावयाचे कितीहि मार्ग विधानसभेनें शोधून

काढले तरी ते अपुरेच पडतील... माणसानें कष्ट करावे व जगावें म्हणून सर्व मानवांच्या उपयोगासाठीं पृथ्वीवरील भूमि आहे... छोटे जमीनदार हे राष्ट्राचे मूल्यवान् घटक होत. ( मॅडिसन ह्यांस, १७८५. )

आपल्या सरकारी यंत्रणेला अधोगतीला नेणारे विचार व मार्ग तींत शिरूं नयेत म्हणून ( सरकारला ) सार्वजानिक खर्चाचें प्रमाण कमींत कमी ठेवावयास भाग पाडणें हा सर्वांत जास्त सुरक्षित मार्ग होय. ( गॅलाटिन ह्यांस, १८०४ )

जर सार्वजानिक कर्जाचा डोंगर पुन्हा प्रचंड झाला... तर इंग्लंडप्रमाणेंच आपल्या वांट्यालाहि कर्ज, लांचखाऊपणा, अधोगति व शेवटीं क्रांति ही परिणामपरंपरा येईल. ( गॅलाटिन ह्यांस, १८०९. )

ज्याच्याजवळ कर्जाऊ देण्यासाठीं पैसे आहेत, तो सोडून इतर कोणासहि सावकारीचा धंदा करण्याचा नैसर्गिक हक्क नाहीं. ( जॉन डब्ल्यू. एपेस ह्यांस, १८१३. )

प्रजासत्ताकांत काटकसरीला मी पहिल्या व सर्वांत महत्त्वाच्या गुणाचें स्थान देतों आणि कर्ज हा सर्वांत मोठा धोका मानतों. ( गव्हर्नर प्लुमर ह्यांस, १८१६. )

कांहीं लोक ईश्वराचे लाडके आहेत असें मानलें व त्या लोकांच्या हृदयांत ईश्वरानें विशेष सद्गुणांचा भरपूर वैशिष्ट्यपूर्ण सांठा ठेवलेला असेल, तर जमीन कसण्याचे कष्ट जे करतात तेच ईश्वराचे असे लाडके लोक होत. ( नोट्स् ऑन व्हर्जिनिया, क्वेरी १९. )

## लोकप्रिय सरकार

जनतेच्या चांगुलपणावर व जनतेच्या पुढाऱ्यांच्या प्रामाणिकपणावर

माझा इतका विश्वास आहे कीं, कोणत्याहि कारणांसाठीं कारभारांत अमर्याद गोंधळ ते चालू देतील, असें मला वाटत नाहीं. ( ड्युमा ह्यांस, १७८८. )

जेव्हां जनतेला पूर्ण ज्ञान असतें तेव्हां स्वयंशासनाच्या बाबतींत तिच्यावर विश्वास टाकावयास हरकत नाहीं; जनतेचें लक्ष वेधून घेण्याइतका कारभारांत जेव्हां गोंधळ माजतो तेव्हां जनता तो सुधारील ह्याबाबत तिच्यावर विश्वास टाकावयास हरकत नाहीं. ( डॉ. प्राइस ह्यांस, १७८९. )

आपल्या राज्यघटनेंतील तत्त्वांना सरकारला बांधून ठेवण्यासाठीं माणसानें शोधून काढलेला एकमेव मार्ग म्हणजे ज्यूरींच्या साहाय्यानें खटले चालविणें. ( थॉमस पेन ह्यांस, १७८९. )

दीर्घकाल सातत्यानें व प्रामाणिकपणें राज्यकारभार चालविण्यासाठीं... राज्यकारभाराच्या प्रत्येक खात्यांत जनतेला वाव देणें हा एकमेव मार्ग आहे. ( अर्नाउड ह्यांस, १७८९. )

शासनाधिकार असलेल्या लोकांकडून युद्ध पुकारण्याचा अधिकार काढून घेऊन तो विधानसभेला देऊन आपण युद्धाच्या कुत्र्यावर परिणामकारक बंधन टाकलेंच आहे. जे खर्च करतात त्यांच्याऐवजीं ज्यांचा पैसा खर्च होतो, त्यांच्या हातांत हा अधिकार आला आहे. ( मॅडिसन ह्यांस, १७८९. )

स्वतंत्र सरकारला चालना देणारें जबाबदारी हें फार सामर्थ्यवान् एंजिन आहे. ( ए. स्टुअर्ट ह्यांस, १७९१. )

आपसांतील पक्षभेद मिटवून एकजिनसी समाज बनविल्यानेंच आपण देशाचें सर्वांत अधिक हित करूं शकूं. ( जे. डिकिन्सन, १८०१ : N. Y. Pub. Lib. Ms. II. 67. )

जनतेच्या संमतीनें तिच्या हातांत हातकड्या अडकविण्याची संधि आपल्यामागून येणाऱ्या लोकांना मिळूं नये म्हणून सत्यदर्शन आणि प्रत्येक

बाबतींत विचारपूर्वक निर्णय घेण्याची पक्की संवय ह्या दोन सर्वांत परिणामकारक असलेल्या हातकड्यांत आपण त्यांचे हात अडकवून ठेवूं या. ( जज टायलर ह्यांस, १८०४. N. Y. Pub. Lib. Ms. III, 34. )

करतां येईल तेवढें देशाचें हित ज्याला करावयाचें असेल, त्यानें बहुसंख्य जनतेला विचारांच्या मार्गानें नेण्यांत यश मिळेपर्यंत तिच्या गैरसमजुतीहि मुकाट्यानें स्वीकारल्या पाहिजेत. ( सीझर रॅाडनी ह्यांस, १८०५, N. Y. Pub. Lib. Ms. III 164–65. )

मला वाटतें कीं, आपल्या शासनकारभारांत वाजवीपेक्षां जास्त माणसें आहेत; परान्नपुष्टांची संख्या मर्यादेबाहेर आहे. ( डब्ल्यू. लडलो ह्यांस, १८२४. )

जनतेची इच्छा हाच कुठल्याहि सरकारचा एकमेव कायदेशीर पाया होय. ( बी. वेरिंग ह्यांस, १८०१. )

फार क्रियाशील असलेल्या सरकारचा मी मित्र नाहीं. नेहमीं असें सरकार दडपशाही करणारें असतें. ( मॅडिसन ह्यांस, १७८७. )

एकतंत्री राज्यकारभाराच्या शैथिल्यापेक्षां... राजकीय मतभेद बरे. ( टी. पिंकनी ह्यांस, १७९७. )

दुसऱ्यावर सत्ता गाजवून कोणता विचारी मनुष्य स्वतः सुखी होऊं शकतो, त्याची मला कल्पनाहि येत नाहीं. ( डी ट्रेसी ह्यांस, १८११. )

लांडग्यांच्या रक्षणाखालीं जगण्यापेक्षां स्वातंत्र्यांतच मेंढरें जास्त सुखीं असतात. ( नोट्स ऑन व्हर्जिनिया, १७८७ ची आवृत्ति. )

अधःपात व जुलूम ह्यांच्याविरुद्ध उपाय योजावयाची उत्तम वेळ, त्यांचा

आपल्यावर पगडा बसण्यापूर्वीची आहे. लांडग्याला आपल्या कळपांत शिरूं देऊन मग तो आपले दांत व नखें काबूंत ठेवील असा त्याच्यावर विश्वास ठेवण्यापेक्षां, त्याला कळपाबाहेर ठेवणेंच चांगलें. ( वरलिप्रमाणें, केरी १३. )

फक्त शासकावर भरंवसा टाकल्यास प्रत्येक सरकारचा अधःपात होतो; फक्त जनतेच्याच हातीं तें सुरक्षित राहातें. ( वरीलप्रमाणें, केरी १४. )

मनुष्याचे जे हक्क जन्मसिद्ध व प्रश्नातीत आहेत, ते सोडले तर जें बदलूं शकणार नाहीं असें कांहींहि नाहीं. ( कार्टराइट ह्यांस, १८२४. )

जनतेच्या अंतिम सत्तेचें रक्षण खुद्द जनतेखेरीज इतर कोणी करील असें मला वाटत नाहीं. ( जार्व्हिस ह्यांस, १८२१. )

लोकप्रिय नियंत्रणाचें प्रजासत्ताकांतील तत्त्व शक्य असेल तितक्या जास्तींत जास्त प्रमाणांत अंमलांत आणलें जावें अशी माझी तीव्र इच्छा आहे. आपलें सरकार शुद्ध आणि शाश्वत होऊं शकेल असा मग मी विश्वास ठेवीन. ( आय्. एच्. टिफेनी ह्यांस, १८१६. )

राष्ट्राला पचेल त्यापेक्षां त्याचें अधिक भलें करूं नये ह्या सोलोनच्या उद्‌गारांतील शहाणपणा आपल्या प्रत्ययास येत आहे. ( डॉ. वॉल्टर जोन्स ह्यांस, १८०१. )

कारभाराला कधींहि गैरस्वरूप आलें तर निवडणुकीच्या आपल्या हक्काच्या मार्गें जनता शांततेनें तो सरळ करील, अशी माझी खात्री आहे. ( विल्सन सी. निकोल्स ह्यांस, १८०६. )

सर्वसाधारणतः समाजाच्या मनावर नव्या कल्पनांचा परिणाम गोगलगाईच्या चालीनें होत असतो. नाखूष झालों तरी आपण हें स्वीकारलें

पाहिजे... आपण योजीत असलल्या प्रत्येक उपायाच्या बाबतींत समाजाला वेळ दिला पाहिजे. ( बार्लो ह्यांस, १८०७. )

आपल्या सत्तेखालीं असलेल्या समाजांतील बहुसंख्यांना सुख देणें हा सरकार ह्या संस्थेचा एकमेव श्रद्धावान् हेतु आहे. ( व्हॅन डेर कँप ह्यांस, १८१२. )

नाहीं, माझ्या मित्रा, चांगलें आणि सुरक्षित सरकार हवें असलें तर तें सर्व एकाच व्यक्तीच्या हातीं देणें हा मार्ग नव्हे, तर अनेकांत त्याची वांटणी करणें हा आहे. ( जोसेफ सी. कॅबेल ह्यांस, १८१६ )

तुम्हांला माहीत आहेच कीं, आम्हां अमेरिकनांची राज्यघटना लोकशाहीची आहे व आम्ही निष्ठेचे लोकशाहीवादी आहों. ( डयुपॉंडी नेम्युअर्स ह्यांस, १८१६. )

जनतेला आपण दोघेहि आपलीं मुलें मानतों... पण तुमचें तिच्यावरील प्रेम ल्हान अर्भकावरील प्रेमासारखें आहे. सोबत दाया असल्याशिवाय तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाहीं. मी त्यांना सज्ञान समजतों आणि स्वयंशासनाचें स्वातंत्र्य देतों. ( वरीलप्रमाणें. )

जनतेच्या नियंत्रणाखालीं असल्याशिवाय कोणतेंहि सरकार सतत चांगलें राहाणार नाहीं. ( ॲडाम्स ह्यांस, १८१९. )

जेव्हां सर्व सरकारें,मग तीं घटक राज्यांचीं असोत, कीं परराष्ट्रांचीं असोत, ल्हानमोठ्या गोष्टींच्या बाबतींत सर्व सत्तेचें केंद्र म्हणून वॉशिंग्टनकडे धांवावयाला लागतील, तेव्हां एका सरकारचें दुसऱ्या सरकारवर नियंत्रण असण्यासाठीं केलेल्या तरतुदी निरुपयोगी ठरतील आणि तें सरकार, आपण ज्या सरकारापासून निराळे झालों त्या सरकारप्रमाणेंच भाडोत्री व जुलमी होईल. ( सी. हॅमंड ह्यांस, १८२१. )

स्वयंशासनाच्या बाबतींत मनुष्यावर विश्वास टाकतां येत नाहीं असें अनेक वेळां सांगण्यांत येतें. मग दुसऱ्यावर शासन करण्याच्या बाबतींत त्याच्यावर विश्वास टाकतां येईल का? का त्याच्यावर राज्य करण्यासाठीं राजांच्या रूपानें पऱ्या आल्या आहेत? ( पहिलें उद्घाटन, १८०१. )

मनुष्यजातीच्या सुखासाठीं जास्तींत जास्त कार्य करणारें, अल्प कालांतरानें होणाऱ्या निवडणुकांतून निवडून येणारें सरकारच प्रातिनिधिक सरकार असतें असा माझा विश्वास असल्यानें त्या तत्त्वाला हानिकारक ठरेल, असें कोणतेंहि कृत्य न करणें हें मी कर्तव्य समजतों. ( व्हर्मांटच्या विधान-सभेस, १८०७. )

मनुष्याच्या शरीरावर आलेल्या फोडांची, त्याची शरीरप्रकृति सुधारण्यास जेवढी मदत होते, तेवढीच मोठ्या शहरांतील जमावांची शासनव्यवस्था शुद्ध राखण्यासाठीं मदत होत असते. ( नोटस् ऑन व्हर्जिनिया, क्वेरी १९. )

## वृत्तपत्रें

सत्य व विचार ह्यांच्या मार्गेंच मनुष्यावर शासन व्हावें. म्हणून सत्य-दर्शन होईल असे सर्व मार्ग त्याला उपलब्ध असावेत हें आपलें पहिलें उद्दिष्ट असावें. असा आजपर्यंत सर्वांत परिणामकारक ठरलेला मार्ग म्हणजे वृत्तपत्र-स्वातंत्र्य होय. ( जज टायलर ह्यांस, १८०४. )

ते ( फेडरॅलिस्ट्स् ) आपलीं वृत्तपत्रें खोट्या, निंदा-नालस्ती करणाऱ्या आणि बेजबाबदार उद्धटपणानें भरलेल्या लिखाणांनीं भरून काढतात... ...त्यांच्या बदनामी करण्याच्या व खोटें लिहिण्याच्या हक्कांचें मी रक्षण करीन. ( व्होल्नी ह्यांस, १८०२. )

सुव्यवस्थित शासन चालविणाऱ्या सरकारला वृत्तपत्रस्वातंत्र्य मानवत नाहीं ह्या विधानांतील खोटेपणा सिद्ध करण्याच्या... एका महान् प्रयोगाचें मी उद्दिष्ट झालों आहें. ( सीमोर ह्यांस, १८०७. )

आमचें स्वातंत्र्य वृत्तपत्रस्वातंत्र्यावर अवलंबून आहे व त्याच्यावर निर्बंध घातले तर तें नष्ट झाल्याशिवाय राहाणार नाहीं. ( डॉ. जे. क्युरी ह्यांस, १७८६. )

अन्याय व जुलूम ह्यांच्यावर विचारीपणा आणि माणुसकी ह्यांनीं जगांत मिळविलेल्या विजयांचें श्रेय, जरी दुरुपयोगांनीं बुजबुजलेलीं असलीं तरी वृत्तपत्रांनाच जातें... अमेरिकेनें स्वतंत्र देश म्हणून आपलें जें स्थान मिळविलें, त्याचा मार्गहि मुख्यतः वृत्तपत्रांनींच प्रकाशित केला होता. ( व्हर्जिनिया आणि केंटकी ठराव, १७९९ )

वृत्तपत्रें हीं राष्ट्राची एकमेव भयसूचक घंटा आहेत. ( थॉमस कूपर ह्यांस, १८०२. )

जेथें वृत्तपत्रस्वातंत्र्य आहे आणि प्रत्येक मनुष्य वाचूं शकतो तेथें सर्व कांहीं सुरक्षित असतें. ( कर्नल यान्सी ह्यांस, १८१६. )

## सार्वजनिक नीतिमत्ता

व्यक्तीप्रमाणेंच राष्ट्रांनासुद्धां, आपल्या हिताचा योग्य विचार करूनहि तें आपल्या नैतिक कर्तव्यापासून निराळें करतां येणार नाहीं... अशी आमची पक्की खात्री पटली आहे. ( दुसरें उद्‌घाटन १८०५. )

इतर शंभर लोकांबरोबर वागतांता मी बदमाषी करीन; पण एकटा वागतांना मात्र प्रामाणिकपणें वागेन असें जो म्हणतो, त्याच्या पहिल्या विधानावर विश्वास बसेल; पण दुसऱ्यावर नाहीं. (मॅडिसन ह्यांस, १७८९.)

माणसांची संपत्ति जशी वाढेल तसा त्यांचा प्रामाणिकपणाहि वाढतो, असें माझ्या निदर्शनास आलें नाहीं. ( जे. मूर ह्यांस, १८००. )

आपले विरोधक चुकीच्या मार्गानें गेले म्हणून आपणहि चुकीच्या

मार्गानें कधींहि जाऊं नये. उलट योग्य तेंच करून आपण त्यांना त्यांनीं काय करावयास पाहिजे होतें तें दाखवूं या. त्यामुळें रागाच्या आहारीं जाण्याच्याऐवजीं आपण विचार व सदसद्विवेकबुद्धि ह्यांच्या आधारावर आपली वागणूक ठरविण्याचा नियम प्रस्थापित करूं. ( जनरल गेट्स् ह्यांस, १८०१ : N. Y. Pub. Lib. Ms, II. p. 8. )

कुठलेंहि राष्ट्र कितीहि सामर्थ्यवान् असलें तरी, व्यक्तीप्रमाणेंच, सतत अन्याय करून त्यांच्या परिणामांतून सुटूं शकणार नाहीं. सुरुवातीला केवळ नैतिक स्वरूपाचें असलेलें जनमताचें हत्यार आज ना उद्यां अशा अन्यायांबद्दल शारीरिक शिक्षा करण्याची संधि साधील. (मॅडिसन ह्यांस, १८०४.)

मुत्सद्दी ह्या नात्यानें जो मनुष्य अप्रामाणिक आहे, त्यानें आयुष्यांत कांहींहि केलें तरी तो अप्रामाणिकच राहील. प्रत्येक व्यक्तीला बंधनकारक असलेलीं नीतितत्त्वें लाखों व्यक्ती एकत्र आल्या कीं, त्यांच्या समुदायास लागूं पडत नाहींत हें म्हणणें चमत्कारिक होय. ( डॉ. जी.लोगन ह्यांस, १८१६. )

आपल्यासारखेच दुसऱ्याला हक्क असतांना, दुसऱ्याच्या त्या हक्कांवर अतिक्रमण करण्याचा नैसर्गिक हक्क कुठल्याहि व्यक्तीस नाहीं. ( फ्रॅन्सिस डब्ल्यू. गिल्मेर ह्यांस, १८१६. )

## धर्म

जें माझें म्हणण्यास मला भीति वाटेल असें एकहि राजकीय किंवा धार्मिक मत मीं कधींहि ठेवलें नाहीं. ( हॉपकिन्सन ह्यांस, १७८९. )

धर्मोपदेशकांनीं कायद्यानें आपल्या गटाची स्थापना करून घेतली व शासनयंत्राचा एक भाग ते स्वतः बनले. मनुष्याच्या नागरिकी व धार्मिक स्वातंत्र्याच्या विरुद्ध चालना देणारे धर्मोपदेशक हे एक मोठें एंजिन आहेत. ( जे. मूर ह्यांस, १८०० : N. Y. Pub. Lib. Ms. 1, 366. )

प्रत्येक मनुष्य व त्याचा निर्माता ईश्वर ह्यांचे आपसांतील संबंध म्हणजेच धर्म असें मी मानीत आलों. ह्या संबंधांत ढवळाढवळ करण्याचा दुसऱ्या कोणालाहि हक्क नाहीं आणि समाजाला तर तो मुळींच नाहीं. ( रश ह्यांस, १८१३ : वरीलप्रमाणें. IV. 164. )

धार्मिक वाद मिटविण्याचा मार्ग म्हणजे त्याची दखल न घेणें ( नोटस् ऑन व्हर्जिनिया. )

जीझसच्या साध्या धर्माचें रूप धर्मोपदेशकांनीं असें विद्रूप करून टाकलें आहे कीं, त्या धर्मतत्त्वांवर त्यांनीं कलम केलेलीं दुर्बोध भाष्यें वाचून ...तीं 'सर्मन ऑफ दि माउंट' देणाऱ्या दैवी उपदेशकानें लिहिलीं आहेत, अशी कल्पना कोणीहि करणार नाहीं. ( डॉ. बी. वॉटरहाउस ह्यांस, १८१५ N. Y. Pub. Lib. Ms, IV, 2–3. )

सर्व धर्मांचें सार त्याच्या सर्वोत्तम उपदेशकानें सांगितलें आहे. तो म्हणतो, 'ईश्वराची भीति ठेवा आणि आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करा.' ह्यांत कसलेंहि रहस्य नाहीं, ह्याला खुलाशाची गरज नाहीं. पण हें असें चालणार नाहीं. कारण त्यानें कुणाला फसवतां येणार नाहीं, धर्मोपदेशकांना त्यावर जगतां येणार नाहीं. ( लोगान ह्यांस, १८१६. )

खरें असें आहे कीं, कॅल्व्हिनिझमच्या प्रणेत्यानें खिश्चन धर्मातील अयुक्तिक गोष्टी काढून टाकण्यापेक्षां त्या आणखी वाढवल्या. ( एस्. हेल्स ह्यांस, १८१८ : N. Y. Pub. Lib, Ms, V, 79. )

आम्हांला वांचविण्यासाठीं आलेला ( खाइस्ट ) केवळ अध्यात्मवाद्यांना वांचविण्यासाठीं आला नव्हता. त्याची शिकवण सोप्यांतल्या सोप्या भाषेंत दिली गेली आहे. खिश्चन तत्त्वांच्या नांवाखालीं जीं रहस्यें आणि विद्वत्तेचें अवडंबर माजविण्यांत येतें, त्यांचा नायनाट करून साध्या व शब्दावडंबर नसलेल्या खाइस्टच्या शिकवणुकीचा पुन्हा स्वीकार करूनच आपण खरे खिश्चन होऊं. ( वरीलप्रमाणें. )

देवांची संख्या वीस आहे किंवा देव अजिबात नाहींच असें माझा शेजारी म्हणाला तर, त्याच्या त्या म्हणण्यामुळें मला कांहीं दुखापत होत नाहीं. त्यामुळें कांहीं माझा खिसा कापला जात नाहीं कीं माझा पाय मोडत नाहीं. ( नोट्स् ऑन व्हर्जिनिया, क्वेरी १७. )

समान श्रद्धा प्रस्थापित करणें शक्य आहे का? खिश्चन धर्मांच्या स्थापनेपासून लाखों निरपराध पुरुष, स्त्रिया व अर्भकें जाळलीं गेलीं, त्यांचा छळ करण्यांत आला, त्यांच्यावर दंड बसविण्यांत आले, त्यांना तुरुंगांत डांबण्यांत आलें; पण समानश्रद्धेच्या दिशेनें आपलें पाऊल इंचभरहि पुढें पडलेलें नाहीं. ( वरीलप्रमाणें. )

राज्यघटनांतील तरतुदींप्रमाणें अमेरिकन सरकारला धार्मिक संस्थांच्या बाबतींत हस्तक्षेप करतां येत नाहीं, असें मला वाटतें... आपलीं कृत्यें, आपली शिस्त किंवा आपलीं तत्त्वें हीं न्यायाधीशानें चालवावींत असें त्याला आमंत्रण देणें धर्माच्या बाबतींत हिताचें ठरेल, असें मला वाटत नाहीं. ( रेव्ह. एस्. मिलर ह्यांस, १८०८ )

नीतितत्त्वांचें पालन करणाऱ्या ज्या पुरातन किंवा आधुनिक पद्धतींचा मीं अभ्यास केला आहे, त्यांतली एकहि जीझसच्या पद्धतीइतकी शुद्ध नाहीं ( डब्ल्यू. कॅन्बी ह्यांस, १८१३. )

सर्व ( धर्मांत ) चांगलीं माणसें नजरेस पडतात. एकांत जेवढीं असतात तेवढींच दुसऱ्यांतहि असतात. ( जे. फिशबॅक ह्यांस, १८०९. )

सारासार बुद्धीनें ज्या कल्पनांचा विचार करावयाचा असतो, त्या कल्पना प्रथम स्पष्ट असावयास पाहिजेत; आणि त्रिमूर्तीची स्पष्ट कल्पना कोणासहि कधींच नव्हती. स्वतःला जीझसचे पुजारी म्हणवून घेणाऱ्या ढोंगी व थापेबाज लोकांची ती निरर्थक बडबड होय. ( व्हॅन डेर कँप ह्यांस, १८१६. )

तीन म्हणजे एक, आणि एक म्हणजे तीन; आणि तरीहि तो एक म्हणजे तीन नव्हेत आणि ते तीन म्हणजे एक नव्हे...हें सारें धर्मोपदेशकांचें कौशल्य आहे. त्यांतच त्यांचें सामर्थ्य, त्यांचा स्वार्थ आहे. धर्मकल्पनांच्या कोळ्याचें हें जाळें झाडून टाका आणि मग धर्मगुरूंना त्यांत माशा पकडतां येणार नाहींत. (ॲडाम्स ह्यांस, १८१३.)

ज्याची आपल्या धर्मस्वातंत्र्यावर श्रद्धा आहे, त्यानें दुसऱ्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आक्रमण न करणेंच त्याला शोभतें. (डॉ. बेंजॅमिन रश ह्यांस, १८०३.)

जीझसला ज्या अर्थानें माणसें ख्रिश्चन व्हावयास हवीं होतीं, केवळ त्याच अर्थानें मी ख्रिश्चन आहें. इतर कुठलींहि तत्त्वें न मानतां मी त्याच्या तत्त्वांशीं प्रामाणिक आहें. (वरीलप्रमाणें.)

असहिष्णुतेला कुठल्याहि कृत्यानें किंवा शब्दानें मी कधींहि शरण जाणार नाहीं किंवा एकाला दुसऱ्याच्या धार्मिक मतांची चौकशी करण्याचा अधिकार आहे, हेंहि मानणार नाहीं. (एडवर्ड डौसे ह्यांस, १८०३.)

प्रत्येक देशांत, प्रत्येक काळांत, धर्मोपदेशकांनीं स्वातंत्र्यास विरोधच केलेला आहे. एकतंत्री जुलमी राजसत्तेची बाजू धर्मगुरु नेहमींच घेत आले आहेत व स्वतःच्या जुलमांवर पांघरूण घालतां यावें म्हणून त्याच्या जुलमांना नेहमींच पाठिंबा देत आले आहेत. (होरॅशिओ जी स्पाफोर्ड ह्यांस, १८१४.)

आपल्या धार्मिक श्रद्धेचा जाब आपण केवळ ईश्वरालाच देऊं लागतों. मी दुसऱ्यांच्या धार्मिक मतांची कधीं चौकशी करीत नाहीं किंवा माझी दुसऱ्यांना सांगत नाहीं. (माइल्स किंग ह्यांस, १८१४.)

दुसरे लोक जीवन कसें जगतात तें पाहून मी त्यांचा धर्म ओळखतों...

कारण आपला धर्म आपल्या वागणुकींत स्पष्ट व्हावा; शब्दांतून नव्हे. ( मिसेस् हॅरिसन स्मिथ ह्यांस, १८१६. )

जर धर्मगुरु आजिबात नसते तर कोणी अश्रद्धहि झाले नसते, असें माझें मत आहे. ( वरीलप्रमाणें. )

( पंथ ) हे ख्रिश्चन धर्मसंस्थेला लागलेलें विष असून, त्यांनीं तिचा नाश केला आहे... ख्रिश्चनराज्य कत्तलखाना बनावेलें. ( रेव्ह. व्हिटेमोर ह्यांस, १८२२. )

जीझसच्या ओंठांतून जशीं बाहेर पडलीं, तशा शुद्ध स्वरूपांतच जर त्याचीं तत्त्वें शिकविलीं गेलीं, तर आजपर्यंत सारें सुसंस्कृत जग ख्रिश्चन झालें असतें. ( डॉ. बेंजामिन वॉटरहाउस ह्यांस, १८२२. )

साक्षात्कार झाल्याशिवाय ईश्वराच्या आस्तित्वाचा पुरेसा पुरावा मिळत नाहीं, ह्या सर्वसाधारण धार्मिक समजुतीमुळें प्रत्येक ख्रिश्चन पंथ निरीश्वरवाद्यांच्या हातीं मोठें शस्त्र देत असतो, असें मला वाटतें ( ॲडाम्स ह्यांस, १८२३. )

ज्या मतांवर माणसाचा विश्वास नाहीं, त्या मतांच्या प्रसारासाठीं त्याला पैसा देण्यास भाग पाडणें हें पाप आहे, तो जुल्म आहे. ( ॲक्टस् फॉर एस्टॅब्लिशिंग रिलिजस् फ्रीडम इन् व्हर्जिनिया, १७८६. )

## क्रांति

अमेरिकन क्रांतीची स्मृति अखंड राहील व ज्यांनीं ती घडवून आणली ते त्या स्मृतींतून अमर होतील. ( डी ॲबरच्युएल ह्यांस, १७८६. )

भौतिक जगांत जशीं वादळें आवश्यक असतात, तसेंच एखादें छोटें बंड राजकीय जगांत आवश्यक असतें. अधून मधून छोटेंसें बंड होणें

चांगलें... शासनसंस्थेची प्रकृति निकोप राहावी म्हणून तें आवश्यक असतें. ( मॅडिसन ह्यांस, १७८७. )

स्वातंत्र्याच्या वृक्षाला अधूनमधून देशभक्तांच्या आणि जुलम्यांच्या रक्ताचें सिंचन करून तो टवटवीत करावा लागतो. तें त्याचें नैसर्गिक खत आहे. ( कर्नल स्मिथ ह्यांस, १७८७. )

जनतेंत प्रतिकाराची इच्छाशक्ति कायम आहे असा इशारा वेळोवेळीं जर शासकांना मिळाला नाहीं, तर जगांतील कोणता देश आपलें स्वातंत्र्य टिकवूं शकेल? त्यांना शस्त्रें उचलूं द्या. ( वरीलप्रमाणें. )

( फ्रेंच राज्यक्रांति ) अयशस्वी झालेली पहाण्याऐवजीं मी अर्धें जग ओसाड झालेलें पाहिलें असतें. फक्त एक आदाम आणि एक ईव्ह अशीं दोघेंच शिल्लक राहिलीं असतीं. आणि तीं पूर्णतः स्वतंत्र असतीं, तर तेंहि जगांतल्या आजच्या परिस्थितीपेक्षां चांगलेंच ठरलें असतें. ( डब्ल्यू. शॉर्ट ह्यांस, १७९३. )

जी पिढी क्रांति सुरू करते, ती क्वचित्‌च ती पुरी करते. ( ॲडाम्स ह्यांस, १८२३. )

## जुलूम

शासनसंस्था आणि धर्मसंस्था ह्या दोहींनीं दुही माजवली, दडपशाही केली आणि जनतेच्या कमाईवर आळशी लोकांना पुष्ट करण्याचे मार्ग शोधून काढले... थोडक्यांत नरभक्षक केवळ अमेरिकेच्या घोर जंगलांतच सांपडतात असें नव्हे, तर प्रत्येक समाजाच्या रक्तावर पुष्ट होत असतात. ( चार्ल्स क्ले ह्यांस, १८१५. )

‘ जेथें वार्षिक निवडणुकांचा अंत होतो तेथें जुलमास सुरुवात होते, ’

हें आमचें त्या दिवशींचें ( १७७६ ) बोधवचन होतें. ( सॅम्युअल अॅडाम्स ह्यांस, १८००. )

मनुष्याच्या मनावर अत्याचार करणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या जुलमाशीं लढावयाची शप्पथ मीं ईश्वरासमोर घेतली आहे. ( डॉ. रश ह्यांस, १८००. )

परराष्ट्रीय संबंधांच्या बाबतींत एकराष्ट्र असलेलीं, पण अंतर्गत कारभाराच्या बाबतींत पूर्णतः स्वतंत्र असलेलीं, लोकांनीं निवडलेल्या विधानसभा व राज्यपाल असलेलीं, वृत्तपत्रस्वातंत्र्यामुळें कारभाराचें पूर्ण ज्ञान असलेलीं सतरा निरनिराळीं घटक राज्यें एका माणसाच्या कावेबाजपणास बळी पडून, आपण होऊन त्याच्या अंकित कधींहि होणार नाहींत. ( डेस्टट डी ट्रेसी ह्यांस, १८११. )

युरोपांत... प्रत्येक मनुष्य दांडा तरी असतो किंवा तो अडकणारा आंकडा तरी असतो, हातोडा तरी असतो किंवा त्याचे दणके खाणारी ऐरण तरी असतो. ( सी. हॅमंड ह्यांस, १८२२. )

जर कधीं हा विशाल देश एकछत्री शासनाखालीं आणला गेला तर तें कृत्य अतिविशाल अधःपाताचें ठरेल. ( वुइल्यम टी. बॅरी ह्यांस, १८२२. )

जुलमाचा परिणाम काय झाला ? अर्धे जग मूर्ख बनविण्यासाठीं आणि उरलेलें ढोंगी बनविण्यासाठीं. ( नोट्स् ऑन् व्हर्जिनिया, क्वेरी १७. )

## युद्ध आणि शांतता

मनुष्याला लष्करी शिस्त पाळणें भाग पाडणें म्हणजे त्याला निष्क्रिय आज्ञाधारकत्वाचें तत्त्व स्वीकारण्यास भाग पाडणें होय. ( जे. हे ह्यांस, १७८८. )

इतर कुठल्याहि तत्त्वापेक्षां सर्वांत जास्त कोणतें तत्त्व जर प्रत्येक अमेरिकनाच्या मनांत खोल रुजलेलें असेल तर तें हें कीं, आम्ही दुसऱ्याचा कुठ-

लाहि देश पादाक्रांत करणाऱ्यांशीं कसलेहि संबंध ठेवणार नाहीं. ( डब्ल्यू. शॉर्ट ह्यांस, १७९१. )

युरोप हा एक वेड्यांचा जमाव आहे असें मी समजतों. त्यांचा सध्यांचा नैतिक अधःपात लक्षांत घेतला तर त्यांची कींव करावी, पण त्यांना टाळावें. वेड्याशीं लढण्यांत शौर्य नसतें. ( डी. बी. वॉर्डन ह्यांस, १८०८: N. Y. Pub. Lib. Ms. 111, 495-96. )

एकाची भूमीवरील व दुसऱ्याची सागरावरील जुलमी सत्ता नष्ट व्हावी इतके ते ( युरोपांतील सिंह व वाघ ) जर एकमेकांना सतावीत असतील तर ते पुन्हा एकत्र येईपर्यंत जगांत कदाचित् शांतता नांदेल. ( डॉ. बेंजामिन रश ह्यांस, १८०३ )

युरोपांतील ज्वालामुखीसारख्या पेटलेल्या परिस्थितींशीं तुलना केली तर आपल्या देशांत दैवी शांतता नांदते आहे असेंच म्हटलें पाहिजे. तेथें लढत असलेल्या राक्षसांच्या पेटत्या चुडी व तलवारी ह्यांच्याशीं तुलना करतां आपले आपसांतील पक्षभेद कांहींच नाहींत. ( टिकूनोर ह्यांस, १८१६ )

ऐहिक आणि आत्मिक जगाला हालवून सोडणाऱ्या ह्या तुफानानें विचारांचे व हक्कांचे बंधारेहि सपाट करून टाकले आहेत. ( सीझर रॉडनी ह्यांस, १८१०. )

आपल्या नागरिकांचें सुख व त्यांची समृद्धि ह्यांची जोपासना करणें हेंच आपल्या सरकारचें कायदेशीर ध्येय आहे व राज्यपालांचें कर्तव्य आहे, असें मी समजतों; जिचा सद्‌गुणाशीं किंवा सुखाशीं कसलाहि संबंध नाहीं अशा प्रतिष्ठेच्या अतिरंजित कल्पनेच्या आहारीं जाऊन, त्यांच्या अधिकाराखालीं असलेला प्रदेश उध्वस्त करणें किंवा त्यांतील माणसांची कत्तल करणें हीं नव्हे. ( कोसियस्को ह्यांस, १८११. )

रशिया व तुर्कस्थान ह्यांच्यांतील युद्ध म्हणजे साप व घार यांची लढा-

ईंच होय. त्यांतल्या कोणी कोणाचाहि नाश केला तरी जगांतला एक विध्वंसक कमी होईल. ( ॲडाम्स ह्यांस, १८२२. )

क्वेकर ( पंथाचें ) धोरण माणसाला किती सुखाचें आहे तें आम्ही सिद्ध करूं अशी मला आशा आहे. लढवय्यापेक्षां अन्नोत्पादन करणाराचें आयुष्य केव्हांहि चांगलें ( वरीलप्रमाणें. )

शांततेच्या मार्गानेंच मानवी समाजाचें जीवन सुखी होऊं शकेल, टिकावू समृद्धि फक्त अशाच पायावर उभी राहूं शकेल. युद्धांत होणाऱ्या हालअपेष्टा व युद्धाचे भयंकर परिणाम हे युद्धानंतरहि बराच काळ भोगावे लागतात अशी खात्री पटल्यावरून मी आपला देश युरोपांतील व आपल्या देशाभोंवतीं सर्वत्र पसरलेल्या संघर्षांत कोणत्याहि गटांत जाऊं दिला नाहीं. ( पीटसबर्गच्या रिपब्लिकनांना, १८०८. )

शांतता आणि समृद्धि यांना सर्वस्वी अनुकूल असलेल्या देशांत व परिस्थितींत आपण ईश्वरकृपेनें जन्माला आलों. मानवाची विटंबना करणाऱ्या आणि जुलमी असणाऱ्या युरोपांतील संघटनांना इथें पाऊल रोंवावयास एकहि कारण मिळण्याची शक्यता नाहीं. ( वॉशिंग्टन कौंटी, पेन्सिल्वानियाच्या रिपब्लिकन प्रतिनिधींना, १८०९. )

एखादें छोटें शहर, एखादा छोटा प्रदेश मिळविण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या दीर्घकालीन युद्धासाठीं जो पैसा खर्च होतो... तोच पैसा जर युद्ध करणाऱ्या राष्ट्रांच्या प्रदेशाची सुधारणा करण्यासाठीं, रस्ते बांधणें, नद्यांतील गाळ काढून त्यांचा प्रवाह मोकळा करणें, बंदरें बांधणें, कलांचा विकास करणें, बेकार गरीबांना कामधंदा देणें अशा कामांसाठीं त्यांनीं खर्च केला तर ( तीं राष्ट्रें ) अधिक सामर्थ्यवान्, अधिक संपन्न अधिक सुखी होतील. मला आशा आहे कीं, आपण ह्याच शहाणपणाच्या मार्गानें जाऊं. ( नोट्स ऑन व्हर्जिनिया, क्वेरी २२. )

* * *

# परिशिष्ट २

## समकालीन व्यक्तींच्याबद्दल मतें

### जॉन ॲडाम्स

तो गर्विष्ठ व चिडका आहे आणि माणसांच्या मनांतील हेतूंचें प्राबल्य आणि त्यांचे परिणाम ह्यांचा त्याला नीट अंदाज करतां येत नाहीं. त्याच्याविरुद्ध एवढेंच म्हणतां येईल. त्याला निर्माण करणाऱ्या ईश्वराइतकाच तो निःस्वार्थी आहे. त्याचीं मतें गाढ विद्वत्तापूर्ण असतात व ज्या बाबतींत व्यवहारज्ञानाची आवश्यकता नसेल त्या बाबतींत त्याचें अनुमान बिनचूक असतें. तो इतका प्रेमळ आहे कीं, मी तर म्हणतों कीं तुझी–त्याची ओळख झालीच तर तूं त्याच्यावर प्रेम करूं लागशील. कॉंग्रेसमध्यें तो एक थोर सभासद होता व होईलहि. (मॅडिसन ह्यांस, १७८७.)

जॉन ॲडाम्स (कॉंग्रेसच्या) सभागृहांत आमचा भव्य पुरुष होता. त्याच्या हालचाली आकर्षक नव्हत्या, त्याचा पोषाख आकर्षक नव्हता, त्याचें वक्तृत्व अस्खलित नव्हतें; पण प्रसंगीं तो असे जोरदार विचार अशा आवेशपूर्ण भाषेंत बोले, कीं उत्तेजित होऊन आम्ही बसल्या जागीं उभे राहायचों. (डॅनियल वेब्स्टर ह्याच्याशीं गप्पा, १८२४)

### सॅम्युएल ॲडाम्स

ध्येयावरील गाढ श्रद्धा, उत्साह व तैलबुद्धि ह्या बाबतींत कॉंग्रेसमधील कोणीहि सॅम्युएल ॲडाम्सपेक्षां सरस नाहीं. कॉंग्रेसमध्यें क्रांतिकारक सुधा-

रणा करण्यांत त्याच्याइतकें कार्य दुसऱ्या कोणींच केलें नाहीं. पण त्याला भाषण मात्र करतां येत नसे. तो चांचरत, अडखळत बोले.. (डॅनियल वेब्स्टर ह्याच्याशीं गप्पा, १८२४.)

इतर कुठल्याहि सभासदापेक्षां त्यानें सर्वांत अधिक महत्त्वाच्या सुधारणा पुढें आणल्या. आणि जरी त्याला अस्खलित किंवा चांगलें बोलतां येत नव्हतें तरी तो जें सांगें तें मोलाचें असे व त्याकडे सर्व सभासदांचें लक्ष वेधलें जाई. (वॉटरहाउस ह्यांस, १८१९ : N. Y. Pub. Lib. Ms, V. 116.)

## रशियाचा १ ला अलेक्झांडर

त्याच्यासारखा सदाचारी व मानवजातीची परिस्थिति सुधारण्यासाठीं उत्साहानें झटणारा मनुष्य मीं पाहिला नाहीं असें मला वाटतें. पण रशियांतील सरदारवर्गाला असा राजा पचण्यासारखा नसल्यानें तो एखाद्या दिवशीं ह्या गुणापायीं बहुतेक बळी पडेल. त्याची बुद्धिमत्ता पहिल्या दर्जाची नाहीं, पण उच्च दर्जाची आहे. (डब्ल्यू. ड्युएन ह्यांस, १८०७.)

तुमच्या चारित्र्याबद्दल मला जो आदरभाव व भक्तिभाव वाटतो तो स्पष्ट करण्याची ही संधि मी घेत आहें. ज्याच्या हृदयांत आपल्या प्रजेचें सुख व समृद्धि ह्यांनाच अग्रस्थान आहे असा तरुण राजा जगाच्या एवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर राज्य करण्यासाठीं गादीवर बसलेला पाहाण्याचें भाग्य मला लाभलें ह्याचें मला आयुष्यभर समाधान वाटेल. (झार अलेक्झांडर १ ला ह्यांस, १८०६.)

## एडमंड बर्क

मिस्टर बर्क ह्याच्यांत झालेली क्रांति पाहून मला जेवढें आश्चर्य वाटतें तेवढें फ्रान्सची राज्यक्रांति पाहूनहि वाटत नाहीं. फ्रेंच राज्यक्रांति ज्या शुद्ध हेतूंनीं झाली, तेवढ्याच शुद्ध हेतूंनीं बर्क ह्याच्यांत क्रांति झाली अशी माझी खात्री पटली असती तर बरें झालें असतें...त्याच्या मनांतील कुजकेपणाचा

हा पुरावा पाहून त्यानें पूर्वी देशभक्तीनें आणि सद्हेतूनें केलेल्या कृत्यांचा हेतूहि दुष्ट होता असें मानणें आपल्याला भाग पडत आहे हें केवढें दुःखद होय. ( बी. वॉघॅन ह्यांस, १७९१. )

### आरॉन बर

त्याच्या वागणुकीमुळें लवकरच मला त्याच्याबद्दल संशय वाटूं लागला. त्याच्यावर फार विश्वास टाकूं नका असें मी मॅडिसनना सांगितलें. ( ॲनस ह्यांस, १८०४. )

तो प्रामाणिक व मोकळेपणानें वागणारा मनुष्य आहे असें मला कधींच वाटलें नाहीं. मला तो वांकड्या झालेल्या बंदुकीसारखा वाटला... अशा बंदुकीच्या नेमाबद्दल किंवा गोळीबद्दल तुम्हांला कधींच खात्री वाटत नाहीं. ( डब्ल्यू. गाइल्स ह्यांस, १८०७. )

छोट्या छोट्यां प्रसंगांत तो थोर पुरुष असल्यासारखा वाटे; पण महत्वाच्या मोठ्या प्रसंगीं मात्र तो छोटा वाटे. ( जी. हे ह्यांस, १८०७. )

### बेंजामिन फ्रँकलिन

आपल्या देशाचें, आणि मी तर म्हणतों कीं, जगाचेंहि मौल्यवान रत्न. ( एम्. ग्रँड ह्यांस, १७९०. )

सर्वांत थोर पुरुष व तो ज्या काळांत व देशांत जगला त्यांचें भूषण. ( एस्. स्मिथ ह्यांस, १७९८. )

अमेरिकन तत्त्वज्ञानाचा प्रणेता. ( जे. वुइल्यम्स ह्यांस, १७९६. )

काळ आपल्या स्मृतिपटलावरून आम्हांला पुसून टाकीत आहे. पण त्याची मात्र सदोदित थोरवी वाढवीत आहे. ( डब्ल्यू. स्मिथ ह्यांस, १७९१. )

फ्रान्सच्या दरबारांत त्याच्या मागोमाग गेल्यामुळें मला आलेला अनुभव म्हणजे विनम्रतेचा एक धडाच होय. अमेरिकेचा वकील म्हणून माझा

कोणाशीं परिचय करून देतांच मला नेहमीं विचारला जाणारा प्रश्न म्हणजे, " महाराज, डॉ. फ्रॅंकलिनच्या जागीं आलेले वकील आपणच आहांत का?" सर्वसाधारणतः मी ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना मी म्हणे, " त्यांची जागा कोणीच घेऊं शकत नाहीं. मी त्यांच्या मागोमाग आलों, एवढेंच." ((?) १७९१.)

## ३ रा जॉर्ज

महाराज, उदार व प्रागतिक विचारांना आपल्या हृदयांत स्थान द्या. इतिहासाच्या पानावर तिसऱ्या जॉर्जच्या नांवानें काळें फांसलें असें म्हणण्याची वेळ येऊं देऊं नका. ( ब्रिटिश अमेरिकेचे हक्क, १७७४. )

इंग्लंडचा राजा वेडा आहे हें सिद्ध झालें आहे. ( वॉशिंग्टन ह्यांस, १७८८. )

जें करूं नये तें नेमकें करण्यांत आपला मित्र जॉर्ज हा वैशिष्टयपूर्ण आहे. ( डॉ. रॅम्से ह्यांस, १७८७. )

बिचारा गरीब वेडा जॉर्ज. ( मॅडाम डि स्टेल ह्यांस, १८१३. )

## ४ था जॉर्ज

थोडें लॅटिन शिकण्यापलीकडे त्याच्या शिक्षणाची मर्यादा गेली नाहीं. पण तो फ्रेंच भाषा बोलतो तेव्हां त्याचे उच्चार निर्दोष असतात... गणित किंवा तत्त्वज्ञान ह्यांच्याशीं त्याची तोंडओळखसुद्धां नाहीं किंवा पृथ्वीच्या पाठीवरील कुठल्याहि शास्त्राचा त्याला गंध नाहीं. ज्यांच्या संगतींत तो असतो त्यांच्याकडून त्याच्यांत असलेली शिक्षणाची उणीव भरून निघण्याची शक्यता नाहीं. ज्यांच्या संगतींत तो असतो ते राज्यांतील सर्वांत हीन, अक्षरशत्रु, बदफैली लोक असून त्यांना सामाजिक दर्जा किंवा बुद्धिमत्ता नाहीं. गप्पांचे विषय नेहमीं घोडे, दारू पिण्याच्या चढाओढी, वेश्यांचीं घरें, असे असतात व भाषा कमालीची अश्लील असते... बुद्धिमान् माणसाशीं

त्यानें कधीं संबंधच ठेवला नाहीं. न्याय, शील, धर्म किंवा माणसांचे हक्क ह्यांबद्दल त्याच्या डोक्यांत एकहि कल्पना शिरत नाहीं. किंवा जग काय म्हणेल ह्याची त्याला क्षणभरहि क्षीति वाटत नाहीं... त्याचें शरीर चांगलें होतें, पण आतां तें ओबडधोबड होऊं लागलें आहे... व्यवहारज्ञान हा त्याच्या देशाचा गुण त्याच्यांत आहे. तो मनमिळाऊ, नम्र आणि आनंदी वृत्तीचा आहे. ( जे. जे ह्यांस, १७८९. )

## अलेक्झांडर हॅमिल्टन

हॅमिल्टन हा रिपब्लिकनविरोधी पक्षाचा शक्तिमान् पुरुष आहे. मोठ्या संख्येचें पाठबळ नसतांनाहि तो अनेक सामान्य माणसांचें काम एकटा करूं शकतो. ( मॅडिसन ह्यांस, १७९५. )

हॅमिल्टन हा खरोखरीच वैशिष्ट्यपूर्ण होता. तो तैलबुद्धीचा, निःस्वार्थी प्रामाणिक, सर्व खाजगी व्यवहारांत सन्मान्य वागणुकीचा, मित्रांशीं प्रेमळ आणि खाजगी जीवनांत सदाचार मानणारा होता. तरीहि त्याच्यावर ब्रिटिश उदाहरणाचा एवढा पगडा बसलेला होता व त्यामुळें त्याचें मन इतकें विकृत झालें होतें, कीं राष्ट्राच्या सरकारांत लांचलुचपत आवश्यक असते ह्याबद्दल त्याची पूर्ण खात्री पटली होती. ( आनस ह्यांस, १८१८. )

## पॅट्रिक हेन्री

तो ज्या समाजांत सतत वागला होता त्याची छाप त्याच्या ओबडधोबड वागणुकींत दिसत असे. त्याला फिडल् वाजविण्याचा, नाचण्याचा आणि थट्टामस्करी करण्याचा विलक्षण नाद होता. थट्टामस्करी करण्यांत त्याचा हात कुणी धरूं शकत नसे व त्यामुळें प्रत्येकाला त्याच्याबद्दल आपलेपणा वाटे. ( डब्ल्यू. विर्ट ह्यांस, १८१५.)

त्याचें वक्तृत्व परिणामकारक व आल्हादकारक होतें. त्याचें भाषण संपल्यावर तो काय बोलला तें सांगणें जरी कठीण जात असे, तरी तो बोलत असतांना मात्र मुद्देसूद बोलतो आहे असें वाटे... त्यानें जवळ जवळ

कांहींच लिहिलें नाहीं— त्याला लिहितां येत नसे... चर्चेसाठींच फक्त त्याचा उपयोग होई. ( डॅनिएल वेब्स्टर ह्यांच्याशीं गप्पा, १८२४. )

कायद्याच्या दृष्टिकोनांतून केलेल्या टीकेंतून बाहेर पडेल असें अगदीं सामान्य विषयावरील बिलसुद्धां त्याला लिहितां येत नसे... त्याच्या डोक्यांतील कल्पना बिनचूक नसत. त्याची कल्पनाशक्ति विपुल, काव्यमय, आल्हाद्कारक, पण अस्पष्टहि होती. सर्वांत उत्तम भाषेंत तो सर्वांत जोमदार गोष्टींबद्दल बोले; पण त्याच्या भाषणांत तर्कशास्त्राचा, योग्य मांडणीचा अभाव असे आणि तो तुटक, विस्कळितपणें बोले. ( विर्ट ह्यांस, १८१२. )

लोकप्रिय वक्ता म्हणून मिस्टर हेन्रीची लायकी... खरोखर फार उच्च दर्जाची होती. त्याच्यासारखें भाषण मीं दुसऱ्या कोणाचेंहि ऐकलें नाहीं. होमर जसा लेखक होता, तसा हेन्री वक्ता होता असें मला वाटलें. ( आत्मचरित्र, १८२१. )

### अँड्रयू जॅक्सन

जनरल जॅक्सनला अध्यक्षपदीं पाहाण्याच्या कल्पनेनेंच मला भीति वाटते. मला माहिती असलेल्या माणसांत अशा पदास तो सर्वांत अयोग्य आहे. राज्यघटनेबद्दल किंवा कायद्याबद्दल त्याला फारसा आदरभाव नाहीं व खरें म्हणजे वस्तुतः तो लायक सेनापति आहे. त्याचा राग भयंकर आहे. मी सिनेटचा अध्यक्ष होतों तेव्हां तो सिनेटचा सभासद होता व त्याच्या भावना इतक्या प्रचंड वेगानें उसळून येत कीं तो कधींहि भाषण करूं शकला नाहीं. त्यानें भाषण करण्याचे पुष्कळ प्रयत्न केलेले मीं पाहिले आहेत; पण प्रत्येक वेळीं राग अनावर होऊन त्याचे शब्द अडकून पडत. आतां त्याचा राग थंड झाला आहे ह्याबद्दल शंका नाहीं... पण त्या माणसापासून धोका आहे. ( डॅनिएल वेब्स्टर ह्यांच्याशीं गप्पा, १८२४. )

### लफायेट

त्याची बुद्धिमत्ता फार चांगली आहे... पण त्याच्यांतला दोष म्हणजे

तो लोकप्रियता आणि प्रसिद्धि ह्यांवर अधाशी मांजरासारखा तुटून पडतो. पण पुढें तो सुधारेल. (मॅडिसन ह्यांस, १७८७.)

## मेरिवेदर लेविस

त्याच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीमुळें तो त्याच्या देशांतील वनस्पति व प्राणी ह्यांचा तज्ज्ञ झाला. हाच गुण त्याला उत्तम शेतकरी व्हावयास उपयोगी पडला असता... त्याचें धैर्य अचाट होतें; आपल्या उद्दिष्टाप्रत जाण्यांत तो इतकें धैर्य व चिकाटी दाखवी कीं तें केवळ अशक्यप्राय असल्याशिवाय तो आपल्या मार्गांतून बाजूला होत नसे. त्याच्या अधिकाराखालीं असलेल्यांची तो बापासारखी काळजी घेई; पण त्यांच्यांत तो शिस्त व सुव्यवस्था राखी. (रेड) इंडियनांच्या स्वभावाचें आणि चालीरीतींचें त्याला चांगलें ज्ञान होतें. शिकाऱ्याच्या जीवनाची त्याला संवय होती. आपल्या देशांतील वनस्पति व प्राणी ह्यांच्या बिनचूक ज्ञानाचा त्याला फायदा होई. आपण ज्यांत यशस्वी झालों आहोंत त्याचें पुन्हा पुन्हा वर्णन करण्याच्या तो विरुद्ध असे. तो प्रामाणिक, निःस्वार्थी, उदार, समजूतदार होता आणि पूर्णतः खरें बोलणारा होता. तो जें कांहीं सांगे त्यावर आपण तें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिल्याइतका विश्वास निःशंकपणें टाकावा. (पॉल ॲलन ह्यांस, १८१३.)

## १६ वा लुई

हा राजा आपल्या राज्यांतील सर्वांत जास्त प्रामाणिक मनुष्य आहे. तो अतिशय नियमित वागणारा व काटकसरी स्वभावाचा आहे.

त्याला व्यापार, काटकसर, सुव्यवस्था व न्याय ह्यांची आवड आहे आणि आपल्या लोकांचें हित करावें असें त्याला मनापासून वाटतें; पण तो स्वभावाचा तापट, उद्धट असून त्याची आकलनशक्ति फार मर्यादित आहे. धर्मवेडा म्हणतां येईल इतका तो धार्मिक वृत्तीचा आहे. त्यानें एकहि बाई ठेवलेली नाहीं, तो आपल्या राणीवर प्रेम करतो आणि तिच्या फार कह्यांत राहातो. (मॅडिसन ह्यांस १७८७.)

लागोपाठ ( कॉंग्रेस आणि कौन्सिल ) ह्यांचा अनुभव घेऊन तयार झाल्यामुळें त्याला आपल्यावर पूर्ण ताबा ठेवण्याची संवय लागली. ह्या संवयीमुळें त्याच्या तेजस्वी, शोधक मनाचा व विशाल ज्ञानभांडाराचा त्याला पुरेपूर फायदा घेतां आला व म्हणून पुढें प्रत्येक संघटनेंत त्याला अग्रस्थान मिळत गेलें... आपला विषय सोडून त्यानें शब्दावडंबर कधींच माजवलें नाहीं. उलट आपला विषय तो शुद्ध, उच्च, समृद्ध भाषेंत स्पष्ट मांडी. आपल्या विरोधकांच्या भावनांवर सौम्य व शिष्टाचारयुक्त भाषेची फुंकर मारून त्यांचा विरोध मऊ करी. १७८७ च्या राष्ट्रीय अधिवेशनांत व त्यानंतरच्या वर्षी व्हर्जिनियांत भरलेल्या अधिवेशनांत तो फार महत्त्वाच्या थोरपदीं चढला... ह्या सर्व गुणांबरोबरच त्याच्या निर्मल शीलाची जोड होती. त्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणें बदमाषांनाहि शक्य झालें नाहीं. ( आत्मचरित्र, १८२१. )

### मारी अँटोनिएट

व्हेटर बर्कनें आपल्या महाकाव्यांत भडकपणें, कांहींशा कल्पना-सौंदर्यानें पण अक्कलहुशारीशिवाय जिचें वर्णन केलें आहे ती ही रक्षक देवता गर्विष्ठ, मनावर ताबा नसलेली होती. तिच्या इच्छेआड येणाऱ्या प्रत्येक अडथळ्यावर ती रागावे, सर्व सुखांचा उपभोग घेण्यास ती नेहमीं उत्सुक असे, व हट्टानें आपल्या मनाप्रमाणें वागे. आपल्या इच्छा पुऱ्या करतांना त्यांत स्वतःचा नाश झाला तरी ती मागेंपुढें पाहात नसे. तिचा जुगारीपणा व उधळेपणा.... हे तिजोरी रिकामी करण्यास कारणीभूत झाले. ( आत्मचरित्र १८२१. )

### जॉन मार्शल

एक धूर्त मुख्य न्यायाधीश. ( रिची ह्यांस, १८२०. )

मार्बरी, बर आणि याझू ह्यांच्या खटल्यांना त्यानें दिलेलें वांकडें वळण पाहिलें म्हणजे आपल्या व्यक्तिगत मताप्रमाणें तो किती धूर्तपणें कायदा वांकवतो तें स्पष्ट होईल. ( मॅडिसन ह्यांस, १८१०. )

माद्यांचें आपल्या मायभूमीच्या सरकारशीं ( हाडवैर ) आहे.

( वरीलप्रमाणें. )

**जेम्स मन्रो**

त्याच्या छातींत हात घाला व त्याचें हृदय उलटें फिरवा तरीहि जगाला त्यावर एकहि डाग दिसणार नाहीं. ( डब्ल्यू. टी. फ्रँकलिन, १७८६. )

सांप्रतच्या व माजी अध्यक्षांवर ( मन्रो व मॅडिसन ) माझा इतका विश्वास होता व अजूनहि आहे, कीं मी त्यांच्या हातांत माझें हृदय व शरीर मोठ्या आनंदानें ठेवीन, ( एन्. मॅकन ह्यांस, १८१९. )

**नेपोलियन**

मी त्याला सर्वांत वाईट मनुष्य समजतों. आजपर्यंत मानवी समाजाला त्याच्याइतकें दुःख कोणी दिलें नाहीं. ( एस. कॅथालान ह्यांस, १८१६. )

ह्या युगांतील ॲटिला आपल्या सिंहासनावरून खालीं खेंचला गेला. दहा लाख मानवांना नष्ट करणारा क्रूर, मानवी रक्ताची ज्याची तहान शमत नव्हती तो, जगांतील मानवी हक्क व स्वातंत्र्य दडपून टाकणारा, आतां एका लहान बेटांत कोंडला गेला... आपल्या उन्मत्त जीवनाचा त्यानें हा कसा दुःखद, हीन शेवट केला!... खरें म्हणजे त्यानें पॅरिसच्या तटावर शत्रूंच्या समशेरीवर प्राणार्पण करावयास हवें होतें. पण बोनापार्ट फक्त रणांगणांतच सिंह होता. त्याच्या नागरी जीवनांत तो थंडपणें, योजना आंखून आपल्या हातीं सत्ता बळकविणारा तत्त्वशून्य माणूस होता. त्याच्या अंगीं एकहि सद्गुण नव्हता. तो मुत्सद्दी नव्हता. व्यापार, राजकीय अर्थशास्त्र किंवा नागरी शासनव्यवस्था ह्यांची त्याला कांहींहि माहिती नव्हती. पोकळ आढ्यतेखोरपणामुळें तो अधिकच अज्ञानी राही. (ॲडाम्स ह्यांस, १८१४. )

मला असें वाटतें कीं, वॉटर्लूच्या लढाईत झालेला पराभव ही फ्रान्सची मुक्ति होय. बोनापार्टला जर विजय मिळाला असता तर त्याची हुशारी,

त्याचा गर्व व नैतिक तत्त्वांचा त्याच्यांत असलेला अभाव ह्यांमुळें लष्करी हुकुमशाही तुमच्या मानगुटीवर कायमची बसली असती. ( लफायेट ह्यांस, १८१६ : N. Y. Pub. Lib., Ms, iv, 369 )

बऱ्या-वाईटाची त्याला मुळींच क्षीति नव्हती. त्यानें ज्या लाखों लोकांचा नाश केला होता त्यांचा, किंवा ज्यांच्या नाशास तो कारणीभूत झाला होता त्यांचा, लूटमार, जाळपोळ आणि दुष्काळ ह्यांमुळें उध्वस्त होणाऱ्या देशांचा आपल्या नागरिकांच्या सम्मतिशिवाय ज्या राज्यकर्त्यांना त्यानें देशोधडीला लावलें त्यांचा,... जे प्रस्थापित समाज तोडूनमोडून ते विभागून आपल्या लहरीप्रमाणें ज्यांची जोड त्यानें केली त्यांचा, आपले हक्क आपल्याला परत मिळतील, आपली परिस्थिति सुधारेल अशा समाजाच्या आशा-आकांक्षांचा त्यानें जो चुराडा केला त्यांचा आणि अशाच, त्यानें लादलेल्या असंख्य प्रचंड आपत्तींच्या मालिकेचा विचार केला असतां, अशीं कृत्यें करणें हा गुन्हा होत नाहीं असें म्हणणारा मनुष्य हा नीतिहीन राक्षसच आहे, असें मी म्हणतों. अशा राक्षसाला ठार करण्यासाठीं प्रत्येक मनुष्यानें आपला हात उचलावयास पाहिजे होता. ( ॲडाम्स ह्यांस, १८२३. )

त्यानें केलेल्या जुलमांचें जें प्रायश्चित्त तो आज भोगीत आहे, त्यामुळें प्रत्येक सदाचारी माणसांस बरें वाटत असलें पाहिजे. त्यामुळें ईश्वराचें अस्तित्व सिद्ध झालें. ईश्वर न्यायी आहे आणि जगांत काय चालतें त्यांकडे दुर्लक्ष करीत नाहीं हेंहि सिद्ध झालें. ह्या अमानुष पाप्याला खूप खूप आयुष्य मिळावें, दीर्घकाळ भरपूर यातना त्याला भोगाव्या लागून, त्याच्या अत्याचारांचें माप त्याच्या पदरीं पुरेपूर पडावें हीच आपली इच्छा असणार. पण माणसांच्या स्वातंत्र्यावर व सुखावर घाले घालण्याचा जो अत्याचार त्यानें केला, त्याच्याबरोबरच्या पिढीला त्यानें ज्या दुःखाच्या खाईंत लोटलें व भविष्यकाळीं जन्माला येणाऱ्या पिढ्यांच्या हातापायांत एकतंत्री अंमलाच्या बेड्या ठोकून त्यांना जखडून ठेवलें. ह्या अत्याचारांचें

पापक्षालन त्याला कोणत्या यातनांचें प्रायश्चित्त घेऊन करतां येणार आहे. ( टिक्नोर ह्यांस, १८१७ )

## मॅडाम नेकर

मॅडाम नेकर फार प्रामाणिक व चांगली बाई होती; पण तिच्याशीं बोलणें फारसें आल्हाददायक वाटत नसे. कारण आपण व्हर्जिनियांत ज्याला 'बज' म्हणतो अशा संवयीची, म्हणजे बोलतांना ती फार बावरून, चांचरत बोलणारी होती. एका जागीं फार वेळ बसणें किंवा एका विषयावर बराच वेळ बोलणें तिला जमत नसे. जेवण चालू असतांना पांच-सहा वेळां आपल्या जागेवरून उठून आपल्या भोजनालयांत येरझारा घालून ती स्वतः-च्या मनावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत असल्याचें मला आठवतें. ( डॅनिएल वेब्स्टर ह्याच्याशीं गप्पा, १८२४. )

## थॉमस पेन

आपल्या जीवनकाळांत पाद्यांशीं व कर्मठ यहुदी धर्मगुरूंशीं शत्रुत्व पत्करण्यांत ते ( लार्ड बोलिंब्रोक आणि पेन ) सारखेच होते. दोघेहि प्रामाणिक होते, दोघेहि मानवी स्वातंत्र्याचे प्रचारक होते. सुबोध व सुडौल शैलीनें सहजपणें लिहिण्यांत, मनाचा ठाव घेणाऱ्या भाषेंत विचार मांडण्यांत, आपला मुद्दा सहजसुंदर रीतीनें स्पष्ट करण्यांत आणि सोपी सुबोध भाषा लिहिण्यांत पेनला एकाहि लेखकानें मागें टाकलेलें नाहीं. त्याच्या ह्या गुणाबाबत त्याची डॉ. फ्रँकलिन ह्यांच्याशीं तुलना होऊं शकेल. ( एफ्. एपेस ह्यांस, १८२१. )

पेननें वाचनापेक्षां मनन अधिक केलें. ( जे. कार्टराइट ह्यांस, १८२४. )

## जॉर्ज वॉशिंग्टन

अगदीं पहिल्या दर्जाचें नसलें तरी त्याचें बुद्धिसामर्थ्य मोठें आणि प्रभावी होतें. त्याची निरीक्षणशक्ति जरी न्यूटन, बेकन किंवा लॉक ह्यांच्या दर्जाची नसली तरी सूक्ष्म होती. त्याचे निर्णय अचूक असत. त्याच्या मनाची

क्रिया मंद असे; कारण ह्या मनाला जोराची चालना देणारी शोधक बुद्धि किंवा कल्पनाशक्ति त्याला नव्हती. पण आपल्या निर्णयाबद्दल त्याला खात्री वाटे... त्याला दिलेल्या सर्व सूचना तो ऐकून घेई; पण त्यांतल्या फक्त सर्वांत उत्तम असलेल्याच तो स्वीकारी; आणि खरोखरीच त्याच्याप्रमाणें आपल्या लढायांची इतकी विचारपूर्वक आंखणी दुसरा कोणताहि सेनापति करीत नसेल. पण युद्धाच्या धुमश्चक्रींत जर त्याची योजना विस्कळित झाली... ...तर तिची पुनर्रचना करण्यांत मात्र तो मंद असे. त्याला कधींच भीति वाटत नसे. स्वतःवर आलेल्या संकटांना न घाबरतां शांतपणें तो तोंड देई.

त्याच्या स्वभावांतील सर्वांत प्रभावी गुण म्हणजे त्याचें दूरदर्शित्व. विचारपूर्वक प्रत्येक परिस्थितीचा व अडचणीचा विचार केल्याशिवाय तो कांहींहि आचरणांत आणीत नसे...त्याचें चारित्र्य शुद्ध होतें. त्याची न्याय-बुद्धीहि निग्रही होती. स्वार्थ, रक्ताचें नातें, मैत्री किंवा तिरस्कार ह्यांचा त्याच्या निर्णयावर कांहींहि परिणाम होत नसे. खरोखरीच तो प्रत्येक अर्थानें शहाणा, चांगला, थोर पुरुष होता. तो साहजिकच लौकर चिडे; पण आपल्या चिडखोरपणास त्यानें विचाराचा आणि निर्धाराचा ताबा ठेवला होता. पण जेव्हां त्याचा राग हीं बंधनें तोडी, तेव्हां मात्र त्याचा राग भयंकर असे.

पैसे खर्च करण्याच्या बाबतींत तो आपल्या प्रतिष्ठेप्रमाणें वागे; पण तो स्वभावानें हिशेबी होता. उपयुक्त ठरलेल्या कार्याला तो उदार हातानें पैसे देई; पण स्वप्नाळू योजना किंवा अयोग्य मागण्या तो धुडकावून लावी व त्यांना कधींहि सहानुभूति दाखवीत नसे. हृदयाचा तो प्रेमळ नव्हता, पण तो प्रत्येक माणसाची लायकी बरोबर ठरवी व त्या लायकीच्या प्रमाणांत त्या माणसाशीं मनापासून आदरानें वागे.

तुला माहीत आहेच कीं, त्याचें शरीर छान होतें. हवी तेवढीच त्याची उंची होती. ताठ, सहजतेनें आणि मोठ्या रुबाबानें तो चाले. त्याच्या काळांतील तो सर्वांत उत्तम घोडेस्वार होता व घोड्यावर बसला कीं तो फार रेखीव, रुबाबदार दिसे.

आपल्या मित्रमंडळींत असला व निर्भयपणें बोलणें शक्य असलें म्हणजे तो मोकळ्या मनानें गप्पा मारी. पण त्याचें संभाषणकौशल्य अगदीं सामान्य प्रतीचें होतें. कल्पनांचें वैपुल्य किंवा भाषेची सहजता त्याच्यांत नव्हती. जाहीर रीतीनें, ताबडतोब मतप्रदर्शन करण्याचा त्याच्यावर प्रसंग आला तर तो बेसावध असे, गोंधळून जाई व फारच थोडें बोले. लिहितांना मात्र तो सहजपणें, जरा विस्तारपूर्वकच, सोप्या आणि निर्दोष शैलीनें लिही. जगांतील अनेक व्यक्तींशीं बोलण्याचा सराव असल्यामुळें त्याला असें लेखन शक्य होई. कारण त्याचें स्वतःचें शिक्षण, वाचन–लेखन व साधें अंकगणित एवढेंच झालेलें होतें. पुढें जमीन मापण्याचें शिक्षणहि त्यानें घेतलें. त्याचा बहुतेक वेळ लढायांत जाई. तो फारच थोडें वाची व हें त्याचें वाचनहि शेती व इंग्लंडचा इतिहास ह्या विषयांपुरतेंच मर्यादित असे... तो घरीं असला म्हणजे त्याचा बहुतेक वेळ शेतीच्या व्यवहारांत जाई.

एकंदरींत त्याचा स्वभाव चांगला होता. त्याच्या स्वभावांत वाईट कांहींच नव्हतें. कांहीं बाबतींत तो उदासीन असे; पण खरें म्हणावयाचें तर मनुष्याला थोर बनवतांना आणि त्याची स्मृति चिरकाल राहील अशा उच्च स्थानावर त्याला नेऊन बसवतांना निसर्ग व नशीब ह्यांचा संगम इतक्या पूर्णत्वानें पूर्वी कधींहि झाला नव्हता.

(डॉ. डब्ल्यू. जोन्स ह्यांस, १८१४.)

## डॅनिएल वेब्स्टर

मिस्टर वेब्स्टर ह्यांची ओळख झाल्यामुळें मला खूप समाधान वाटलें. आपल्या सरकारांत त्यांचें वजन खूप वाढण्याचा संभव आहे.

(मन्रो ह्यांस, १८२४.)

## जॉर्ज विद्

आपल्या चारित्र्याची इतकी आदरणीय स्मृति जॉर्ज विदखेरीज कोणीहि ठेवली नाहीं. त्याचें शील शुद्ध होतें. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल केव्हांहि संशय नव्हता. तो योग्य न्याय देई. हृदयाचा तो खरा देशभक्त

होता. मानवी स्वातंत्र्याच्या व मनुष्याच्या नैसर्गिक व समान हक्कांच्या रक्षणाच्या कामीं त्यानें स्वतःस वाहून घेतल्यानें त्याला आपल्या देशाचा कॅटो म्हणतां येईल. पण रोमन कॅटोसारखा तो लोभी नव्हता. त्याच्याइतका निःस्वार्थी मनुष्य सांपडणें अशक्य.

( जे. सॉंडर्सन ह्यांस, १८२०. )

—★★★★★★★★★★★—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
93904
REFBK-0013105

## नवलेखन प्रकाशनें :

| | |
|---|---|
| चांदण्याचा सुगंध | अच्युत बर्वे |
| कांचपात्रें | विजय तेंडुलकर |
| नखरेला | वसंतकुमार सराफ |
| खरं खोटं | सदाशिव आठवले |
| लोंबकळणारीं माणसं | वसंत पुरुषोत्तम काळे |
| जिद्द | क. दि. सोनटक्के |
| कोंडी | ज्ञानेश्वर नाडकर्णी |
| काशभट | मंगेश पद्की |
| माझा नाटकी संसार | मामा वरेरकर |